२०६ इतिहास

स्थळ प्रत
सं. इतिहास
ता

संगीत

# शास्त्रकार व कलावंत

यांचा

# इतिहास.

४३२५

लक्ष्मण दत्तात्रेय जोशी,
बी. ए., एलएल्. बी., वकील, पुणें.

REFBK-0005327

[पुनर्मुद्रण वगैरे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें
स्वाधीन ठेविले आहेत.]

शके १८५७] किंमत १.

मुद्रक:-
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए.
आर्यभूषण प्रेस, घ. नं. ९३६।२,
भांबुर्डा, पुणें.

प्रकाशक:-
श्री. लक्ष्मण दत्तात्रेय जोशी,
बी. ए., एल्एल्. बी. वकील,
४८९ शनवार पेठ, पुणें.

२०६ इंग्रजी

# प्रस्तावना.

आधुनिक शिक्षणामध्यें एकाद्या विषयाकडे पाहाण्याची व त्याचा अभ्यास करण्याची एक विशिष्ट पद्धति आहे ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. एकादा विषय शिकावयाचा तर त्या विषयाचें ऐतिहासिक समालोचन व त्या विषयांचे शास्त्रकार, लेखक, कलावंत वगैरे तज्ज्ञांचीं चरित्रें व कामगिरी वगैरे गोष्टींचा अभ्यास करणें हा या पद्धतींतील एक सर्वमान्य व उपयुक्त असा भाग आहे.

सुमारें शेंसव्वाशें वर्षांपूर्वी संगीत विषयाकडे ज्या नजरेनें शिष्ट व सभ्य समाज बघत असे, तो समाजाचा दृष्टिकोण सांप्रत बदललला आहे, यांत शंका नाहीं सभ्य समाजानें अभ्यास करण्यास हरकत नाहीं अशा लायकीची ही एक ललित कला आहे; परंतु आजपर्यंत संस्कृति, शिक्षण व सामाजिक दर्जा या दृष्टींनीं कमी असलेल्या व दुर्गुणी लोकांच्या मगरमिठींत ती असल्यानें संगतिदोषामुळें त्या कलेला कमीपणा आला होता व सभ्य समाजांत तिला तितकासा मान व प्रतिष्ठा नव्हती; तरी त्या स्थितींतून या कलेला सोडवून तिची उन्नति करावी अशा भावनेनें सुशिक्षित व सभ्य लोक आज जवळ जवळ पंचवीस वर्षें प्रयत्न करीत आहेत व त्यांच्या या प्रयत्नाला यश येण्याचीं चिन्हें दिसत आहेत ही कला अशा तऱ्हेनें सुशिक्षितांच्या कक्षेंत येऊं लागल्यामुळें तिच्याकडे इतर विद्येकडे पाहण्याच्या दृष्टीनेंच लोक पाहूं लागले आहेत आणि इतर विद्येसारखा व त्या तोडीचा दर्जा हळू हळू तिला प्राप्त होऊं लागला आहे. अर्थात् इतर विद्येच्या अभ्यास-पद्धतीचा अवलंब या विद्येचे कामींहि होऊं लागणें क्रमप्राप्त आहे. साहजिकच या विद्येचा यथायोग्य अभ्यास होण्यासाठीं या कलेची सांप्रत स्थिति काय आहे याचा अदाज यावा म्हणून तिचें ऐतिहासिक समालोचन करणें जरूरीचें झालें आहे, हें कोणींहि विचारी मनुष्य कबूल करील. उपरिनिर्दिष्ट हेतूसाठीं व त्याच दृष्टीनें लेखकानें प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत पुस्तकाची सामान्य रूपरेखा खालीलप्रमाणें आहे.

या पुस्तकाचे शास्त्रकार, गायक, वादक, नर्तक आणि स्त्रिया असे एकदर पांच भाग आहेत. आरंभीं उपोद्घात असून कोणतेंहि नाव सुलभतेनें सांपडावें यासाठीं शेवटीं नावाची सूचि जोडिली आहे.

उपोद्घातामध्यें संगीताचें ऐतिहासिक सामान्य समालोचन स्थूलमानानें केलें आहे. त्यांत निरनिराळ्या कालखंडांमध्यें लोकरुचि व इतर देशकालपरिस्थिति या मुळें काय व कसा फरक झाला अगर भर पडत गेली याचें स्थूल दिग्दर्शन केलें आहे. तसेंच गायनाच्या निरनिराळ्या पद्धति दाखविणारे त्याचे प्रकार व त्याची घडामोड आणि गवयांच्या गायनकौशल्याचें दिग्दर्शन करणारीं अशीं निरनिराळीं वळणें दाखविणारीं त्यांचीं घराणीं अथवा पटडी याची माहिती दिली आहे. पुढील पांच भागांत क्रमानें शास्त्रकार, ग्रंथकार, ध्रुवपद, धमार, ख्याल, टप्पा, ठुमरी, लावणी वगैरेंसारख्या चीजा गाणारे कलावंत; बीन, सतार, सुरसिंगार, रबाब, जलतरंग, हार्मोनियम, पखवाज, तबला वगैरे वाद्यें वाजविणारे वादक व नर्तनकलेंत नांव मिळविणारे नर्तक व या सर्व कलांमध्यें कुशल असलेल्या स्त्रिया, अशा सुमारें ४५० वर व्यक्तींच्या चरित्राचा समावेश केला आहे. या साडेचारशें व्यक्तींमध्यें इ. स. च्या चवथ्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंतच्या काळांतील व्यक्ती आल्या आहेत. तसेंच श्रीमंत नानासाहेब पेशव्यांपासून तों दुसरे बाजीराव-साहेबांपर्यंत पेशवाईंत होऊन केलेल्या व ऐतिहासिक कागदपत्रांतून ज्यांची माहिती उपलब्ध झाली अशा गुणी जनांचा अंतर्भाव प्रस्तुत पुस्तकांत केला आहे.

या पुस्तकांतील माहितीचें कामीं लेखकाचे वडील **पं. द. के. जोशी** यांचें जें अमोलिक साहाय्य झालें आहे त्याचा कृतज्ञता व अभिमानपूर्वक उल्लेख करणें लेखकाचें अवश्य कर्तव्य आहे. त्यांचा संगीतविषयक अभ्यास आज जवळजवळ ४० वर्षांवरचा आहे. आधुनिक दृष्टि व ऐतिहासिक गोष्टींची आवड असल्यानें जेव्हां जेव्हां त्यांना अशी कांहीं माहिती मिळण्याची संधि आली त्याचा त्यांनीं त्या दृष्टीनें उपयोग करून घेतला, व सुदैवानें त्यांना तशा प्रकारच्या अनेक संधी मिळल्या. ते ' पुणें गायन समाजा ' चे ऑनररी सेक्रेटरी होते त्यामुळें पुष्कळ गवई व या कलेची आवड असणारे लोक यांच्या त्यांच्या गांठीभेटी पडल्या व संबंध आले. तसेंच विष्णुपंत छत्रे, बाळागुरुजी, निसार हुसेनखां वगैरे लोकांचा व त्यांचा चांगला स्नेह असल्यामुळें यांच्या त्यांच्या पुष्कळ गप्पागोष्टी होत व बोलतां बोलतां ही मंडळी इतर कलावंत व गवई यांबद्दल अनेक वेळां माहिती सांगत, त्या माहितीचीं यांनीं टिपणें करून ठेविलीं होतीं. शिवाय ' अखिल भारतीय संगीत परिषदां 'चे करितां बडोदा, दिल्ली, काशी, लखनौ, इंदोर इत्यादि ठिकाणीं व महाराजांच्या निमंत्रणावरून नाभा, ग्वाल्हेर, रामपूर वगैरे संस्थानांत जाण्याचा, तसेंच तेथील अनेक कलावंतांच्या प्रत्यक्ष भेटीचा व त्यांची कला

प्रत्यक्ष पाहण्याचा यांना योग आला त्या वेळीं तेथेंहि याविषयीं बरीच माहिती मिळालेली आहे. तसेंच काशी व रामेश्वर या यात्रा केल्या त्यावेळींहि त्यांनीं ही माहिती मिळविण्याची आवड दृष्टीआड होऊं दिली नाहीं. लखनौ येथील 'मॉरिस कॉलेजांत दोन वर्षे मुक्काम असल्यानें तेथेंहि त्यांना एतद्विषयक बरीच माहिती मिळवितां आली. प्रस्तुत लेखकहि दक्षिण हिंदुस्थानामध्यें हिंडला असून खुद्द लखनौमध्यें सहा महिने मुक्काम करण्याची संधि त्यांस मिळाली होती. अशा प्रकारें अनेक निरनिराळ्या व्यक्ती व ठिकाणें यांपासून मिळविलेल्या व जमविलेल्या माहितीवरून सदर पुस्तकांतील चरित्रें लिहिण्याचें काम केलें आहे.

शिवाय, या कामीं लेखकाच्या वडिलाचे ज्ञानकोशांतील लेख, मादनुल मुसकी, राजा एस् एम्. टागोर यांचें पुस्तक, ऐतिहासिक कागदपत्र वगैरे पुस्तकांचा लेखकास उपयोग झाला आहे व त्याबद्दल या सर्व लेखकाचा तो आभारी आहे.

या पुस्तकांतील चरित्रलेखनाचे कामीं लेखकास मिळालेल्या माहितीपैकीं विश्वनीय वाटली अशाच माहितीचा, शक्य तितकी तारतम्यबुद्धि व सारासारविचार ठेवून त्यानें उपयोग केला आहे. लेखक हा कोणत्याहि एकाद्या विशिष्ट पक्षाचा अभिमानी नाहीं; केवळ त्रयस्थ अशीच त्याची भूमिका आहे. त्याला एकाद्याबद्दल फाजील आदर अगर निष्कारण तिरस्कार असण्याचें काहीं कारण नाहीं परंतु त्याला जें प्रामाणिकपणानें वाटलें व योग्य दिसलें तें आपलें मत त्यानें स्पष्टपणानें नमूद केलें आहे इतकेंच.

प्रस्तुत पुस्तकात दिलेली माहिती परिपूर्ण अगर बिनचूक आहे असा लेखकाचा बाणा केव्हांहि नाहीं व तो असणें योग्यहि नाहीं. कारण जेथें मोठमोठ्या राजकारणधुरंधर व विद्वान् अशाहि लोकांच्या चरित्राबद्दल वाद उत्पन्न होऊन त्या कामीं बिनचूकपणा अगर परिपूर्णता आढळत नाहीं तेथें बिचाऱ्या कलावंताच्या चरित्रांतील माहितीची काय कथा ! असो तथापि प्रस्तुत लेखकास पुस्तकांत दिलेली माहिती कशी अपुरी अगर चुकीची आहे हें साधार दाखवून ती योग्य प्रकारें कशी परिपूर्ण व दुरुस्त करावयाची याची साधार माहिती जो कोणी देईल त्याबद्दल लेखक त्याचा आभारी होईल, व पुढील आवृत्तीचे वेळीं ती दुरुस्ती खास अमलांत आणील.

चरित्राचा क्रम ठरविण्यांत साधारणपणें काल, नातें व गुरुपरंपरा वगैरे गोष्टी डोळ्यापुढें ठेविल्या आहेत.

प्रस्तुतसारख्या पुस्तकामध्यें फोटो असणे अवश्य अशीच बरेच लोकांची अपेक्षा आहे; परंतु ही गोष्ट दोन तऱ्हेनें गैरसोयीची आहे. जुन्या लोकांचे फोटो मिळणें अशक्य आहे. जीं माणसें आज नजरेसमोर आहेत अगर ज्यांचे फोटो इतरत्र मिळणें संभवनीय आहे त्याच्या फोटोंचा अंतर्भाव पुस्तकांत करून उपयुक्ततेच्या दृष्टीनें पुस्तकाची किंमत वाचकांच्या आवांक्याबाहेर घालविणें लेखकास इष्ट वाटत नाहीं.

शेवटीं, आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजर श्री पटवर्धन व श्री. विठ्ठलराव बर्वे यांनीं या पुस्तकाचें काम सुबक व लवकर करून दिल्याबद्दल त्याचे आभार मानणें योग्य आहे.

अशा प्रकारचें दुसरें एखादें पुस्तक लेखकाच्या पाहाण्यांत नाहीं, तरी हा अभिनव प्रयत्न संगीतप्रेमी व संगीतव्यवसायी लोकांस आवडेल व उपयोगी ठरेल असा लेखकास पूर्ण भरवंसा आहे.

४८९ शनवार पेठ,<br>
पुणें शहर.<br>
१४ जून १९३५.

लक्ष्मण दत्तात्रेय जोशी.

मराठी ग्रंथसंग्रहालय
स्थळ प्रत
सं. ३ न ८०५
ता.
मराठी ग्रंथ संग्रहालय
५३२


# उपोद्घात.

कोणत्याहि गोष्टीच्या उत्क्रांतीच्या व प्रगतीच्या ऐतिहासिक समालोचनाची यथायोग्य व नीटशी कल्पना येण्यासाठीं तिचा उगम व प्रारंभ यांपासून आजलागायतच्या तिच्या स्थितीचें विहंगम दृष्टीनें निरीक्षण करणें अवश्य व योग्य असतें.

सजीवसृष्टींमध्यें प्राणी व प्राण्यांत मनुष्य श्रेष्ठ, अशी ही श्रेणी आहे. सजीव प्राण्याला व विशेषतः मनुष्याला बऱ्याच भावना व मनोविकार असतात. या मनोभावनांची तृप्ति व वाढ यांसाठीं मनुष्याची सारखी धडपड चालू आहे, व त्यांतच त्याचें कौशल्य व श्रेष्ठत्व दिसून येतें. मनोभावनांच्या तृप्तीसाठीं मनुष्यानें आजपर्यंत निरनिराळे विषय व कला यांचा शोध लाविला आहे व वाढ केली आहे. ज्या विशिष्ट मनोभावनांच्या समाधानाकरितां व तृप्तीसाठीं मनुष्यानें जे विशिष्ट विषय काढिले, वाढविले व उत्पन्न केले, त्या विषयांबद्दलची मनुष्याची आवड, त्या विषयांचें कोणत्याना कोणत्या स्वरूपांत अस्तित्व आणि ते विशिष्ट मनोविकार, यांचें बहुशः साहचर्य असतें, असें म्हणणें चुकीचें नाहीं. थोडक्यांत म्हणावयाचें तर, मनुष्य प्राणी अस्तित्वांत आल्या वेळेपासून संगीताची अपेक्षा व उत्पत्ति झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

मनुष्याचा नेहमींचा बोलण्याचा स्वर एक ठराविक असतो. पण आपली मनोभावना स्पष्ट करण्याकरितां व मनोविकाराचें स्वरूप इतराच्या ध्यानीं नीट आणून देण्याकरितां घोगऱ्या आवाजापासून तों कर्कश ओरडण्यापर्यंत उच्चनीच आवाज व भीतिदायक प्रसंगांतील तुटक अस्पष्ट आवाजापासून आनंदातिशयाच्या अगर गुर्मीच्या अरेरावी, कठोर व जोरदार आवाजापर्यंत स्वराच्या निरनिराळ्या छटा मनुष्य प्रसंगानुरूप व्यवहारांत वापरीत असतो, अशी वस्तुस्थिति आहे. पण त्या वेळीं अशा प्रकारचा स्वर वापरला म्हणजे त्याचा असा परिणाम होतो व त्यासाठीं तो तसा स्वर काढितो असें मात्र नव्हे तर मनुष्य आपल्या मनोभावना व मनोविकार व्यक्त करूं लागला म्हणजे तशा विशिष्ट तऱ्हेच्या स्वरस्वरूपांत ते आपोआपच प्रगट होत असतात. मानव समाज उत्पन्न होऊन जसजसा वावरूं लागला त्या मानानें त्यामध्यें समंजस, विचारी व ज्ञानी लोक उत्पन्न झाले व मानवाच्या निर्वाहाचा प्रश्न सोडविल्यावर एकंद-

रीत त्याचें सुख, स्वास्थ्य व बौद्धिक आणि मानसिक अपेक्षा, गरजा व त्यांची तृप्ति यांच्याविषयीं ते लोक विचार करूं लागले विचाराअंतीं स्वरभिन्नतेचा व्यवहारात घडत असलेला हा परिणाम त्यांचे नजरेंत आला व त्या दृष्टीनें या विषयांचा ते अधिक विचार करूं लागले.

निरनिराळीं शेंकडों वैयक्तिक उदाहरणें घेऊन त्यावरून एक सामान्य नियम काढावयाचा व त्या सामान्य तत्त्वाचे दृष्टीनें मग वैयक्तिक गोष्टीची पारख करावयाची, हा ज्ञानप्राप्तीचा सर्वसमत व महत्त्वाचा सिद्धांत आहे या सिद्धांताच्या अनुरोधानें भिन्न स्वराच्या परिणामावरून एक नवी कल्पना त्यांस सुचली; व तीमुळें गायनाच्या सांप्रतच्या स्वरूपाचा अतिशय स्थूल मानानें उगम झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणचीहि गोष्ट नीट सुसंघटित व व्यवस्थित रूपांत येण्याचे अगोदर ती बराच काळ रूढ असावी लागते; अर्थात् त्या विषयाच्या शास्त्राचा उगम प्रथमतः अनमानधक्यानें बसविलेल्या कल्पनांत असतो मनुष्याला प्रथमतः जें Empirical ज्ञान असतें त्याचेंच झाडून झटकून मग शास्त्र बनत असते. Systematised Knowlegde सुव्यस्थित रीतीनें संघटित केलेलें ज्ञान म्हणजे शास्त्र होय. अर्थात् ही सुसंघटित स्थिति येण्यास तें अगोदर अस्तित्वांत असून बराच काळ रूढ असलें पाहिजे हें उघडच आहे.

संगीतांतील मुख्य घटक जो स्वर त्याच्या परिणामाची म्हणजे अर्थात् गायनाची कल्पना प्रथम वर दर्शविल्याप्रमाणें उद्भूत झाली व मग त्याचें क्रमानें शास्त्र बनूं लागलें. ज्या गोष्टीवरून गायनाची मूळ कल्पना सुचली तोच गायनाचा खरा मुख्य हेतु व ध्येय आहे; तोच साध्य होण्यासाठीं आजपर्यंत गायनाची खटपट चालूं आहे, व त्या दृष्टीनें वाढ होत आहे. परतु अजून तो हेतु मात्र साध्य झालेला दिसत नाहीं. गायनाचा उगम अशारीतीनें analytical method नें झालेला आहे असें दिसतें, ही कल्पना एकदां उद्भूत झाल्यावर हळूहळू त्या दिशेनें विचार व प्रयत्न होऊन त्यांत भर पडत गेली. होतां होतां गायनोपयोगी अशा सात स्वरांची उत्पत्ति झाली. अर्थात् ही मजल येण्याला बराच काळ लोटला असणें साहजिक आहे.

'पाणिनीय शिक्षा' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या ग्रथांत सात स्वरांचीं नांवें दिलीं आहेत शिवाय त्या सात स्वरांचे उदात्त, अनुदात्त व स्वरित असे तीन भेदहि त्यांत वर्णिले आहेत. यावरून त्या वेळीं हा विषय त्याला व्यवस्थित

स्वरूप देऊन शास्त्रीय पायावर उभारला जात असून शास्त्र बनण्याचे मार्गास लागला होता असें दिसतें. श्रमपरिहार, वेळ मजेंत घालविणें, मनाला शांत व संतोष स्थिति प्राप्त करून देणें, यासाठीं भिन्नभिन्न आवाजांबद्दल प्राणिसृष्टीची व विशेषतः मानव जातीची साहजिक आवड गायनाच्या उत्पत्तीस व वाढीस कशी कारणीभूत व अनुकूल झाली आहे हें वर पाहिलेंच आहे. मनोभावनामुळें स्वरभिन्नता उत्पन्न होते, या व्यवहारांत रोज दिसणाऱ्या गोष्टींची कौशल्यानें व बुद्धीनें केलेली नक्कल म्हणजे गायनाची मूळ कल्पना होय जगाच्या वाढी-बरोबर त्यांत मग भर पडली हें निराळें.

एकदा एकाद्या विशिष्ट कारणाकरिता विशिष्ट आवाज अगर स्वर आहेत असें साधारणपणें ठरून गेल्यावर त्या पुढची पायरी म्हणजे त्या स्वरांचा तसा उपयोग करून पहाणें हें क्रमानेंच आलें व कांहीं आवाजाचा निरनिराळे लोक उपयोग करूं लागले. त्या दृष्टीनें आया, शेतकरी, गुराखी, नावाडी, हमाल, दळपिणी वगैरे लोकांच्या तोंडून गाणीं ऐकूं येऊं लागलीं. पण या त्यांच्या गाण्यास कला शास्त्र अगर सुव्यवस्थित विषय असा कोणत्याहि तऱ्हेचा निर्बंध व नियम नसे. या व्यक्ती आपल्या मनास येईल तसें गात अगर आवाज काढीत. त्या त्यांच्या गाण्याला तालस्वराचा नियम नव्हता. अशा तऱ्हेच्या गाण्यास कोणी folk music लोकगान अगर जानपद गीत अशी संज्ञा देतात; मूळ कल्पनेपासुन हें स्वरूप प्राप्त होईपर्यंत बरींच शतकें लोटलीं असणें साहजिक आहे.

एकाद्या विषयाला शास्त्रीय व संघटित स्वरूप प्राप्त झालें असतां त्या विषयाच्या स्वरूपाची इतर जनतेला व्यवस्थित ओळख व्हावी अशी समाजात अपेक्षा उत्पन्न झाली म्हणजे मग त्या विषयाबद्दलचे ग्रंथ अस्तित्वांत येऊं लागतात व त्या विषयाचा अभ्यास सुरू होतो, परंतु गायन विषयावर ग्रंथ केव्हा सुरू झाले हें निश्चित सांगतां येत नाहीं; तसेंच या विषयाची प्रास्ताविक व प्राथमिक वाढ अति प्राचीन काळीं झाली असल्यानें त्या काळांत उत्पन्न झालेले ग्रंथ आज उपलब्ध नाहींत. तेव्हां त्या वेळच्या ग्रंथाधाराशिवाय त्या परिस्थितीबद्दल कांहीं सर्वसामान्य व ठोकळ विधानापेक्षां इतर अधिक अनुमानें केवळ तर्काचे जोरावर बांधणें चुकीचें होण्याचा संभव आहे. सबब तो काळ सोडून ज्या वेळेपासून सदर विषयावरील ग्रंथ, थोडे बहुत कां होईना, उपलब्ध झाले आहेत, त्या काळाकडे वळणें योग्य होईल.

इ. स. पहिल्या शतकापासून पांचवे शतकापर्यंतच्या काळांत नारद, मंडुक, विशाखिल, दत्तिल, कोहल, भरत इत्यादि ग्रंथकार होऊन गेले. ह्या काळापर्यंत गायनाची चांगलीच प्रगति होऊन तें शास्त्र या कोटीला पोंहोंचलें होतें. तसेंच त्याविषयीं ग्रंथनिष्पत्ति होऊन त्या ग्रंथामध्यें गायनाच्या नियमांची व विधि-निषेधांची चर्चा आणि माहिती दिलेली आहे; तथापि या काळांत गायनाची अंतर्गत व तपशीलवार वाढ झाली नव्हती.

या काळांत शुद्ध स्वर सात व विकृत दोन मिळून नऊ स्वरांचेंच गाणें गात असत आतां त्या वेळीं गाणें काय गात व कसें गात हा साहाजिकच प्रश्न आला. गायन ही मनोभावांच्या आविष्काराच्या कामीं निसर्गतःच उपयोगांत येणाऱ्या निरनिराळ्या भिन्न स्वरांच्या साम्यावर बसविलेली नक्कल आहे. तेव्हां मनोविकार व्यक्त करण्याचें उत्तम साधन जी भाषा तिच्यापेक्षा गायनाचा दर्जा दुय्यम आहे; मनोभावनाच्या आविष्काराला विशेष स्पष्ट करण्यास केवळ मदतगार या दृष्टीनेंच गायनाचा उपयोग होतो. मनोविकारांच्या आविष्काराचा सहाय्यक अगर मदतनीस याच दृष्टीनें फक्त गायनाची योग्यता राहणार आहे. यापेक्षां अधिक दर्जा त्यास प्राप्त होणें कठीण आहे. अर्थात् त्या वेळीं प्रचारांत रूढ असलेलीं पद्यें घेऊन तीं कांही विशेष नियमानें वरील नऊ स्वरांपैकीं स्वरांची जोड देऊन म्हणत अशा प्रकाराला ' जाति गायन ' असें पारिभाषिक नांव शास्त्रकार देतात.

नारदाच्या नांवानें प्रसिद्ध असलेला 'नारदी शिक्षा' हा सर्वांत प्राचीन ग्रंथ आहे, यामुळें या विषयाच्या भाविक मडळींना तो प्रिय वाटतो, पण तो केवळ मामुली आहे.

भरताचा 'नाट्यशास्त्र' नांवाचा नाट्यावरील ग्रंथ आहे व त्यांत त्यानें एकाच अध्यायामध्यें संगीताबद्दल विवेचन केलें आहे. परंतु आजकाल हा ग्रंथ मोठा लोकप्रिय झाला आहे.

यापुढील उत्क्रांतीच्या पायरीची मर्यादा इ. स ६ व्या शतकापासून इ. स. १३ व्या शतकाअखेर म्हणजे सुमारें ८०० वर्षांवर पसरलेली आहे असें दिसतें. या काळांतील ग्रंथकारांपैकीं मतग, पार्श्वदेव, शार्ङ्गदेव यांचेच ग्रंथ सांप्रत उपलब्ध आहेत. या सर्वांत शार्ङ्गदेवाचा ' रत्नाकर ' हा त्या वेळेच्या या विषयावरील माहितीचा सर्वसंग्राहक असा मोठा ग्रंथ आहे. आजकाल लोक त्या ग्रंथावरच आपलें संगीतज्ञान आधारीत असतात संगीत विषयाशीं नातें जोडणारा कोणीहि इसम 'रत्नाकराचें' नांव घेणार नाहीं, असें क्वचितच! ' नारदीय

शिक्षा' व 'नाट्यशास्त्र' यापेक्षां हा ग्रंथ बरा आहे इतकेंच; परंतु आमच्या कालच्या उपयोगाच्या अगर अपेक्षेच्या दृष्टीनें तो कोणत्याहि प्रकारें उपयोगी नाहीं. तथापि वेदांत्यांना जसें 'प्रस्थानत्रयीचें' महत्त्व तितकें महत्त्व गायनभावकांना 'नारदीय शिक्षा,' 'नाट्यशास्त्र' 'रत्नाकर' यांबद्दल वाटत असतें !

इ. स. दहाव्या शतकापर्यंत, प्रचारांतील एकाद्या वृत्तांत अगर छंदांत रचिलेलीं आयतीं तयार पद्यें घेऊन तीं जाति गायनाच्या नियमानुसार मधुर कंठानें ताला-सुरांत गात असत अर्थात् कांहीं काळानें अभ्यासामुळें व कलेच्या दृष्टीनें म्हणण्याचा सराव, व्यवस्थितपणा वगैरे गोष्टींमुळें योग्य तो उत्पन्न होणारा फरक होत होत जातिगायनास उत्क्रान्त दशा प्राप्त झालीच असली पाहिजे. मानव व त्याच्या सर्व संस्था परिवर्तनशील असतात तसेंच कालगतीमुळें व नाविन्याच्या आवडीनें पूर्वकाळापासून चालत आलेल्या कोणत्याहि विषयाच्या स्वरूपांत फरक होणें अपरिहार्य आहे.

इ. स. दहाव्या शतकापर्यंत जातिगायन होतें, परंतु त्यानंतर उत्क्रांतीनें त्यांत स्थित्यंतर होतां होतां जातिगायन प्रकार मागें पडून त्या जागीं नवीन, मनोहर व सुधारलेली अशी पद्धति अमलांत आली व त्या नियमाप्रमाणें लोक गाऊं लागले. या नवीन प्रकारच्या गायनाला शास्त्रकार 'राग' असें पारिभाषिक नांव देतात. 'जाति' हा गायनाचा केवळ सर्वसाधारण, अतिप्राथमिक व ओबडधोबड असा प्रकार असावा; आतां आपण जसें 'अमुक चाल' असें म्हणतों, किंवा जशीं ठराविक वृत्तें असतात, तशा जाति होत्या. त्या अर्थात् थोड्याच असणार ! त्यामुळें त्यांत कौशल्याला जागा अगर वैचित्र्य नव्हतें, सहजींच त्यांत monotony चा दोष येऊं व जाणवूं लागला असला पाहिजे. परंतु दहाव्या शतकापर्यंत बराच काल लोटल्यामुळें व गायनकलेमध्यें कौशल्यविषयक आवड अपेक्षित व उत्पन्न झाल्यानें उत्क्रान्त व रंजनकारक अशी अधिक लयशीलांची 'राग' ही पद्धति चालू झाली एकाद्या देशाच्या नकाशाचा केवळ आराखडा काढण्यापेक्षां त्यातील नद्या, पर्वत, गांवें वगैरे दाखविणें, अधिक कुशलतेचें, ज्ञानाचें व त्या देशाच्या माहितीची व उपयुक्ततेची उत्क्रान्त स्थिति दर्शविणारें आहे. तद्वत् जाति व राग यांची स्थिति आहे. जाति गायनांत न्यास, अपन्यास यांस महत्त्व असे, तर रागगायनाची मुख्य मदार वादी-संवादी स्वरावर आहे. या वेळीं शुद्ध स्वर सात व विकृत स्वर सात मिळून चौदा स्वर प्रचारांत आले. मागील काळापेक्षां स्वरज्ञानाच्या व सूक्ष्मतेच्या दृष्टीनें

ही वाढ कमी नाहीं. यामुळें रागगायन प्रचारांत येऊं शकलें व रंजनकारी ठरलें आहे. या काळापर्यंत अद्यापि अखिल आर्यावर्तांत एकाच पद्धतीनें गायन चालत असे.

गायनाच्या उत्क्रान्तीमध्यें इ. स. तेराव्या शतकानंतर अशी स्थिति येऊन पोहोंचली की, गायन शास्त्र बनून त्यांत ग्रंथसंपत्ति चांगल्या तऱ्हेची निर्माण झाली; कला या दृष्टीनेंहि तें चांगलें रंजनकारी बनून उत्क्रांतीच्या पायरीवर स्थिर झालें ' ही स्थिति प्राप्त झाल्यावर साहजिक आजूबाजूला पाहून या विषयांत लक्ष घालणाऱ्यांना इतरांपेक्षां आपलें वैशिष्ट्य व महत्त्व वाढावें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली याचा परिणाम असा झाला कीं, केवळ या विषयाच्या शास्त्राचा व कलेचा अभ्यास सुरू होऊन लोक त्यांत प्रावीण्य मिळविण्याच्या प्रयत्नाला लागले व दोनहि शाखांचा अभ्यास सुरू झाला. शास्त्र व कला ह्या गायनाच्या दोनहि शाखांत सारखेंच प्रावीण्य मिळविणारास 'नायक' म्हणत. एकंदर अठरा नायक होऊन गेले असे समजतात. त्यांपैकीं ध्रुपद गाणारे नायक सुमारें दहा व ख्याल गाणारे नायक सहा होते. जो केवळ गायन कलेमध्यें निष्णात आहे त्यास 'कलावंत' म्हणतात. हे नायक सुमारें इ. स. तेराव्या शतकापासून इ. स. अठराव्या शतकापर्यंतच्या काळांत होऊन गेले. गोपाळ व बैजू हे नायक प्रचारांतील पद्यें अथवा प्रबंध रागाचे नियम सांभाळून ताल स्वर लावून म्हणत असत त्यांच्या वेळीं आर्या, ओंवी, चर्चरी वगैरे सुमारें छत्तीस प्रबंध प्रचारांत होते असें आढळतें.

गोपाळ नायकाच्या पराभवानंतर विजयी सरदार अमीर खुशरू याला आपलें वैशिष्ट्य व महत्त्व स्थापन करावेंसें साहजिक वाटलें. त्यासाठीं त्यानें केवळ गायनोपयोगी अशी नवी पद्यरचना काढली व ती पद्यें मनोहर व सुलभ रीतीनें म्हणतां यावींत या हेतूनें गाण्याची एक नवीनच पद्धति सुरू केली. तिला 'हिंदुस्थानी' अगर 'उत्तर' पद्धति म्हणतात. त्यानें काढिलेल्या नवीन पद्धतीचा प्रसार सुरू झाला परंतु केवळ गाण्याच्या उपयोगाकरितां त्यानें मुद्दाम नव्या धर्तीचीं जीं पद्यें रचिलीं त्याकडे गायक आपलेपणानें पाहीनात; त्यामुळें त्याचीं तीं नवीन तऱ्हेचीं पद्यें त्यावेळी रूढ झालीं नाहींत. असो.

इ. स. चवदाव्या शतकापासून अठराव्या शतकाचा काळ गायनविद्येच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा व घडामोडीचा असा होता इतकी घडामोड व स्थित्यंतर आजपर्यंत त्यामध्यें झालें नव्हतें कारण या काळापर्यंत हा विषय वाढत होता

परंतु आतां त्याला स्थैर्य आलें होतें. एकाद्या गोष्टीला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर, कांहीं दिवसांनीं पुन्हां खळबळ उडून त्यांत स्थित्यंतर अथवा क्रान्ति घडून यावी ही जगरहाटीच आहे. यापूर्वीचे काळांत या विषयांत सुधारणा व्हावी अशी इच्छा होती, तर आता, त्या विषयाचे Specialization, त्याचें काठिण्य व आपली विद्वत्ता ह्या गोष्टी इतरांचे नजरेस याव्यात यासाठीं या विषयांत ग्रंथकार आपली पंडितगिरी लढवूं लागले. पण याचा परिणाम असा झाला कीं, प्रत्यक्ष कला व ग्रंथ यांची मात्र फारकत होऊं लागून शेवटीं शास्त्र व कला यांची फाटाफूट झाली! इतकेंच नव्हे, तर गायनकलेच्या दृष्टीनें निरुपयोगी पण केवळ पंडितगिरी दाखविणाऱ्या अनेक क्लिष्ट अशा विषयांची संगीतविषयक ग्रंथांमध्यें भरती होऊं लागली. या शतकापर्यंत अखिल हिंदुस्थानात जी एक गायनपद्धति होती त्याच्याऐवजीं 'उत्तर' व 'दक्षिण' अशा दोन पद्धति प्रचारांत आल्या.

या काळांत लोचन, रामामात्य, पुंडरीक विठ्ठल, अहोबल, सोमनाथ, नारद, रघुनाथभूपाल, श्रीनिवास, हृदयनारायणदेव, व्यंकटमखी, दामोदर, भावभट्ट, श्रीकंठ, तुळाजी राजे भोसले वगैरे ग्रंथकारांनीं ग्रंथ लिहिले. यापैकीं लोचन, अहोबल, श्रीनिवास, हृदयनारायणदेव व दामोदर यांचे ग्रंथ उत्तर पद्धतिप्रतिपादक आहेत या सर्वांमध्यें अहोबलाचा ग्रंथ शास्त्रीय दृष्टीचा, निरर्थक गोष्टींचें अवडंबर न माजविणारा असा उपयुक्ततेच्या दृष्टीनें लिहिलेला आहे. उत्तर पद्धतीच्या ग्रंथांत अहोबलाचा ग्रंथ श्रेष्ठ आहे.

ग्रंथाची पद्धति त्यानें स्वीकारलेल्या स्वर, राग वगैरे विषयांच्या विवेचनाच्या तऱ्हेवरून समजते.

रामामात्य, पुंडरीक विठ्ठल, सोमनाथ, रघुनाथभूपाल, व्यंकटमखी व तुळाजी भोसले वगैरेंचे ग्रंथ दक्षिण पद्धतीचे आहेत. यांपैकीं व्यंकटमखीचा 'चतुर्दंडिप्रकाशिका' दक्षिण पद्धतीचा आधारग्रंथ समजतात. भावभट्टाचे ग्रंथ म्हणजे इतरांच्या ग्रंथाचा केवळ संग्रह असल्यानें त्याचें स्वतःचें असें त्यांत कांहींच नाहीं!

स्वर, श्रुति इत्यादि विषय मोठे शास्त्रीय व गहन आहेत असा त्यांचा मोठा बाऊ करून त्या एकंदर विषयांचा या काळातील ग्रंथकारांनीं केवळ चोजवारा उडविला आहे! या त्यांच्या कृतीचा परिणाम असा झाला कीं, गायनाची शास्त्रीय बाजू निरर्थक ठरून शिक्षितांनीं त्याकडे दुर्लक्ष्य केलें व संगीत हें केवळ कला म्हणून अशिक्षित लोकांच्या मात्र हातांत गेलें व त्याची

शास्त्रीय परंपरा सुटली परंतु या सर्वांतून मार्ग काढण्याचें व ती स्थिति सुधारण्याचें अवघड काम अहोबलानें स्वरस्थानाच्या जागा सांगून आपल्या परीनें केलें आहे या त्याच्या कामगिरीबद्दल खरोखरी त्याला धन्यवाद देणें योग्य आहे. सारांश, या कालांत ग्रंथकारांच्या असल्या या निरर्थक पांडित्यानें व घमेंडखोरीनें गायनाच्या कला ह्या शाखेकडेच लोकांनीं विशेष लक्ष्य पुरविलें; व त्या दृष्टीनें कलेचीं अंगें उपांगें यांची वाढ झाली. शास्त्रीय भाग फक्त नांवापुरता राहिला. सा, प हे स्वर अचल झाले; गाणें एका ग्रामांत आलें होतें. प्रत्यक्ष शिक्षणाला सोईस्कर अशा 'बिलावल' सप्तकाचा प्रचारांत उपयोग होऊं लागला; रागांची संख्या वाढली व वाद्यवादनाला स्वतंत्रता प्राप्त झाली. अशा प्रकारें अठराव्या शतकाच्या अखेरीस एकंदर गायनविषयास मोठीशी कौतुकास्पद नव्हे, पण कलेच्या दृष्टीनें प्रगतीची अशी स्थिति प्राप्त झाली. ग्रंथकार एका दृष्टीनें आपली लोकप्रियता गमविण्याचा उद्योग करीत असतां कलावंत मात्र गायनकलेच्या लौकिकांत भर घालण्याच्या उद्योगास १६ व्या शतकापासून लागले होते.

गायनशास्त्राच्या स्थित्यंतराच्या व वाढीच्या दृष्टीनें एकोणिसाव्या शतकापासून एक निराळा टप्पा सुरू झाला आहे व अजून तो चालू आहे. याचे मागील कालांत म्हणजे अठराव्या शतकाअखेर या शास्त्रामध्यें जी घडामोड अगर स्थित्यंतरें झालीं त्यापेक्षां या काळांत कांहीं म्हणण्याजोगा फरक झाला नाहीं. जर काहीं फरक झाला असेल तर तो एवढाच कीं या काळांत जे ग्रंथ झाले त्यांनीं प्रत्यक्ष गायनांत जें 'बिलावल' सप्तक होतें तेंच आपल्या ग्रंथाचें 'शुद्धस्वर सप्तक' म्हणून अंगिकारलें. या काळांत अलिकडे अलिकडे बरेच चांगले ग्रंथ निष्पन्न झाले आहेत. या ग्रंथांचा विशेष असा आहे कीं त्या ग्रंथाप्रमाणेंच हल्लींचें गायन चालू आहे असें दिसतें. परंतु याचें मर्म असें आहे कीं, सध्या काय प्रचार आहे तो निरीक्षण करून तोच त्या ग्रथांत नमूद केला आहे; यामुळें अर्थात् प्रचार आणि ग्रंथ ह्यांत साम्य व एकवाक्यता आढळणारच ! या काळांत ग्रंथ लिहिले आहेत ते मोठमोठ्या विद्वानांनीं व सुशिक्षितांनीं; परंतु असें जरी आहे, तरी परंपरेची पकड इतकी विलक्षण असते कीं त्यांतून मनुष्य बाहेर पडू शकत नाहीं व तीच स्थिति याहि विद्वानांची झाली आहे ! खरोखर शास्त्रामध्यें माजलेला गोंधळ सुव्यवस्थित करून त्याची व्यवस्थित पायावर पुनर्रचना करावयाची, तर सांप्रत ज्या गोष्टी निरर्थक व निरुपयोगी आहेत त्या

अजिबात गाळून टाकावयास पाहिजे होत्या अगर ग्रंथांत त्या नमूद करण्यांत आल्या असल्या तरी आतां त्यांचा कांहीं उपयोग नाहीं अशी स्पष्ट शब्दांत त्याची तेथेंच वासलात लावावयास पाहिजे होती; पण तसा प्रकार मात्र दिसत नाहीं मागील गोष्टींचा आज काय उपयोग आहे याचें खुलासेवार दिग्दर्शन करावयास पाहिजे. शिवाय वाचकांच्या सोयीसाठीं ग्रंथकारांनीं आपलीं स्पष्ट व निःसंदिग्ध मतें देणें योग्य व अवश्य आहे. परंतु याहि काळांतील ग्रंथांत ही स्थिति आढळत नाहीं हें आश्चर्य आहे

या काळांत कृष्णधन बानर्जी, पं. भातखंडे, आप्पा तुळशी वगैरेनीं ग्रंथ लिहिले आहेत.

जेता अमीर खुशरू यानें आपलें वैशिष्ट्य स्थापित करण्याकरितां व इतर लोकावर छाप बसविण्याकरितां नवीन पद्धति सुरू करून त्यासाठीं पद्यरचनाहि केली होती. अमीर खुशरू दिल्लीचा रहिवासी व मुसलमान, अर्थात् त्यानें पद्यरचना केली ती उर्दु अगर उत्तरप्रांतीय भाषेंत यांत नवल नाहीं. त्या पद्यास त्यानें 'ख्याल' असें नांव दिलें. 'ख्याल करना' याचा अर्थ 'ध्यानांत घेणें,' 'विचार करणें' असा आहे. तेव्हां आपण मोठा विचार करून नवीन पद्धति अंमलात आणिली व त्याकरितां पद्यचरना केली हें दाखविण्यासाठीं खुशरूनें 'ख्याल' असें नांव त्या पद्यांस दिलें असावें असें वाटतें.

परतु कोठल्याहि गोष्टींतील सुधारणेची अशी गंमत आहे, कीं ती सुधारणा उत्क्रान्त पद्धतीची असावी लागते; क्रान्तिकारक सुधारणा केल्यास ती लोकांच्या पचनीं पडत नाहीं. याच दृष्टीनें सुधारणेस अशा लोकांची संमति न मिळाल्यानें ती रूढ होऊं शकत नाहीं! सांप्रत चालू असलेल्या स्थितींत योग्य तो थोडासा फेर करून अंमलांत आणलेली सुधारणा सहजीं लोकांच्या अंगवळणीं पडते. अमीर खुशरूच्या पद्यरचनेच्या प्रयत्नाची वर वर्णन केल्याप्रमाणें स्थिति झालेली पाहून कांहीं दिवसांनीं इतरांनाहि थोड्या अन्य दिशेनें प्रयत्न करण्याची इच्छा झाली. या कामीं ग्वालेरचा हिंदु राजा मान (इ. स. १४८६–१५२६) ह्यानें या दिशेनें विशेष प्रयत्न केला, व त्याला या कामीं त्याच्या पदरीं असलेल्या डल्लू, भगवान, धोंडू व चरजू या नायकाचें फार सहाय्य झालें. राजा माननें जो पद्यरचनेचा प्रयत्न केला त्याला 'ध्रुवपद' असें नांव त्यानें दिलें. 'ख्याल' व 'ध्रुवपद' ही पद्यरचना केवळ गायनासाठीं व त्याच विशिष्ट हेतूनें मुद्दाम केलेली आहे. त्याचे अगोदर त्या वेळीं रूढ असलेलीं कवींचीं

आयतीं तयार असलेलींच पद्यें घेत व तींच गात असत. पद्यात किंवा कवितेंत ध्रुवपद ( Burden of Song ) अशा तऱ्हेच्या कांहीं ओळी असतात. त्या साम्यावरच ही पद्यरचना करण्यांत आली आहे, अशी लोकांची समजूत व्हावी यासाठीं त्यानें या नव्या रचनेला 'ध्रुवपद' नाव दिलें असावें शिवाय ही रचना दृढ पायावर रचलेली आहे असेंहि दर्शविण्याचा त्यांत त्याचा हेतु असेल. पद्यांतील ध्रुवपदाच्या ओळी एकाच रीतीनें म्हणण्याची चाल आहे, ही गोष्ट त्या लोकांच्या परिचयाची असल्यामुळें ध्रुवपद हें त्याच प्रकारचें असणार अशा समजुतीनें लोकांत तें प्रिय झालें. ख्यालाची सर्वच तऱ्हा वेगळी! गायन पद्धतीच्या दृष्टीनें ध्रुवपद गायनापेक्षां ख्याल गायन अधिक गुंतागुतीचें, तपशिलाचें व निरनिराळ्या वळणाचें आहे. प्रबंध गायनापासून ख्याल गायनापर्यंतची उडी फार लांब आहे, त्यामुळें ती हुकली व ध्रुवपद गायन प्रचारांत आलें असो.

ध्रुवपदें गाणाराला 'ध्रुवपदीया' अगर 'कलावंत' म्हणू लागले दिल्लीपति अकबर बादशहा फार गायनप्रेमी होता ग्वाल्हेरच्या राजा मान नंतर त्याच्या दरबारांतील विद्वान् नायक व गायक दिल्ली दरबारीं गेले ध्रुवपदगायन इ. स १६ व्या शतकापासून समाजांत रूढ झालेलें आहे. ध्रुवपद पद्यांत प्रतिपाद्य विषय म्हटले म्हणजे देवादिकांचें वर्णन व स्तुति, मंगल प्रसगांचें वर्णन, राजांची व राजसभेची स्तुति, गायनशास्त्र वगैरे होत. वीर, शांत, भक्ति व शृंगार हे रस यात दृष्टीस पडतात, अशी ध्रुवपदियाची समजूत आहे. स्थायी, अतरा, सचारी व आभोग असे याचे चार भाग असतात, त्यास 'तूक' असें म्हणतात. हिंदी, ब्रिज, माळवी, उर्दू, पंजाबी वगैरे भाषात हीं रचिलेलीं असतात. ध्रुवपदें साधारणतः चौताल, ब्रह्म, रुद्र, झंपा, सूल इत्यादि तालांत गातात ध्रुवपदे बहुतेक आलापाई व गंभीर प्रकृतीच्या रागात रचिलेलीं असतात. ध्रुवपदें गाण्याची निरनिराळीं वळणें आहेत. त्या वळणास 'बाणी' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. अकबर बादशहाचे वेळीं डागुरी, नोहारी, खडारी व गौंडारी अशा चार प्रकारच्या बाण्या उत्पन्न झाल्या. तानसेन ज्या प्रकारानें ध्रुवपद गाई त्या वळणास 'गौंडारी बाणी' म्हणत तानसेनाचा जांवई प्रसिद्ध बीनकार राजा समोखनसिंग याच्या ध्रुवपद गायकीस 'खडारी,' ब्रिजचंदाच्या तऱ्हेला 'डागुरी' व श्रीचंद याचे वळणास 'नोहारी' संज्ञा आहे. या चार प्रकारांच्या गाण्यामध्यें कसा व काय फरक आहे हें माहितीच्या दृष्टीनें सांगणारा व निरनिराळ्या बाणीचे

सं. नं.
ता. ११

ध्रुवपद घेऊन तें गाऊन दाखविणारा गवई विरळाच। परंतु जे गवई आपण एकाद्या विशिष्ट वळणाचे ( बाणी ) गाणें गातो असें सांगतात त्या निरनिराळ्या वळणांच्या गवयांचीं गाणीं ऐकिलीं तरी त्यांत फरक कांहीं दिसत नाहीं। खरी गोष्ट अशी आहे कीं, या प्रकारचें शिक्षण कोणास मिळत नाहीं हे फरक केवळ ऐतिहासिक कौतुकाचाच विषय म्हणून आतां तरी उरले आहेत!

ध्रुवपद गायनास आवाज मर्दानी, पल्लेदार व गंभीर असावा लागतो. ध्रुवपद गायनास आरंभ करण्यापूर्वी ज्या रागांत ध्रुवपद गावयाचें असेल त्या रागाचें सामान्य स्वरूप गायक आकारानें गातो त्यास 'नोम थोम' किंवा ' जोड ' म्हणतात. यामुळें गायक श्रोत्यांपुढें रागाचें सामान्य स्वरूप उभें करीत असतो. नंतर तो बांधीव ध्रुवपद तालांत म्हणतो. ध्रुवपदाचे चार विभाग मंद्र, मध्य अशा योग्य सप्तकामध्यें म्हणावयाचे असतात. ध्रुवपदामध्यें ताना नसतात. त्यांत निरनिराळ्या गमकांचा उपयोग होत असतो व नंतर तालाच्या खटपटीस व कसरतीस गवई लागतो. निदान सांप्रत तरी ध्रुवपदगायनाची तऱ्हा अशी आढळते, मग ही त्या चार बाण्यांपैकीं कोणती बाणी आहे अगर त्या चारांचेंच मिश्रण आहे याचा उलगडा नीट होत नाहीं. ध्रुवपदगायनाचा कळस शहाजान बादशहाचे वेळेपर्यंत झाला असें मानतात. सांप्रत ध्रुवपदगायकी त्या उच्च स्थितींत राहिली नाहीं.

हरिदास स्वामी, तानसेन, बिलासखां, जगन्नाथ, चिंतामण मिश्र, वजीरखां व जाकोद्दिनखां असे मोठे नामांकित ध्रुवपदिये आजपर्यंत होऊन गेले आहेत.

ध्रुवपदगायनाच्या समकालीन ' धमार ' गायन असे. ' धमार हें तालाचें नांव आहे. धमार तालांत जें पद्य गाईलें जातें त्याला पक्की होरी अगर धमार म्हणतात. या प्रकारच्या चीजामध्यें श्रीकृष्णाच्या फाल्गुनमासांतील रंगक्रीडेचें वर्णन असावयाचें, असा संकेतच ठरून गेल्यासारखा दिसतो धमारामध्यें बोलताना घ्यावयाच्या असतात व धमार गायनांतीलच बोलताना ख्यालियांनीं उचलल्या आहेत. ध्रुवपदें अनेक तालांत गावयाचीं असतात व तालाची खटपट त्यांत बरीच असते असें म्हणतात त्यामुळें पखवाजीयाच्या तंत्रानेंच ध्रुवपदियास चालावें लागून त्याला तितकासा मोकळेपणा सांपडत नाहीं परंतु धमार हा एकच व ठरलेला ताल असल्यामुळें त्यांत वादकांची कांहीं गडबड फारशी न चालतां गवयाला मोकळीक मिळून आपल्या आवडीप्रमाणें गावयास सांपडत असलें पाहिजे; ध्रुवपदांतील गमकांचें रूपांतर धमारांतील बोलतानांत झाल्या-

सारखें दिसतें. ध्रुवपदापासून ख्यालापर्यंतच्या मजलींतील धमार हें मधील स्थान आहे. ख्यालामध्यें दिसणाऱ्या तानांचें बोलतांना हें पूर्वरूप आहे. पद्यांतील वर्णित विषयाच्या दृष्टीनें पाहिलें तर ध्रुवपदांतील विषय गंभीर व सभ्य आहेत पण ख्यालांतील विषय पूर्णपणें शृंगारिक। आतां गंभीर विषयावरून माणसाची उडी शृंगार रसावर एकदम जाणार नाहीं. यासाठीं मध्यंतरींची एकादी स्थिति अवश्य आहे व ती स्थिति धमारामध्यें दिसते. श्रीकृष्णाच्या फाल्गुनांतील रंगलीलांच्या वर्णनानें त्यावेळीं पद्यकारांनीं शृंगारवर्णनाची आपली हौस बऱ्याच मजलेपर्यंत फेडून घेतलेली दिसते। यावरून सहजीं ध्रुपद व ख्याल यांमधील स्थिति धमार होय असें वाटतें. सध्यां धमार गायन दृष्टीस पडत नाही परंतु एखादा गवई धमार गातो असें म्हणाला तर त्याच्या त्या धमार व इतर गायनांत तालावांचून कांहीं फरक दृष्टीस पडतो, असें वाटत नाहीं. असो.

ध्रुवपदाच्या लोकप्रियतेची परंपरा अदमासें इ. स. १७२० पर्यंत चालू राहिली. त्या काळीं पुन्हां गवयांना गायनाकरितां एकादा नवा पद्यप्रकार काढावा अशी अपेक्षा वाटूं लागली. ध्रुवपद व धमार हें गायन ऐकून लोकांची मनोभूमिका बरीच तयार झाली असल्यानें त्या वेळीं ख्याल सहजीं मूळ धरूं शकले असते व परिस्थितीनें ही गोष्ट घडून आलीहि. महमदशहाचे दरबारी मोठाले ध्रुवपदगायक होते परंतु दरबारची गैरमर्जी झाल्यामुळें त्यांना अज्ञातवासांत राहणें भाग पडलें! कलावंत झाला तरी पोट कांहीं कोणास सुटलें नाहीं! दरबारांत पुन्हां यांना प्रवेश हवाच होता. पण तो कांहीं युक्ती केली तरच मिळेल असा विचार करून व महमदशहाची गायनविषयक आवड पाहून त्यांनीं आपल्या शिष्यांना नवीन तऱ्हेचीं पद्यें शिकवून तीं दरबारांत गाववून मोठ्या युक्तीनें पुनरपि दरबारामध्यें आपला प्रवेश करून घेतला. या पद्यांस ते 'ख्याल' म्हणत. हीं पद्यें त्यानीं त्यावेळीं प्रचारांत असलेल्या पद्यांच्या वळणावरच बांधलीं. ते गायक म्हणजे सदारंग-आधारंग होत. सदारंग-आधारंगांनीं ख्यालगायनाची पद्धती नवी काढली असें म्हणण्यापेक्षां अमीरखुशरूनें काढिलेल्या पद्धतीचा अनुकूल काल पाहून जीर्णोद्धार करून दरबारामध्यें तिचा त्यांनीं शिरकाव करून दिला, हें म्हणणें जास्त वस्तुस्थितिनिदर्शक व सत्य आहे, असें म्हणणें योग्य होईल. हेंच ख्यालगायन कांहीं काळापूर्वी अमीरखुशरू, सुलतान हुसेनशर्की, बाजबहादर, चंचलसेन, चांदखां, सूरजखां वगैरेंनीं प्रस्तृत करण्याचा अटोकाट प्रयत्न केला होता, पण त्यावेळीं त्यांस हें यश लाभलें नाहीं. असो. अशा प्रकारें ख्यालगायन प्रचारांत आलें.

ख्यालास दोन विभाग असतात, पहिला स्थायी व दुसरा अंतरा. एकताल, झूमरा, आडा चौताल, तिलवाडा व त्रिवट वगैरे तालांत या चीजा बांधलेल्या असतात जे ध्रुवपदाचे तेच राग बहुधा ख्यालांचे असतात. लयीच्या दृष्टीनें ख्यालाचे दोन भेद समजतात एक विलंबित लयीचा व दुसरा जलद लयीचा. या पद्याचा वर्ण्यविषय प्रेमीजनांची वागणूक व शृंगार रस एवढाच असतो. सदारंग, अधारंग, सबरंग, मनरंग, कोडीरंग, हररंग अशीं नांवें धारण करणारे ख्याल रचणारे झाले आहेत. गुलाम रसूलपासून ख्याल गायनाची चढती कमान सुरू झाली. ख्यालगायकांमध्यें गुलाम रसूल, बडे महंमदखा, हद्दूखां हस्सूखां, रहिमतखां व बाळकृष्णबुवा वगैरे नामांकित ख्यालिये होऊन गेले आहेत. त्यामुळें ख्यालगायनाची लोकप्रियता व कला फार उच्च दर्जा प्राप्त करू शकली.

हल्लीं गायक मंडळींत बहुतेक सर्वच ख्यालिये दिसतात; व तें योग्यहि आहे. पूर्वीं ख्यालगायनाचींहि निरनिराळीं वळणें, घराणीं अगर प्रकार होते. पण आतां ते दृष्टीस पडत नाहींत. सध्या ग्वाल्हेर प्रकार व जयपूर प्रकार असे दोनच प्रकार आहेत असें म्हणतात. जैनुल अबदुलखांचे शिष्य आपलें घराणें निराळें असें प्रतिपादन करीत असतात, परतु ग्वालेरचें घराणें व हें घराणें यात कांहीं फरक नाहीं, असें ज्ञात्यांचें मत आहे. जयपूर घराण्याचे ख्याल लहान असतात, परंतु त्यांच्या तानांची तरकीब मोठी मजेदार आहे. लोटण कबुतराप्रमाणें गिरक्या मारीत मारीत वर जावयाचें, व गिरक्या घेत घेत खालीं यावयाचें अशी त्यांची तऱ्हा आहे. परंतु तेढ्या ताना घेऊन एकादी चीज नटवावयाची अशी त्यांची तऱ्हा अलीकडे फारशी दिसत नाहीं.

ख्यालियांचे नावाजलेलें घराणें म्हणजे ग्वालेरचें. त्या घराण्याची गावयाची पद्धति अशी असे कीं, चीजेची स्थायी व अंतरा म्हणून मग बेलावे, बोलताना रागवाचकतानांना, चीजेच्या बांधणीच्या आंगच्या हरकती व एकडाल ताना घ्यावयाच्या; परंतु हल्लीं हीहि पद्धति फार करून दिसत नाहीं, व त्याहि घराण्याचें हें वळण सुटलें आहे. आतां गाण्याला सुरवात होऊन दोनचार अक्षरें तोंडाबाहेर पडलीं कीं, झाली तानाच्या झडीला सुरवात! जलद लयीचा ख्याल घेऊन त्याच्या बांधणीकडे न पाहतां वाटेल तशा ताना झोंकून याव-याच्या व त्याच त्याच स्वराचे तेच तेच तुकडे घेऊन कंटाळवाणी पुनरावृत्ति करण्याची प्रथा पसरत चालली आहे. विलंबित लयीचा ख्याल प्रथम गाऊन

मग जलद लयीचा ख्याल म्हणावयाचा ही तऱ्हा बुडाल्यासारखीच आहे. स्थायी नंतर अतरा अशी समग्र चीज गायक म्हणताना दिसतच नाहीं ! सर्वमान्य जुने राग जाऊन अनावट व स्वकल्पित रागांचें प्रदर्शन केलें जातें ! परंतु ह्यामुळें घराणीं व त्यांचीं वळणें नष्ट होत आहेत; व गायनच्या पूर्वपरंपरेची वाताहत होत आहे; ही मोठीशी स्पृहणीय गोष्ट नव्हे. तरी घराण्याच्या अभिमान्यांनीं ही स्थिति ध्यानांत बाळगून आपली पूर्व परंपरा कायम राहील व घराण्याचा विशेष स्पष्ट दिसेल अशी खबरदारी घ्यावी. अशी ही सर्वसामान्य स्थिति आहे, यास कांहीं अपवाद असतील असो

येथपर्यंत ध्रुवपद, धमार व ख्याल वगैरेबद्दलचा विचार झाला. सबब राहिलेले इतर प्रकार, टप्पा, ठुमरी व लावणी याकडे वळू.

प्रसिद्ध ख्यालगायक गुलाम रसूलखां याला गुलाम नबी या नांवाचा मुलगा होता. गुलाम नबीला अशी कल्पना आली कीं सर्व रागांमध्यें कांहीं सारखा गळा फिरवितां येत नाहीं. तरी ज्यामध्यें गळ्याच्या कौशल्याला वाव मिळेल असा एकादा गीत प्रकार असावा. गुलाम नबी याचा गळा अतिशय तयार व हलका होता, त्यामुळें त्याची तान फार तयार असे यासाठीं आपल्या योग्य असा ज्यांत पुष्कळ तानांचा पाऊस पाडतां येईल असा टप्पा हा गीतप्रकार त्यानें सुरू केला टप्पे सर्व रागांत असत नाहींत. टप्पा या पद्यांत अक्षरें थोडीं असतात; त्यामुळें पुष्कळ ताना मारतां येतात व त्या शोभून दिसतात टप्पा गायकीस आवाज फार हलका लागतो. पुष्कळांना ही गळ्याची देणगी असत नाहीं, त्यामुळें टप्पे म्हणणारे थोडे असतात. आज काल हा प्रकार दुर्मिळ होत चालला आहे. मीया शोरी, गम्मू, बाबूराम सहाई, मीर अल्लीसाहेब, गोगटे वगैरे नामांकित टप्पेवाले होऊन गेले.

ध्रुवपदापासून टप्पा ही मजल म्हणजे गाण्याची सर्वांगीण दृष्टीची पायरी पायरीनें झालेली सुधारणा होय. केवळ गाण्याकरिता रचिलेलीं पद्यें, राग व स्वरकौशल्याची वाढ, शिस्तीच्या सुव्यवस्थित ताना अशी स्थिति आली यानतर ज्यामध्यें अर्थाचा व भावनांचा परिपोष जास्त होऊं शकेल असा गायन प्रकार अपेक्षित व क्रमप्राप्त आहे. या दृष्टीनें योग्य असा प्रकार ठुमरी होय. आवाजाच्या नैसर्गिक देणगीच्या दृष्टीनें विचार केला तर गायनाला पुरुषाच्या गळ्यापेक्षां स्त्रीचा गळा अधिक योग्य होय परंतु आतापर्यंतच्या गायनप्रकारच्या एकंदर पद्धतीमुळें स्त्रियांना त्यात विशेष वाव मिळून नांव होण्याला जागा नव्हती, पण ठुमरी हा

प्रकार प्रचारांत येऊन स्त्रियानांहि सोय चांगली झाली स्त्रियांचा गळा ठुमरीला योग्य असतो. टप्पा गायकीतूनच ठुमरी गायकी निघाली टप्प्याचें जे राग तेच बहुतेक राग ठुमरीचे असतात. परन्तु ठुंमरी अर्थप्रधान असल्यामुळें त्यांत टप्प्या-इतक्या ताना शोभत नाहींत. ठुमरी म्हणून नाचावयाचें व नंतर बसून गायिकेनें त्या पद्यातील अर्थ हावभाव करून व्यक्त करावयाचा असतो. ठुमऱ्या प्रायः स्त्रिया म्हणतात प्रत्येक रागांत ठुंमरी नसते व ठराविक रागांखेरीज इतर रागांत गायिल्यास ती शोभत नाहीं. ठुमरी हें भावनाप्रधान गीत गाणें, वाटतें तितकें सोपें नाही या गायकीची स्वतन्त्र तालीम घ्यावी लागते ठुंमरी गातांना त्या मधील अर्थ व्यक्त करण्याकरितां आवाज लहान मोठा करणें भागच आहे व त्यांतच कौशल्य आहे. हें काम दांडग्या पुरुषांपेक्षां जातीचें मार्दव असलेल्या स्त्रियांना योग्य होय. एकाद्या रागात ठुमरी सुरू करून योग्य जागीं तिच्यामध्यें इतर रागांचें शोभेलसें मिश्रण करून पुन्हां मूळ रागावर येणें यांत खराखर कलेचें कौशल्य आहे ठुमरी शिकविणारेहि वेगळे आहेत. सध्यां ठुमरी गायनाची स्थिति मोठी समाधानकारक आहे असें नाहीं.

अख्तरपिया, कदरपिया, सनदपिया व ललनपिया असे चार ठुमरी चरणारे होऊन गेले काशीस ठुमरी नामांकित म्हणतात. ठुमरी गायनात मोजुद्दिन, दिलीपराव वगैरे पुरुष व छटाकी, झोराबाई, गोव्हरजान वगैरे स्त्रिया होऊन गेल्या.

लावणी हा पद्यप्रकार महाराष्ट्राचा विशेष आहे. लावणी हेंच महाराष्ट्राच खरें संगात आहे. लावणीला महाराष्ट्रीय ठुंबरी म्हणणें चुकीचें होणार नाहीं. लावण्या बहुतेक मराठी भाषेंत रचिलेल्या असतात. लावण्या रचणारे शाहीर महाराष्ट्रात झाले आहेत महाराष्ट्रांतील इतर विशेष प्रबंध म्हणजे कटाव, पोवाडे होत; पण ह्या चीजा भावनात्मक असण्यापक्षां केवळ उपदेश अगर वर्णनपर अशा अर्थानें अर्थप्रधान असल्यामुळें खऱ्या अर्थानें त्या गायनोपयोगी होत नाहींत. अर्थात् यांत ताना वगैरे घेणें अगदीं विसगत आहे. पद्याचा अर्थ व्यक्त करणें अगर गायनाची रक्ति वाढविणें ह्या दृष्टीनें तानेचा कांहीं उपयोग नाहीं. गवयाला आपला गळा किती तयार आहे हें दाखविण्याचें तान एक साधन होय कुस्तीचे कामी वेताच्या मलखांबाचा जो उपयोग व इष्टता तितकीच इष्टता तानेची गायनाचे हेतूला आहे अर्थहानि होऊ नये म्हणून कटाव, पोवाडे वगैरे पद्यांस एक ठराविक साधी चाल लाविलेली असते. या दृष्टीनें हें पूर्वकालीन जाति-गायनाचें राहिलेलें प्रतिक आहे असें म्हणणें वावगें होणार नाहीं. पण लावणी हें

भावगीत असून सामान्यतः पुष्कळशा लावण्या शृंगारपर असल्यानें त्यांत गायकी सहजीं शोभून जाते. अनेक रागांत लावण्या रचिल्या जात. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या वेळेपासून महाराष्ट्रांत लावणीचें गाणें सुरू झालें व श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांच्यावेळीं त्या गायनाची सीमा झाली.

लावण्या गाण्याची एक स्वतन्त्रच तऱ्हा आहे. परंतु सांप्रत ही तऱ्हा नाहीशी होत आहे व लावण्यांमध्यें तानबाजी शिरली आहे. सामान्यतः गोंधळी व तमासगीर लावण्या म्हणतात; सध्यां लावणीगायन नाटकांतील पदांच्या वळणावर बहुतेक गेलें आहे. लावणीगायनाच्या दृष्टीनें ही स्थिति समाधानकारक नाहीं.

आजपर्यंत रामजोशी, होनाजी बाळ, प्रभाकर, सगनभाऊ, परशराम इत्यादि नामांकित शाहीर होऊन गेले. तसेंच सगुणा, हिरा, बया, कृष्णा, विठा वगैरे चांगल्या लावणी म्हणणाऱ्या होऊन गेल्या.

इ. स. १८८० सालीं संगीत नाटकाचा जन्म झाला; त्या वेळेपासून ध्रुवपद, ख्याल, ठुंमरी, लावणी ह्या गायनाला उतरती कळा लागून महाराष्ट्रांत नाटकांतील पदें म्हणण्याचा प्रघात पडत चालला आहे व तो असाच वाढत जाईल असा रंग दिसतो. यांहिपेक्षां अलिकडे गज्जलावर श्रोत्यांची भक्ती फार वाढत आहे. गज्जल हें अर्थप्रधान भावगीत आहे. त्याची एक ठरलेली चाल आहे. त्याची खरी खुबी त्याच्या गाण्याच्या चालीत नसून अर्थामध्यें त्याचें मर्म आहे. बरें, गज्जल हें पद्य उर्दू किंवा पर्शन भाषेंत असतें. तेव्हां अशा गीताचें अर्थमर्म महाराष्ट्रीय श्रोत्यांस कितपत कळणार व खरा आनंद होणार ! गायनाची खरी मजा अनुभवावयाची तर स्वभाषेंतील भावात्मक पद्यच त्या कामीं योग्य आहे. पण ही खरी गोष्ट कांहीं लोकांस पटत नाहीं. कारण ते परंपरेच्या पलीकडे जाऊन गतस्थितीचें सिंहावलोकन करीत नाहींत. त्यांनीं गायन म्हणजे उत्तरीय अगर हिंदी भाषा असें जणू समीकरणच बसवून टाकलें आहे ! हिंदी हीच गायनाला योग्य अशी भाषा आहे असें त्यांचें म्हणणें आहे. आपण ज्या पद्धतींत गाणें गातों ती उत्तर पद्धति अमीर खुशरू यानें दिल्ली प्रांतामध्यें स्थापिली व वाढविली असल्यामुळें व त्या प्रांताची भाषा हिंदी असल्यानें तीमध्यें साहजिक त्यानें पद्यरचना केली; व मुसलमानी अमलामुळें राजकीय सत्ता व श्रीमंत लोक यांची भाषा हिंदी असल्याकारणानें ती प्रतिष्ठित मानली गेली आणि त्यामुळें अनेक शतकें त्याच भाषेंत पद्यें रचिलीं गेलीं. परंतु अमीर खुशरू पूर्वी प्रबंध गात, ते संस्कृत व इतर प्रांतीय भाषेंत असत. हल्लीं दक्षिणेकडे तामिल, तेलगू व कानडी ह्या भाषेंतील पद्यें म्हणत नाहींत कां ?

मराठी ही भाषा गायनास योग्य नाहीं असें कांहीं म्हणतात; परंतु सर्व गाणें म्हणजे भावनांची अर्थस्पष्टता आवाजाच्या मदतीनें डोळ्यासमोर उभी करणें. मनुष्याचा स्वभाव व भावना ह्या तो रहात असलेल्या देशाची अगर प्रांताची भौगोलिक रचना, त्याची सामाजिक परंपरा आणि परिस्थिति यांनीं बनत असतात. भाषा ही त्याच्या भावनांचें व विचारांच्या संक्रमणाचें साधन आहे. तेव्हां त्याच्या भावनांना व स्वभावाला अनुकूल, त्यांशीं समरस असेंच स्वरूप त्याच्या भाषेला येणार हें उघड आहे मनुष्याचे भाव प्रगट करण्याचें काम स्वभाषेइतकें उत्तम दुसऱ्या कोठल्याहि भाषेमुळें होणार नाहीं. अशा स्थितींत महाराष्ट्रीय मनुष्याला सर्व आनंददायक गायन मराठी भाषेव्यतिरिक्त असलेल्या पद्यांत अनुभवावयास सांपडेल हें म्हणणें, खोटा अभिमान सोडून, शास्त्रीय विचार व प्रत्यक्ष अनुभव हेच ध्यानांत घेतां, कोणींहि योग्य आहे असें म्हणणार नाहीं. असो

येथपर्यंत संगीताचा मुख्य विषय जो गायन त्याबद्दलचा विचार झाला. आतां संगीतांतील दुसरा भाग जो वादन त्याकडे वळूं

वादन ही गायनाची निर्जीव पदार्थापासून तयार केलेल्या यंत्र Machine नें केलेली नक्कल आहे. गायनाला साधारण स्थिर स्वरूप प्राप्त झाल्यानंतर गवयाला आवाजाला मदत म्हणून वाद्यें प्रचारांत आलीं असलीं पाहिजेत. शिवाय पुढें गवयाला गाण्याला सोयीचें व्हावें यासाठीं आरंभस्थान म्हणून व त्याच्या आवाजाच्या पल्ल्याची कल्पना येण्याकडे वाद्याचा उपयोग होऊं लागला. तसेंच गवई कांहीं सारखा गाऊं शकत नाहीं तेव्हा मध्यंतरीं जेव्हां जेव्हां गवई गात नाहीं त्या वेळीं स्वराचे Atmosphere सारखे कायम ठेवण्यासाठीं वाद्य उपयोगी होतें. गवयाचें पूरक म्हणून वाद्य प्रचारांत आलें. गायनाच्या क्षेत्रांत पूरक म्हणून जशीं स्वरोत्पादक वाद्यें अस्तित्वांत आलीं तशीच ताल धरण्याकरितां तालदर्शक वाद्येंहि निघालीं. उपयोगाचे दृष्टीनें वाद्यांचे हे दोन प्रकार आहेत. ज्या प्रकारानें वाद्यें बनवितात त्या दृष्टीनें वाद्याचे प्रकार चार आहेत. तांती अगर तारा लावून व वारा भरून जीं वाद्यें वाजतात तीं गायनाचें अनुकरण अगर साथ करितात कातड्यांनीं मढविलेलीं वाद्यें गायनाची कालमर्यादा दाखविणारीं म्हणजे ताल देणारीं आहेत. दक्षिणेकडे मातीचें मडकें पालथें घालूनहि त्यावर ताल वाजवितात, त्याला घटवाद्य म्हणतात. कांहीं वाद्यें अशीं आहेत कीं, तीं स्वतंत्र वाजवून देखील जनमन रंजन करितां येतें.

वाद्यें पहिल्यानें स्वर भरतीकरितां, व मग स्वतंत्र वादनासाठीं अशीं प्रचारांत आलीं. वाद्यांचें बाबतींतहि उत्क्रान्तीनेंच त्यांची प्रगति होत आली आहे. पहिलें वाद्य पावा अगर अलगूज हें असलें पाहिजे, कारण कळकाला भोकें पाडून त्यांत तोंडानें हवा भरणें इतकी सोपी याची कृति आहे. यांतील पहिला स्वर मध्यम असे व वाद्यांतील मध्यमाचें हें महत्त्व अजूनहि दिसत आहे. यानंतर वाद्य प्राणिजन्य पदार्थांपासूनच झालेलें आहे वाद्यास पहिल्यानें तांती लावीत व तालवाद्यें कातड्यानें मढविलेलीं असत तार ही तांतीच्या उपयोगानंतर बराच काळानें प्रचारांत आलेली सुधारणा होय प्रथम वाद्याची Tuning-box कातड्यानें मढवीत मग लाकूड कोरूं लागले. त्यानंतरची सुधारणा म्हणजे भोपळा होय. वाद्याला लावण्यांत येणाऱ्या तारांच्या बाबतींमध्येंहि सुरवातीस एक, दोन व चार असा फरक होत आला. पहिल्यानें वाद्य जव्यानें वाजवीत, त्यानंतर गज व गजानंतर नखी प्रचारांत आली वाद्यास प्रथमतः पडदे नव्हते. वाद्य-वादनाचा पूरक हा दर्जा जाऊन वाद्य-वादन स्वतंत्र झालें त्यावेळीं वाद्यांत पडदे दिसूं लागले. अशी एकंदर वाद्याची वाढ आहे. तालदर्शक वाद्यांत कांहीं विशेष फरक झाला नाहीं. पखवाज आडवा होता त्याचे दोन तुकडे होऊन तो उभा होऊन तबला बनला. असो स्वरोत्पादक वाद्यांमध्यें बीन, सतार, सारंगी, सरोद, सुरसिंगार, रबाब, हार्मोनियम हींच वाद्यें मुख्य आहेत

वाद्यांमध्यें बीन हें वाद्य राजा असें तज्ज्ञ म्हणतात. या वाद्याचा साथीकडे उपयोग करीत नाहींत, याचें वादन स्वतंत्र असतें याचे वादनामध्यें रागाचें मंडन योग्य होतें. यांचे वादन सावकाश व गंभीर असतें यास पखवाजाची साथ नसते. अनेक प्रकारचीं ध्रुवपदें आल्याशिवाय चांगला बीनकार निपजत नाहीं व बीन चांगलें वाजविता येत नाहीं कारण रागाचें सामान्यस्वरूप उत्तम प्रकारें उठविण्यास अनेक ध्रुवपदांची अवश्य जरूर असते. तीन सप्तकांतहि याचें वादन कर्णमधुर लागतें विशेषेंकरून मंद्र सप्तकांतील स्वर चांगले निघाल्यास मनास फार आनंद होतो. बीनाचा बाज विशेष आहे; परंतु याचें योग्य शिक्षण घेतलेले वादक साम्प्रत दिसत नाहींत. इतर वाद्यांच्या आगमनानें हळूहळू हें मागेंच पडलें आहे व पडणार असें स्पष्ट दिसत आहे.

संमोखनसिंग, रसबीनखां, अमीरखां, अल्लीहुसेन, बंदेअली, वजीरखां इत्यादि नामांकित बीनकार झाले आहेत

प्रसिद्ध नायक अमीर खुशरू यानें सतार हें वाद्य आपल्या मुलांकरितां

काढिलें. अर्थात् ही कल्पना त्याला वीणेवरूनच सुचली हें उघड आहे. वीणेंत त्याला योग्य वाटले ते फरक करून त्यानें तिची सतार बनविली. वीणेतील चार तारां ऐवजीं यानें तीन तारा केल्या. तारा लावण्याचा जो क्रम होता त्यामुळें वाजविण्यास त्रास होई, सबब सुलभता यावी यासाठीं तो क्रम यानें उलट केला व पडदे अचल होते ते सरकणारे केले. यामुळ वीणेचा बोजडपणा जाऊन सतार हें सुटसुटीत वाद्य बनलें व हस्तकौशल्य दाखविण्यास वादकांस सहज अवसर सांपडला सतारीचे वादन द्रुतगतीचें असतें यांत गती वाजवितात. सतारीला तबल्याची साथ असते. गतीच्या बांधणीच्या अनुरोधानें त्यांचें 'तोडे' वाजवितात. सतार वादनांत हाताच्या जलदीची तयारी दाखविता येते. सतारींत बिलंपद लयीचें काम करणें ही गोष्ट बीन वादनांतून उसनी घेतलेली आहे. तसेंच बीनांत जलदलयीचें वादन ही सतार वादनांतील उसनवारी होय. सतारीचे कायदे बीनाच्या कायद्यापेक्षा निराळे आहेत परंतु सांप्रत ही गोष्ट वादक दृष्टीआड करितात असें दिसत आहे सतारवादन येण्याकरितां द्रुत-लयीच्या ख्यालाचें चागलें ज्ञान असावें लागतें. वाद्यवादनाला स्वरज्ञान फार चांगलें असावें लागतें. हल्लीं सतारवादन निदान महाराष्ट्रांत तरी मागें पडत चाललें आहे असें दिसत आहे.

मसजीदखानानें स्वतःचा एक बाज काढिला होता तो मसजीदखानी बाज या नांवानें प्रसिद्ध आहे. गुलामरझानेंहि एक बाज काढिला होता फिरोजखां, मसजीदखां, गुलामरझा, बाबू इसरीप्रसाद, इम्रतसेन, अमीरखां वगैरे प्रसिद्ध सतारिये झाले आहेत.

सारंगी हें वाद्य ताती व तारा लाविलेलें असतें यास पडदे नसतात व हें गजानें वाजवितात. यांस पडदे नसल्यामुळें हें वाद्य शिकण्यास व वाजविण्यास अवघड आहे; परतु यासारखें साथीला अनुकूल वाद्य दुसरें नाहीं साधारणतः नाय-किणीच्या साथीला सारंगी असते. या परिस्थितीमुळें हें वाद्य हलकें समजलें जातें व त्यामुळें त्याचा प्रसार आणि तें शिकण्याची विशेष आवड शिष्ट समाजांत नाहीं. शिवाय सुलभ व शिष्ट वाद्यें प्रचारांत येऊ लागल्यामुळें कांहीं विशिष्ट मर्यादेपलीकडे या वाद्याचा प्रसार झाला नाहीं. संकुचित क्षेत्रांत याचा प्रसार असल्यानें व लोकांस हें शिकण्याची विशेष आवड नसल्यानें हें वाद्य लोप पावत आहे.

रमजानी, देवीदास, हुसेनबक्ष, इब्राहिमखां, अल्लादाद, काळू, हैदरबक्ष वगैरे प्रसिद्ध सारंगीवादक झाले आहेत.

सरोद, रबाब व सुरसिंगार हीं वाद्यें वाजविणारे कमीच. जे लोक झाले ते उत्तरेकडेच झाले आहेत. महाराष्ट्रांत या वादनाचा पहिल्यापासून अभावच आहे. साम्प्रत तर बोलावयासच नको.

प्यारखां, जाफरखां, निसारअल्ली, शिखरसेन, ह्याति वगैरे रबाबवादक; गुलाम-अल्ली, नन्हेखां, फिदाहुसेन, हाफीजखा वगैरे सरोदवादक; बादुरहुसेनखां, साहेब-जादा हैदरअल्लीखां व छमनसाहेब हे सुरसिंगार वादक, असे लोक या वाद्यवाद-नांत प्रसिद्ध होऊन गेले आहेत.

सांप्रत सर्वांत अतिशय प्रसार पावलेलें व बायका मुलांचें तसेंच धंदेवाईक गवयांचें देखील कोणचें एकादें आवडतें वाद्य असेल तर तें हार्मोनियम होय. हें वाद्य इतकें आवडतें होण्याचीं दोन कारणें आहेत एकतर, हें वाद्य ज्यांना आपण मोठे व शहाणे समजतों आणि ज्यांचें अनुकरण करण्यांत भूषण माननों त्या पाश्चिमात्यांकडून आलेलें आहे। तेव्हां श्रीमत व फॅशनेबल लोकांच्या घरांत तें फॅशनच्या नांवाखालीं शिरलेंच। टेबल, खुर्ची, कपाटें, तसबिरी, आरसे, शिवण्याचें यन्त्र व बाजाची पेटी हीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं श्रीमत सुशिक्षित घरांतील Hall Decoration ची साधनें होतीं. दुसरें कारण असें कीं, इतर वाद्यांप्रमाणें हार्मोनियममध्यें त्रास अगर अवघडपणा नाहीं. स्वर कायम बांध-लेले आहेत. बोट ठेविलें कीं, झाली सुरवात; त्यामुळें पेटी शिकणें व वाजविणें फार सोपें झालें आहे, व म्हणून तिचा फार प्रसार झाला आहे. नाटक कपन्या, कथाकीर्तनें, भजनें इत्यादि सर्व ठिकाणीं पेटी लागते. एवढेंच नव्हे तर, स्वतः तज्ज्ञ व मोठे गवई मानणारांना देखील तबोरा लावणें झाल्यास तो पेटीच्या स्वरा-बरोबरच लावावा लागतो। शास्त्रीय दृष्टीनें पाहिल्यास हार्मोनियममधील स्वर आपल्या गाण्याला योग्य नाहीत त्यांतील स्वर Tempered असल्यानें तें स्वरसप्तक शुद्ध व शास्त्रीय नाहीं. अलीकडे बरेच लोक पेट्या वाईट आहेत असें म्हणतात मात्र आपणाला शास्त्रांतील गम्य आहे असें वाटणारे व दाखविणारे कलावंतहि पेटीस नांवें ठेवितात, पण त्या वाद्याचा मात्र मनसोक्त उपयोग करितात ! असो

हार्मोनियम वादकांमध्यें गणपतराव भैय्या अप्रतिम होऊन गेले; गोविंदराव टेंब्यांचा पेटीवादनपटुत्वाबद्दल फार लौकिक आहे.

आतां तालदर्शक वाद्यें, पखवाज व तबला, याबद्दल विचार ओघानेंच आला. या तऱ्हेच्या वाद्यांचे वर निर्दिष्ट केलेले दोन प्रकार आहेत. जेव्हां ध्रुवपदांचीं

प्रगती झाली त्या बरोबर साथीच्या दृष्टीनें पखवाज वादन सुरू झालें व त्यामुळें या वादनाचीहि वाढ झाली. होतां होता पुढें स्वतंत्र असें पखवाजवादनहि होऊं लागलें. वादनाच्या कामीं गणिताची अवश्यकता व जोड असल्यानें ही कला व तिच शास्त्र बदिस्त झालें आहे; त्यामुळें सुव्यवस्थित रीतीनें सहजी नें प्रगती करू शकलें. जसें ध्रुवपद गायन मार्गे पडलें व ख्यालगायकी लोकप्रिय होऊ लागली तसें पखवाज वादन हळू हळूं मागी पडून तबला वादन पुढें सरसावलें. ख्याल, टप्पा, ठुमरी वगैरे गायनांत तबल्याचीच साथ असते, तेव्हां त्याचा प्रसार सहजीं झाला. या प्रयास जलद् लय शोभते व तें काम तबला चांगल्या तऱ्हेनें करूं शकतो. या दोनहि वाद्यवादनांत हात फार हलका, गोड व मृदु असा लागतो तबलावादनामध्यें चाटी चांगली बोलविण्यांत खरें कौशल्य आहे. तसेंच एकदां स्वीकारिलेली लय त्यांत कमी जास्त होऊं न देतां कायम ठेवणें हें फार अवघड काम आहे या सर्व गोष्टीस मेहनत फार करावी लागते. अलीकडे तबला वादनाचा प्रसार बराच झालेला दिसतो परंतु सख्या वाढली म्हणजे गुणांचें प्रमाण कमी होतें, हा जो सिद्धांत काहीं जण मांडितात, त्याची या कामीं प्रतीति येणार नाहींना, अशी भिती वाटते.

धर्मा गुरव, फिरोजखां धाडी, लाला भगवानदास, कुदवसिंग, जोरावरसिंग, नाना पानशे, नासरखां, बळवंतराव वैद्य, कान्ताप्रसाद, अबीद हुसेन वगैरे प्रसिद्ध पखवाज व तबलावादक झाले आहेत.

सगीत विषयाचा तिसरा विभाग नर्तन होय. नर्तनामध्यें दक्षिण व उत्तर अशा दोन पद्धति आहेत नर्तनावर संस्कृतांत भरत, शार्ङ्गदेव, पार्श्वदेव, नारद, नंदिकेश्वर, विठ्ठल, अहोबल, दामोदर इत्यादि ग्रंथकारांनीं लिहिलेलें आहे. परतु त्या ग्रथांत प्रतिपादिलेल्या इतर विषयांत जसें परिवर्तन घडून आलें आहे तीच स्थिति नर्तनाबद्दलची आहे. आज शभर वर्षांत नृत्यावर त्याच्या सांप्रतच्या स्थितीशीं अनुरूप, मार्गदर्शक व मान्य होईल असा ग्रंथ झालेला प्रस्तुत लेखकास माहित नाहीं. हल्लीं नर्तनाचें शिक्षण म्हणजे जुने कथ्थक व मुसलमान उस्ताद याना परपरागत आलेलें जें कांहीं त्याबद्दल ज्ञान आहे तेंच पुढें चालूं ठेवणें हें होय.

नर्तनामध्यें नृत्त व नृत्य असे दोन प्रकार आहेत 'नृत्य' म्हणजे तोंडानें पद्य म्हणून त्या पद्याचा अर्थ व मर्म अभिनयानें म्हणजे चेहऱ्याच्या व

हातांच्या हालचालीनें व्यक्त करून दाखविणें. 'नृत्त' म्हणजे उभें राहून ताल व लय ह्या दृष्टीनें पदादि अवयवांच्या हालचाली करणें. नृत्तामध्यें तालाचा भाग जास्त आहे. नृत्य हा भावनांचा प्रांत आहे स्त्रिया व पुरुष दोघेहि नर्तनाचें काम करितात. नर्तनाचें काम करणाऱ्या पुरुषास कथ्थक म्हणतात.

'नृत्य' करणें हें फार कुशलतेचें व समजुतीचें काम आहे. गायनाचा जो उद्दिष्ट हेतू आहे तो, भावगीत म्हणून त्याचें नृत्य करून दाखविलें असतां, साध्य होणार आहे. नृत्य म्हणजे नाटकांतील Soliloquy होय, आणि नाटकांतील उत्तम भाग जर कोणता असेल तर तो Soliloquy असतो असें म्हणतात. मध्यतरी नाटकाची कला बरीच वाढली होती पण तूर्त बोलपटाची प्रथा वाढत आहे. तेव्हां त्या दृष्टीनें नृत्याची पायरी प्रगतीवर आहे असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. बोलपटामध्यें नृत्ताचेहि देखावे दाखवावे लागतात, त्या दृष्टीनें नृत्तालाहि उर्जित दशा येईल, निदान त्याचा प्रसार व प्रचार होऊन त्याबद्दल अभिरुची तरी वाढेल असें दिसतें.

कन्हैया, कालिकादीन, बिंदादीन, चांदा, गुलबदन, मोहना, हिरा, व्यकट-नरशी, विचवा वगैरे या कलेंत फार प्रसिद्ध झाले आहेत, अशी यांची ख्याती आहे.

येथपर्यंत गायन, वादन व नर्तन या सबंधाची त्यांच्या उत्पत्तिपासून आज तागायत काय स्थिती आहे याचें विहंगम दृष्टीनें समालोचन केलें आहे. आतां गायनाची स्थिती पुढील काळांत कशी होईल किंवा असावी, या दृष्टीनें दोन शब्द लिहिणें विसंगत होणार नाहीं.

सांप्रतकाळीं सर्व विषयांमध्यें Specialization चालू आहे. पण गाण्यामध्यें मात्र तशी स्थिति दिसत नाहीं प्रत्येकजण Something of everything आहे. पण कला अगर विद्या यांच्या प्रगतीच्या व व्यक्तीच्या कौशल्याच्या दृष्टीनें ही स्थिति समाधानकारक नाहीं. तरी कलेची प्रगति व वैयक्तिक कौशल्य या गोष्टींकडे लक्ष पुरवून त्या दृष्टीनें प्रयत्न व्हावा व होईल अशी आशा आहे. सुशिक्षित लोकांत ही कला शिरली आहे, व त्यांचें तिकडे लक्ष आहे ही गोष्ट चांगली होत आहे. वाईटांतून चांगली गोष्ट निघावी तद्वत सध्याच्या बेकारीनें बऱ्याच सुशिक्षितांना या कलाकडे वळविलें आहे. एंजिनाचें तोंड प्रथमतः वळविण्याकरितां Turn table लागतें. एकदां तोंड फिरलें कीं, त्या मार्गावर हवा त्या लांबीचा प्रवास मग सरळ होतो.

सध्यां गायनातील रसात्मक भागाकडेहि बऱ्याच लोकांचें लक्ष लागलें आहे व त्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहे ही अभिनंदनीय गोष्ट होय, याचा परिणाम असा होईल कीं, ख्याल इत्यादि जुनीं पद्यें मागें पडून त्या जागीं भावात्मक ठुमरी गायन लवकरच प्रचारांत येईल. महाराष्ट्रामध्यें मराठी गायनोपयोगी पद्यरचना होऊं लागेल; व त्या दृष्टीची सुधारणा अत्यंत इष्ट आहे. या सुधारणेला बोलपटाचा प्रचार खरोखर उपकारक ठरेल. दिवसें दिवस बोलपटाची कला वाढणारच; त्यामुळें रसपरिपोषक गायनाची वाढ झाल्यावांचून राहाणार नाहीं व तेंच होणें इष्ट आहे. येथें हेंहि सांगणें अवश्य आहे कीं, गायनोपयोगी रस म्हणजे शृंगाररसच होय. शृंगाराशिवाय इतर रस हे गायनोपयोगी नाहींत. प्रचारांत जे नवरस म्हणतात त्यांपैकीं तीनच रस मुख्य आहेत. शृंगाररस ही नेहमींची साधारण भावना आहे. कारण equality ही या रसांतील मुख्य गोष्ट आहे व या रसाचें अधिष्ठान Sex attraction वर आहे Sex attraction ही Instinct असल्यामुळें तद्विषयक आकर्षण हा मनुष्याचा जन्मजात गुण व तद्‌भूत शृंगाराची आवड स्वाभाविक आहे. या सर्व गोष्टींचा विचार करितां गायनाचा हेतू सिद्धीस नेणारीं जीं भावगीतें त्यांमध्यें शृंगाररस असणेंच योग्य आहे. सबब यापुढील काळांत प्रत्येक प्रांतीय भाषेंतील, ज्यांत मनोविकार व भावना यांचा स्पष्ट उठाव आहे अशीं, उत्तम अर्थप्रधान पद्यें तयार होऊन त्यांचेंच गायन सरस व लोकप्रिय होईल व व्हावें असा लेखकाचा अंदाज आहे. असो एखादें भविष्य वर्तवावयाचें म्हणजे ज्योतिषी पहिल्यानें भूतकाळांतील गोष्टी सांगतो, त्याच न्यायानें या पुस्तकांतील पुढील भागांमध्यें गत व्यक्तींची कामगिरी व चरित्रें वर्णिलीं आहेत; तरी त्यांचें अवलोकन अवश्य होईल अशी इच्छा प्रदर्शित करून वाचकांची रजा घेतों.

# वस्तुसंग्रह.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| **प्रस्तावना** | ... ... | १—४ |
| **उपोद्घात** | ... ... | १—२३ |
| **भाग १.** | | |
| **शास्त्रकार** ( ३५ ) | ... | १ |
| **भाग २.** | | |
| **कलावंत** ( ४२२ ) | | |
| **गायक** ( २१९ ) | | |
| नायक | ... ... | २५ |
| ध्रुवपद गायक | ... | ३० |
| ख्याल गायक | ... | ५२ |
| टप्पा गायक | ... | १२२ |
| ठुमरी गायक | ... | १२८ |
| लावणी गायक | ... | १३१ |
| **भाग ३.** | | |
| **वादक** ( १३५ ) | | |
| बीन वादक | ... | १४० |
| सतार वादक | ... | १५० |
| सारंगी वादक | ... | १५९ |
| रबाब वादक | ... | १६२ |
| सरोद वादक | ... | १६४ |
| सुरसिंधार वादक | ... | १६५ |
| हार्मोनियम वादक | ... | १६६ |
| जलतरंग वादक | ... | १६७ |
| पखवाज व तबला वादक | | १६७ |
| **भाग ४.** | | |
| **नर्तक** ( १६ )... | ... | १८५ |
| **भाग ५.** | | |
| **स्त्रिया** ( ५२ ) | ... | १८९ |
| **सूची.** | | १—९ |

स्थळ प्रत
सं. ३ नं. ५०५
ता.
५३२५

# संगीतशास्त्रकार व कलावंत यांचा इतिहास.

## भाग १.

## शास्त्रकार.

क्र. ५३२५

### मंगलाचरण.

अंबाया मम तातस्य वन्दे पादान् सगौरवम् ।
ममांगीकृतकार्याणि सफलानि सदाशिषा ॥ १ ॥

### नारद.

संगीतावरील बरेच ग्रंथ नारदाच्या नांवावर मोडतात परंतु ते ग्रंथ पाहिले असतां एका व्यक्तीनें ते सर्व लिहिले असतील असें वरवर पहाणाराला सुद्धां म्हणता यावयाचें नाहीं. तेव्हां या नावाच्या दोन तीन तरी व्यक्ती होऊन गेल्या असें दिसतें; यावरून नारद हें गोत्रवाचक नाम असावें असें वाटतें तेव्हां साहजिकच नारद या नांवाचे निरनिराळे ग्रंथकार निरनिराळ्या वेळीं झाले असले पाहिजेत. या ग्रंथकाराचा ग्रंथ **नारदी शिक्षा** या नांवानें प्रसिद्ध आहे अर्थात् 'नारदी शिक्षा' ह्या ग्रंथाचा कर्ता नारद हा देवर्षि नसून व्यवहारांतील एक व्यक्ति होता. हा ग्रंथ बराच लहान आहे व ह्याची भाषाहि साधी व सोपी आहे. ह्या ग्रंथात संगीताशिवायहि इतर माहिती आली आहे. ह्यानें सामवेदाच्या वेळची कांहीं माहिती आपल्या ग्रंथांत दिली आहे. श्रुति = स्वराचा भाग अशा अर्थाचा शब्द इ. स. चौथ्या शतकांत लिहिलेल्या कोशात सापडत नाहीं श्रुति शब्द दत्तिलानें व भरतानें, आपल्या ग्रंथांत ज्या अर्थानें योजिला आहे तसा ह्या

ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत तो योजिला नाहीं. वर दिग्दर्शित केलेल्या परिस्थितीवरून हा ग्रंथकार चौथ्या शतकापूर्वीचा आहे असें दिसतें. 'नारदी शिक्षा' या ग्रंथात 'राग' शब्द २१३ वेळा आला आहे, परंतु त्याचें लक्षण या ग्रथांत कोठें सांगितलेलें नाहीं. परतु 'राग' हा विषय त्यावेळीं सांप्रतच्या अर्थानें अस्तित्वांत नव्हता; हा त्याचा उदय व लक्षण वगैरे सविस्तर विचार इ. स १० व्या शतकाच्या नंतरच्या कालांत झाला. ह्याचा हा ग्रंथ आतां छापला गेला आहे.

## दत्तिल.

सगीतावर सस्कृतांत '**दत्तिल**' नांवाचा ग्रंथ यानें लिहिला आहे. ग्रंथ लहानच आहे. त्यांत स्वर, ताल व जाति ह्या विषयाचें वर्णन संक्षेपानें केलें आहे. 'नाट्यशास्त्रकर्ता' **भरत** ह्यानें आपल्या ग्रंथांत दत्तिलाच्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे. ह्यावरून हा ग्रथकार इ. स पांचव्या शतकापूर्वी होऊन गेला हें स्पष्टच आहे. पुढील अनेक ग्रंथकारांनींहि ह्या ग्रंथकाराचा उल्लेख केलेला आढळतो पण तेवढ्यावरून त्याचा काल निश्चितपणें ठरविणेचे कामी या उल्लेखांचा फारसा उपयोग होईल असें दिसत नाही दत्तिलानेंहि आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या नारद, कोहल व विशाखिल ह्या ग्रथकाराचा उल्लेख केला आहे. परतु ह्यांच्या ग्रथाचा कालनिर्णय झाल्यांवाचून दत्तिलाचा काल ठरविणेस त्याचा कांहीं उपयोग नाही हा ग्रंथकार इ स च्या चौथ्या शतकात झाला असावा असें अनुमान आहे. पण तें ठरविण्यास चांगलासा ग्रंथाधार नाहीं शिवाय ह्या ग्रथकाराचा ठावठिकाण कांहींच समजत नाहीं असो हा ग्रथ आतां छापून प्रसिद्ध झाला आहे.

## भरत.

**नाट्यशास्त्र** या ग्रंथाचा कर्ता **भरत** हा इ स च्या पांचवे शतकात झाला असें हल्लींच्या पुराव्यावरून इतिहासकार मानितात. संगीतशास्त्रात ह्या ग्रंथाचें व ग्रंथकाराचें महत्त्व फार आहे कारण 'नाट्यशास्त्र ह्या ग्रंथांत २८ व्या अध्यायामध्यें त्यानें संगीताची माहिती सांगितली आहे. ह्या ग्रथापूर्वीचे संगीतावरील दत्तिलाशिवाय दुसरे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. साहजिकच संगीतास आरंभ करणें झाल्यास आरंभीचा मान ह्याच ग्रंथास आहे; कारण ह्याच्या ग्रथांत संगीत विषय दत्तिलापेक्षां अधिक विस्तारानें लिहिलेला आहे.

संगीत शास्त्रासंबधाची ह्याच्या ग्रंथांत प्रमेयें खालीलप्रमाणें आढळतात :—

( १ ) सर्व भरतखंडांत गायनाची पद्धति एकच होती.

( २ ) ध्वनि मोजण्याचे मापाम श्रुति म्हणत सप्तकांतले नाद, श्रुति या एकाच सारख्या मापानें मोजीत एका सप्तकांत अशा श्रुति २२ होत्या श्रुतीचें माप म्हणजे सोळाव्या व सतराव्या श्रुतमिधील ध्वनीचें अतर.

( ३ ) शुद्ध स्वर सात व विकृत स्वर दोन होते.

( ४ ) षड्ज व पचम हे दोन स्वर इतर पांच स्वरांप्रमाणें विकृती पावत असत.

( ५ ) षड्ज व मध्यम हे दोन ग्राम प्रचारांत होते.

'राग' हा शब्दहि त्या ग्रथांत नाही। तेव्हां त्याची व्याख्या, त्याचा गायनप्रचार ह्याबद्दल बोलावयास नकोच! मग भरतापूर्वी झालेल्या कालीदासाच्या नाटकांत राग गायन आहे हें म्हणणें युक्तिसगत ठरेल काय? 'भरतनाट्यशास्त्र' हा ग्रथ आतां बनारस येथें छापून प्रसिद्ध झाला आहे.

## मतंग.

हा ग्रंथकार कोठें झाला ह्याबद्दल कांहीच माहिती मिळत नाहीं ह्यानें **बृहत् देशी** नावाचा संगीतावरील ग्रथ सस्कृत भाषेंत लिहिला आहे. ह्या विषयावरील सर्वमान्य ग्रथांत ह्या ग्रथाची गणना विद्वान् करितात **मतंगानें** हा ग्रंथ नारदाच्या मांगण्यावरून लिहिला असें म्हणतात पण हा कोणचा नारद ? हा नारद म्हणजे देवऋषि नारद असें कसें म्हणतां येईल ? मतगाच्या 'बृहत्देशी' ग्रंथांतील अनेक उतारे **शार्ङ्गदेवानें** आपल्या 'रत्नाकर' ग्रंथांत घेतले आहेत ह्यावरून तो इ स च्या तेराव्या शतकापूर्वी झाला हें निर्विवाद आहे. मतंग आपल्या ग्रथांत म्हणतो, 'रागमार्गस्य यद् रूपं यन्नोक्तं भरतादिभिः । निरूप्यते तद्स्माभिर्लक्ष्यलक्षणसंयुतम् ।' ह्यावरून तो भरतानतर म्हणजे इ. स पांचव्या शतका नंनर झाला हें ओघानेंच आलें. भरत व त्या पूर्वीचे ग्रंथकार यांच्या वेळेस रागगायन प्रचारांत नव्हतें तेव्हां मतग पांचव्या शतकानतर व १३ शतकापूर्वी झाला असला पाहिजे कारण दहाव्या शतकापूर्वी राग गायन नव्हतें असें आमचें मत असल्यानें हा ग्रथकार दहाव्या शतका नतर म्हणजे ११ व्या शतकांत झाला असला पाहिजे मतगाच्या वरील उताऱ्यावरून या आमच्या म्हणण्यास बळकटी येते श्रुतीचें आपल्या वेळचें ठराविक माप कोणतें तें त्यानें ग्रथांत स्पष्ट सांगितलें आहे ह्याच्या वेळीं दोन ग्रामाचें गाणें प्रचारांत

होतें षड्ज पंचम हे स्वर ह्याच्यावेळी विकृत होते, व ह्या दोन ग्रामांत गायक गात. प्रचारांतील कवितांचे छंदांचा समावेश प्रबंधामध्यें करीत असत, म्हणजे ते छंद गायक गात त्या वेळीं एकच एक गायनपद्धति सर्व देशभर होती. हा ग्रंथ आता छापून प्रसिद्ध झाला आहे.

## पार्श्वदेव.

नांवावरून हा जैनधर्मी असावा असें वाटतें, ह्यानें 'संगीत समयसार' नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला आहे. हा कोठला राहणारा हें नक्की सांगतां येत नाहीं. ह्यानें 'बृहत् देशी' ग्रंथाचा कर्ता मतंग ह्याचा उल्लेख आपले ग्रंथांत केला आहे. तेव्हां त्या ग्रंथकाराच्या मागून हा झाला हें सांगणें नकोच. आपल्या ग्रंथांत 'आभोग' ह्या पारिभाषिक शब्दाची व्याख्या सांगतांना परमर्दीमहीपतीचा उल्लेख ह्यानें केला आहे. हा परमर्दीराजा चंद्रवंशांतील १८ वा पुरुष होय. हा इ. स. ११६५ मध्यें झाला. तेव्हा सदर ग्रंथकार बाराव्या शतकाच्या शेवटी अगर तेराव्या शतकाच्या प्रारंभी झाला असावा. या ग्रंथाचीं ९ प्रकरणें आहेत. त्यांत स्वर, राग, वाद्य, ताल, नृत्य वगैरे विषय आहेत. ह्याची विवेचनपद्धति, मांडणी, विषय वगैरे गोष्टी इ. स. ५ पासून तेराव्या शतकापर्यंतच्या कालखंडास साजेशा आहेत. हा ग्रंथ आतां छापून प्रसिद्ध झाला आहे.

## पं. शार्ङ्गदेव.

इ. स. ११८७ मध्यें भिल्लम राजानें देवगिरीस यादव घराणें स्थापिलें. त्याचा नातु सिंघण (१२१०–१२४७) हा फार पराक्रमी निघाला. त्यानें आपलें राज्य गुजराथेपर्यंत वाढविलें. हा जसा पराक्रमी होता तसा विद्येचा भोक्ता होता. ह्यानें अनेक विद्वानास आश्रय दिला होता. हा मोठा उदारहि होता. ह्यानें अनेक देवालयास देणग्या दिल्या. सातारा जिल्ह्यांत डोंगरावर सिंघणापुर म्हणून जें देवस्थान आहे तें ह्यानेंच स्थापून त्या देवास आपलें नांव दिलें व देवस्थानास इनाम करून दिलें आहे. ह्याचा कारभारी सोढळ नांवाचा होता त्याला 'श्रीकरणाग्रणी' अशी पदवी होती. हा मोठा संगीतज्ञ होता. सोढळ वारल्यावर त्याच्यामागून हेमाडपंतास सिंघणानें आपला कारभारी नेमिलें व आपल्या पूर्वीच्या कारभारीपुत्रास दरबार गवयी केलें. तोच हा

स्थळ प्रत
स. ३ नं. ४०८
ता.
नोंद नं ४३२५

यांचा इतिहास.

**शार्ङ्गदेव** पंडित होय. सिंघणाच्या स्वारीबरोबर हा पंडित होता. ओवी छदांत मराठी भाषेंत कविता लिहिण्याचा प्रघात त्या वेळच्या कवींनी सुरू केला होता. तेव्हां ओवी हा छद शार्ङ्गदेवानें प्रबंधाध्यायांत एक प्रबंध म्हणून नमूद केला आहे. ह्यानेंच सिंघण राजाच्या पदरीं असतां **संगीतरत्नाकर** नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांत त्याच्यापूर्वी जे संगीतविशारद होऊन गेले त्याचा त्यानें प्रारंभीं नामनिर्देश केला आहे. ह्याचा काल म्हणजे इ स तेरावें शतक होय. संगीतशास्त्राच्या दृष्टीनें हा काल फार महत्त्वाचा आहे. कारण इ स पांचव्या शतकापासून तेराव्या शतका-पर्यंत जे संगीत संस्कृत ग्रंथकार झाले त्यांची परंपरा एक, अगदीं एक होती. मासल्याकरितां कांहीं प्रमेयांचा उल्लेख येथें करितों –श्रुतीचें एक नियत प्रमाण, षड्ज व पंचम हे स्वर विकृत, प्रचारांत षड्ज व मध्यम ग्राम, मूर्छना, रागाचें वर्गीकरण, ग्रामराग, रागांग इत्यादि, कवितेंत जे छंद योजिले असतील त्यांस प्रबंध मानून ते रागदारींत गाणें, सर्व भरतखंडभर एकच गायनपद्धति, शुद्ध स्वर सात व त्यांत बावीस श्रुतींची ४।३।२।४।४।३।२ अशी क्रमानें वांटणी, विकृत-स्वर सात, शुद्धस्वर सप्तक मुखारी सारखें, च्युत षड्ज व काकली हे स्वर ध्वनीनें षड्ज स्वरापेक्षा ध्वनीनें कमी इत्यादि परंतु पुढें १४।१५ व्या शतकांत संगीतांत फार फेरफार झाल्यानें हा ग्रंथ लागेनासा झाला ह्या ग्रंथाचे स्वराध्याय, रागाध्याय, प्रकीर्णाध्याय, प्रबंधाध्याय, तालाध्याय, वाद्याध्याय व नर्तनाध्याय असे सात अध्याय आहेत कल्लिनाथ पंडितानें ह्यावर टीका लिहिली आहे ह्या ग्रंथ पुण्या-तील आनंदाश्रम संस्थेनें छापून प्रसिद्ध केला आहे

## चतुर कल्लिनाथ.

हा विद्वान् ब्राह्मण विजयानगरच्या प्रताप देवराजाच्या पदरीं होता. ह्या राजानें इ स १४५६–१४७७ पर्यंत राज्य केलें हा राजा कलावंत व शास्त्रज्ञ यांस आश्रयस्थान होतें. ह्या राजाच्या आज्ञेनें चतुर **कल्लिनाथानें संगीत रत्नाकर** नांवाच्या संस्कृत ग्रंथावर **टीका** लिहिली आहे ह्याची टीका नसती तर तो ग्रंथ लागण्यास बराच त्रास झाला असता. कल्लिनाथाचा संगीतावर एखादा स्वतन्त्र ग्रंथ असावा असा विद्वानांचा तर्क आहे. परंतु अद्यापि त्याचा शोध लागला नाहीं. ह्याला 'चतुर' ही पदवी होती ह्यावरून संगीत कलेंत हा निष्णात असावा असें वाटतें

# अमीर खुशरू.

**अमीर खुशरू** हा अमीर महमद सैफुद्दिन याचा मुलगा महमद सैफुद्दिन हा प्रथमतः बलखनमध्यें राहत असे, तेथून तो हिंदुस्थानांत राहावयास आला हिंदुस्थानांत आल्यानंतर त्यास इ. स. १२५३ मध्यें जो मुलगा झाला तोच हा अमीर खुशरू होय. हा अतिशय चलाख व हुषार होता त्या काळांत योग्य तें शिक्षण संपादन केल्यावर अमीर खुशरू त्या वेळच्या गुलाम घराण्यांतील दिल्लीपति ग्यासुद्दिन बलबन यांचे पदरीं राहिला परंतु कांहीं वर्षांनीं या गुलाम घराण्याचा शेवट होऊन त्या ठिकाणी खिलजी घराणें तख्तावर आलें. अर्थातच अमीर खुशरू हा त्यामुळें खिलजी घराण्याचा नोकर झाला. खिलजी घराण्यातील पहिला पुरुष जलालुद्दिन तख्तावर आला त्या वेळी फार म्हातारा होता त्याचा पुतण्या अल्लाउद्दिन हा फार महत्त्वाकांक्षी होता दक्षिण हिंदुस्थानांतील राजे अतिशय संपत्तिमान आहेत असें कळल्यावर तिकडून संपत्ति आणावी अशा हेतूनें अल्लाउद्दिनानें इ. स १२९४ मध्यें देवगिरीच्या राजावर स्वारी केली. त्या वेळीं त्या स्वारींत अमीर खुशरू त्याचेबरोबर होता. अल्लाउद्दिनानें देवगिरीच्या राजाचा पराभव केला। परंतु नेहमीं अशा पराभवापेक्षां सांस्कृतिक पराभव हा फार टिकाऊ व परिणामकारक असतो कारण जेते नेहमीं आपल्या सर्व बाजूचा मोठेपणा व सर्व तऱ्हांचा दिमाख दाखवून जित लोकाना दिपवून सोडण्याचा प्रयत्न करीत असतात आपल्या संस्कृतीचा वरचढपणा दाखवून जित राष्ट्रांतील लोकांना त्यांचा हिणकसपणा त्यांच्या नजरेस आणून त्यांच्यांत मानसिक दौर्बल्य उत्पन्न करण्यांत जेत्यांना मोठा अभिमान वाटतो असो.

अमीर खुशरू हा उत्तमांपैकीं संगीतज्ञ, गाणारा व मुत्सद्दी होता. देवगिरीच्या राजाचे पदरीं **नायक गोपाळ** या नांवाचा विद्वान गवई होता हें त्यास माहीत होतें. त्यानें आदले दिवशीं नायक गोपाळाचें गाणें ऐकिलें व दुसरे दिवशीं त्याच्या ऐकलेल्या गाण्यांत मोडतोड करून, कांहीं पर्शियन शब्द व कांहीं पर्शियन रागाचें मिश्रण करून त्यानें गावून दाखविलें व तसें नायक गोपाळानें गाऊन दाखवावें अगर हार कबूल करावी असा पेंच घालून मोठ्या युक्तीनें त्यानें त्यास जिंकलें। नायक गोपाळाचा जरी त्यानें पराभव केला तरी तो गुणज्ञ असल्यानें त्याची किंमत जाणत होता त्यामुळें नायक गोपाळ यास दिल्लीस जावें लागलें.

अमीर खुशरू दिल्लीस परत गेल्यावर संगीतामध्यें त्यानें अपूर्व क्रांति घडवून आणून मोठी कामगिरी केली त्यानें दक्षिणेंतील शुद्धसप्तकापेक्षां निराळ्या शुद्ध-

स्वरसप्तकाची योजना करून तें प्रसृत केलें; प्रचलित रागांपेक्षां अभिरुचीकडे लक्ष पुरवून लोकाना आवडतील असे वैचित्र्यपूर्ण व नवे राग प्रचारांत आणिले. तसेंच रागवर्गीकरणाचा रागांच्या स्वरावरून एक नवा प्रकार त्यानें काढिला. रागांत म्हणण्यास नवीन पद्येंहि तद्देशीय भाषेंत त्यानें रचिलीं. हींच पद्यें पुढें ख्याल म्हणून प्रसिद्धीस आलीं, ह्यामुळें ख्यालाचें उत्पादकत्व अमीर खुशरूकडे सहजच आलें त्याचप्रमाणें वाद्यांतही त्यानें क्रांति घडवून आणिली. त्याला ती दक्षिणी वीणा आवडली नाहीं त्या वीणेस चार तारा होत्या तिच्या यानें तीन केल्या; तसेंच तारांचा क्रम उलट केला व पडदे चल लाविले. शिवाय जलद लयींत वाजवितां येतील अशा गती बांधिल्या व त्यास तालाची साथ दिली, त्यामुळें वीणेपेक्षां लोकांना ती अधिक प्रिय झाली. ह्या वाद्यास तीन तारा लाविल्यामुळें त्यास 'सतार' असें पर्शन नांव त्यानें ठेविलें.

अमीर खुशरू हा अल्लाउद्दिनाचा मित्र असल्यानें फेरफार केलेल्या या नव्या गायनाचा लोकांत प्रसार करण्याची संधि त्यास मिळाली अशा प्रकारें सध्यां जिला 'हिंदुस्थानी' अगर 'उत्तरपद्धति' म्हणतात त्या पद्धतीचा उत्पादक, प्रस्थापक व प्रवर्तक अमीर खुशरू होता हें ह्यावरून दिसून येतें. यानें निरनिराळ्या विषयांवर ७२ ग्रंथ लिहिले आहेत. हा इ. स. १३२५ मध्यें दिल्ली येथें वयाच्या ७२ व्या वर्षीं मरण पावला याची कबर जुन्या दिल्लींत आहे

## पं. लोचन.

हा संगीतज्ञ पंडित मिथिला म्हणजे हल्लींच्या बहार प्रांतांतील मुझफरपूरचा राहाणारा होता. हा तद्देशीय ब्राह्मण जातीचा होता. संस्कृत भाषेचा अभ्यास झाल्यावर ह्यानें प्राचीन संगीत व अर्वाचीन संगीताचा चांगला अभ्यास केला. संगीतशास्त्रांत चांगलें प्राविण्य संपादल्यावर ह्यानें संगीतकलेचा अभ्यास केला हा चतुर, व्यवहारदक्ष व बुद्धिमान होता. शास्त्र व कला ह्यांत चांगली प्रगति झाल्यावर त्यास दिसून आलें कीं, अमीर खुशरूनें जी नवी संगीतपद्धति आपल्या व आपल्या सभोंवतालच्या प्रांतांत चालू केली आहे, ती केवळ नवी नसून जुन्या पद्धतीत कांहीं फेरफार करूनच काढिली आहे. हिचें उगमस्थान आपल्या देशांतच आहे हें यानें ओळखिलें. ह्या पंडिताच्या वेळचा काल संगीतपरिवर्तनाचा असल्यामुळें त्याला जुन्या नव्यातील भेद दिसून आला. तेराव्या शतकाअखेर श्रुतिसंख्या एका सप्तकांत बावीस व श्रुति हें ध्वनीचें माप असे बावीस श्रुति

सात शुद्ध स्वरांत अनुक्रमें ४।३।२।४।४।३।२ अशा वांटल्या जात. षड्ज व पचम विकृत होत असत म्हणून त्यांपासून विकृत स्वरांची प्राप्ति होत असे. कैशिक, काकली व मृदु षड्ज ह्या तीन षड्जांच्या विकृती असून त्या अनुक्रमें १।२।३ ह्या श्रुतींचे ध्वनि असत म्हणून हे मध्य सप्तकांतील षड्जापेक्षां ध्वनीनें कमी असत तसेंच मृदु पचम हा पचम स्वराचा विकृत स्वर असून तो १६ व्या श्रुतीवर अभिव्यक्त होत असे रागांचें वर्गीकरण, गगांग वगैरे प्रकारें करीत व रागाचे स्वर मूर्च्छनेच्या साहाय्यानें आणीत पण पंडित लोचनाच्या वेळी म्हणजे चौदाव्या शतकाच्या अखेरीस व पधराव्या शतकाच्या प्रारंभीं या प्रकारामध्यें पालट झाला होता. तेव्हा ह्या झालेल्या फेरफागच्या अनुरोधाने ग्रंथ लिहून झालेला पालट प्रथम ग्रथगत करण्याचा मान मिळविण्याच्या इच्छेनें त्यानें **राग सर्वसंग्रह** व **राग तरंगिणी** हे दोन ग्रथ लिहिले त्यामुळें ह्या पंडिताल चांगली कीर्ति लाभून तो दीर्घायु होऊन इ स च्या पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## पं. रामामात्य.

**पंडित रामामात्य** हा विजयानगरचा रहाणारा होता. विजयानगरच्या राजांमध्यें कृष्णराय हा फार पराक्रमी असून सर्व कलाची त्याला आवड होती त्याच्या मागून त्याचा चुलत भाऊ अच्युतराय हा गादीवर आला यानें इ स १५३० पासून १५४२ पर्यंत राज्य केलें यालाहि कलांची मोठी आवड होती; परतु हा दुर्गुणी व दुर्बल असल्यानें त्याची सर्व सत्ता त्याचा प्रधान (अमात्य) तिम्मराज यानें बळकावली अच्युतरायानें कर्नूलचा किल्ला बांधिला. याच्या वेळीं वैष्णवपंथाचा फार प्रसार झाला प्रख्यात पुरंदरदास हा अच्युतरायाच्या पदरीं असून विजयानगरातच रहात होता. आपल्या अमात्याच्या पुत्रावर म्हणजे रामामात्यावर अच्युतरायाची फार कृपा होती. अच्युरायानंतर सदाशिवराय गादीवर आला यानें इ. १५४२ पासून १५६७ पर्यंत राज्य केलें याचाही प्रधान तिम्मराज हाच होता याचा पुत्र जो **राम** त्यास आपल्या बापाची अमात्य पदवी होती, का तो सदाशिवरायाचा खरोखरीच प्रधान होता हें ऐतिहासिक पुराव्याच्या अभावीं नक्की सांगतां येत नाहीं ह्यानें '**स्वरमेलकलानिधी**' ग्रंथ संस्कृतांत लिहिला हा दीर्घायु होऊन विजयानगरांतच कालवश झाला

## पं. पुंडरीक विठ्ठल.

मद्रास इलाख्यांत रामनाड जिल्ह्यांतील शिवगंगा तालुक्यांत एक खेडें आहे. त्याचें नांव सात्तनूर. तेथें एक जामदग्न्य गोत्री ब्राह्मणाचा मुलगा राहत होता तो मोठा झाल्यावर संगीतप्रवीण म्हणून त्याची कीर्ति झाली. तोच हा **पुंडरीक विठ्ठल** संस्कृत भाषा व संगीत विद्या यांचा उत्तम अभ्यास करून त्यांत प्राविण्य संपादल्यावर निर्वाहासाठीं व कीर्तिलोभानें त्याला परदेशांत जाण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणें इ स. १५७० च्या सुमारास तो घर सोडून बाहेर पडला; तो प्रथम खानदेशांत गेला त्यावेळीं खानदेश स्वतंत्र असून तेथें **फरुखी** घराण्यांतील राजे राज्य करीत होते तेथील राजे गुणग्राहक, शूर, उदार व विद्वानास आश्रय देणारे असे होते. तेव्हां या तरुण व विद्यासंपन्न ब्राह्मणास तेथें आश्रय मिळाला खानदेशाची त्यावेळीं राजधानी बऱ्हाणपूर ही होती. राजे प्रजावत्सल व लोक सुखी असल्यावर कलाकौशल्याची वाढ साहजिकच होते. संगीतशास्त्र व संगीतप्रचार यांत मोठें अंतर पडलें आहे हें या तरुण विद्वानास दिसून आलें; ती गोष्ट त्यानें राजाच्या कानावर घातली तेव्हां आपल्या पदरच्या या विद्वानाची परीक्षा पाहण्याची ही संधि ठीक आहे असें जाणून राजानें त्यास विचारलें कीं, 'संगीतशास्त्र व प्रचार यांचें ऐक्य घडवून आणण्याची एकादी योजना तुम्हांला सुचत असल्यास सांगा ' तेव्हां पुंडरीक म्हणाला, 'आपण आज्ञा कराल तर हल्लीं जसा प्रचार रूढ आहे, तदनुसार नियम बांधून प्रचार व शास्त्र यांचा मेळ ज्यांत दृष्टीस पडेल असा ग्रंथ तयार करितों. या विद्येंत शास्त्रापेक्षां प्रचाराला अधिक महत्त्व दिलें जावें अशी पूर्वाचार्यांची अनुमतिहि आहेच.' तेव्हां पुंडरीकाचा हा उल्हास पाहून राजानें मोठ्या आनंदानें तसा ग्रंथ तयार करण्यास हुकूम केला हुकुमानुसार पुंडरीकानें '**सद्रागचन्द्रोदय**' नांवाचा ग्रंथ तयार केला. हा पुंडरिकाचा पहिला ग्रंथ होय या ग्रंथारंभीं अहमदखान, ताजखान व बुऱ्हाणखाण हे फरुखी वंशांतील राजे, मोठे शूर, उदार, चतुर असून विद्वानांस आश्रय देणारे, कलाचे भोक्ते अशी त्यांची स्तुति त्यानें गाइली आहे. त्यांची राजधानी जें बऱ्हाणपूर तीस तो 'आनंदवल्ली' या नांवानें संबोधितो. तसें करण्यांत त्यानें पंडितगिरी लढविली आहे कारण फरुख म्हणजे आनंद, समाधान असा अर्थ फारशी भाषेंत आहे. तेव्हां अर्थात् फरुखी घराण्याचे राजे ज्या नगरींत राहतात ती आनंदवल्ली होय खानदेशांत असतांना अकबर बादशहा व त्याचा दरबार यांचीं

रसभरित वर्णनें त्याच्या कानावर येऊ लागलीं, तेव्हा तो बादशहा व त्याचा दरबार पहावा अशी उत्कंठा पुंडरिकास लागली. भवानसिंग या जयपूरच्या रजपूत राजानें आपली बहीण व मुलगी यांना बादशहाच्या जनानखान्यात घालून त्याची मर्जी प्रसन्न करून घेतली आहे, ही हकीगत त्याच्या कानावर आली; तेव्हां त्याच्या द्वारें आपली मनीषा तृप्त करण्याचा त्यानें निश्चय केला. भवानसिंगाचे मुलगे माधवसिंग व मानसिंग हे मोठे उदार व गुणाचे चाहते आहेत, असें समजताच तो त्यांच्या आश्रयास गेला व मानसिंगानें या पंडिताला आपल्या पदरीं ठेवलें. मानसिंगाच्या द्वारा पुंडरिकास बादशहाची ओळख झाली व त्याच्या पदरच्या गुणी व विद्वान् लोकांचा परिचय झाला मानसिंगाच्या आज्ञेनें त्यानें आपला दुसरा ग्रंथ, '**रागमंजरी**' हा लिहिला. या ग्रंथांत प्रारंभीं भगवानदास, मानसिंग, माधवसिंग व अकबर यांच्या स्तुतिपर श्लोक त्यानें घातले आहेत. पुढें संगीतज्ञ म्हणून जेव्हां याची कीर्ति झाली, तेव्हां अकबराचा व त्याचा परिचय झाल्यावर याला अकबरानें एकादा ग्रंथ लिहिण्यास हुकूम केला; तेव्हां मोठ्या हौसेनें, '**रागमाला**' नांवाचा तिसरा ग्रंथ लिहिला. तो ग्रंथ बादशहास पसंत पडल्यावर संगीताचें तिसरें अंग जें नृत्य तत्प्रतिपादक ग्रंथ लिहिण्याची बादशहानें त्यास आज्ञा केली तेव्हां बादशहाच्या इच्छेनुरूप '**नृत्यनिर्णय**' नांवाचा ग्रंथ यानें लिहिला हा याचा चवथा ग्रंथ होय अशा प्रकारें कीर्ति व आयुष्य यांचा भरपूर लाभ झाल्यावर तो तेथेंच कालवश झाला.

## पं. अहोबल.

**अहोबल** हा मूळचा दक्षिणेकडील द्रविड ब्राह्मण त्याच्या वडिलांचें नांव श्रीकृष्ण पंडित अहोबलानें संस्कृत भाषेचा उत्तम अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला नंतर संगीत शास्त्र व कला यांचा अभ्यास पूर्ण झाल्यावर कीर्तीच्या लोभानें व निर्वाहासाठीं तो उत्तरेकडे निघाला उत्तरेकडे जातां जातां धनबड नांवाच्या शहरीं तो गेला. धनबड हें त्यावेळीं एका लहानशा संस्थानाचें राजधानीचें शहर होतें त्या वेळचा तेथील राजा लोकप्रिय, उदार व विद्वानांचा आणि कलावंतांचा भोक्ता असून त्यांचा आश्रयदाता होता. त्या शहरीं राहून अहोबलानें उत्तरेकडील संगीताचा चांगला अभ्यास केला व शास्त्रासाठीं पं. लोचनाच्या ग्रंथाचें परिशीलन केलें. उत्तरेकडील शास्त्र व कला यांत चांगलें प्राविण्य संपादल्यावर राजाची गांठ घेऊन त्यानें आपली विद्वत्ता त्याच्या नजरेस आणिली.

स्थळ प्रत
सं. ३ नं. २०५५
५३२७०
नं ११

याचा इतिहास.

राजा वेंकटेंद्र दरबारी लोकांस त्याचें गायन पसत पडल्यावर राजानें त्यास आपल्या पदरीं ठेविलें. सरकार दरबारांत चांगलें वजन बसल्यावर व सर्व लोकात मान्यता पटल्यावर प. अहोबलानें आपणहि उत्तर पद्धतीवर संपूर्ण ग्रंथ लिहून त्यात लौकिक मिळवावा अशी हाव धरिली राजाश्रय, शिष्यशाखा मोठी, तेव्हां ग्रंथ लिहिण्यास काय उशीर त्यानें उत्तर पद्धतीवर '**संगीत पारिजात**' नांवाचा संस्कृतांत मोठा ग्रंथ लिहिला त्यामुळें त्याची वाहवा फार झाली. तो ग्रंथ उत्तर पद्धतीत सर्व मान्य समजला जात आहे. त्यानें आपल्या ग्रंथात ज्या तीन गोष्टी ग्रथित केल्या त्यामुळें सर्व ग्रंथांत त्याचा ग्रंथ श्रेष्ठ समजला जात आहे. श्रुति आणि स्वर हे भिन्न नसून एकच आहेत. षड्ज ग्रामांतील पहिल्या चार स्वरांच्या दिढीनें पुढील चार स्वर ध्वनि दृष्टीनें उच्च आहेत तो आपल्या रागांत सात शुद्ध व पांच विकृत असे जे बारा स्वर योजी, त्या स्वरांचीं स्थानें त्यानें तारेच्या लांबीनें कायम करून ठेविलीं आहेत म्हणजे अमुक स्वराचा ध्वनि निघण्यास अमुक लांबीची तार पाहिजे हीच गोष्ट पाश्चात्य शास्त्रकारांनीं इ. स १९ व्या शतकांत शोधिली पण त्यांस गणितज्ञ व पदार्थ शास्त्रवेत्ते यांची मदत मिळाली पण त्याच्यावेळीं साधनसामुग्रीचा अभाव असतां त्यानें तें काम केलें म्हणून तो संगीतज्ञाच्या स्तुतीस पात्र झाला आहे. पंडित इ स च्या १७ व्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेला.

## पं. सोमनाथ.

सकलकल या आडनांवाचें एक कुटुंब राजमहेन्द्री शहरी इ स १५१० च्या सुमारास राहत असे त्या कुटुंबांतील कुलपति मेंगनाथ नावाचा होता हा मोठा विद्वान् असून पंडित होता. त्याला एक मुलगा होता, त्याचें नांव मुद्गल असें होतें. तोहि मोठा पंडित अशी त्याची ख्याति होती तो मोठा धर्मनिष्ठ व दानधर्मशील असा होता त्याला एक मुलगा झाला. तोच हा **सोमनाथ** होय. हा सोमनाथ पुढें मोठा विद्वान निघाला. याला संस्कृत भाषा चागली येत होती व्याकरण व अलंकारशास्त्र यांमध्यें तो प्रवीण होता. संगीतविद्येंत तर तो चांगलाच पारगत झाला. याच्या वेळीं संगीताचा प्रचार व संगीतशास्त्र यांमध्यें मोठा विरोध पडलेला याच्या ध्यानांत आला, तेव्हां आपल्या वेळीं जसा गायन-प्रचार आहे तत्प्रतिपादक एखादा ग्रंथ लिहावा असें याच्या मनांत आलें व तो प्रचार ज्यांत उत्तम वर्णिला आहे असा '**रागविबोध**' नांवाचा ग्रंथ त्यानें संस्कृतात लिहिला. या पंडिताचा हा विशेष आहे कीं, यानें आपल्या ग्रंथावर

आपणच सुबोध टीका लिहिली, त्यामुळें तो ग्रंथ समजण्यास मोठें सुलभ झालें आहे. शिवाय त्यानें या टीकेमध्यें आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ इतर ग्रंथकाराचे अनेक उतारे घेतले आहेत, त्यांमुळें ती टीका एक प्रकारें ग्रंथपरिपूरकहि झाली आहे. टीकेमध्यें जागजागीं व्याकरणांतील सूत्रें व मंमट, रुद्रट यांच्या ग्रंथांतील उतारे दिले आहेत, यावरून व्याकरण व अलंकार हीं शास्त्रें त्यास चांगलीं अवगत होतीं असें वाचकांस वाटणें साहजिकच आहे आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या संगीत ग्रंथांतून त्यानें अनेक उतारे टीकेंत घेतले आहेत, यावरून त्या शास्त्राचें त्याचें ज्ञानहि अभिव्यक्त होत आहे हा मोठा वैणिक होता. ह्यानें वीणावादनाचीं अनेक नवीन चिन्हें आपल्या ग्रंथांत योजिली आहेत. याचा ग्रंथ दक्षिण संगीतप्रतिपादक आहे. परंतु यानें उत्तरेकडील व लोचनाचा 'तरंगिणी' नांवाचा ग्रंथ चांगला अभ्यासिला होता असा तर्कास या पंडितानें आपल्या स्वरविवेकांत त्याच्या ग्रंथांतील पारिभाषिक शब्द घेतले आहेत यामुळें जागा झाली आहे. हा पंडित रामभक्त होता, असें त्याच्या नमनावरील श्लोकावरून अनुमान होतें हा पंडित कीर्ति व आयुष्य लाभून ह्याच गांवीं इ. स. १७ शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला

## नारद. ( २ )

ह्या नांवाचे ग्रंथकार संगीतशास्त्रामध्यें तीन झाले आहेत हल्लीं हरी, कृष्ण, राम हीं नांवें जशीं अनेक व्यक्तींचीं दिसून येतात त्याप्रमाणें नारद हें नाम प्राचीन काळीं ब्राह्मण जातीमध्यें ठेवण्याची चाल असावी, किंवा हें गोत्रनाम असावें अशी प्रस्तुत लेखकाची समजूत आहे असो. '**चत्वारिंशतशत रागनिरूपणम्**' ह्या संगीतावरील ग्रंथाचा कर्ता **नारद** या नांवाचा आहे त्याचें राहण्याचें ठिकाण व त्याच्या वाडवडिलांची कांहींच माहिती ग्रंथांत किंवा इतर ठिकाणीं लिहिलेली उपलब्ध नाहीं सदर ग्रंथांत 'नवरोचिका,' 'माहुरी' अशीं रागांचीं नांवें आढळतात; तसेंच रागांचें वर्गीकरण पुरुष, स्त्री, पुत्र, स्नुषा ह्या प्रकारें केलेलें आहे; पण असें विवेचन इ. स. च्या पंधराव्या शतकापूर्वीं ग्रंथांत कोठें उपलब्ध नाहीं तेव्हां ह्या ग्रंथाचा कर्ता नारद इ. स. च्या १५ व्या शतकापूर्वीं झाला नसावा असा प्रस्तुत लेखकाचा तर्क आहे.

## रघुनाथ भूपाल.

तंजावरच्या गादीवरील नायकवंशांतील हा तिसरा राजा. हा मोठा शूर, पराक्रमी व विद्याभिलाषी होता, ह्यानें अनेक देवालयें बांधिलीं कलावंत व शास्त्रज्ञ ह्यास ह्याचा चांगला आश्रय होता ह्यानें '**संगीत सुधा**' नांवाचा ग्रंथ संस्कृतींत लिहिला त्यांतील विचारसरणीवरून ह्याची मार्मिकता प्रतीत होते हा तंजावरच्या गादीवर इ स १६०४ पासून १६६० पर्यंत होता नंतर त्याचा मुलगा गादीवर आला सदर ग्रंथ अद्यापि छापिलेला नाहीं तो तंजावर येथील प्यालेस लायब्ररीमध्यें आहे.

## नारद. ( २ )

'**संगीत मकरंद**' हा ग्रंथ यानें लिहिला ह्याच्या कालाबद्दल विचार करितां ह्या ग्रंथांत स्वर मूर्छना, राग, ताल नृत्य वगैरे विषय आले आहेत पुरुषराग, स्त्रीराग अशा प्रकारची या ग्रंथांत केलेली रागांची वर्गवारी तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या कोणत्याहि ग्रंथांत दिसून येत नाहीं; म्हणून सदर ग्रंथकार १४।१५ व्या शतकांपुढील काळांत झाला असावा असें दिसतें ह्या ग्रंथकारानें आपल्या डोळ्यापुढें 'रत्नाकर' ग्रंथ ठेवून त्याचा संक्षेप केला असावा व आपल्या वेळचें रागवर्गीकरण त्यांत सामिल केलें असावें असें वाटतें, कारण त्याच्या वेळेचा व कालाचा अंमल त्यास झुगारतां आला नाहीं याच्या ग्रंथामध्यें 'माहुरी' हें राग नाम आढळतें शिवाय संस्कृत रागांस मुसलमानी नांवें दिलेलीं आढळतात. माहुरी हें रागनाम सारंग रागास पुंडरीक विठ्ठलानें आपल्या ग्रंथांत योजिलें आहे संस्कृत राग नामास मुसलमानी रागनामें देण्याची योजना १६।१७ व्या शतकांतील दिसते ह्या सर्व कारणांवरून सदर ग्रंथकार १५।१६ व्या शतकापूर्वीचा नसावा असा प्रस्तुत लेखकाचा तर्क आहे कोणी त्यास ८ व्या शतकांत घालतात, पण त्याचे राग व त्याचें वर्गीकरण वगैरे गोष्टी तो काळ ठरविण्यास नडतात हें त्याचा तो काल ठरवितांना त्यांच्या ध्यानांत कसे आलें नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें।

## पं. श्रीनिवास.

हा पंडित अहोबलाचा अनुयायी आहे हें स्पष्ट दिसतें. अर्थात् तो अहोबलानंतर झाला हें उघड आहे; म्हणजे हा इ स सतराव्या शतकाच्या उत्त-

रार्थांत झाला असें मानणें चुकीचें होणार नाहीं ह्यानें जो ग्रंथ लिहिला त्याचें नाव '**रागतत्त्वविबोध**' असें आहे. ह्या ग्रथात ह्यानें जेथें अहोबल पंडिताची भाषा त्याच्या ग्रथांत संदिग्ध होती, तेथें ती स्पष्ट करून तेंच मत प्रस्थापित केलें आहे. रागास बारच स्वर लावावे वगैरे ह्याचीं मतें स्पष्ट व खुलासेवार आहेत ह्याचा रागतत्त्वविबोध हा ग्रथ प्रस्तुत लेखकाच्या वडिलांचे संपादकत्वाखालीं प्रसिद्ध झाला आहे.

## हृदयनारायणदेव.

हा गढा देशाचा राजा ह्याच्या बापाचें नाव प्रेमशहा ऊर्फ प्रेमनारायण ओरछाचा राजा वीरसिंग याचा पुत्र झुझारसिंग ह्यानें प्रेमशहास इ स १६३४ मध्यें पराभूत करून ठार मारिलें. तेव्हां त्याचा हा मुलगा हृदयनारायण तेथून पळाला. त्यानें दिल्लीपति शहाजहान बादशहाच्या मदतीनें आपली गादी पुन. मिळविली परंतु त्यास सभोंवारच्या प्रबळ राजानीं पुनः इ स १६५१ मध्यें गादीवरून हांकून लाविलें तेव्हा तो जबलपरच्या दक्षिणेस मडळा येथें जाऊन राहिला तेव्हापासून ह्या राजांस गढामडळा' चे राजे म्हणूं लागले हृदयनारायण राजास दोन पुत्र होते, एक छत्तरशहा व दुसरा हरसिंग. हा राजा इ. स. सतराव्या शतकात झाला ह्यानें संगीतावर दोन ग्रथ लिहिले (१) **हृदयकौतुक** (२) **हृदयप्रकाश** 'तरंगिणी' ग्रथ पाहून त्यास पहिला ग्रथ लिहिण्याची इच्छा झाली असावी असें त्या ग्रंथाच्या मांडणीवरून वाटतें. दुसरा ग्रथ हृदयप्रकाश हा अहोबल पंडिताचा पारिजात ग्रथ पाहून त्या धर्तीवर लिहिण्याचें त्याच्या मनानें घेतलें असावें असें दिसतें. ह्या ग्रथांत त्याच्या वेळच्या बारा स्वरांच्या निश्चित जागा त्यानें तारेच्या लांबीनें स्पष्ट सांगितल्या आहेत तसेंच या ग्रंथांतील मेळव्यवस्था त्यानें मोठ्या चतुराईनें योजिली आहे. हे दोनहि ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले आहेत. हे दोनहि ग्रथ उत्तरपद्धति प्रतिपादक सर्वमान्य ग्रथांत मोडतात. ह्या राजानें आपल्या पदरच्या जय गोविंद नांवाच्या पंडिताकडून आपल्या घराण्याचा इतिहास लिहवून तो शिळेवर खोदवून आपल्या राजवाड्यावर इ स १६६७ त ती शिळा लावविली हे दोन ग्रंथ आतां छापून प्रसिद्ध झाले आहेत ते संपादन करण्याचें काम प्रस्तुत लेखकाच्या वडिलांनीं केलें आहे.

## पं. व्यंकटमखी.

**व्यंकटेशाच्या** वडिलांचें नाव गोविंद दीक्षित व मातोश्रींचें नाव नागमांबा. नायक घराण्यातील शेवटचा राजा विजयराघव इ स. १६६० मध्यें गादीवर बसला. तंजावरच्या गादीवरील हा राजा मोठा शूर असून विद्येचा व कलेचा मोठा भोक्ता होता व्यंकटेश्वर पंडिताचा पिता गोविंद दीक्षित हा याचा दिवाण होता. राजा जसा शस्त्रांत प्रवीण तसा त्याचा दिवाण शास्त्रांत प्रवीण होता. विजयराघव युवराज असतां व्यंकटेश्वराची व त्याची मैत्री जडली. पुढें तो गादीवर आल्यानतर त्यानें आपला मित्र व्यंकटेश्वर यास दरबार-गायक नेमिलें.

व्यंकटेश्वराचे गायनगुरु तानापाचार्य होते त्याच्या वडिलांचें नांव हैनैय्याचार्य ते आपली गुरुपरंपरा शार्ङ्गदेवापर्यंत आहे असें म्हणत गुरूजवळ संगीताचा अभ्यास केल्यावर ' गंधर्व जनता सर्व ' हें गीत त्यानें आरंभीं रागांत गुरुवर्णनपर प्रथम रचिलें हें गीत अद्यापि तिकडे प्रचारांत आहे. अप्पय दीक्षिताच्या भावाचे पौत्र नीलकंठ दीक्षित नांवाचे होते. त्यांनीं ' नीलकंठ-विजय ' नांवाचा ग्रंथ इ स १६३८ च्या सुमारास लिहिला. त्यांचा दुसरा ग्रंथ 'गंगावतरण' हा होय त्यांत दीक्षित लिहितात कीं, ' मी व्यंकटेश्वराचा शिष्य आहें. '

**चतुर्दण्डिप्रकाशिका** नांवाचा संगीतावर ह्यानें ग्रंथ लिहिला. तो दक्षिण पद्धति प्रतिपादक ग्रथांत श्रेष्ठ म्हणून गणिला जातो. हा ग्रंथ आतां छापला आहे. याचें संपादकत्व प्रस्तुत लेखकाच्या वडिलांकडे आहे. हा पंडित इ. स च्या १७ शतकाच्या अखेरीस तंजावर येथें कालवश झाला.

## पं. दामोदर.

**दामोदराच्या** पित्याचें नांव लक्ष्मीधर हा पंडित कोठल्या प्रांताचा हें नीटसें समजत नाहीं पंडित दामोदर दिल्लीपति जहांगिर बादशहाच्या वेळेस झाला त्यानें ' **संगीतदर्पण** ' नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला. स्वराध्याय, रागाध्याय, प्रबंधाध्याय, वाद्याध्याय, तालाध्याय व नृत्याध्याय असे ह्याचे सहा अध्याय आहेत ह्यानें स्वराध्याय रत्नाकरांतून घेतला, परंतु रत्नाकरकार इ स १३ व्या शतकांत झाला, त्यावेळीं श्रुती एका प्रमाणाच्या होत्या. षड्ज, पंचम हे स्वर विकृत होत होते, पण इ स. १७ व्या शतकांत जेव्हां श्रुति एका प्रमाणाच्या नव्हत्या; षड्ज, पंचम अविकृत झाले होते तेव्हां इ. स. तेरावे

शतकांतील स्वर आपल्याला कसे चालतील ह्याचा विचार ह्यानें केला नाहीं ह्यामुळें संगीतदर्पण ग्रंथाच्या स्वराचा खुलासा नीट होत नाही रागाध्याय त्यानें दुसऱ्या कोणत्यातरी ग्रंथातून घेतला आहे, कारण रत्नाकाराचे राग त्याच्या-वेळी उपयोगीं येतेना, कारण रत्नाकरकाराच्या वेळचें रागवर्गीकरण निराळें व ह्याच्या वेळचें निराळें झालें होतें. ह्यानें रागाचीं देवतात्मक वर्णनें दिलीं आहेत त्याचा उपयोग श्रद्धाळू उपासकांसच होईल ! संगीत जिज्ञासूंस त्याचा काय उपयोग होणार ! स्वरांचे जे रंग ह्यानें सांगितले आहेत त्या रंगानें तीं चित्रें रंगविलीं जाणार नाहींत पण आज२०व्या शतकात काहीं लोकांस त्या रागाचीं चित्रें रंगविण्याचा मोह पडत आहे हें पाहून आश्चर्य वाटतें एक तर ग्रंथांतील स्वराचा खुलासा होत नाहीं असें असतां केदार रागाचें चित्र काढावयाचें ! १७ व्या शतकांतील केदार रागाचे स्वर व आजच्या केदार रागाचे स्वर भिन्न आहेत; तरी देखील दर्पणांत सांगितल्याप्रमाणें रागांचीं चित्रें काढणें समजस आहे काय ? ह्याचा विचार सूज्ञ वाचकांनीं करावा ह्या ग्रंथाचें पर्शियनमध्येंहि भाषांतर झालें आहे हा ग्रंथ आतां छापला गेला आहे

## भावभट्ट.

हा ग्रंथकार आभीर देशांत धवलपूर येथील राहणारा हा जातीनें ब्राह्मण असून ह्याचें गोत्र कृष्णात्र असें होतें ह्याच्या मातेचें नांव स्वप्रभवा व पित्याचें नांव जनार्दन भट्ट होतें हा पंडित बिकानेरचे महाराज अनूपसिंह (१६७४–१७०९) ह्याच्या पदरीं होता ह्यानें महाराजाचे आज्ञेवरून **अनूपसंगीत विलास, अनूपसंगीत रत्नाकर, अनूपसंगीतांकुश** व **मुरलीप्रकाश** वगैरे ग्रंथ संस्कृतांत रचिले ह्याचें संस्कृतभाषेचें ज्ञान मोठें होतें असें ह्याच्या ग्रंथाच्या भाषेवरून वाटतें आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या ग्रंथकारांचा त्यानें जागोजाग उल्लेख केला आहे. ह्याचे हे तीन ग्रंथ आतां छापून प्रसिद्ध झाले आहेत प्रस्तुत लेखकाच्या वडिलांनी ते संपादित केले आहेत

## श्रीकंठ.

**श्रीकंठ** हा नवानगर येथील राहणारा. ह्यानें इ. स. च्या १८ व्या शतकांत **रसकौमुदी** नांवाचा ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिला. त्यामध्यें पहिल्या भागात संगीताची माहिती दिली आहे व दुसऱ्या भागांत साहित्याबद्दल लिहिलें आहे. प्राचीन

संगीत ग्रंथातील माहिती ह्यानें आपल्या भाषेंत दिली आहे. स्वरपरिभाषा व मेळ-परिभाषा दक्षिण पद्धतीची आहे. उत्तरेंत राहून दक्षिण पद्धति प्रतिपादक ग्रंथ लिहिणें चमत्कारिक वाटेल, परंतु त्यांतील रहस्य असें आहे कीं, उत्तरेकडील संगीतज्ञांस दक्षिण पद्धतीचा ग्रंथ लवकर लागणार नाहीं; तेव्हां साहजिकच लोकावर ग्रंथकाराची छाप पडणार कीं, विद्वान म्हणविणारासहि हा ग्रंथ समजत नाहीं। असो. असे अनेक ग्रंथकार आहेत त्यांपैकींच हा एक होय. हा ग्रंथ अद्यापि छापून प्रसिद्ध झाला नाहीं ह्याची हस्तलिखित प्रत बडोद्याच्या लायब्ररींत आहे.

## तुळाजीराजे भोसले.

तंजावरचे श्रीमंत **तुळाजीराजे** भोसले हे महाराज, शिवाजीमहाराजांच्याच वंशांतील एक पुरुष होत. तंजावरच्या गादीवर प्रसिद्ध शूर राजा प्रतापसिंग हा कैलासवासी झाल्यावर त्याचा हा पुत्र इ. स. १७६५ ह्या वर्षी त्या गादीवर बसला. हा राजा विशेष पराक्रमी नव्हता विद्या व कला यांचा तो प्रेमी असून मोठा धर्मशील होता. देवालयें व धर्मशाळा बांधणें, तीर्थयात्रा करणें अशा धर्मकृत्यांत त्यानें बराच पैसा खर्च केला हा राजा गादीवर आल्यावर कांहीं वर्षांनी म्हणजे इ स १७७१ सालीं अर्काटचा नबाब महंमदअली यानें तंजावरावर स्वारी केली. त्या झटापटींत अर्काटचा नबाब विजयी झाला; मग त्यानें तुळाजीस कैदेंत टाकिलें व तंजावरचा राज्यकारभार आपण करूं लागला. अशीं दोन वर्षें गेलीं. पुढें तुळाजीनें इंग्रजांशीं संधान बांधून, महमदअलीची समजूत त्यांच्याकडून करविली मग इंग्रजांनीं तुळाजीस कैदेंतून सोडवून त्यास तंजावरच्या गादीवर बसविलें ही गोष्ट इ स. १७७३ त घडली या गोष्टीचा परिणाम असा झाला कीं, त्यास इंग्रजांचें स्वामित्व पत्करावें लागलें या वेळे-पासून तंजावरचे राजे इंग्रजांचे मांडलिक बनले या राजास तीन पुत्र व तीन कन्या झाल्या. हीं सर्व अपत्यें त्याच्या देखत वारल्यानें राजा फार कष्टी व उदास झाला व इ. स. १७८६ मध्यें मरण पावला. त्यानें **संगीतसारामृतोद्धार** नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला. या ग्रंथाची भाषा सरळ व स्पष्ट आहे यांमध्यें प्रतिपादिलेलीं मतें ठाम आहेत. या ग्रंथांतील मतें या राज्यात शंभर वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या ग्रंथकाराच्या ग्रंथांशीं बहुशीं मिळतात हा ग्रंथ दक्षिण-पद्धति-प्रतिपादक सर्वमान्य ग्रंथांत मोडतो असें विद्वानांचें मत आहे.

## मिर्झा खान.

हा ग्रंथकार इ स च्या एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी झाला असावा, कारण ह्यानें लिहिलेल्या **तोफेतुल हिंद** ह्या उर्दू ग्रंथाचें उतारे इ. स. १८१३ त लिहिलेल्या **नगमाते आसफी** ह्या उर्दू ग्रंथांत घेतलेले दिसतात ह्या ग्रंथकारास हिंदुस्थानी संगीताचें चांगलें ज्ञान असावें असें त्याच्या ग्रंथावरून दिसतें. ह्यानें आपल्या ग्रंथास 'संगीत दर्पण,' 'रागार्णव,' 'सभाविनोद' वगैरे संस्कृत ग्रंथाचे आधार घेतले आहेत. ह्या ग्रंथकारास अझमशहाचा आश्रय होता. हिंदुस्थानी संगीतास ह्याचा ग्रंथ बराच आधारभूत आहे, ह्याचे शुद्धस्वर-सप्तक 'बिलावल' असावे असें ह्याच्या लिहिण्यावरून वाटतें.

## महंमद रझा.

हा लखनऊचा नबाब आसफ उद्दवला (१७७५-१७९५) ह्याच्या पदरीं होता ह्या मोठा शोधक व विद्वान् होता ह्यानें संगीतावरील जुने ग्रंथ समजून घेऊन आपल्या वेळचें संगीत '**नगमाते आसफी**' ह्या ग्रंथांत लिहून ठेविलें आहे. हा ग्रंथ उर्दू भाषेंत इ स १८१३ लिहिला. आसफउद्दवला याच्या पदरीं जे गायकवादक होते त्यांचें सहाय हा ग्रंथ लिहीत असतांना ह्या ग्रंथकारास झालें. ह्या ग्रंथकारानें आपल्या आश्रयदात्याचें नांव पुस्तकास दिलें आहे ह्या ग्रंथांत मुख्य सहा राग व त्यांच्या भार्या, स्नुषा, असें रागांचें वर्गीकरण करून त्यांची माहिती सविस्तर दिली आहे ह्याच्या लिहिण्यावरून ह्याच्या ग्रंथाचें शुद्धसप्तक बिलावल असावें असें दिसतें हा इ स आठराव्या शतकाच्या शेवटीं व एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभीं झाला हा ग्रंथ अद्यापि छापिला गेला नाहीं. ह्या ग्रंथाचे कांहीं उतारे हिंदुस्थानी संगीत पद्धति ह्या मराठी ग्रंथांत घेतलेले दृष्टीस पडतात.

## हकीम महंमद करमइमाम

हे लखनऊचे राहणारे. हे एक विद्वान गृहस्थ असून इंग्रजसरकारच्या नोकरींत होते पुढें कांहीं वर्षांनी म्हणजे इ स. १८५४ च्या सुमारास ते नोकरी सोडून लखनऊस राहाण्यास आले, व पुढें मरेपर्यंत ते तेथेंच होते ह्यांच्या वडिलाचें नांव दिलावरखां, हे मोठे संगीतज्ञ होते ह्यानें संगीताचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला. लखनऊस परत आल्यावर त्यांनीं नबाब वाजिद अल्ली-

शहा याचा सासरा नबाब इकरामउद्दौला यांजपाशीं नोकरी धरली. तेथें असताना त्यांनीं **मादनूल मुसिकी** नांवाचा उर्दू मध्यें एक ग्रंथ लिहिला. त्या पुस्तकाचा विशेष हा, कीं, त्यात कलावंताच्या घराण्याचा इतिहास ग्रथित केला आहे हे गृहस्थ इ स १८६५ च्या सुमारास कालवश झाले, मादनुल मुसिकी हा ग्रथ इ स १९२५ सुमारास छापून प्रसिद्ध झाला आहे

## कृष्णानंद व्यास.

हा दिल्लीचा राहणारा. त्याच्या आजाचें नांव अमरानंददेव व्यास, बापाचें नाव आहीरकानंदेव व्यास ह्यानें **रागकल्पद्रुम** नांवाचा ग्रंथ लिहिला, व तो इ स १८४२ मध्यें कलकत्ता येथें छापिला ह्यानें ग्रंथारंभीं प्रथम जी शास्त्रीय माहिती ग्रंथास जोडली आहे तिचा उपयोग संगीताचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस फारसा होण्याजोगा नाहीं त्याच्या लिहिण्यावरून त्याच्या शुद्ध स्वरांचें सप्तक 'बिलावल' असावें असें वाटतें. ह्यानें तीस वर्षं खपून दीर्घ प्रयत्नानें व चिकाटीनें एक काम केलें तें म्हणजे सर्व देशभर हिंडून अनेक लोकांचीं पायधरणी करून ध्रुवपद, धमार, ख्याल, टप्पा, ठुमरी वगैरे त्यावेळीं प्रचलित असलेल्या चीजा जमा करून त्या छापिल्या. वेब्स्टरच्या इंग्रजी कोशासारखे त्याचे चार भाग आहेत. त्या चीजांचा उपयोग प्रत्यक्ष गाणारास काहीं होणार नाही कारण त्या सताल व सस्वर अशा नाहींत. खरें, कविता ह्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व नाहींच. कारण त्या कविता कनिष्ठ प्रतीच्याच आहेत. जुन्या चिजा व त्यांचीं अक्षरें कशीं होतीं ह्या कौतुकानें त्यांकडे पाहणारास त्याचें महत्त्व !

## क्षेत्र मोहनस्वामी.

राजा शौरीन्द्र मोहन टागोर याचे हे गायन गुरु. हे आपल्यास बंगाल्यामधील 'विष्णुपुरी' पद्धतीचे परंपरेतील समजत होते टागोर साहेबांनीं जे ग्रंथ प्रकाशित केले त्याचें काम ह्यास त्यानीं सांगितलें होतें. संस्कृतांतील आर्यसंगीतावरील प्राचीन ग्रथांचें शुद्ध स्वर सप्तक बिलावल आहे अशी यांची समजूत होती. ह्यावरून प्राचीन ग्रंथांचें यथार्थज्ञान त्यांस नीट झालें नव्हतें असें निरुपायानें म्हणणें भाग आहे. बंगालमध्यें हे संगीतशास्त्रज्ञ म्हणून समजले जात हे स्वभावानें नम्र असत हे इ स च्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## राजा शौरींद्रमोहन टागोर.

हिंदुस्थानची पूर्वींची राजधानी जें कलकत्ता शहर त्यामध्यें जीं श्रीमान् व विद्वान् घराणीं इंग्रजी अमदानींत प्रसिद्धीस आलीं त्यांपैकीं टागोर घराणें हें एक आहे. शौरींद्रमोहन हे विद्वान् व श्रीमान् असून सरकारच्या कृपेंतले होते त्याचा स्वभाव मनमिळाऊ व लोककल्याणकारण होता तसेंच त्याना संगीताचा मोठा नाद होता. त्यांनीं संगीतावरील जुनें संस्कृत ग्रंथ मोठ्या प्रयासानें व द्रव्य खर्च करून जमा केले व त्यांची मोठी लायब्ररी सजविली होती; तसेंच अनेक गायक, वादक आपल्या नोकरीस ठेविले होते कोणीकडून संगीतचा उत्कर्ष होईल असे उपाय योजण्यांत त्यांनीं कमी केलें नाहीं. संगीतावरील अनेक सर्वमान्य संस्कृत ग्रंथ छापविले व तज्ज्ञास ते फुकट दिले. त्यांनीं आपल्या वेळचे या विषयांतील विद्वान् **क्षेत्र मोहनस्वामी** यास गुरु केलें होतें क्षेत्र मोहनस्वामींना जुन्या संगीत ग्रंथांच्या स्वरांचें योग्य ज्ञान न झाल्यानें जुन्या सर्व संस्कृत ग्रंथांचा शुद्ध थाट ते '**बिलावल**' मानीत. ह्यामुळें त्यांच्या लेखांत अनेक चुकींचीं विधानें ग्रथित झालीं. आपल्या गुरूकडून राजा टागोर ह्यांनीं संगीतावर '**संगीतसारसंग्रह**' नांवाचा ग्रंथ लिहविला. संगीताच्या माहितीसंबंधानें त्यांनीं अनेक ग्रंथ इंग्रजी भाषेंतहि लिहविले. एकंदरींत ह्याच्या परिश्रमानें संगीताच्या उन्नतीस उत्तम मदत झाली आहे. '**संगीताचा इतिहास**' ह्या नांवाचें त्यांनीं एक उत्तम पुस्तक इंग्रजींत लिहिलें आहे. हे इ. स. १९१५ च्या सुमारास कलकत्ता येथें कालवश झाले.

---

## कृष्णधन बानर्जी.

इतर प्रांतांपेक्षां बंगालमध्यें संगीताची गोडी जास्त आहे. तेथील लोक श्रीमान् व विद्वान् आहेत इ. स. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं संगीताचा व्यासंग करणारीं जीं विद्वान् माणसें निघालीं त्यांत **कृष्णधन बानर्जींचें** नांव प्रामुख्येंकरून कलकत्त्याच्या लोकांच्या तोंडीं आहे. हे गृहस्थ शिकलेले असून त्यांनीं कांहीं दिवस सरकारी नोकरीहि केली होती. ह्यांनीं संगीताचा अभ्यास मनापासून करून '**गीतासूत्र**' नांवाचा या विषयावर एक बंगाली भाषेंत उत्तम ग्रंथ लिहिला त्यांत संगीतावरील अनेक विषयांची चर्चा मोठ्या मार्मिकपणें केली आहे. मूर्च्छना, ग्राम, राग वगैरेबद्दल त्यांनीं सविस्तर विवेचन केलें आहे. एकंदरींत तें पुस्तक हल्लींच्या उत्तम पुस्तकांत गणण्याजोगें आहे.

शेवटी शेवटी बानर्जी हे कुचबिहार संस्थानांत जाऊन राहिले होते पुढें कांहीं दिवसांनी तेथेंच ते कालावश झाले ह्यांनी आपल्या ग्रंथांत अनेक ध्रुवपदें व ख्याल 'स्टाफ' नोटेशनें छापिली आहेत. ह्यांच्या ग्रंथांची नवी आवृत्ति निघणें योग्य आहे. ती निघेल तो सुदीन प भातखंडे ह्यांनीं आपल्या ग्रथात कोठें कोठें त्याच्या मतांचें सार दिलें आहे; ही गोष्ट हिंदुस्थानी संगीतपद्धति ग्रथाचे वाचकांस आठवत असेलच त्यास एक मुलगा आहे. पण त्यास संगीताचें ज्ञान बेताचेंच आहे असें म्हणतात.

## सवाई प्रतापसिंह.

हे राजे जयपूरच्या गादीवर असतां ( इ. स. १७७९-१८०४ ) त्यांच्या मनात संगीतावर एक सर्वमान्य ग्रंथ लिहवावा असें आलें ह्यांना त्या विद्येची आवड फार असे त्यावेळचे कलावंत व शास्त्रज्ञ त्यांच्या बोलावण्यानें त्यांच्या राजधनींत हजर झाले. कलावंत चांगल्या प्रतीचे जमले परंतु पहिल्या प्रतीचे शास्त्रज्ञ त्यांत आले नसावेत असें ग्रंथावरून दिसून येतें. महाराजांच्या हुकुमानें त्यानीं '**संगीतसार**' नांवाचा ग्रंथ हिंदींत तयार केला. ह्या ग्रथाचें शुद्ध सप्तक 'बिलावल' आहे. पुष्कळ वर्षें तो ग्रंथ न छापतांच राहिला होता, पण पुणें गायनसमजाचे सेक्रेटरी के ब ज्य सहस्रबुद्धे यांनीं तो इ स १९१३।१४ त छापिला प्रतापसिंहमहाराजांस ह्याचें श्रेय आहे.

## आप्पा तुळशी.

हे दक्षिण हैद्राबाद येथें राहत असत निजामाचे पदरीं हे गायक म्हणून नोकर असत हे ध्रुवपद गात. हे चांगले संस्कृतज्ञ असत ह्यांची संस्कृत कविता करण्याची हतोटी चांगली असे. ह्यांनीं संगीतावर संस्कृतांत **संगीत सुधाकर**, **राग कल्पद्रुमांकुर, रागचंद्रिका, अभिनवतालमंजरी** व हिंदीमध्यें **रागचंद्रिकासार,** अशीं पुस्तकें लिहिलीं आहेत. प्रचलित संगीतास यांचीं पुस्तकें आधार ग्रंथ समजलीं जात आहेत. ह्यांचें लिहिणें स्पष्ट व सुबोध असे संगीतावरील संस्कृत ग्रंथ ह्यांनीं वाचिले होते हे बरेच वयातीत होऊन इ. स. १९२० च्या सुमारास हैद्राबाद येथें कालावश झाले ह्यांचे सारे ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत. मुंबईचे प्रसिद्ध गायनाचार्य वि. ना. भातखंडे यांचा व आप्पा तुळशी यांचा चांगला परिचय होता.

# पं. विष्णु नारायण भातखंडे.

हे चित्तपावन ब्राह्मण मुंबईचे राहणारे. ह्यास लहानपणापासून गायनाचा नाद होता. शाळेंत व कॉलेजांत अभ्यास करीत असताहि त्यांनी ह्या नादाकडे दुर्लक्ष केलें नाही पण इ. स. १८९० मध्यें LL. B. पास होऊन मुंबईस वकिली करूं लागल्यावर त्यास मूर्त स्वरूप आलें. त्यांनीं **हिंदुस्थानी संगीत पद्धति** नांवाचे चार भाग मराठींत लिहून त्यात सुमारें दोनशें रागांचें उत्तम विवरण केलें आहे. जुने संगीत ग्रंथ, काश्मीरापासून रामेश्वरापर्यंत फिरून जमा केले व त्यांचा उत्तम अभ्यास केला. त्यांच्या पूर्वीं, संगीत संस्कृत ग्रंथांचा इतका अभ्यास कोणी केल्याचें ऐकिवात नाही. हस्तलिखित प्रती मिळवून तें छापण्याचें कामहि त्यांनीं केलें. त्या संस्कृत ग्रंथांचें संपादकत्व त्यांनीं आपले पुण्याचे मित्र **पंडित जोशी** यांजकडे सोंपविलें. इ. स. १९१० मध्यें त्यानी संस्कृतात **लक्ष्यसंगीत**' ग्रंथ लिहून छापून प्रकाशित केला. तो ग्रंथ म्हणजे हल्लींच्या गायनाचा आधार ग्रंथच आहे. पुढें '**अभिनवरागमंजरी**' नावाचा संस्कृत ग्रंथ लिहून छापला. तो ग्रंथहि चांगला आहे. त्यांनीं प्रत्यक्ष गायनाचा अभ्यास प्रथम रावजीबुवा बेलबागकर यांजपाशीं केला. नंतर जयपूरचे प्रसिद्ध गायक महमद अलीखां व त्यांचा मुलगा यांजपाशी केला. महमद अलीखांपासून सुमारें ३०० चीजांचीं रेकॉर्डेहि त्यांनीं घेऊन ठेविलीं आहेत. प्रस्तुत लेखकाप्रमाणें त्यांचें गाणें ऐकण्याचा लाभ ज्यास झाला असेल त्यास त्यांच्या गायनांतील खुब्या कशा आहेत हे कळलें असेल. त्यांचें स्वरज्ञान फार उत्तम व बिनचुक आहे. चीजाचें 'नोटेशन' करण्याची हलवटी त्यांच्यासारखी आजतरी कोणास साधलेली नाही. त्यांच्या परिश्रमानें अखिल भारतीय संगीत परिषदा पांच निर-निराळ्या शहरीं भरून रागाचीं चर्चा वगैरे होऊन संगीताचा फार फायदा झाला आहे. त्यांच्याच प्रयत्नानें ग्वालेरीस व लखनऊस संगीत कॉलेजें स्थापन झाली आहेत. हे हिंगण्याच्या युनिव्हर्सिटीचे परीक्षक होते. इ. स. १९२० मध्यें त्यांनीं क्रमिक चार पुस्तकें चीजांच्या तालस्वरासह छापून प्रसिद्ध केलीं आहेत. चार पुस्तकें मिळून सुमारें १५०० शें. चीजा भरतील. राजा ठाकुरबाब, कै० आण्णा तुळशी, पुण्याचे पं. जोशी वगैरे संगीतज्ञ त्याचे मित्र होते व आहेत. आतां वृद्धापकाळ झाल्यानें ते निवळ विश्रांति घेत आहेत.

## पं. दत्तात्रेय केशव जोशी.

इ स. १८९६ मध्यें पुण्यांत नूतन मराठी विद्यालयात नोकरी धरल्यापासून त्यांनीं गायनशास्त्राचा व कलेचा अभ्यास सुरू केला त्यावेळीं जीं संस्कृत व मराठी पुस्तकें प्रकाशित झालीं होतीं त्याचा त्यांनी चांगलाच अभ्यास केला पुढें इ स. १९०५ मध्यें त्यांचे परमस्नेही कै हरिभाऊ आपटे ह्यांच्या मध्यस्तीनें त्यांनी 'पुणें गायन समाजाचे' सेक्रेटरीचें ऑनररी काम पत्करिलें. मुख्य अधिकार कै. बळवंत त्र्यंबक सहस्रबुद्धे ह्याच्याकडे होता. यानी नू म. विद्यालय, भावोंची शाळा व नवीन मराठी शाळा ह्या तीन शाळेंत मराठी शासेकडे गायन समाजाचे शिक्षक देऊन गायन सुरू केलें; व सरकारी ग्रँट दोनशेंपासून १ हजारापर्यंत मिळवून दिली. नू म. विद्यालयाच्या इग्रजी तीन इयत्तेमधील मुलास हें शास्त्रीय शिक्षण विनामूल्य देत असत. ह्यावेळीं ह्यांनीं कै. गणपतीबुवा भिलवडीकर याजपाशीं प्रत्यक्ष गायनाचा अभ्यास सुरू केला प्रत्यक्ष गायनाचा अभ्यास त्यांनीं सात वर्षें केला सहस्रबुद्धे यांच्याशीं मतभेद झाल्यामुळें त्यांनीं गायनसमाज सोडला. इ. स १९१२ सालीं त्यांनीं पं. भातखडे यांजकडे ग्वालेर घराण्यांतील आपणास येत असलेल्या सुमारें ४०० चीजाचें नोटेशन करून पाठविलें. इ स १९१० सालापासून प भातखडे यांच्याशो त्यांचा स्नेह जडला तो अद्यापि कायम आहे. यांनीं मराठी ज्ञानकोशांत राग व ताल, संगित, वाद्य, वृद्संगीत वगैरे सगीत विषयांवर केतकरांच्या विनतीवरून लेख लिहिले आहेत. त्याबद्दल त्यांजपासून काहीं मोबदला घेतला नाहीं तसेंच **महाराष्ट्र-शब्द-कोशांत** संगीताचे सुमारें अठराशें शब्द विनामूल्य लिहून दिले आहेत. सगीताच्या परिषदेमध्यें भारदस्त निबंध त्यानीं लिहून वाचिले आहेत त्याबद्दल त्यांची वाहवा झाली आहे इ स १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत श्रुति हें ध्वनीचें माप होतें म्हणजे श्रुती समप्रमाण होत्या इ स. १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत भरतखंडभर एकच गायनपद्धति होती रागगायन इ स च्या १० व्या शतकापूर्वीं नव्हतें. बिलावल सप्तक मींयां तानसेनाच्या वेळीं प्रचारांत आलें. उत्तरसंगीत पद्धतीचा जनक अमीरखुसरू; वगैरे प्रमेये जीं त्यांच्या लेखात दृष्टीस पडतात तें त्यांच्या तीन तपांच्या सगीताच्या व्यासगाचें फळ आहे

हिंगणे युनिव्हर्सिटीमध्यें दोन वर्षें सगीतशास्त्रावर त्यानीं विद्यार्थिनींस विनामूल्य व्याख्यानें दिलीं आहेत तेथें सगीत विषयाचे ते अनेक वर्षें परीक्षक होते तेथील संगीताचा अभ्यासक्रम त्यानींच तयार करून दिला आहे. कर्वे

युनिव्हर्सिटीमध्यें संगीत विषयाच्या बुक कमिटीचे अद्यापि ते मेंबर आहेत इ. स १९२० मध्यें जी **क्रमिक पुस्तकमालिका** प्रसिद्ध झाली तिचे ते संपादक आहेत त्याचप्रमाणें अनेक संगीत संस्कृत ग्रंथ त्यांनीं संपादिले आहेत लखनऊ-मधील **मॉरिस संगीत** कॉलेजमध्यें विनामूल्य त्यांनीं दोन वर्षें व्हाइस प्रिन्सि-पालचें काम व प्रत्यक्ष गायन शिकविण्याचें काम केलें आहे. अनेक विद्यार्थ्यांस आजवर त्यांनीं शास्त्र व प्रत्यक्ष गायन शिकविलें आहे 'रागकोश' 'हिंदुस्थानी-संगीतप्रकाश' वगैरे पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत. आतां त्यांचें वय पंचा-हत्तराच्या घरांत आहे. तरीहि संगीत विषयाबद्दलचा त्यांचा लेखनव्यवसाय अद्यापि चालू आहे

## राजा ठाकुर नवाब.

हे गृहस्थ अकबरपुरचे तालुकदार आहेत. हे उत्तम सुशिक्षित आहेत. ह्यांचा स्वभाव फार प्रेमळ, दिलदार व मनमिळाऊ आहे. संगीतशास्त्र व कला हे उत्तम जाणतात ह्यांचें स्वरज्ञान बिनचुक व मार्मिक आहे. ह्यांनीं '**मारिफत उल नगमात**' नांवाचें उर्दूमध्यें संगीतावर उत्तम पुस्तक लिहिलें आहे, व पुढील दोन भागांत ध्रुवपदें व धमार अनेक रागांत नोटेशनसह छापले आहेत मारिफत उलनगमात हें पुस्तक उत्तर हिंदुस्थानांतील गायकाचें आवडतें पुस्तक झालें आहे मुंबईचे प भातखंडे व पुण्याचे पं द के जोशी यांचे हे मित्र आहेत. लखनऊ येथील संगीत कॉलेज काढण्यांत ह्यांनीं पुष्कळ श्रम केले आहेत. गृहस्थांत ह्यांच्यासारखा मार्मिक संगीतज्ञ फार विरळा हे हार्मोनियम हें वाद्य उत्तम वाजवि-तात लखनऊमध्यें गायक वादकास हे एक आश्रयस्थान आहे.

# भाग २

# कलावंत.

## नायक.

संगीतशास्त्र व संगीतकला या दोहोंमध्यें जो प्रवीण त्यास ' नायक ' अशी पदवी पूर्वीं देत असत असे नायक आजपर्यंत बारा होऊन गेले आहेत हे नायक इ. स. बाराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत झाले त्यांची नांवें:- १ गोपाळ २ † अमीरखुशरु ३ बैजू ४ भन्नु ५ लोहग ६ डल्लू ७ भगवान. ८ धोंडू ९ पांड्ये. १० चरजु ११ बक्षू व १२ निजामोद्दिन

## गोपाल.

अल्लाउद्दिनानें जेव्हां देवगिरीवर स्वारी केली (इ. स. १२९४) तेव्हां तेथील गादीवर राजा रामदेवराव यादव हा होता याच्या पदरीं **गोपाळ** नायक दरबार-गवई म्हणून होता अल्लाउद्दिनाच्या बरोबर शूर वीर, मुत्सद्दी, विद्वान, कवि व संगीतज्ञ सरदार अमीर खुशरू हा होता खुशरूनें त्याचें गाणें ऐकिलें. दुसरे दिवशीं त्यांत पर्शियन रागाचें मिश्रण करून आपण स्वतः तो राग गायिला, " मजप्रमाणें गा नाहीं तर 'हरलों' असें कबूल कर " असा पेंच खुशरूनें त्याला घातला पर्शियन मिश्र गाणें त्यास गाता येईना, तेव्हां त्यानें 'हरलों' असें कबूल केलें. अल्लाउद्दिनानें परत जातांना अपार संपत्ति व विद्वान् लोक दिल्लीस नेले. त्यांत गोपालनायकासहि नेलें दिल्लीस गवयी म्हणून त्याचा मोठा मान असे. दक्षिणेंतील संगीताचें परिपूर्ण ज्ञान खुशरूनें त्याजपासून संपादन केलें गोपालनायक दिल्लीस असतां बाहेर जातांना आपल्या गाडीच्या बैलाच्या गळ्यांत वेळेच्या अनुरोधानें रागवाचक ध्वनि निघणाऱ्या घंटा बांधीत असे अशी दंतकथा आहे. रत्नाकर ग्रंथावरील तालाध्यायाच्या टीकेंत नायक गोपाळाच्या नांवाचा उल्लेख चतुर कल्लिनाथानें ' कुड्डुक ' तालावर लिहित असतांना केला आहे. यावरून नायक गोपाळाच्या विद्वत्तेबद्दल विद्वानांत त्या वेळीं किती आदर होता हें दिसून येतें.

† पान ६ पहा.

गोपाळ नायक इ. स १२९५ मध्यें दिल्लीस गेला असावा असें आपणास इतिहास सांगतो त्या वेळच्या प्रसिद्ध व उपलब्ध संस्कृत ग्रंथांत जे प्रबंध निर्दिष्ट केले आहेत त्यांत ध्रुवपद या नांवाचा प्रबंध उल्लेखलेला प्रस्तुत लेखकांस तरी आढळला नाहीं. यावरून गोपाळ नायक ध्रुवपद हा प्रबंध गात नव्हता हें सिद्ध आहे. त्याच्या वेळीं इतर प्रबंध प्रचारांत होते व ते संस्कृत, तामिल, तेलगू या भाषेंत होते गोपाळ नायक दिल्लीस गेल्यावर तेथेंच कालवश झाला हा जातीचा ब्राह्मण होता. अमीर खुशरूनें जरी त्याचा गायनांत पराभव केला होता, तरी त्याजबद्दल त्याच्या मनांत आदर वाटत असे, म्हणूनच तो त्याला उत्तम प्रकारें वागवी व सरकारदरबारांत त्याचा चांगला मान ठेवील असे

## बैजू.

हा जातीनें मुसलमान होता हा नायक गोपाळ याचा समकालीन होता, इतकेंच नव्हे तर त्याचा मित्रहि होता हा दौलताबादेमध्यें राहत असे यानें कोणाची नोकरी केली नाहीं हा अतिशय विरक्तपणानें राहत असे याची एकदर वागणूक एकाद्या साधूसारखी अगर मुसलमान फकिराप्रमाणें होती. नायक ही पदवी त्यास असल्यामुळें याच्या गायनशास्त्राच्या विद्वत्तेबद्दल व पारंगतपणाबद्दल सहजीं कल्पना करता येईल. आपण सध्यां ज्याला ध्रुवपद म्हणतों अशा प्रकारचा गायनप्रबंध इ स तेराव्या शतकाचे वेळीं प्रचारांत नव्हता, अशी प्रस्तुत लेखकाची समजूत आहे तेव्हा साहजिकच हा नायक ध्रुवपदें गात नसून प्रबंध गात असे हें उघड झालें

## भानू.

हा जातीनें हिंदु होता याचा काल व राहाण्याचें ठिकाण यांसबधीं विश्वासार्ह व सुसंगत अशी माहिती उपलब्ध नाहीं सर्व नायकांमध्यें हा फार नामांकित विद्वान् होऊन गेला अशी याच्याबद्दल समजूत आहे.

## लोहंग.

हा जातीनें हिंदु होता हा नायक होता तेव्हां संगीत शास्त्र व कला ह्यांत तो निष्णात होताच याशिवाय याबद्दलची कांहीं माहिती मिळत नाहीं

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत २७
नं ३ ८०७

## डल्लू.

हा जातीनें मुसलमान होता. ग्वालेरच्या तुनुवार घराण्यांतील राजा मान ( इ. स. १४८६–१५२६ ) याचे पदरीं हा होता. राजा मान यानें ध्रुवपद्गायन सभ्य समाजांत प्रचलित करण्याची जी खटपट केली तीमध्यें या नायकाची त्याला फार मदत झाली

## भगवान.

हा जातीनें हिंदु होता. ग्वालेरचा राजा मान ह्याच्या वेळीं हा झाला. ध्रुवपद्गायन प्रचलित करण्याची राजा मानची खटपट यशस्वी करण्याचें बरेंचसें श्रेय याला आहे.

## धोंडू.

नावावरून हा हिंदु असावा असें वाटतें ग्वालेरचा राजा मान हा संगीतकलेचा मोठा ज्ञाता व प्रेमी असल्यामुळे त्याचे पदरीं मोठाले विद्वान् व कलावन बरेच होते. त्यामध्यें धोंडू हा एक होता. यानेंहि मान राजास त्याचे ध्रुवपद्प्रसाराच्या प्रयत्नांत बरेंच सहाय्य केलें

## चरजू.

हा जातीनें मुसलमान होता. हा ग्वाल्हेरच्या तुनुवार घराण्यांतील राजा मान याचे वेळीं झाला हा गायनशास्त्र व कला यांमध्यें प्रवीण होता हें त्याला नायक पदवी मिळाली यावरून स्पष्ट होत आहे परंतु त्याच्या विद्वत्तेची दुसरीहि खूण आज उपलब्ध आहे. त्यानें कांहीं नवे राग बनवून प्रचारांत आणिले होते त्यांपैकीं मल्हार रागाचा एक प्रकार अद्यापि प्रचारांत आहे. तो प्रकार ' चरजूचा मल्हार ' या नावानें प्रसिद्ध आहे बक्षूशिवाय इतर नायकांनीं कोणी नवे राग तयार करून प्रचारांत आणल्याची माहिती अजून उपलब्ध नाहीं. त्या अभावीं याचा हा विशेष आहे हें म्हणणें वावगें होणार नाहीं. हा रागप्रकार इतर गवयांत अप्रसिद्ध आहे; परंतु रामपूर येथील गवई तो गातात यावरून रामपूरच्या घराण्याचा संबंध या नायकाशीं असावा असें वाटतें.

## पांड्ये.

नांवावरून हा जातीनें हिंदु असावा असें दिसतें, याशिवाय याच्या काळाची व राहण्याचें ठिकाण वगैरे संबधाची काहींच माहिती मिळत नाहीं. हा नायक होता ह्यावरून संगीत कलेंत व शास्त्रांत तो प्रवीण होता, हें अगदीं उघड आहे.

## बक्षू.

प्राचीन काळीं गायनवादनाचा धंदा करणारास धाडी म्हणत, हे पूर्वी हिंदु होते. पुढें हे मुसलमान झाले. ते 'करका' नांवाचीं गीतें गात असत. बक्षू हा ह्या जातींतील होता हा जातीनें मुसमान होता ग्वाल्हेरचा राजा मान (इ स १४८६–१५१६) याच्या पदरीं हा दरबार गवई होता राजा नंतर त्याचा मुलगा विक्रमाजित् हा गादीवर बसला. परतु त्याच्या शत्रूंनी त्याला गादीवरून काढून टाकिल्यामुळें बक्षूला तो दरबार सोडावा लागला तेथून तो कालिंजरच्या राजाकडे गेला व कांही वर्षें त्याच्या पदरीं राहिला त्यानतर तो गुजराथेंत गेला. त्यावेळीं गुजराथचा राजा सुलतान बहादुरशहा हा अहमदाबाद येथें राज्य करीत होता (इ स १५२६–१५३६). हा गायनप्रेमी असल्यामुळें त्यानें बक्षूस आपल्या पदरीं ठेविलें तेथें असतांना त्यानें एक तोडीचा नवा प्रकार तयार केला व त्यास आपला आश्रयदाता जो बहादुरशहा त्याचें नांव दिलें. तो तोडीचा प्रकार 'बहादुरी तोडी' या नांवानें प्रसिद्ध आहे. हा बराच वयातीत होऊन इ. स. १५३५ च्या सुमारास वारला.

अलीकडे कांहीं लोकांस नायक बक्षू हा तानसेनाचा गुरु होता असें म्हणण्याचा मोह पडतो परतु तानसेन हा इ स १५३२ मध्यें ग्वालेर येथें जन्मला व त्या वेळीं बक्षू अहमदाबादेस होता, आणि बक्षू वारला त्या वेळीं तानसेनाचें वय फक्त तीन वर्षांचें होतें! यावरून या लोकांचें हें म्हणणें वस्तुस्थितीशीं सुसंगत दिसत नाहीं!

## सय्यद निजामोद्दीन.

हा जातीनें मुसलमान होता. हा बिलियाम शहरीं राहत असे. हा मुसलमानी शक १०९८ मध्यें म्हणजे इ स. १७२० च्या सुमारास होऊन गेला; असें मुसलमान ग्रंथकारांचें मत आहे. याच्या वेळीं ध्रुवपदगायकी चांगलीच प्रचारांत आली होती; तेव्हां त्यात तो प्रवीण असणें साहजिकच आहे. याचें टोपण नाव 'मीरमधनायक' असें होतें. कालनुक्रमानें हा नायक शेवटचा ठरतो

## सुलतान हुसेन शर्की.

तघलक घराण्यांतील दुसरा महमद दिल्लीच्या गादीवर इ. स १३९४ त बसला त्यावेळीं ख्वाजा यास दरबारनें जोनपूरचा सुभेदार नेमिला. दिल्लीपति लहान, व देशांत अंदाधुंदी पाहून ख्वाजानें जौनपूर येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें ( इ. स. १३९९ ). जोनपूरचा शेवटचा राजा हुसेन इ. स १४५८ त गादीवर बसला. त्यावेळचा दिल्लीचा बादशहा बलोल याची व हुसेनची लढाई झाली. त्यांत हुसेनचा पराजय झाला. हुसेन जोनपुरांतून पळून बंगालच्या राजाच्या आश्रयास राहिला. तो तेथें इ. स. १४९९ मध्यें मरण पावला. हा मोठा गायनप्रेमी असे.

त्या वेळीं समाजांत प्रसृत होत असलेल्या ख्यालगायनाचे प्रसारास याची मदत होती ख्यालगायनास नवें वळण देण्याचा जो यानें प्रयत्न केला त्यावरून त्या वळणास ' जौनपुरी ' प्रकार असें नांव पडलें. हुसेन यानें सभ्य लोकांत हें ख्यालगायन मान्य व्हावें म्हणून जी खटपट केली तींत त्यावेळीं त्यास यश आलें नाहीं.

## बाजबहादूर

हा माळव्याचा शेवटचा राजा. याच्या राजधनींचें नांव मांडवगड असें होतें. यानें इ. स १५५४ पासून १५६४ पर्यंत राज्य केलें. हा राजा विलासी व संगीतलोलुप होता. रजपूत कन्या रूपमती ही याची पट्टराणी होती हिच्या प्राप्तिसाठीं नर्मदा नदीचा ओघ फिरविण्याचा यानें आटोकाट प्रयत्न केला. ही जशी देखणी तशीच गायनप्रवीण होती. बाजबहादूरच्या पदरच्या मानखान नामक गवयानें अकबर बादशहापाशीं रूपमतीच्या लावण्याची व गानकौशल्याची तारीफ केली, तेव्हां बादशहानें तिला दिल्लीस पाठविण्याबद्दल बाजबहादुरास हुकूम फर्माविला. तेव्हां बाजबहादुरानें "आपल्या जनानखान्यांतील सौंदर्यलतिका व संगीतप्रवीण एखादी स्त्री मजकडे पाठवा" असा उलट निरोप पाठविला ! या उत्तरानें चिडून जाऊन अकबरानें माळव्यावर सैन्य रवाना केलें. इ. स. १५६४ मध्यें लढाई झाली. त्यांत बाजबहादूर ठार झाला. पतीचें मरण ऐकतांच त्या रजपूत कन्येनें आत्महत्या करून पतीच्या मागोमाग स्वर्गाचा मार्ग धरिला। रूपमती व बाजबहादूर या जोडप्यास कविता करण्याचा फार नाद असे. कविता करून एकमेकांस त्या गाऊन दाखविण्यांत तें जोडपें दंग असे. माळवा प्रांतांत भूपाळी राग रूपमती राणीनें फार लोकप्रिय केला अशी दंतकथा आहे. या जोडप्यानें ख्याल

गायन सभ्य समाजांत प्रसृत करण्याची फार खटपट केली. ध्रुवपदाच्या जशा चार बाण्या आहेत तशा ख्यालाच्या काहीं बाण्या आहेत असें म्हणतात त्यांपैकीं 'बाजखानी' म्हणून एका बाणीचें नांव आहे यावरून सदर राजानें ख्यालगायनांत सुधारणा करून तें समाजांत प्रसृत करण्याची किती खटपट केली असावी हें दिसून येतें ख्यालगायनप्रवर्तक व्यक्तींमध्यें याचा नंबर बराच वर लागतो.

## चंचलसेन

हा पंजाब प्रांतांत राहणारा होता हा चांगला गायक होता. नवीं पद्यें रचून तीं शिष्ट समाजांत लोकप्रिय करण्याची यानें पुष्कळ खटपट केली. तीं पद्यें म्हणजे **ख्याल** होत, परंतु त्याच्या त्या प्रयत्नास यश आलें नाहीं !

## चांदखां व सूरजखां

हे दोघे बंधू पंजाब प्रांतांत खैराबाद गांवीं राहत असत. हे नामांकित गवई होते. प्रचलित गाण्यात बदल करून नवा गायनप्रकार समाजांत प्रसृत करावा अशी यांची फार इच्छा होती. त्या दिशेनें त्यांनीं फार प्रयत्न केले. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. गायनाच्या नादानें या उभयतां बंधूंनीं महंमदी धर्माचा स्वीकार केला यांचीं पहिलीं नांवें सुधाकर व दिवाकर अशीं होतीं. यांनीं ख्यालगायनास जें नवें वळण दिलें त्यास 'खैराबादी' प्रकार असें म्हणतात. हे इ. स. १६ व्या शतकांत होऊन गेले

---

# ध्रुवपदगायक.

## ब्रिजचंद.

हा जातीचा ब्राह्मण असून दिल्लीनजिक डागूर म्हणून एक खेडें आहे तेथला राहणारा हा तानसेनाच्या तोडीचा ध्रुवपदगायक होता. यानें ध्रुवपद गायनाची एक नवी पद्धत सुरू केली तिला **डागुरी** असें म्हणतात. हें नांव पडण्याचें कारण ही पद्धत सुरू करणारा जो ब्रिजचंद तो डागूर या गांवचा राहणारा होता.

## श्रीचंद.

हा जातीचा रजपूत होता. हा **नोहार** गांवीं रहात असे. हा सुद्धां तानसेनाच्या बरोबरीचा ध्रुवपदगायक मानला गेला होता. याच्या ध्रुवपदगायनाच्या पद्धतीस ' **नोहारी** ' अशी याच्या राहण्याच्या गावावरून संज्ञा मिळाली आहे.

## हरिदासस्वामी.

हे महान् कृष्णभक्त होते, हे मथुरेनजिक वृंदावन येथें राहत असत. हे परम वैराग्यशील होते. हे तानसेनाचे गुरु; यांनीं अनेक रागांत अनेक ध्रुवपदें, होऱ्या वगैरे कवनें रचिलीं आहेत. त्यांचें गायन म्हणजे एक मोहिनी होती. असें सांगतात. त्यांचें गाणें ऐकून दिल्लीपति अकबर बादशहा खूष झाला व राज्याचा त्याग करून वृंदावनांत त्यांच्या जवळ राहण्याचें त्याच्या मनांत आलें व त्याप्रमाणें त्यानें हरिदास यास कळविलें. त्यावेळीं हरिदासस्वामी त्यास म्हणाले, " आपल्यासारखा दिल्लीपति दुसरा मिळणार नाहीं, तरी आपण दिल्लीचें राज्यच करावें. आपणांस गायनानें खुष करणारे गवई अनेक मिळतील." तेव्हां अकबराच्या मनातील ही वेडी कल्पना गेली व तो दिल्लीस गेला. हे पूर्ण वयातीत होऊन वृंदावनांतच देवलोकीं गेले.

## मीया तानसेन.

मकरंद पांडे नांवाचा गौड ब्राह्मण ग्वाल्हेरीस इ. स. १५०० च्या सुमारास राहत असे. त्याची बायको ही सुस्वभावी, विनयशील व धार्मिक बुद्धीची होती. यास बरेच दिवस मूल नव्हतें. ग्वाल्हेरीस त्या वेळीं महमद घोष नांवाचा मुसलमान साधु राहत असे. या जोडप्याची बाहेर जाण्याची वाट त्या साधूच्या घरावरून होती. ती साध्वी त्या साधूस रोज नमस्कार करी. एक दिवस साधूस नमस्कार करून तिनें मनात असा नवस केला कीं, " हे साधो, तुझ्या कृपेनें मला जर पुत्र झाला तर तो मी तुझ्या पायांवर घालीन." कर्मधर्मसंयोगानें वर्ष दोन वर्षांत बाईस पुत्र झाला ! उभयतां मातापितरांस आनंद झाला. बायकोनें नवऱ्यास साधूला नवस केल्याची हकीगत सांगितली. मुलाचें नांव तन्नामिश्र ठेविलें. तन्नामिश्र इ. स. १५३२ मध्यें जन्मला. मुलगा पांच वर्षांचा झाल्यावर आईबापांबरोबर साधूच्या दारावरून नित्य जात असे. एक दिवस

मुलगा बरोबर घेऊन आईबाप साधूच्या दारावरून जात असतां साधूनें त्या उभयतास हाक मारिली. तेव्हां सर्वजण साधूजवळ गेले. त्या वेळीं साधू म्हणाले, " बाई, मला नवस करून तुला पुत्ररत्न झालें; त्याला पायांवर घालण्याचा नवस आतां कधीं फेडणार ? " हें ऐकून त्या दोघांस महमद घोषाच्या साधुत्वाबद्दल खात्री झाली. त्यांनीं हात जोडून साधूस विनविलें कीं, " महाराज, आम्हांला आपल्या कृपेनें फार दिवसानीं मूल झालें, आम्ही हिंदु ब्राह्मण तेव्हां त्याचा व्रतबंध वगैरे सोहाळे करावयाचे. तर ती हौस फिटेपर्यंत नवस न फेडण्याची आम्हांस कृपा करून मोकळीक द्यावी " मातापितराची ती केविलवाणी अवस्था व पुत्र-प्रेम ध्यानांत आणून साधूनें त्यांस मोकळीक दिली व मुलाच्या अंगावरून हात फिरवून म्हटलें, " बेटा, चांगला लौकिकवान् हो " असा आशीर्वाद व प्रसाद देऊन त्यांची रवानगी केल्यानें आईबापांस किती समाधान झालें असेल याचें वर्णन कोण करील ?

एकदां तानसेन बापाबरोबर बाहेर गेला असतां त्यानें वाघ ओरडतांना ऐकलें; घरीं आल्याबरोबर त्यानें हुबेहुब वाघासारखी डरकाळी मारून दाखविली. तेव्हां बापास आश्चर्य वाटलें. पुढें त्याचा व्रतबंध झाला. कांहीं दिवसांनीं तो आपल्या बापाबरोबर बागेंत गेला तेथें पांखरें ओरडत होतीं, तीं त्यानें ऐकिलीं व त्यांसारखें किलबिलूं लागला त्याची ही विलक्षण अनुकरणशक्ति पाहून बापास आश्चर्य वाटलें पुढें दहा वर्षांचा झाल्यावर बापानें त्यास आपली बाग राखण्याची कामगिरी सांगितली. तेव्हां या मुलानें बागेंत गेल्यावर वाघासारख्या चारदोन वेळां डरकाळ्या फोडाव्या; त्या ऐकून इतर श्वापदें वाघाच्या भयानें तेथें येईनाशीं झालीं ' त्याचप्रमाणें माणसेंहि कोणी फळ तोडण्यास आंत जाण्यास धजेनात बापास मुलाच्या राखणीनें समाधान झालें

एकदां हरिदासस्वामी त्या रस्त्यानें जात असतां वाघाची डरकाळी त्याच्या कानीं आली. अशा वस्तीच्या जागीं वाघ कसा राहतो या कौतुकानें ते बागेंत शिरले व पाहतात तों एक मुलगा वाघासारखा ओरडत आहे ! तेव्हां त्यांस हें चमत्कारिक वाटून त्यानीं त्या मुलास जवळ बोलावून निरनिराळ्या श्वापदांचे शब्द काढावयास सांगितलें. तेव्हां त्याच्या अनुकरणशक्तीचा त्यांस चमत्कार वाटला ते त्याच्या बरोबर त्याच्या बापाकडे गेले व म्हणाले, " हा मुलगा मज-पाशीं ठेव. पांच वर्षांत मी यास नामांकित गवयी बनवून तुझ्या हवालीं करीन " हरिदासस्वामीचा तो तेजःपुंज चेहरा व भाषण ऐकून मकरंद पांड्यानें मुलगा

त्याच्या हवाली केला. हरिदासस्वामींनीं त्यास उत्तम गवई बनवून मकरंदाच्या हवालीं केलें. हरिदासस्वामींची त्याजवर पूर्ण कृपा होती. ग्वाल्हेरीस आल्यावर आईबापांचा आनंद गगनांत मावेना. नंतर ही गोष्ट त्यांनीं महमद घोष यांस निवेदन केली. साधु फार खूष झाले व तानसेन भेटीस आल्यावर त्यास आशी-र्वाद देऊन त्यांनी आपल्या तोंडांतील विडा त्याच्या तोंडांत घातला. झालें त्या दिवसापासून तो हिंदु मुलगा मुसलमान झाला. त्याच्या गायनप्राविण्याची कीर्ति दिवसेंदिवस चोहोंकडे पसरत चालली. रेवाच्या महाराजानी तानसेनास आपला दरबार-गवई म्हणून चाकरीस ठेविलें. तानसेनाच्या गायनपटुत्वाची कीर्ति दिल्लीपति अकबर बादशहा याच्या कानावर गेली. तेव्हा अकबरानें रेवाच्या महाराजांपाशीं त्याची मागणी केली. परंतु त्यांकडून नकार आला. तेव्हां तानसेनाच्या भारंभार सोनें देऊन अकबरानें त्यास रेवाच्या महाराजां-पासून आपल्या दरबारी आणविलें. यांत अकबराच्या औदार्याची व गायन-प्रेमाची तारिफ करावी तेवढी थोडीच होईल। यांत त्याचें सौजन्यहि दिसून येतें; नाहीतर स्वारी करून बलात्कारानें त्यास तसें करतांहि आलें असतें. ही गोष्ट इ. स. १५६१ मध्यें घडली. गुणी तानसेन, गुणज्ञ दिल्लीपति व श्रोता दिल्ली-दरबार, मग त्या आनंदास काय पारावर! अकबराचें त्याच्यावर अतोनात प्रेम जडलें. त्यानें आपल्या 'नवरत्न दरबारांत' त्यास दाखल केलें. त्या वेळच्या मुसलमान इतिहासकारांनीं असा शेरा मारला आहे की, तानसेनासारखा गवई हजार वर्षांत झाला नाही।

एकदां बादशहा व तानसेन नावेंत बसून फिरावयास गेले असतां बाद-शहानें त्याच्या संगीत-पटुत्वाची तारिफ केली. तेव्हां तानसेनानें नदींत आपली करगळी बुडविली व ती झाडून तो बादशहास म्हणाला, "महाराज, यमुना नदींतील पाणी व माझ्या करगळीस लागलेलें पाणी याच्या प्रमाणांत संगीत-विद्या व माझें संगीतज्ञान हीं आहेत." हें तानसेनाचें उत्तर ऐकून वाचकांस न्यूट-नच्या म्हणण्याची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. जों जों मनुष्य ज्ञान-वृद्ध होतो, तों तों तो विनयानें नम्र होत जातो. एकदां अकबरानें तानसेनास विचारलें "मला तुझें गाणें तुझ्या गुरूच्या गाण्याइतकें चांगलें कां बरें वाटत नाहीं?" त्यावर तानसेन हात जोडून नम्रपणानें म्हणाला, "खुदावत, माझे गुरु आपल्या इच्छेनें वाटेल तेव्हां गातात, पण मी पडलों आपल्या हुकुमाचा बंदा।" तान-सेनाचा आवाज मर्दानी, पल्लेदार, गोल व गोड असे, अशी प्रसिद्धी आहे. तो

ध्रुवपद गात असे त्याच्या वेळी ध्रुवपदगायकी शिखरास पोहोंचली त्याच्याच वेळी ध्रुवपदाच्या चार वाण्या अस्तित्वांत आल्या तानसेन गौड ब्राह्मण म्हणून त्याच्या ध्रुवपदगायकीस **गौडारी** अशी संज्ञा प्राप्त झाली त्यानें अनेक नवे राग रचून आपल्या अन्नदात्यास खूप केलें त्यांपैकीं कांहींचीं नांवें:—मीयां मल्हार, मीयां तोडी, मीयां सारंग इत्यादि त्यानें अनेक ध्रुवपदें नवीं रचिलीं आहेत. त्यांत आपलें नांव, आपल्या अन्नदात्याचें नांव व आपले मित्र जे बैजू बावरे व गोपाळलाल याचीं नावें गोंविलीं आहेत. असा हा अपूर्व गायक इ. स. १५९५ मध्यें वारला त्याची कबर जुन्या ग्वाल्हेरीस आहे. त्याच्या शेजारीं त्याचा मुलगा बिलासखा याची कबर व थोड्या अनरावर महमद घोष साधु याची कबर पाहाण्यास सांपडते तानसेन यास तीन मुलगे व एक मुलगी अशीं चार अपत्यें होतीं. रबाब वाद्य तानसेनानें काढिलें असें म्हणतात तानसेनाच्या मुलाकडील वंशज 'सेनिये' या नावानें प्रसिद्ध आहेत शिवाय ते रबाब वाद्य वाजवितात म्हणून त्यांस 'रबाबिये' असें म्हणण्याची चाल आहे. तानसेनाची मुलगी नौबादुस यांस दिली होती ते बीन वाजवीत म्हणून तानसेनाच्या मुलीकडील वंशजास 'बीनकार' अशी संज्ञा देतात.

तानसेनासारखा गायनपटु, अकबरासारखा दिल्लीपति त्याचा चाहता, असें असतां त्यानें 'नायक' ही जी संगीत विद्यापारंगतेची पदवी ती तानसेनास का बहाल केली नाहीं ? त्याला हें करणें अशक्य होतें काय ? अशी शंका कोणाचेंहि मनांत येईल पण त्यावेळीं पदवीला किंमत होती ! पदवी देण्यामध्यें पदवी देणार व पदवी स्वीकारणार या दोघांची परीक्षा होत असते ! म्हणून कदाचित् त्यानें पदवी दिली नसेल किंवा पोकळ पदव्या देणें दिल्लीपतीस आवडलें नसेल ! एक संगीत इतिहासकार म्हणतो कीं, नायक ही पदवी संगीतशास्त्र व कला हीं दोन्ही अंगें ज्यास पूर्णपणें अवगत असतात त्यास देण्याचा पाठ असे. तानसेन कलापरिपूर्ण होता हें खास; पण त्यास संगीतशास्त्र पूर्णपणें अवगत नव्हतें ! म्हणून त्याला 'नायक' म्हणतां येत नाहीं ! कसेंहि असो, अशा अलौकिक गायकास त्याच्या वरील प्रेमानें सुद्धां कोणी केव्हांहि 'नायक तानसेन' असें संबोधिलेलें आढळून येत नाहीं ! पदव्यांचा सुळसुळाट तेव्हां नव्हता ! आतांच मात्र तो झाला आहे !

२०६ ...

## बैजू बावरे.

हा नामांकित गवयी व तानसेनाचा मित्र अकबर बादशहाच्या वेळीं दिल्लींत रहात असे. हा गोपाळलाल नांवाच्या त्याच्या वेळच्या गायकाचा मित्र होता. यानें अनेक ध्रुवपदें रचली आहेत त्यांत गोपाळलाल, तानसेन, व दिल्लीपति अकबर बादशहा यांचे उल्लेख केलेले दृष्टीस पडतात नायक बैजू व हा बैजू बावरे हे दोन गायक निरनिराळ्या वेळीं झाले हें विसरतां कामा नये बैजू बावरे यानें दिल्लीपतीची नोकरी कधीं पत्करिली नाहीं. हा त्याच कारकीर्दींत कालवश झाला.

## गोपाळलाल.

हा एक हिंदु गायक अकबर बादशहाच्या वेळीं दिल्लीस राहात असे. अकबर बादशहानें त्यास दरबार गायक म्हणून राहण्यास अनेकवार आग्रह केला; पण त्यानें ती विनति मान्य केली नाही. हा तानसेनाचा मित्र होता व ध्रुवपद गायनांत फार प्रवीण होता. यानें जीं नवीं ध्रुवपदें रचिलीं त्यांत "सुनो मियां तानसेन" अशी रचना केली; हेतु हा कीं, आपण त्याचे मित्र आहों हें ध्वनित व्हावें हा अकबराच्या कारकीर्दींतच कालवश झाला. गोपालनायक व हा अशा निराळ्या दोन व्यक्ती होऊन गेल्या हें आतांच्या कलावतांनीं विसरू नये. पहिला तेराव्या शतकांत व हा सोळाव्या शतकांत होऊन गेला.

## रामदास.

हा हिंदु ध्रुवपदगायक पूर्वी गुजराथेची राजधानी अहमदाबाद येथें इस्लामशहाच्या पदरीं दरबार-गायक म्हणून होता पुढें दिल्लीपति अकबर बादशहाच्या निमंत्रणावरून तो दिल्लीस गेला याच्या गाण्याचें तेज तानसेनाच्यापुढें जरी पडलें नाहीं तरी तो एकदर गवयांत फार श्रेष्ठ प्रतीचा होता. याचा आवाज जोरकस व गोड असून ध्रुवपद म्हणण्याची ह्याची शैली फार डौलदार होती, म्हणूनच ह्याचें गाणें फार मोहक असे. तानसेनाप्रमाणें ह्यानेंहि कांहीं नवे राग तयार केले त्यांपैकीं हल्लीं प्रचारांत 'रामदासीमल्लार' हा एक ऐकण्यांत येतो. अकबराच्या दरबारांत हिंदु गायक फार थोडे होते त्यांत ह्याचा दर्जा श्रेष्ठ होता. कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, तानसेनाच्या खालोखाल हाच दरबार-गायक श्रेष्ठ होता हा वयातीत होऊन दिल्ली येथें कालवश झाला ह्याला एक मुलगा

होता व तोहि गायनकलेंत अप्रतिम निघाला त्याचें नांव सुरदास. मल्लार रागांचे नवीन प्रकार त्यावेळच्या सर्व गायकानीं काढिले; यास कारणें दोन संभवतात एक चढाओढ; तानसेनानें एक मल्लार प्रकार काढिला, आपण काय कमी आहोंत, आपणहि काढू आणि अकबर बादशहास कोमल गधार व कोमल निषाद स्वराचे राग ऐकण्याचा मोठा शौक होता, हें दुसरें.

## सुरदास.

हा गायक प्रसिद्ध ध्रुवपद गायक रामदास ह्याचा पुत्र. हा जन्मांध होता. अकबराच्या दरबार-गायकांत नामांकित ध्रुवपद-गायक म्हणून ह्याची गणना असे. ह्यानें गानविद्येचा अभ्यास आपल्या वडिलांपाशीं केला व त्यांत तो निष्णात झाला. ह्याच्या गायनाची तरकीब फार मोहक होती आवाज मोठा पण मधुर असे ह्यानेंहि कांहीं नवे राग बनविले होते. त्यांपैकीं 'सुरदासी मल्लार' हा हल्लीं ऐकण्यांत येतो बापाच्या मागें ह्याचा लौकिक फार झाला होता.

## महिपति.

महिपति हा हिंदु ध्रुवपदगायक असून रामदास नावाच्या ध्रुवपद गायकाचा मोठा मित्र होता. हे दोघेहि प्रारभीं इस्लामशहाचे पदरी होते. पुढे दिल्लीपति अकबर बादशहाच्या इच्छेनें ते दिल्लीस गेले महिपतीचा आवाज गोड व जोरकस होता. त्याची ध्रुवपद म्हणण्याची पद्धति फार मोहक होती. त्याचें गाणें बादशहास फार प्रिय असे मीयां तानसेनाच्या खालोखाल रामदास, सुरदास महिपति हेच हिंदु गायक ध्रुवपदगायनांत त्या वेळीं प्रसिद्ध होते जगन्नाथ तर प्रतितानसेनच होता बादशहाच्या दरबारीं गायक सुमारे ३६ होते, त्यांत हिंदु गायक जगन्नाथ, रामदास, सुरदास व महिपति हेच अव्वल दरजाचे होते. हा गायक बादशहाच्या अमदानींतच कालवश झाला.

## बिलासखां.

हा मीया तानसेनाचा वडील मुलगा. याची अप्रतिम गायक म्हणून फार प्रसिद्धी होती. मीया तानसेन यांच्या मुलांमध्यें जेव्हां गायनकौशल्याबद्दल चढाओढ सुरू झाली त्या वेळीं आपले वडील मीया तानसेन यांस जो आपल्या गायनानें सूप करील तो श्रेष्ठ होय असें ठरलें. त्याप्रमाणें बिलासखानें एक

तोडीचा प्रकार अशा खुबीनें गाइला कीं, मीयां तानसेन फार खुष झाले हा राग सध्या बिलासखानी तोडी या नांवानें प्रसिद्ध आहे. या रागाचा विशेष असा आहे कीं, याचे सर्व स्वर भैरवीचे असून हा राग म्हणण्याचें चलन तोडीचें आहे. यावरून रागाच्या चलनाचें महत्त्व किती आहे हें ध्यानांत येण्याजोगें आहे. बिलासखांच्या मुलाचें नांव **सुरतसेनखां.** हाहि मोठा अप्रतिम गायक होता **लालखां** हा याचा जांवई हा मोठा नामांकित गवई असून शहाजान बादशाहाचे पदरीं होता. याचा शिष्य **मिश्रिखां धाडी.** म्हणून होता तो नावाजलेला ध्रुवपदिया होता बिलासखांची कबर जुन्या ग्वाल्हेरीमध्यें त्याच्या बापाचे—मीयां तानसेनाचे कबरीजवळ आहे.

## तानतरंगखां.

हा तानसेनाचा मुलगा हा अप्रतिम गायक होऊन गेला. याच्या गळ्याची तयारी विलक्षण होती याचा आवाज गोड होता. याची तानेची तयारी अद्वितीय होती व त्यामुळेंच त्याचें नाव सार्थ होतें

## सुरतसेनखां.

हा बिलासखाचा मुलगा व तानसेनाचा नातू हा गायनांत अतिप्रवीण होता. याला त्याच्या वेळचे लोक प्रति तानसेन म्हणत असत इतकी याची ख्याति होती.

## रागरसखां.

हा नौबतखाचा दुसरा मुलगा हाहि फार बुद्धिमान् व हुषार होता आजोबांनीं त्यास अनेक ध्रुवपदें शिकविलीं होतीं व वडिलानीं बीन वाजविण्याचे सर्व कायदे त्यास दाखविले होते. मग त्याच्या विद्येंत वैगुण्य कोठून राहणार? त्याचें बीनवादन ऐकून बादशहा खुष होई व सासरे-जांवई यांचा आनंद गगनांत मावत नसे त्या वाजविण्याची व गोडीची आतां कल्पनाच करणें बरें आतांप्रमाणें त्या वेळीं ग्रामोफोन हें यंत्र निघालें असतें तर अशा अलौकिक वादनाचा व गायनांचा आज आपणांस लाभ घेतां आला असता. तशा प्रकारचे बीनकार जेव्हां निपजतील तो सुदिन! त्यास अनेक ध्रुवपदें आजानें शिकविल्यामुळें हा ध्रुवपद-गायकींत उत्तम तयार झाला होता; परंतु बीन वाजविणें ही घरची विद्या असल्यामुळें तो बीन वाजविण्यांत तयार झाला होता तरी हा ध्रुवपद्गायनांत फार प्रवीण होता, व म्हनत स गायक म्हणवून घेई हा स्वभावानें नम्र असे त्यानें

अनेकांस बीन वाद्यवादन शिकविलें होतें संतति व संपत्ति त्यास ईश्वरकृपेनें प्राप्त झाली होती; तरी हा गर्विष्ठ नव्हता त्याच्या अंगांत घरंदाजपणा परिपूर्ण वसत होता हा इ स च्या अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## लालखां.

प्रसिद्ध मीयां तानसेन याचा मुलगा बिलासखां यांचा हा जांवई. हा चांगल्या-पैकी ध्रुवपदगायक असून मोठा संगीतशास्त्रज्ञ होता. हा शहाजहान बादशहाचे पदरी होता

## खुशालखान.

हा गवई, श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या पदरीं होता ह्याचा आवाज मर्दानी असून गाण्याची ढब चांगली होती हा ध्रुवपद व धमार गात असे.

## पावाभीमराव बिदनूरकर.

हा गवयी श्रीमंत नानासाहेब पेशवे ह्यांच्या पदरीं होता. हा कानडा होता. ह्याचा आवाज कडक असे. हा कानडी गाणें गात असे.

## राणु शिंपी.

श्रीमंत नानासाहेब पेशवे ह्यांच्या पदरीं हा होता. ह्याचा आवाज मर्दानी व म्हणण्याची ढबहि चांगली होती हा ध्रुवपद गात असे.

## विठू गुरव.

हा इ. स १७६८ मध्यें पेशवाईंत नोकर होता ह्याचा आवाज मोठा व पल्ले-दार असे. ह्याची गायनाची पद्धति चांगली असून श्रोत्यांचे मनरंजन करण्यांत हा मोठा पटाईत असे

## त्र्यंबक आत्माराम

हा गवई इ. स. १७९० मध्यें पेशवाईत नोकर होता. हा ध्रुवपद गात असे. ह्याच्या आवाजात फार गोडी असे

## विठोबा पारनेरकर.

हा गवई इ. स १७९६ मध्यें पेशव्यांच्या पदरीं होता. ह्याचा आवाज मोठा असून गोड होता. हा ध्रुवपद व धमार गात असे.

## दावलखान.

हा श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब ह्यांच्या पदरीं होता. हा जातीचा मुसलमान असल्यानें ह्याच्या गायनाचा रंग कांहीं निराळाच असे. हा ध्रुवपद व धमार हीं गाणीं गाई

## खुषहालखां.

हा लालखाचा मुलगा याला 'गुणसमुद्र' अशी पदवी होती. यावरून हा किती चांगला गात असेल याची कल्पना होईल.

## नागू गुरव.

हा गवयी श्रीमंत दुसरे बाजीराव साहेब ह्याच्या पदरीं असे. ह्याचा आवाज मोठा होता हा ध्रुवपद गाई.

## हैदरखां.

हे तानसेनाच्या घराण्यांतील होते म्हणून यास सेनिये म्हणत. मीयांप्यारखां व जाफरखां यांचे हे चुलत भाऊ होते लखनौचे शेवटचे नबाब वाजद्अल्लीशहा यांचे वजीर नबाब अल्लीनक्कीखां यांचे हे गायनगुरु होते. हे धृपद, धमार फार उत्तम म्हणत असत अशी याची प्रसिद्धी आहे. 'अर तोरी अंगिया' ही पूर्या-धनाश्री रागांतील होरी यांच्या मोठी आवडीची होती

## अल्लीदाद्.

हा नामांकित गवई इ. स एकोणिसाव्या शतकाच्या अवलीस पंजाबांत होऊन गेला. हा ध्रुवपद गात असे

## मौलादाद.

हा ध्रुवपद गाणारा प्रसिद्ध गवई इ. स. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेला. याच्या गाण्याची प्रख्याती पंजाबांत फार आहे. त्यांचें गाणें मोठें मर्दानी व जोरकस असे. त्याची शिष्यशाखा फार मोठी नाहीं.

## सोभलसेन

हा तानसेनाचा नातू होय. हा उत्तम गायक होता. तथापि पुढें तो प्रसिद्ध झाला.

## गुणसेन.

याचें खरें नांव अफजुल असें होतें. हा नायक मन्नूच्या वंशातील होता. हा एक चांगल्यांपैकीं ध्रुवपद गायक होता. हा काश्मीरमध्यें कालवश झाला.

## सोदाससेन.

हा सोभलसेनाचा मुलगा व तानसेनाचा पणतु. हा कवि होता. हा उत्तम गात असे. प्रथम हा शहाजहानाचा मुलगा शहासुजा याचे नोकरीस होता. नंतर कांहीं दिवसानीं काश्मीरचा सुभेदार फकीरउल्ला याचेजवळ होता

## मिश्रीखां धाडी.

हा तानसेनाचा मुलगा विलासखां याचा शिष्य हा ध्रुवपदें चांगली गात असे. शहाजहान बादशहाचा मुलगा शहासुजा बंगालचा सुभेदार असतांना हा त्याचे पदरीं होता

## शेख कमाल.

हा मीर्यां दाऊद धाडी याचा शिष्य होय. हा चांगल्यांपैकीं ध्रुवपद गायक होता हा काश्मीरमध्यें फकीर उल्लाचे नोकरींत होता.

## जगन्नाथ.

हा जातीनें ब्राह्मण होता हा भावलपूरचा राहणार हा मोठा पंडित होता. हा शहाजहान बादशहाचे पदरीं असून त्यानें त्याच्या विद्वत्तेबद्दल त्यास 'कवि-

राज अशी पदवी दिली होती. तसेंच हा कलेमध्येंहि फारच निष्णात होता. बादशहानें एक वेळ खूष होऊन याची रौप्य तुला केली. मजव्यतिरिक्त याच्या तोडीचा दुसरा गवई झाला नाही' असे याच्या गायननैपुण्याबद्दल मीर्या तानसेन उद्गार काढीत संगीत शास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथकार पंडित भावभट्ट हा याचा मुलगा यानें बरींच ध्रुवपदें रचिलीं आहेत, तीं भावभट्टाचे ग्रंथात पहावयास सापडतात. हा शतायु होऊन मरण पावला.

## दिरंगखां.

दिल्लीपति शहाजहान (इ स १६२७–१६५६) ह्याच्या पदरीं हा ध्रुवपद गायक होता. हा दरबार गायकात फार प्रसिद्ध होता ह्याच्याच वेळीं प्रसिद्ध हिंदु-गायक कविराज जगन्नाथ होता ह्या दोघांच्या गाण्यावर बादशहा फार खूप असे एकदां ह्याचें गायन इतकें अप्रतिम झालें की, बादशहानें फर्माविलें कीं, 'तुझी रौप्य करून तुला तो ऐवज बक्षीस द्यावयाचा.' मग त्याच्या आनन्दास काय विचारावें! ठरल्याप्रमाणें तुलेचा दिवस मुकरर झाला. त्या दिवशीं हा एका लहान बारावर्षांच्या मुलास घेऊन आला अधिकाऱ्यांनी मुलास मज्जाव केला. बादशहा हसून म्हणाला "पैशाचा लोभ आहे मुलासह त्याची तुला करा" ते सर्व रुपये दिरंगखानास ठरल्याप्रमाणें दिले. हा इ. स १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात दिल्ली येथें कालवश झाला

## शेख बाहुद्दिन बर्नी.

हा शहाजहान बादशहा (इ स १६२७–१६५८) चे वेळीं होता. तो पुढें विरक्त झाला तो अविवाहित राहिला होता यानें अनेक ध्रुवपदें, होऱ्या, तराणे वगैरे रचिलीं आहेत हा एक नामांकित ध्रुवपदिया म्हणून गणला जात होता. याच्या मित्राचें नांव शेख शीरमहमद असें होतें.

## सावदखां धाडी.

हा फत्तेपूरचा राहणारा होता हा चांगल्यापैकीं गायक असून कविहि होता.

## कानखां कलावंत.

हा दिल्लीस शहाजहान बादशहाचे पदरीं होता पुढें शहासुजा बंगाल्यांत सुभेदार झाल्यावर त्यानें याला बादशहापासून मागून घेऊन आपल्या नोकरींत ठेविलें.

## सलीमचंद डागूर.

हा ब्रिजचंद डागूर याचा वंशज होय हा उत्तम गायक होता याने अनेक चीजा रचिल्या होत्या परंतु सध्या त्या प्रचलित असलेल्या आढळत नाहींत

## शेख सादुल्ला.

हा लाहोरचा राहणारा त्या प्रांतांत याची गायकी मोठी प्रसिद्ध होती त्याला अफूचें मोठें व्यसन होतें त्यामुळें पुढें त्याचा आवाज बिघडला

## पूजा.

हा शेरमहमदचा भाऊ. हा चांगल्यापैकीं गायक होता हा काश्मीरचा सुभेदार फकीरउल्ला याचे नोकरींत होता.

## महंमद बागी.

हा एक उत्तम ध्रुवपद गायक असून मोठा कवि होता याला अफूचें व्यसन होतें. त्यामुळे याचा आवाज पुढें बिघडला

## इंद्रसिंग.

हा राजा रोझ अफझूनचा मुलगा अमीर खुश्रूचीं गीतें गाण्यात याची ख्याति होती तसेच तराणे गाण्यांतहि हा फार प्रसिद्ध होता

## वजीरखां नोहार.

हा सुजानखाचा नातु. हा एक चांगल्यापैकीं ध्रुवपद गायक होता ध्रुवपद गाण्यांत याची प्रसिद्धि असे. अमीर खुश्रूचें ख्याल तो उत्तम गात असे.

## मीयां छज्जुखां.

हा तानसेनाच्या घराण्यांतील होता हा जाफरखां याचा मुलगा. हा आपल्या घराण्यातील गौडारी वाणीची ध्रुवपदें फार उत्तम म्हणत असे.

## मीयां जीवनखां.

हा छज्जूखांचा बंधु हा तानसेनाच्या घराण्यांतील होता. हा आपल्या घराण्यांतील ध्रुवपदें फार उत्तम गात असे. हा रबाब वाद्यहि वाजवीत असे हा लखनौंत असफउद्दौल्याचे कारकीर्दींत वारला

## नबाब सालरजंग.

हे सुजाउद्दौल्याचे (इ स १७५४-१७७५) मेहुणे गमक व आकार यांत यांना जोड नव्हती. तसच हे होरी व ध्रुवपद उत्तम गात असत

## नबाब कासमअलीखां.

हा सालरजंगाचा मुलगा. हाहि होरी व ध्रुवपद गायनांत मोठा प्रवीण होता

## नबाब सुलतान अलीखां.

हा नबाब कासमअलीखाचा मुलगा हा लखनौचा राहणारा; ध्रुवपद गाण्यांत याची फार प्रसिद्धि असे.

## नबाब हुसेनखां.

हा कासमअलीखाचा दुसरा मुलगा. हा लखनौचा राहणारा असून ध्रुवपदें फार उत्तम गात असे याच्या आवाजाची फार तारीफ होती.

## मीर अहंमदसाहेब.

हा अजिमाबादचा राहणारा. ध्रुवपद गाण्यात याची फार प्रसिद्धि असे.

## दिलावरअलीखां.

हा लखनौचा राहणारा. हा छज्जूखाचा शिष्य होता. हा उत्तम ध्रुवपद गात असे.

## अलीमुल्लाखां.

हा गुलाम रसूल याचा शिष्य. ध्रुवपद्गायनांत याची प्रसिद्धि असे.

## शेख शीरमहंमद.

हा शहाजहान बादशहाचे वेळीं (इ. स. १६२७–१६५८) होऊन गेला. हा शेख बाहुद्दिन बर्नांचा मित्र होता. यानें अनेक ध्रुवपदें वगैरे गीतें रचिलीं असून कांहीं नवे रागहि काढिले होते. हा एक उत्तमांपैकीं ध्रुवपद्गायक होता.

## सादिकअलीखां.

प्रसिद्ध बीनकार व सुरसिंगारवादक बहादूर हुसेनखा ह्याचे हे पुत्र साहेब जादा हैदरअलीखां, रामपूरच्या माजी नबाबाचे बंधु, यांचे हे गुरु होते. हे बीन, सुरसिंगार हीं वाद्यें उत्तम वाजवीत; शिवाय हे मोठे गायक होते. लखनौचे शेवटचे नबाब वाजिद्अलीशहा पदच्युत होऊन इ. स. १८५६ मध्यें कलकत्त्यास गेले त्यावेळीं त्यांनीं सदर गायकास आपल्याबरोबर नेलें. ह्यांनी अनेक चीजाहि रचिल्या आहेत.

## चिंतामण मिश्र.

श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पदरीं चिंतामण मिश्र नांवाचा एक अप्रतिम गवयी होता. तो श्रीमंतांबरोबर ब्रह्मवर्तास गेला होता. श्रीमंत कलासवासी झाल्यावर श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे यांनीं त्यास आपल्या पदरीं ठेविलें. तो ध्रुवपद् गायनांत फार प्रवीण होता. तो रोज नवीं ध्रुवपदें रचून तीं पूजेनंतर देवासमोर गात असे. ज्यास देवाचा प्रसाद येई तेवढीं ठेवून बाकीचीं निर्माल्याबरोबर विसर्जन करण्याचा त्याचा प्रघात होता. त्याच्या ध्रुवपदांत 'चिंतामणी' किंवा 'चेन' असे शब्द आढळतात. हा जयाजीराव महाराजांच्या कारकीर्दींत कालवश झाला.

## नारायणशास्त्री.

हे ग्वाल्हेरचे राहणारे होते, यांनी ध्रुवपदाचा अभ्यास श्रीमंतांच्या पदरचे प्रसिद्ध ध्रुवपदीये चिंतामण मिश्र यांच्याजवळ केला. हे ध्रुवपद्गायकींत पक्के होते. जेव्हां कुदवसिंग अजिंक्यपत्र मागण्यासाठीं ग्वाल्हेरीस आला, तेव्हां नारा-

यणशास्त्री बरेच वयातीत झाले होते, तथापि ध्रुवपदगायनास सुरुवात करून कुदवसिंगास त्यांनी पहिल्या झपाट्यास पराभूत केलें ही आख्यायिका नारायणशास्त्री यांच्या समाधीवर लिहिलेली असून कोणाहि जिज्ञासूस ग्वाल्हेरीस पाहावयास सांपडेल मृत्यूपूर्वी नारायणशास्त्री यांनी चतुर्थाश्रम स्वीकारला होता हे जयाजीराव महाराजांचे कारकीर्दीत कालवश झाले

## वामनबुवा देशपांडे

हे ग्वालेरचे राहणारे व ग्वाल्हेरचे प्रसिद्ध ध्रुवपदिये नारायणशास्त्री यांचे शिष्य होत. याचा आवाज मर्दानी असून ध्रुवपद म्हणण्याची याची शैली वाखाणण्यासारखी होती. यांची शिष्यशाखा मोठी आहे. हे श्रीमन जयाजीराव महाराज यांचे वेळीं कालवश झाले

## मोरया गोसावी.

हे चिंचवडचे राहणारे. हे मोठे भगवद्भक्त होते. ध्रुवपदगायनात यांची मोठी प्रसिद्धि असे. श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांच्या पदरची प्रसिद्ध गायिका व्यंकटनरसी ही यांस गुरुस्थानीं मानीत असे. तिला दुसरीकडे कुठेंहि जाण्याची जरी बंदी होती तरी मोरया गोसावी यांच्याकडे जाण्यास तिला सदर परवानगी होती. यावरून श्रीमंतांचीहि गुणग्राहकता स्पष्ट होते

## सखारामबुवा मिरची.

हा सातारचा राहणारा. याचा ध्रुवपदिया म्हणून महाराष्ट्रांत मोठा लौकिक होता. श्रीमत दुसरे बाजीराव पेशवे यांच्या पदरची प्रसिद्ध गायिका व्यकानरसी ही यांना फार मान देत असे. यावरून यांच्या विद्वत्तेबद्दलचा व कलेच्या उच्च दर्जाचा सहज तर्क करितां येईल.

## सखारामबुवा काशीकर.

सखाराम हा राहणारा महाराष्ट्रांतील. पण त्यास इच्छा झाली काशीस राहण्याची. अव्वल इंग्रजीच्या वेळीं प्रवासाचीं साधनें जरी चांगलीं नव्हतीं तरी सखाराम हा शरीरानें धष्टपुष्ट असल्यानें त्यास प्रवासाची फिकीरच वाटली नाहीं.

तो मजल दर मजल करीत काशीस गेला. तेथें व्याकरण, न्याय, वेदान्त, साहित्य इत्यादि शास्त्रें शिकविणारे मोठाले नामांकित विद्वान् गुरु होते, तसेंच गायन, वादन, ह्या कला शिकविणारेहि वस्ताद होते. सखारामाची लहर गायन शिकण्याकडे लागली. व तो त्याप्रमाणें गायनप्रवीण बनला, व सखारामाचा सखारामबुवा झाला. त्यावेळीं तेथें ध्रुवपद गायनाची गोडी लोकांत असल्यानें सखारामबुवा ध्रुवपदीया बनला. लग्न वगैरे करून तेथेंच प्रपंच करून राहिला व काशीकर बनला. त्याचा आवाज मर्दानी, पल्लेदार व अंगात शक्ति अचाट तेव्हां ध्रुवपद गाण्याचें इतरांचें तेज त्याच्यापुढें पडेना व सखारामबुवा काशीकर हे काशींत एक श्रेष्ठ गायक म्हणून मोडूं लागले. बरींच वर्षें गेल्यावर बुवास महाराष्ट्रांत जावें व तेथें कृष्णाकांठीं कालक्षेप करावा अशी इच्छा झाली. त्यास मूलबाल कांहीं नव्हतें काशीहून बुवा निघाले ते हिंडत हिंडत सांगली हें गांव कृष्णाकाठीं आहे तेथें राहावें अशी त्यांस इच्छा झाली. त्यावेळीं श्री. चिंतामणराव संस्थानाधिपति होते. (१८१८–१८६१) ते कलेचे भोक्ते असून कलावंतास त्यांचा आश्रय असे प्रसिद्ध मूर्तिकार भिवा सुतार व चांदी, तांबें, पितळेचीं सुबक भांडीं करणार कुमारी यांना त्यांचा आश्रय होता. एकदां श्रीमंताची स्वारी शहरांतून जात असतां एक गोरापान, सतेज, धिप्पाड पुरुष उत्तम पोषाख केलेला त्यांच्या दृष्टीस पडला. वाड्यात गेल्यावर त्या इसमाची चोकशी करण्यास श्रीमंतांनीं हुकूम सोडला. दोन तासांनीं खबर कळली कीं, तो कोणी काशीचा गायक आहे. श्रीमंतानीं त्याचा मुजरा ठरविला. बुवा रुबाबदार पाहून श्रीमंत खूष झाले त्याचें गाणें झालें. तेंहि अप्रतिम. तेव्हा पुढें श्रीमंतांनीं त्याजपाशीं चौकशी केली कीं; 'तुम्ही येथें कां आलात' बुवा म्हणाले, 'मी पूर्वीचा महाराष्ट्रीय, कृष्णानदीवर माझें प्रेम, तेव्हा तिच्या काठीं राहिलेलें आयुष्य कठावें म्हणून इकडे आलों आहें' श्रीमंतांनीं सांगितलें, 'इच्छा चांगली आहे तर येथें कृष्णा आहे येथेंच रहावें. पोटाची काळजी करण्याचें कारण नाहीं.' असें श्रीमंतांकडून आश्वासन मिळाल्यावर बुवा तेथेंच राहिले.' त्यांनी शिष्यास चांगल्या तऱ्हेनें ज्ञान करून दिलें. कवठेकरबुवा हे त्यांचेच शिष्य होत. अशारीतीनें सांगली संस्थानास एक चांगला गवयी श्रीमंतांच्या चांगुलपणानें लाभला. हे बुवा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरआर्धांत कालवश झाले.

## सदोबा अष्टेकर.

हे मिरज प्रांतांतील अष्ट्याचे राहणारे. यांनीं गायनाचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला. हे पुण्यातील जुन्या पिढींतील नामांकित ध्रुवपदिये म्हणून समजले जात असत. मार्तंडबुवा बीडकरांनंतर हे बेलबाग देवस्थानचे नोकर झाले यानीं आपले दोघे मुलगे ध्रुवपद गाण्यांत चांगले तयार केले. त्यांपैकीं ग शंकरबुवा हयात आहेत. ग शंकरबुवा बेलबाग देवस्थानांत अनेक वर्षे नोकर होते. पुण्यांत ध्रुवपदिये म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे.

## भलोबा लिमये.

हे सदोबा अष्टेकराचे शिष्य समजले जात होते. यांचें वागणें फार भिडस्तपणाचें असे. पर्वती–देवस्थानात त्यांस आमरण नोकरी होती. बक्षीसपणाबद्दल यांच्या वेळचे लोक याची फार तारीफ करीत. हे ध्रुवपदें गात.

## रावजीबोवा बेलबागकर.

हे पुण्याचे राहणारे. यांच्या वडिलांचें नाव मार्तंडबुवा बीडकर मार्तंडबुवा चांगले ध्रुवपदिये होते. रावजीबुवाचा गाण्याचा अभ्यास त्याच्या वडिलांजवळच झाला यांच्या वडिलांस पुण्याच्या बेलबाग देवस्थानांत नोकरी होती. विद्या चांगली झाल्यावर बुवा आपल्या वडिलांच्या बदली बेलबागेंत देवापुढें गाण्यास जात असत. बुवांना पेढे खाण्याचा फार नाद होता. तेव्हां वडिलांनीं म्हटलें कीं, “ आज जो मजकरितां देवळात गाण्यास जाईल त्यांस मी पोटभर पेढे देईन. ” म्हणजे रावजीबुवा देवळात जात गोपूनाना म्हणून यास एक भाऊ होता. तेहि गाणें शिकले होते कांहीं कारणामुळें बेलबागेची नोकरी सुटल्यावर रावजीबुवा मुंबईस गेले व मुंबईतील गायनोत्तेजक क्लबांत त्यांनीं गवयाची नोकरी धरिली. ते बरींच वर्षें तेथें नोकरीवर होते. त्यांस ध्रुवपदें पुष्कळ येत होतीं. त्याची शिकविण्याची हातोटीहि चांगली असे प्रस्तुत लेखकाच्या वडिलांचे परम स्नेही ग. विष्णुपंत भातखंडे हे ह्या बुवांचे शिष्य आहेत. गोपुनानाची समाधि साताऱ्याजवळ गोवें म्हणून जें क्षेत्र आहे तेथें आहे. रावजीबुवा बरेच वयातीत होऊन इ. स. १८९५ च्या सुमारास कालवश झाले.

## वजीरखां

वजीरखां हे घरदाज गवई होते यांच्या वडिलाचें नांव निजामखां. ते ध्रुवपद गात असत. वजीरखांस युसफखां नावाचा एक भाऊ होता. या उभयता बधूंस ध्रुवपदगायनाची तालीम त्याच्या वडिलांनींच दिली. ख्यालगायनामध्यें ज्याची ख्याति ते बडे महमदखां हे याचे मामा त्याच्यापासून यांना ख्यालाचीहि तालीम मिळाली होती. पण ते सदा ध्रुवपद व धमारच गात असत. याचा आवाज फार गोड व सुरेल होता हे दिसण्यांत फार देखणे होते व त्यांचा स्वभावहि फार चांगला होता बडोद्यास खंडेरावमहाराजांकडे यांचीं गाणीं झालीं. नतर ते मुंबईस आले. मुंबईचे जीवनलालमहाराज यांच्याकडे त्याचा मुजरा झाला. त्यावेळीं त्यांनीं यांच्या आवाजाची व गायकीची तारीफ करून यांस मोठी बिदागी दिली हे मुंबईहून पुणें, भोर, सातारा इत्यादि शहरीं गेले. भोर संस्थानातील रामनवमीच्या उत्सवात यांचीं गाणीं झालीं त्यावेळीं तेथें जमलेल्या अनेक गवयांनीं यांच्या गायकीची तारीफ केली मुजरा ठरला म्हणजे ठरींव वेळीं ते फारच वक्तशीर जात. त्याबद्दल यांची नावाजणी फार होत असे. एकवार यांची व सखारामबुवा अलबारकर—ग्वालेर घराण्यांत ख्याल शिकलेले प्रसिद्ध गवयी—यांची गाठ पडली. तेव्हां ख्याल व ध्रुवपद यांच्या गायकीची चर्चा निघाली. त्यावेळीं अलबारकर यांनीं अशा काही बिकट ताना मारून दाखविल्या कीं, त्यामुळें वजीरखां फार खुष झाले व म्हणाले, ‘ मी आतां यापुढें ख्यालीयास नावें ठेवणार नाहीं ’ यांचे बधु युसफखा कधीं मैफलींत पुढें बसून गात नसत; तर ते सदा आपल्या भावाची साथ करीत. युसफखा वारल्यावर वजीरखाच्या गाण्यास थोडा कमीपणा आला. यांना आवाजाची अशी देणगी होती कीं, तो कधीच बिघडत नसे. वजीरखांचें वागणें एखाद्या सरदाराप्रमाणें असे. यांनीं कोणास फारसें शिकविलें नाही.

## वामनबुवा कवठेकर.

हे महाराष्ट्रांतील एक ध्रुपदगायक होते. यांचा आवाज पल्लेदार व जोरकस असून ध्रुवपद म्हणण्याची याची ढब चांगली होती नानासाहेब पानसे, इंदूरचे प्रसिद्ध पखवाजी, हे ज्यावेळीं पुण्यास आले व त्यांच्या वादनाचा लाभ पुणेंकरांस मिळाला, त्यावेळीं सदर कवठेकरबुवा ध्रुवपद म्हणण्यास बसले होते. हे इ. स १८९५ च्या सुमारास कालवश झाले.

## गणेशपंत फडके.

गणेशपंत फडके हे प्रसिद्ध बीनकार दत्तोपंत फडके यांचे बंधु. हे जमखंडीचे राहाणारे. मिरज प्रांतांत हे ध्रुवपद गाणारे समजले जात असत. यांचें शिक्षण व गाण्याची तऱ्हा बरी होती हे इ. स १८९५ चे सुमारास मरण पावले.

## विश्वनाथबुवा.

हे महाराष्ट्रीय असून कलकत्त्यास रहात असत. यांची ध्रुवपद गाण्यात तिकडे बरीच प्रसिद्धी होती. हे स्वभावानें प्रेमळ असून यांचा आवाज बरा होता.

## भटजी बापु.

हे दक्षिण हैद्राबादचे राहणारे. हे विरक्त तऱ्हेनें राहत असत. हे ध्रुवपद चांगलें म्हणत. ह्यांनीं अनेक शिष्यास ही कला शिकविली आहे. ह्यांचा स्वभाव फार प्रेमळ होता. ह्यांच्या वेळेस हैद्राबादेस जे गायक होते त्यांत ह्यांना चांगला मान होता. ह्यांची ध्रुवपद म्हणण्याची धाटणी वाखाणण्याजोगी होती. हे इ स. च्या २० व्या शतकाच्या सुरवातीस कालवश झाले.

## लालजी.

हे धारेस राहत असत रामकृष्णदेव यांचे गायनगुरु होते त्यांच्या जवळ हे ध्रुवपद व टप्पा शिकले होते. ह्यानीं ही कला अनेक शिष्यांस शिकविली होती. ज्यांचा आवाज पातळ असून टप्प्यास लायक असेल त्यास ते टप्पे शिकवीत, व ज्यांचा आवाज जाड व जोरकस असेल त्यास ध्रुवपद शिकवीत. ह्याचा स्वभाव मनमिळाऊ व नम्र होता. ह्यांस एक भाऊ होता त्याला ही कला चांगली अवगत होती व आपल्या भावास ते ह्या कामीं मदत करीत असत. हे दोघे बंधु इ स च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## अघोरबाबू.

हे बंगालकडील एक चांगले ध्रुवपदीये होते याचा मुक्काम मुंबईस अनेक वेळ होत असे. इकडेहि त्यांना ध्रुवपदगायनाबद्दल बराच मान होता. हे आपणास

आग्र्याचे वजीरखां यांचे शिष्य म्हणवीत असत. हे इ. स. १९२० चे सुमारास कालवश झाले.

## राधिका गोस्वामी.

हा बंगालकडील चांगला ध्रुवपद गाणारा होता याला गायनशास्त्राचें ज्ञान चांगलें होतें हा तिकडील एका संगीतशाळेचा मुख्याध्यापक होता. हा नुकताच म्हणजे इ स. १९२६ चे सुमारास कालवश झाला.

## जाकुद्दिनखां.

हा उदेपूरचा राहणारा याची ध्रुवपद गाण्याची फार प्रसिद्धि असे यास चंदे-अल्लीखांची मुलगी दिली होती याचा आवाज मर्दानी व जोरदार होता. त्याच्या गुणावरून उदेपूरच्या महाराजांनीं त्यास आपल्या पदरीं ठेविलें होतें.

याच्या सारखा ध्रुवपद गाणारा आज तरी कोणी नाहीं. त्याची ध्रुवपद गाण्याची शैली उत्तम होती. बडोद्यास इ स १९१६ त जी संगीत परिषद झाली तीत यांचें गाणें ऐकून सर्व लोक तल्लीन झाले व सर्वांनीं त्याची फार वाहवा केली. ध्रुवपदाचे गायकींत जोरकसपणा कसा असतो हें तेव्हां श्रोतृसमुदायास त्यानें दाखविलें. हा इ स. १९२४ चे सुमारास वारला

## आलाबंदेखां.

हा जाकुद्दीनखांचा धाकटा भाऊ. ध्रुवपदगायकींत याचीहि बरीच प्रसिद्धि होती. हा अलवार दरबारचा गायक होता इ स. १९२३ चें सुमारास हा कालवश झाला.

## महंमद अलीखां

हा प्रसिद्ध गवई गयेजवळ गिधोर येथील राहणारा, याच्या वडिलांचें नांव वासतखां, हे वाजिदअली, लखनोचे शेवटचे नबाब, यांचे गुरु होते. महंमद अलीखांनीं अनेक रागांतील ध्रुवपदें व धमार या चीजा आपले शिष्य ठाकूर नबाबअलीखां, अकबरपूरचे तालुकदार, यांस शिकवून त्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्या आहेत. हा तानसेन वंशातील अकरावा पुरुष होय याचा

आवाज मोठा असून जोरकस होता; व याची ध्रुवपद म्हणण्याची पद्धति चित्ताकर्षक होती. हा इ. स १९२७ मध्यें कलकत्त्याजवळ एका प्रसिद्ध व धनिक जमीनदाराच्या नोकरींत असतां कालवश झाला.

## दौलतखां.

हा ध्रुवपद गायक जयपुराकडील. ह्याचें घराणेंच गायकाचें असून फार प्रसिद्ध होतें हा ही विद्या आपल्या घरींच शिकला. ह्याचा आवाज जोरकस, म्हणण्याची ढब चांगली ह्यामुळें त्याचा मोठा लौकिक झाला. पुढें हा कांहीं वर्षे मुंबईच्या एका गानप्रिय व्यापाऱ्याजवळ होता. ह्याच्याजवळ ध्रुवपद चीजांची भरती फार असे. महाराष्ट्रांत प्रसिद्धि पावलेले अलादियाखां ह्यांचा हा चुलता होय हा इ. स. च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## केशवबुवा आपटे.

हे घराणेदार गवई आहेत. हे इंदुरास राहतात. ह्यांची गायकी ध्रुवपदाची आहे. ग्वालेरचे प्रसिद्ध ख्यालगायक बाळासाहेब गुरुजी यांचे हे मातुल. हे दिसण्यांत रुबाबदार, व ह्यांचा आवाज फार मधुर आहे. ज्यास ध्रुवपद गायन आवडत नाहीं, त्यास घटकाभर ध्रुवपद गायन ऐकण्यास लावण्याची मोहनी ह्यांच्यामध्यें आहे. ह्यांची ध्रुवपद गायनाची पद्धति फार चित्ताकर्षक आहे; म्हैसुरास गेल्यावेळीं तेथील महाराजांनी त्यांचें गाणें करून त्याचा योग्य सन्मान केला व त्यांस सिंहाच्या तोंडाचें सोन्याचें कडें बक्षीस दिलें ह्यांची शिष्यशाखा बरीच आहे. ह्यांचे चिरंजीवहि ध्रुवपद गायनांत तयार झाले आहेत.

## गोपेश्वर बानर्जी.

हे बंगालमधील एक नामांकित ध्रुवपदीये आहेत. यांनीं गायनावर कांहीं पुस्तकेंहि लिहिलीं आहेत व नोटेशनसह चीजा छापून प्रसिद्ध केल्या आहेत. हे तिकडील एका संगीत शाळेचे मुख्याध्यापक आहेत. यांचें गायन फारसें मनोवेधक आहे असें नाहीं

# ख्यालगायक.

## गुलाम रसूल.

ख्यालगायनप्रवर्तक जे गायक झाले त्यांपैकीं हे एक होते. याना ध्रुवपद-गायकी चांगली येतच होती, परंतु गायनास नाविन्य येण्यासाठी ख्याल रचून त्याचें गायन सभ्य समाजांत प्रसृत करावें ही त्यांची मनीषा. ती इच्छा त्यांनी आपल्या आयुष्यांत पुरी केली. हे लखनौचे राहणारे होते, व त्यांच्या वेळचे लखनौचे नवाब आसफउद्दौला यांच्या नोकरीत होते एकदां त्यांस नबाबाचा दिवाण नवाब हसन रजाखा यांच्याकडे गाण्यास जाण्याची पाळी आली. तेथें दिवाणानें त्यास चांगल्या रीतीनें वागविलें नाहीं. हा अपमान सहन न होऊन त्यानीं दरबारची नोकरी सोडिली ! दिवाणास वाटलें हे गर्व ! गुलाम रसूलखांस वाटलें कीं, मजसारखा गुणी व कलावंत या रियासतींत तरी दुसरा खास नाहीं। यामुळें त्यानीं नोकरी तर सोडिली; एवढेंच नव्हे तर लखनौ हें गांवहि सोडून ते परठिकाणीं राहण्यास गेले. त्यांचें गाणें फार अप्रतिम व मधुर असे. त्यांच्या गाण्यास बुलबुल पक्षी लुब्ध होऊन तेथें जमत, अशी आख्यायिका चालत आली आहे. हे दीर्घायुषी होऊन इ. स च्या अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले. ख्याल गायकांत हे शेवटले गायक असें खास समजत असत. त्यांस गुलाम नबी नांवाचा मुलगा होता. त्यानेंच पुढें टप्प्याचें गाणें नवें काढून त्यांत अलौकिक कीर्ति संपादन केली.

## मीयां शक्करखां.

हा एक प्रसिद्ध ख्याल–गायक लखनौत रहात असे. प्रसिद्ध ख्यालगायन-प्रवर्तक जे गुलाम रसूलखां त्याजपाशीं हा ख्यालगायन शिकला. ह्याचें गायन-प्राविण्य व हुषारी पाहून गुरूनीं आपली मुलगी त्यांस देऊन ह्या शिष्यास आपला जावई केलें. बडे महमदखां म्हणून पुढें जे प्रसिद्धीस आले ते ह्यांचाच मुलगा महंमद. हे वयातीत होऊन लखनौ येथें एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले

२०५ ६

## बडे महंमदखां.

याच्या वडिलाचे नाव शक्करखा. हे लखनौ येथें रहात होते. याचे वडील उत्तम गायक असून ख्यालाचें गाणें प्रचलित करावें अशी याची इच्छा होती महमदखां आपल्या वडिलांजवळ गायनविद्या शिकले. ख्यालियास तानेची तयारी चांगली असावी लागते ही तयारी त्यांनीं उत्तम केली होती त्यावेळीं त्याच्यासारखी तान कोणाची नव्हती म्हणून त्याची प्रसिद्धी फार झाली होती. ख्यालगायनांत त्यांच्यासारखा गवई नाहीं म्हणून अलिजाबाहद्दर दौलतराव शिंदे यांनीं महंमदखांस दरबार गवई नेमलें. नथ्थन पीरबक्षाचे नातू प्रसिद्ध ख्यालगायक हद्दूखां व हस्सूखां त्यावेळी ग्वाल्हेरीस होते महमदखांच्या घराण्याचें व नथ्थन पीरबक्षाच्या घराण्याचें वाकडें असल्यानें हद्दूखां व हस्सूखां यांस महमदखानें गाणें शिकविलें नाहीं। इतकेंच नव्हे तर आपलें गाणें त्यांस ऐकूंहि दिलें नाहीं। महमदखाचें गाणें चोरून ऐकून त्या बंधुद्वयांनीं त्यांच्याशीं सामना केला व वाहवा मिळविली। त्यामुळें चिडून जाऊन त्यांनीं ग्वाल्हेरची नोकरी सोडून रेवा दरबारांत नोकरी धरिली हे स्वभावानें खुनशी होते. ग्वाल्हेर दरबारात नोकरीवर असतां हे हत्तीवर बसून दरबारांत जात असत, असा त्यांचा बडेजाव होता. याच्या गायकीची व तानबाजीची तरकीब विलक्षण होती असा त्यांचा लौकिक आहे. हे वयातीत होऊन रेवा संस्थानात वारले त्यांस चार मुलगे होते.

## अहमदखां.

हा शक्करखांचा मुलगा व महमदखांचा बंधु होय हा ख्यालगायन आपल्या वडिलांजवळ शिकला याच्या गायनांत रागाची शुद्धता कायम राही, व ख्यालगायनाचे नियम याच्या गायनांत कधीं मोडले जात नसत याला बडे महंमदखां यांच्यासारखी तान साधली नाही, हें खरें; पण याच्या गायनांत रागनियम उत्तम सभाळले जात, म्हणून संगीत शास्त्रज्ञांची याच्यावर फार मर्जी असे. हा लखनौ येथें रहात असे. हा मोठा नम्र व चालीरीतींत सभ्य होता. यानें अनेक शिष्यास आपली विद्या शिकविली. हा चांगला वयातीत होऊन एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## कुतुबअली.

हा बडे महंमदखांचा औरस मुलगा होता. त्याला आवाजाची देणगी होती. शिक्षण प्रत्यक्ष वडिलांजवळ झालें होतें. त्यामुळें ख्यालगायनांत ह्याची चांगलीच कीर्ति झाली. हा स्वभावानें चांगला असून मनमिळाऊ होता. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## मुनवरखां.

लखनौचे प्रसिद्ध ख्याल-गायक बडे महंमदखां यांच्या रखेचा हा मुलगा. ह्याला गायनाची तालीम बापाकडून मिळालेली तेव्हां ह्याच्या कलेबद्दल निराळी शिफारस नको. ह्याचें ख्यालगायन लोकरंजनकारी असे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## मुबारकअलीखां.

लखनौचे प्रसिद्ध ख्याल-गायक बडे महंमदखां ह्यांच्या रखेचा हा मुलगा. हा दिसण्यांत झोकदार असून ह्याची विद्या प्रत्यक्ष बापाजवळ झाल्यानें गान-विद्येंत तो चांगला प्रवीण झाला होता. ह्याचें गायन विलक्षण रंगदार असल्यानें त्या वेळच्या लोकांत ह्याची फार चहा असे. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत लखनौ येथें कालवश झाला.

## मुरादअलीखां.

बडे महंमदखांचा हा सर्वांत धाकटा मुलगा. हाहि त्यांच्या रखेपासून झाला होता. हा मोठा बुद्धिमान असून गान-विद्येंत चांगला प्रवीण झाला होता. हा बापाचा फार लाडका होता, तेव्हां बापानें आपली कला ह्यास मनापासून शिक-विली होती. ह्याचें गाणें फार लोकपसंत असे. ह्याच्या गायनाचा ढंग बापा-सारखा होता. हा लखनौ येथें इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत काल-वश झाला.

## दिलावरखां.

मुबारकअलीचा हा मुलगा म्हणजे बडे महंमदखांचा हा नातू. ह्याला गायनाची तालीम आपल्या बापापासून मिळाली होती. हा आपल्या घराण्याची गायकी मोठ्या डौलानें गात असे. ह्याची गायनाची तरकीब विलक्षण असे. ह्याची तानबाजी वर्णन करण्याजोगी असे. हा वयोवृद्ध होऊन इ. स. च्या २० व्या शतकाच्या प्रारंभीं लखनौ येथें कालवश झाला.

## रजबअली.

हा लखनौचा राहणार. हा बडे महंमदखाचा घराण्याची गायकी गात असे व आपण त्या घराण्याचे शागिर्द असें तो मोठ्या अभिमानानें सांगे. ती गायकी त्यानें पुष्कळ ऐकल्यामुळें त्यांत तो चांगला प्रवीण झाला होता. हा इ. स च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत मरण पावला.

## फजलअली.

बडे महमदखांच्या घराण्याची गायकी ह्यांस पोंचली होती. ख्यालांत तानबाजींची एक तरकीब बडे महमदखाच्या घराण्यांत विलक्षण होती, ती ह्यानें चांगली हासल केली होती, त्यामुळें ह्याच्या गाण्याची छाप लोकांवर फार पडे. हा इ. स. च्या २० व्या शतकांत मरण पावला.

## मेंडूखां.

हा ख्यालगायक, लखनौच्या फजल अलीच्या बहिणीचा मुलगा. ह्याला ख्यालाची गायकी आपल्या मामापासून मिळाली होती हा ख्याल गायनांत चांगला तरबेज झाला होता. परंतु हा आपल्या मामाची गायकी गात नसे। ह्यानें आपला जबडा तयार केला होता; व तशा ताना तो घेत असे. हा प्रकार नवा असल्यानें लोकांस तो फार आवडे. हा लखनौ येथें इ. स. च्या २० व्या शतकाच्या प्रारंभीं कालवश झाला.

## मीयाजानि.

लखनौचा नवाब आसफउद्दौला (१७७५-१७९०) ह्याच्या नोकरींत हे होते. हे अप्रतिम ख्यालगायक असत लखनौच्या नवाबाच्या दिवाणानें ह्याचा अपमान व पाणउतारा केल्यामुळें हे नवाबाची नोकरी व लखनौ शहर सोडून परठिकाणीं राहण्यास गेले. हे विलक्षण स्वाभिमानी होते. हे चांगले वयांत होऊन इ. स. च्या एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले.

## शादीखां.

हा ख्यालगायक मीरत येथील राहणारा ह्याची ख्यालगायकीबद्दल फार प्रसिद्धी असे. ह्याची तान चागली तयार असे. बडे महंमदखांपासून ख्यालांत तानबाजीची आवड लोकांस लागल्यामुळें ख्यालगायकांस तान तयार करणें भागच पडे. ह्याचें गायन लोकांत फार प्रिय असे. हा. इ. स च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला

## मुरादखां.

हा प्रसिद्ध व लोकप्रिय गायक मीरत येथें राहत असे. ह्याची ख्यालगायकी-बद्दल फार तारीफ असे. ह्यानें बडेमहमदखांच्या घराण्याची गायकी चांगली संपादन केली होती. हा आपल्या वेळीं मोठा लोकप्रिय गायक असे. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला.

## सुलेमानखां.

मुरादअलीखां हा बडे महमदखाचा सर्वांत धाकटा मुलगा, त्याचा मुलगा हा सुलेमान. हा रजबअलीखांचा शागिर्द. ह्याला आपल्या उस्तादाकडून ह्याच्या घराण्याची गायकी मिळाली होती. ह्यानें चांगली मेहनत घेऊन आपली घरची विद्या जतन केली. ह्याची तान फार तयार असे ह्याच्या गुरुची ह्याच्यावर फार मर्जी असे हा स्वभावानें गरीब होता म्हणून लोकप्रिय झाला होता. हा जुन्या-तऱ्हेनें ख्याल तानपलट्यांसह गात असे; ह्यावरून पूर्वींचे मोठाले गायक कसे गात असतील ह्याची कल्पना याच्या गाण्यावरून येई हा इ. स च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

स्थळ प्रत
स. ३ नं. ४०० ५७
ता. . .

## बडे मुनेखां.

हे नामांकित गवयी लखनौचे राहणारे. उत्तर हिंदुस्थानांत ह्यांची आपल्या कलेबद्दल चांगली कीर्ति होती हे ख्याल गात असत. ह्यांचा आवाज चांगला असून गायनपद्धति तारीफ करण्याजोगी होती. ह्याच्या आईचा बाप छुले-मानखां हा बडे महमदखांच्या घराण्यांत शिकला होता म्हणून नातवास ती गायकी परंपरेनें मिळाली होती. हे इ. स १८१२ च्या सुमारास कालवश झाले.

## मौजखां.

हा प्रसिद्ध ख्यालगायन तिरवन येथें राहत असे. ख्यालगायन ज्यानें शिष्ट लोकांत प्रचलित केलें व जो ख्यालगायनातील एक नायक समजला जातो, असा जो गुलाम रसूल ह्याच्या बहिणीचा हा मुलगा. हा आपल्या मामाजवळ ख्यालगायन शिकला. ख्यालगायन लोकप्रिय व्हावें म्हणून भाच्यास मामानें शक्य तों उत्तम ख्यालगायकी शिकविली होती. हा नामांकित ख्यालिया इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## करीमखां.

हा पंजाबचा राहणारा. हा ख्यालगायन ह्या कलेंत फार प्रवीण होता. ख्याल-गान पुढें येऊन ध्रुवपद-गायकी मागें पडावी अशी ह्याच्यावेळीं गायकांची मनीषा होती त्या हेतूनें ह्यांनीं ख्याल गायकी मोठ्या परिश्रमानें तयार केली होती हा प्रसिद्ध ख्यालगायक इ. स च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत वारला.

## मखनखां.

हे एक अप्रतिम ख्यालगायन म्हणून त्यांची प्रसिद्धी आहे. ख्यालगायन शिष्ट समाजांत प्रसृत करणारांपैकीं ज्या प्रसिद्ध व्यक्ती होऊन गेल्या त्यांपैकींच गुलाम रसूलखां एक होते. मखनखां यांनीं त्यांचेंच शिष्यत्व पत्करलें होतें शक्कर-खांची व त्यांची गायनविद्येमध्यें मोठी चुरस असे. यांच्या मुलाचें नांव नथ्थन-पीरबक्ष. हे राहणारे लखनौचे. हे पिढीजाद गायकघराण्यांपैकीं होत हे स्वभा-वानें नम्र व मनमिळाऊ होते. त्यांच्या घराण्यांत पूर्वी ध्रुवपदगायकी होती. पण

लोकास त्या गायनाचा कटाळा आल्यानें नवी पद्धति शिकून लोकांचं रंजन करावें व पैसा मिळवावा या हेतूनें त्यांनीं ख्यालगायकीचा अभ्यास करण्यासाठीं गुलाम रसूल यांचें शिष्यत्व पत्करलें होतें गुलाम रसूल ध्रुपद्गायकींत निष्णात होते हें सर्वंप्रसिद्ध आहे. गायनांत नवा ढंग पैदा करून लोकांत प्रसिद्धि मिळवावी अशी गुलाम रसूल यांची मनीषा होती ती यांच्या कर्तबगारीनें सफल झाली आणि शक्करखां व मक्खनखां यांच्यासारखे शिष्य त्यांस मिळाल्यानें त्यांचा हेतु सफल झाला

## नथ्थनपीरबक्ष.

हे मूळचे लखनऊचे राहणार. हे ख्याल गात असत. प्रसिद्ध मक्खनखां ह्यांचे हे पुत्र. शक्करखांचें व मक्खनखांचें गाण्याच्या चुरशीमुळें वांकडें होतें. नथ्थन पीरबक्ष ह्यांच्या मुलास शक्करखांच्या घराण्यांतील किंवा त्यांच्या पक्षांतील लोकांनीं मूठ मारून ठार केलें असा त्या वेळीं प्रवाद होता; म्हणून आपले लहान दोन नातू हद्दु व हस्सू ह्यांस घेऊन हे लखनौ सोडून ग्वालेरीस येऊन राहिले. हे इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत वारले.

## कादरबक्ष.

हा नथ्थनपीरबक्षाचा मुलगा. ह्यास बापानें ख्याल गायकीची तालीम देऊन तयार केलें. ह्याचा आवाजहि चांगला होता घरचें वळण, तेव्हां ह्याची गायक म्हणून चांगली प्रसिद्धी झाली यामुळें विरुद्ध पक्षाच्या लोकांस ह्याचा लौकिक सहन न होऊन त्यांनीं ह्यास मूठ मारून ठार केलें, अशी दंतकथा आहे! ह्यांतील खरे खोटेपणा आज कसा सांगतां येईल. ह्यास दोन मुलगे होते. हा आपल्या बापाच्या देखत भरज्वानीमध्यें वारला तेव्हां ह्याच्या बापास दुःख होणें साह- जीकच आहे. श्री दौलतराव शिंदे ग्वालेरच्या गादीवर होते त्यावेळीं हा ग्वालेर दरबारचा गायक होता

## मीयां हस्सूखां.

मीयां हस्सूखां हे कादरबक्ष ह्याचे मुलगे व नथ्थन पीरबक्ष ह्यांचे नातू होत. ह्यांचे वडील पूर्ववयांत वारल्यामुळें ह्यांच्या आजानें ह्यांचें संगोपन केलें. ह्यांचा

आवाज पहाडी गोल व गोड होता. ह्यास आवाजाची देवाची देणगी ह्मणतात असें म्हणतात ह्यास त्यांच्या आजानें गायनकला उत्तम प्रकारें शिकवून ख्याल–गायनात त्यांस प्रवीण केलें. हे लखनौचे राहणारे परंतु ह्याचा बाप तेथें वारल्यानें ह्यांचा आजा ग्वाला व हस्सूखां व हद्दूखां या दोन नातवांस घेऊन ग्वालेरीस आला. त्या वेळीं श्रीमंत दौलतराव शिंदे गादीवर होते दौलतराव गायनप्रेमी व हस्सूखां व हद्दूखां पूर्ववयांत म्हणून महाराजांनी बडे महंमदखांस दरबारगवयी नेमिलें ते तर हिंदुस्तानप्रसिद्ध गवय्ये. एकवेळ ह्या दोघां भावांचें गाणें ऐकून दौलतराव म्हणाले " मला महंमदखांचें गाणें व ताना फार आवडतात " तेव्हां नथ्थनपीरबक्ष म्हणाले " महाराज महंमदखाचें गाणें माझ्या नातवांनीं ऐकल्यास ते तसें गातील" महाराजांची हस्सू-हद्दूवर मोठी मर्जी असल्यानें महमदखांचें गाणें महाराजांच्या कृपेनें ह्यास सहा महिने ऐकण्यास मिळालें. नथ्थनपीरबक्षानें महाराजांस विनंति केली कीं, माझे नातू महमदखांशी सामना करण्यास आतां तयार आहेत" तेव्हां महाराजांनी मोठा दरबार भरवून महंमदखांस गाण्यास बसविलें त्यांचें गाणें नेहमीप्रमाणें अप्रतिम झालें. सगळ्यांनीं वाहवा केलीच. पुढें महाराज म्हणालें " नथ्थनपीरबक्ष तुझे नातू कसें गातात हें आम्हांस व या दरबारी मडळीस ऐकीव तर बरें " तो हात जोडून म्हणाला " महाराज, हे बडे, माझे नातू छोटे, तथापि महाराजांची इच्छा असल्यास तेहि गातील, पण अशा गाण्यापुढें मुलांची काय छाप पडणार ! आपला हुकूम तर गाण्यास बसविलें."

असें बोलून हस्सू व हद्दू ह्यांस गावयास बसविलें. त्यांनीं आपल्या घरचें गाणें व सहा महिने एकून तयार केलेल्या महंमदखांच्या ताना ह्यांचा मिलाफ करून असें जोरकस पण डौलदार गाणें गायिलें कीं, वाहवांचा वर्षावच झाला महमदखां उताराला लागलेले व हे बंधुद्वय ऐन उमेदीमधील; तेव्हां ह्यांच्या गाण्यास महमदखांपेक्षां रंग चढला; महाराजहि खुष झाले, व दरबार मंडळीहि आश्चर्यचकित झाली नथ्थनपीरबक्षास धन्यता वाटली झालें. नथ्थनपीरबक्षाचें वजन दरबारांत वाढलें व महंदखाचें पारडें खालीं झालें हा दगा झाला आहे व आपली किंमत कमी होणार ह्या द्वेषानें चिडून जाऊन एकदां एका मैफलीत हस्सूखांची महंमदखानें तारिफ करून ज्या मीयां मल्हारच्या चीजेंत 'कडकबिजलीची तान' आहे ती चीज म्हणण्यास फरमाष केली. हस्सूखां तरुण, त्याच्या ध्यानांत कपटभाव आला नाहीं त्यांनीं चीज सुरू केली. अस्ताई अंतरा चांगला घोळून म्हटल्यावर तानबाजीस सुरुवात केली कडकबिजलीच्या

तानेची जागा येतांच मोठ्या जोरानें ती तान घेऊन महमदखांकडे पाहिलें तेव्हां महमदखां म्हणाले " बेटा ठीक और एक दफे लेव; " तेव्हा हस्सूखानें मोठ्या जोरानें ती पुनः घेतली पण काय; त्या बरोबर डाव्या आंगाची फासळी वर चढली व रक्ताची गुळणी आली; नथ्थनपीरबक्षान शेल्यानें ती बांधून म्हटलें " बेटा आज तरी मरावयाचें उद्यां तरी मरावयाचें ! तर तान घेऊनच मर, नसा मरूं नकोस तुझें नांव तरी होईल " नातवानें महमदखांचें कपट ओळखून चिडून जाऊन सही सही तान घेतली। श्रोतृमंडळींनीं वाहवा केली. पण काय हस्सूखां खालीं पडले व लगेच गतप्राण झाले। नथ्थनपीरबक्ष ह्यास फार दुःख झालें; भावास तर आकाश कोसळल्यासारखें झालें। पण उपाय काय, असला तयार झालेला हिरा लोपला, तेव्हा लोकास फारच वाईट वाटलें; कांहीं तर भरदरबारांत ढळढळा रडले. सरकारासहि फार खिन्नता आली; अशा ह्या गाण्याचा प्रसंगच न येता तर असा खेदजनक प्रकार न घडता असेंहि त्यांस वाटलें कांही लोकांस महमदखांबद्दल मनांत त्वेष आला. कांहीं प्रेमळ लोकांस ही रामलक्ष्मणाची जोडी फुटली म्हणून दुःख झालें. एकदरींत त्यावेळीं ग्वाल्हेरीस आनंद व उत्साह मावळून लोक हवालदिल झाले होणारापुढें कोण काय करणार !

तोंड मिटून तान घेणें ही हस्सूखांच्या गाण्यांतील एक खुबी होती ती फार कोणास साधली नाहीं. हे फार प्रेमळ स्वभावाचे होते. ह्यांनीं पुष्कळ शिष्य तयार केले होते. ह्यांचें आपल्या भावावर विलक्षण प्रेम असे. इ. स १८५१ च्या सुमारास हे दिवगत झाले. ह्यांस एक मुलगा होता

## मीयां हद्दूखां.

हिंदुस्थानप्रसिद्ध गायक मीयां हद्दूखां हे मूळचे लखनौचे राहणारे. ह्यांच्या आजाचें नांव नथ्थनपीरबक्ष. वडिलांचें नांव कादरबक्ष भावाचें नांव हस्सूखां व चुलत भावाचें नांव नथ्थेखां ह्यांस ख्यालगायनाची गायकी त्यांच्या आजोबानें शिकविली, कारण त्यांचे वडील हे लहान असतांच वारले होते. ह्यांच्या कुळास शिंदेसरकारचा चांगला आश्रय होता. श्रीमंत दौलतराव महाराजांची ह्या मुलांवर व त्यांच्या आजावर फार कृपा होती. पण महाराजांच्या वेळीं हीं मुलें नुकतीं उमेदींत येत चाललीं होतीं, म्हणून महाराजांनीं त्या वेळीं हिंदुस्थानप्रसिद्ध गवैय्या बडे महमदखां ह्यास नोकरीस ठेविलें होतें. त्याची तानबाजी

विलक्षण होती. त्यांत तो अद्वितीय होता तेव्हां महाराजांनीं नथ्थनपीरबक्ष ह्यास विचारलें "मीयां अशी तानबाजी तुझ्या नातवास येणार नाहीं का" तो म्हणाला "तशी तानबाजी माझे नातु गातील पण त्यांनीं ती निदान सहा महिने ऐकिली पाहिजे महमदखां माझ्या नातवास ती शिकविणार नाहीं येवढेंच नाहीं तर ऐकूनहि देणार नाहीं." तेव्हां, 'त्यांचें गाणें चाललें असतां तुझ्या नातवानीं पलंगाखालीं लपून बसावें व ऐकावें,' अशी महाराजांनीं युक्ति सुचविली. ती त्यास पसंत पडून महमदखांचें गाणें हद्दू व हस्सूखां ह्या दोघां भावानीं सहा महिने ऐकिलें व घरीं खूप मेहनत करण्याचा सपाटा चालविला. सहा महिन्यानंतर नथ्थनपीरबक्षानें महाराजास विनंति केली कीं आमची तयारी आहे. वाटेल तेव्हां हुकूम व्हावा.' एके दिवशीं महमदखांचें गाणें संपतांच महाराजानीं नथ्थनपीरबक्ष ह्यास हुकूम केला कीं, "तुझ्या नातवांचें गाणें मला आतां ऐकावयाचें आहे" तेव्हां हद्दू व हस्सू हे तरणे गवयी गावयास बसले. प्रथम ध्रुवपदअंगाचे मोठाले ख्याल विलंबितलयींत सावकाश गाऊन नतर त्या तरण्याबांड बंधुद्वयानें महमदखांच्या तानांची अशी हुबेहुब नक्कल केली कीं, सर्व दरबार मंडळी व खुद्द महाराज खुष झाले. त्याबरोबर महमदखां चिडले व म्हणाले "कांहीं दगलबाजी झाली आहे. नाहींतर बिशाद काय ही पोरें माझ्या बिकट ताना हुबेहुब घेऊ शकतील" त्यावेळेपासून ती तानबाजी ग्वालेरगायकींत शिरली. महंमदखां नोकरी सोडून गेले, व हद्दू, हस्सू व नथ्थेखां ग्वालेर दरबारचे नोकर झाले ह्या तिघा भावास पांच–पांचशें पगार होता. पुढें जयाजीराव महाराज गादीवर आल्यावर त्यांसहि गायनाचा नाद लागला. ते गायनप्रेमी व गानमर्मज्ञ होते. ते स्वतः गात असत रात्रीं देवाचें भजन करीत तेव्हां हद्दू, हस्सू व नथ्थेखां वगैरे सर्व गवई भजन करण्यास उभे रहात. हद्दूखां हिंदूप्रमाणें दिसत. कारण त्यानीं दाढी राखिली नव्हती व प्रसंगविशेषीं ते कपाळास गंधहि लावीत असत. एकदा जयाजी महाराज सवाई रामसिंगाच्या भेटीस गेले तेव्हां त्यानीं आपली गवयी मंडळी बरोबर नेली होती. महाराज रामसिंग महाराजास विनोदानें म्हणाले "मी दोन गुलाबाचीं फुलें बरोबर आणिलीं आहेत" जयपुरास हद्दूहस्सूची गाणी झालीं. रामसिंग महाराज व जयाजी महाराज बसले व पुढें तबकामध्यें बक्षिसान्या जिनसा ठेविल्या शिफारस करावयाची व त्याप्रमाणें ह्या बंधुद्वयांनीं गावयाचें. तें पसंतीस उतरलें म्हणजे बक्षीस उचलावयाचें. ह्याप्रमाणें अनेक बक्षिसें

त्या बधुद्वयानी मिळविली. उभयतां महाराज फार खुष झाले. दरबारी मंडळी, मानकरी, कामगार व दरबारचे गवयी संतुष्ट झाले. जयपूर व ग्वालेर येथील गवयांची एक प्रकारची चुरस असता एकमतानें ग्वालेरचें गायन अप्रतिम असा सर्वांचा अभिप्राय पडला. ह्यावरून हद्दुखां कसे गात असतील ह्याची कल्पना येईल. हद्दूखांचा आवाज हस्सुखां सारखा जात्या चांगला नव्हता. परंतु मेहनतीनें व विलक्षण कसरत करून त्यांनीं तो कमावला होता. कांहीं कारणामुळें जयाजीराव महाराजांची हद्दूखांवर अवकृपा झाली तेव्हां ते ग्वालेर सोडून लखनौस जाऊन राहिले. लखनौस असतां कसरत करीत असतां ते अशा जोरकस ताना घेत कीं, एकदा त्यांच्या सरदार मित्राचा तळमजल्यावर बांधिलेला घोडा दिवाणखान पायबंद तोडून पळाला ही गोष्ट लखनौचे लोक अद्याप सांगतात व ती जागा मोठ्या प्रेमानें दाखवितात प्रस्तुत लेखकास ती जागा पाहण्याचा सुयोग तो लखनौस गेल्यावेळीं आला श्री जयाजीराव महाराजांचा राग कमी झाल्यावर त्यांनीं आपला कामगार पोतनीस ह्यास पाठवून त्यांस परत आणविलें मीयां रोज ६ तास वरी कसरत करीत. कोणी म्हटलें “ इतकी कसरत आतां कशास ? ” तर ते म्हणत “ मी म्हातारा झालों असें लोकानी म्हणावें पण माझें गाणें म्हातारें झालें असें म्हणू नये. ” ते स्वभावानें फार साधे होते. पगार महिना संपण्यापूर्वी संपला तर ते राजवाड्यांत जाऊन आपण आल्याची महाराजांकडे वर्दी लावीत तेव्हा महाराज हसून म्हणत कीं, “ बहुधा पगार संपला असेल; बोलवा वर ” असें म्हणून त्यांचें गाणें ऐकत खूष झाले म्हणजे ओंजळीनें त्यांच्या अंगावर रुपये फेंकीत. ह्यांत महाराजांच्या मार्मिकतेची अथवा उदारपणाची कशाची तारीफ करावी हें लेखकास समजत नाहीं कसरतीच्या वेळीं कोणीहि ऐकण्यास बसला तर त्याची ते फिकीर करीत नसत शभर रुपयाच्या पांच चळका करणें त्यांस माहित होतें. कोणी प्रत्येक चळक पचविसाची करून जर त्यांच्यापुढें चार चळका मांडिल्या तर ते म्हणत “वीस रुपये कमी पडले ते कोणी घेतले सांगा ? ”

हस्सुखां वारल्यावर कितीएक दिवस त्यांस चैन पडलें नाहीं व त्यांचें गाणें किर्र वाटू लागलें. एकदां ते कलकत्त्यास गेले ह्यांचा नांवलौकिक फार मोठा; तेव्हां गाणं एकण्यास अतोनात गर्दी लोटली. ह्यांनीं विलंबित लयीचे ख्याल सुरु केले पण तेथील लोकांस ध्रुवपद ऐकण्याची गोडी; ख्यालाच्या ताना कानी येतांच लोक उठून गेले, व मैफलीचा बेरंग झाला मीयांहि खट्टू झाले. पण त्यांचा मित्र दुसरे दिवशीं त्यांजकडे जाऊन म्हणाला “ मीयां आपण खिन्न होण्याचें

कारण नाहीं. येथील लोकांस ख्याल ऐकण्याची सवय नाहीं, त्यामुळें तुमचें गाण्याचें मर्म त्यांस कळणार नाहीं. आपण एक ताल्यांतील विलंबित लयीचे ख्याल ध्रुवपदें म्हणून गमकाच्या ध्रुवपदास शोभणाऱ्या ताना घ्या म्हणजे आपलें गाणें लोकांस पसंतीस येईल." हा सल्ला पसत पडून मीयांनीं तसें केलें. मग काय त्यांचे अनेक मुजरे होऊन त्यांची वाहवा झाली.

प्रपंचाचा भुंगा पाठीमागें लागल्यास कसरत करण्यास वेळ मिळणार नाहीं व विद्या परिपूर्ण होऊन त्यांत प्राविण्य संपादितां येणार नाहीं, या हेतूनें त्यांनीं लग्न उशीरा केलें. पहिल्या कुटुंबापासून महंमद व रहिमत हे दोन मुलगे झाले. दुसऱ्या कुटुंबापासून दोन मुली झाल्या एक इनायतखांस दिली व दुसरी बंदेअलीखां प्रसिद्ध बिनकार यास दिली होती त्यांनी अनेक शिष्य तयार केले त्यांत हिंदूंचा भरणा जास्त आहे. त्याचें कारण ते असें सांगत "मुसलमान शिष्य माझें नांव न सांगतां आपल्या वडिलांचें नांव सांगेल. हिंदूमध्यें नांव घेण्याजोगा गवई नसल्यानें ते शिष्य माझेंच नांव सांगतील." जयाजीराव महाराज जेव्हां पढरपूरच्या यात्रेसाठीं गेले त्यावेळी त्यांचा मुक्काम पुण्यास काळूराम मनसाराम याच्या वाड्यात होता. मीयां हद्दूखा जयाजीमहाराजांबरोबर होते त्या वेळीं त्यांचें एक गाणें पुण्यास होऊन ग्वालेरच्या हद्दूखाचें गायन म्हणजे काय ह्याची ओळख त्या वेळच्या लोकांस पटली होती. अनेक मार्मिक वृद्ध लोक त्यांच्या गायनाची तारीफ पुढील पिढीतील लोकांस कौतुकानें करीत असत. म्हातारपणीं त्यांच्या कमरेखालील अंग लटकें पडलें होतें. गाण्यास दरबारांत त्यांस उचलून आणावें लागे. मरणापूर्वीं महिनाभर त्यांची सहा तासांची कसरत कायम होती थोरला मुलगा त्यांच्या देखत वारल्यामुळें त्यांना धक्का बसला व पुढें ते इ. स १८७६ च्या सुमारास वारले. ह्यांच्यासारखा गवई ग्वालेरीसच नव्हे तर हिंदुस्थानांत आजवर झाला नाहीं असें तज्ज्ञाचें मत आहे. त्यांच्या मरणाची बातमी ऐकतांच जयाजीराव महाराज म्हणाले "माझा दौलतीचा एक खांब ढासळला" एक आठवडाभर ते अगदीं उदास व खिन्न होते त्यांचें नांव अद्यापि गायन विषयांत उपमानपद होऊन बसलें आहे.

दरबारी कानडा, तोडी, बिहाग, मीयांमल्हार, यमन मालकौस वगैरे राग त्यांच्या आवडत्या रागांपैकीं होते. त्यांच्या गाण्याची पद्धति म्हणजे प्रथम एखाद्या रागांतील विलंबित लयीचा ख्याल घेऊन त्याची प्रथम स्थायी सावकाश, मोठ्या पण मधुर आवाजानें म्हणावयाची, मग अंतरा गावयाचा, पुनः स्थायी व मग

अंतरा असे दोनवार झाल्यावर स्थायीच्या चीजेचें पहिलें वाक्य गाऊन आलापास आरंभ करावयाचा, नंतर बोलतांना व नंतर ताना असा क्रम असे. त्यानंतर जलद लयीचा त्याच रागांतील ख्याल गाऊन जलद ताना घेत; त्या अशा कीं, श्रोते त्यांच्या गळ्याची तारीफच करीत रहात. लय इच्छेप्रमाणें वाढवून आपल्या तयारीचें प्रदर्शन करीत. शेवटली तान म्हणजे तार सप्तकांतील स्वरांचा श्रोत्यांच्या कानावर मधुर आवाजांचा गडगडाट. त्याबद्दल कितीहि लिहिलें तरी तें थोडेंच होणार!

त्याच्या शिष्यशाखेनें तें वळण राखिलें म्हणण्यास हरकत नाहीं. पण आतां काल पालटला. त्याच्या शिष्यसंप्रदायापैकीं असें मोठ्या डौलानें सांगणारे गायक गावयास बसले म्हणजे स्थायी कशीतरी शेवटास लाऊन, अंतऱ्यास संक्षेप देऊन तानबाजीचे भुरके मारण्यास सुरवात करितात! जुन्या गोष्टींचा कंटाळा व नव्याची आवड ही एकच गोष्ट त्यांच्या बाजूचें समर्थन करील. पण मग आमचा जुना घराणदार सांप्रदाय असें मात्र म्हणता येणार नाहीं कारण हा नवा सांप्रदाय 'स्वकपोल' ठरतो.

# मीयां नथ्थेखां.

मीयां नथ्थेखां हा लखनौचा राहणारा. मीयां हद्दूखांचा हा चुलत भाऊ. याचा गायनाचा अभ्यास हद्दूहस्सू बरोबरच होता. ख्याल गायनामध्यें ह्यानें चांगला लौकिक संपादिला होता. हद्दूखां, हस्सू व नथ्थेखां हे तिघे बंधु मोठ्या प्रेमानें वागत असत श्रीमंत जयाजीराव महाराजांनीं गायनगुरू म्हणून नथ्थेखाचा गंडा बांधिला होता एकदां महाराज व ही गवय्ये मंडळी बसली असतां नथ्थेखानीं विनंति केली कीं, 'महाराज आपण मजला गुरू समजतां पण माझा इतमाम इतर गवय्याप्रमाणेंच ठेवितां हें कसें?' महाराजांचें औदार्य कर्णाप्रमाणें होत असें त्या वेळचे लोक म्हणत असत त्या त्यांच्या औदार्यास साजेसाच त्यांनीं हुकूम फर्माविला. दुसरे दिवसापासून नथ्थेखांच्या दारात हत्ती बांधिला व त्याचा खर्च दौलतींतून चालू केला! नथ्थेखां त्या दिवसापासून राजवड्यांत हत्तीवर बसून गावयास जात असत. एकदां नथ्थेखांचें गाणें ऐकून महाराज खुष झाले हें ध्यानीं येताच नथ्थेखानें अर्ज केला कीं, 'महाराज आमच्या घरचीं

भाडी पितळेचीं असतात व त्यांतूनच ह्या असल्या गळ्याला आम्ही रोज पाणी पाजितों' महाराज नुसते हसले, पण कांहीं बोलले नाहींत दुसरे दिवशीं नथ्थेखांच्या घरीं चांदीच्या भांड्यानें भरलेली गाडी आली! ती पाहतांच खासाहेब चकित झाले व मनांत ओशाळलेहि! मग भेटीचा योग आल्यावर म्हणाले, ' महाराज आमची कदर आपणासारखी कोणी करणार नाहीं आपली धन्य आहे. आपण खरे गुणज्ञ आहांत.' अशा प्रकारें महाराज ह्या गवयांचें कोड पुरवीत असत. महाराज रात्रीं भजन करीत, त्यांत हे त्रिवर्गबंधु सामील होत; येवढेंच नव्हे तर दाढ्या काढून कपाळास आडवें गंध लावून इतर हिंदूप्रमाणें भजनास उभे राहत! श्रीमंत जयाजीराव महाराज पंढरपुरास श्रीविठ्ठलाच्या दर्शनास गेल्यावेळीं ही मंडळी त्यांच्या बरोबर होती. महाराजांस राजकारणाच्या कामानें शीण आला म्हणजे ' विश्रांतिघाट ' नांवाच्या आपल्या वाड्यांत ते रहावयास जात तेव्हां हे त्रिवर्ग बंधु व इतर गवयी मंडळी तेथें जावयाची. त्यांचें जेवणखाण तेथेंच; अहोरात्र गायनाचा सप्ताह सुरू असावयाचा, अशा रीतीनें महाराजांनीं गायनाची इच्छा तृप्त करून घेतली. त्याला कारण हे गवय्ये होत. नथ्थेखांचा स्वभाव नम्र व मनमिळाऊ असे त्यास मूलबाळ नव्हतें म्हणून त्यांनीं हद्दूखांच्या मेहुणीचा मुलगा निसार यास दत्तक घेऊन आपली सर्व जिनगी व विद्या त्यास दिली. हे वयातीत होऊन ग्वालेर येथें इ स १८७० च्या सुमारास कालवश झाले. हद्दूखांस फार दुःख झालें. कारण पहिल्यापासून ते एकमेकं मोठ्या प्रेमानें व ममतेनें वागत असत. महाराजांसहि गुरूच्या निधनानें दुःख झालें हें सांगणें नकोच. अशासारखे अलौकिक पुरुष नेहमीं परमेश्वर जन्मास घालीत नाहीं.

## गुले इमामखां.

प्रसिद्ध मीयां हस्सूखांचा हा मुलगा घरची विद्या तेव्हां त्याच्या गायकीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. ह्याचा आवाज गोड व चांगला होता. परंतु योगायोग असा कीं, हा नामांकित गवई आपल्या भर तारुण्यांत म्हणजे ऐन तीस वर्षाच्या वयात ग्वालेरीस कालवश झाला.

## मेंदी हुसेनखां.

हा, प्रसिद्ध ख्यालिये मीयां हस्सूखां, यांचा नातू. ह्याच्या वडिलांचें नाव गुले इमामखां. घरची विद्या, तेव्हां हा त्यांत प्रवीण झाला हें योग्यच आहे ह्याचा आवाज

चांगला व वळण ग्वाल्हेरचें, मग त्याच्या गायनाबद्दल काय विचारावें? याचा स्वभावहि नम्र होता. हा इ. स. १९२० च्या सुमारास ग्वाल्हेर येथें कालवश झाला. त्यानें तयार केलेली शिष्यीण मंगु अद्यापि आहे तिच्या गाण्यावरून तिच्या उस्तादाच्या गायकीची सामान्य कल्पना हल्लींच्या लोकांस होण्यासारखी आहे.

## बन्नेखां.

मीयां हद्दूखां लखनौहून ग्वालेरींत येऊन शिंदे सरकारचे दरबार-गायक झाल्यावर कांहीं दिवसांनीं एक मुसलमानाचा मुलगा त्यांना भेटला त्याची चेहरेपट्टी पाहून खांसाहेबांची त्याच्यावर मर्जी बसली. घरचा गरीब तेव्हां आपल्या घरीं जेवून हा राहील असें मनांत आणून त्यांनीं त्याला घरीं आणलें व जवळ ठेवलें. तो मुलगा नम्र व आज्ञाधारक असल्यानें खांसाहेबांचें त्याच्यावर फारच प्रेम जडलें त्यानें खांसाहेबांचें पडेल तें काम करावें व कोणतीहि गोष्ट वक्तशीर व टापटिपीनें करावी. पुढें कांहीं दिवसांनीं त्या मुलास आपल्या मागें तंबोरा वाजविण्यासाठीं बसण्यास त्यांनीं सांगितलें. कांहीं दिवसांनीं ते त्यास तालीम देऊं लागले. मुलगा चलाख, पाणीदार, हुषार व बुद्धिमान, तेव्हां गायनांत त्याची गति ठीक होऊं लागली. जेवणखाण चांगलें, काळजी कांहींच नाहीं, गुरूची मर्जी खोळा आणे, तेव्हां तो मुलगा जो सरव्ला तें कांहीं विचारूं नका. ऐन उमेदींत आल्यानें तो शोकदार दिसूं लागला. खांसाहेबांस अद्याप मूल नव्हतें, तेव्हां त्यांस वाटूं लागलें कीं, आपणास संतती न झाल्यास ह्याला दत्तक घ्यावा. हा हेतु मनांत आल्यामुळें ते त्यावर फारच प्रेम करूं लागले. पण कांहीं दिवस लोटल्यावर खांसाहेबांस मुलगा झाला. स्वतःचा मुलगा मोठा होऊं लागून चलाख दिसूं लागल्यावर बन्यास दत्तक घेण्याचा विचार साहजिकच त्यांच्या मनांतून गेला एक दिवस बन्यास हांक मारून खांसाहेबांनीं आपल्याजवळ बसविलें व म्हटलें, "बन्या, तुझ्या पायगुणानें मला मुलगा झाला, तेव्हां त्याबद्दल मीं तुला काय द्यावें?" बन्या फार हुषार; त्यानें सर्व परिस्थिति मनांत आणून म्हटलें, 'आपण मला विद्या दिली हें काय थोडें झालें! आपण विचारतां तर सांगतों, मला ह्या विद्येंत परिपूर्ण करावें.'' खांसाहेब या उत्तरानें संतुष्ट झाले व त्यांनीं बन्यास मनापासून विद्या शिकविली व त्याचें लग्न करून त्यास निराळें बिऱ्हाड करून दिलें. मग बन्याचे बन्नेखां झाले. तालमी देऊन व मुजरे करून तो आपला चरितार्थ चालवूं लागला. त्याजकडे कोणी प्रसिद्ध गवई

आल्यास, "आपल्याला अमुक रागांत किती चौकड्या येतात?" असा बन्ने-खानें प्रश्न करावा म्हणजे तो गवयी थिजून जाई. बन्नेखां म्हणत, "मला प्रत्येक रागांत इतक्या चौकड्या (अर्थात् चीजा) येतात." ते आपल्या चीजा चौकड्यांवर मोजीत. ह्यावरून त्यांच्याजवळ निरनिराळ्या अंगाच्या चिजांची किती भरती होती हें ध्यानांत येईल. तालीम देतांना कोणास तान बरोबर घेतां आली नाहीं तर ते म्हणत, "बेसुरी तान घेऊन गाण्याची माती करूं नका जेथें ती सफाईदार येणार नाहीं तेथें ती घेऊं नये. वाटल्यास तें काम मींडेनें करावें"

असे भरतीदार गवयी आतां दृष्टीस पडणार नाहींत. जे आपणास आता भरतीदार म्हणवितात त्यानीं या वरील गोष्टीपासून पुष्कळ बोध घेण्याजोगा आहे. निरनिराळ्या अंगाच्या चीजा आल्याशिवाय रागाचें ज्ञान परिपूर्ण होत नाहीं हें मात्र खरें. तसे गुरुहि नाहींत व शिष्यांस त्याची हौस व आवडहि नाहीं पुढें बन्नेखां ग्वालेरीहून दक्षिण हैदराबादेकडे गेले व तेथेंच इ. स. १९१८ सुमारास कालवश झाले

## छोटे महंमदखां.

ग्वाल्हेर दरबारचे हिंदुस्थानप्रसिद्ध मीयां हद्दूखां यांस फार दिवस मूल नव्हतें. फारा दिवसांनीं मूल झालें तेंहि मुलगा. तेव्हां सर्वांसच आनंद झाला. पैगंबरानें कृपा केली म्हणून त्याचें नाव महंमद असें ठेविलें. सगळ्या भावात एवढाच मुलगा म्हणून त्याचें फार कौतुक असे; शिष्य मंडळीहि गुरूची कृपा संपादण्याचें एक साधन म्हणून त्या मुलाचें कोड करीत असत. मुलगा देखणा व सशक्त होता. मुलगा वयात येतांच त्यास गायनाची तालीम सुरू झाली. मुलगा बुद्धिवान् व चलाख असल्यानें तालीम देतांना बापास समाधान होई. अनेक रागांतील अनेक निराळ्या अंगांच्या व ढंगांच्या चिजा महंमदास पोंचल्या विलंपद लयीचे, जलद लयीचे ख्याल त्यास मिळाले; साध्या ताना, एकडाल ताना, बोल ताना, रागवाचक ताना या तर त्याला आल्याच पण खास घरंदाज तालमींतील रंगतीच्या जागा, कडक बिजलीची तान, मुकी तान, वस्तादी हरकती, अवघड फिरती वगैरे, सामान्य शिष्यास कधीं ठाऊक नसणारे हे प्रकार तळघरांत नेऊन त्यास वडिलानीं शिकविले. ठीकच आहे. मुलास जर आपली विद्या व कसब शिकवावयाचें नाहीं तर मग कोणास शिकवावयाचें? म्हणूनच मराठींत म्हण पडली आहे की,

" मुलाबरोबर शिकावें व जावयाबरोबर जेवावें " याप्रमाणें शिकविणें चाललें असतां महमद् बाळासाहेब गुरुजींच्या घरीं मागील बाजूस तुळशीवृंदावना-शेजारील खोलींत बसून प्रहर दीड प्रहर शिकलेल्या विद्येची कसरत करीत असे महमद् जेव्हां बापासमोर गायी तेव्हां हद्दूखांस समाधान होई व ते म्हणत की, "हा माझें नाव राखील." जयपूरच्या रामसिंगाच्या निमंत्रणावरून श्री जयाजी-महाराज जयपुरास गेले होते त्या वेळीं बापाबरोबर महंमद् व रहिमत हीं दोन मुलें गेलीं होतीं दरबारांत रामसिंग महाराजांसमोर हस्सूखां, हद्दूखां व नथ्थेखां गावयास बसत त्या वेळीं हद्दूखां हीं दोन मुलें दोन बाजूस घेत व महाराजांपुढें थट्टेनें हसून म्हणत, " महाराज, एक तोफेचा गोळा आहे व दुसरा मद्याची कुपी आहे " असें म्हणून कौतुकानें रहिमत लहान असल्यानें खांसाहेबांनीं त्याचा मुका घ्यावा. हद्दूखांचें म्हणणें पुढें अक्षरशः खरें झालें. कारण महदखांचा आवाज मोठा, पल्लेदार, मर्दानी व जोरकस होता व रहिमतखाचा आवाज म्हणजे बांगडीसारखा व मधुर होता अशा गुणी मुलां-वर कोणा बापाचें प्रेम बसणार नाहीं ! असो

पुढें परिपूर्ण तयारी झाल्यावर महमदानें बापाजवळ देश हिंडून येण्याची पर-वानगी मागितली. बापानें ती आनंदानें दिली व सांगितलें कीं, " माझ्या लौकि-कास डाग लावू नकोस. जा, नांव कमावून ये प्रथम इंदुरास जा; नानासाहेब पानसे यांस भेट व त्यांना परीक्षा दे व त्यांची परवानगी झाल्यावर पुढें जा " महमदखां ग्वाल्हेरीहून इंदुरास आला; नानास भेटला. नानांनी त्याचा सर्व मज-कूर ऐकून घेतला व सांगितलें कीं, 'मी जा म्हणून सांगितलें म्हणजे जावयाचें ' मग नानानी लहानमोठे ख्याल महंमदखांस गावयास सांगून तालांत व लयींत त्यास निर्भय केलें. तबलियानें आड लाविली, मध्यें परण लावून गडबड करूं लागला कीं, ख्यालीचे गडबडतात व त्याच्या गाण्यास मग रंग चढत नाहीं म्हणून नानांनीं स्वतः त्याजबरोबर साथ करून त्याची ही भीति काढून टाकिली एवढेंच नव्हे तर ख्यालियाचे ताल व त्यांचीं परणें व तुकडे त्याच्या हातांतून काढून घेतलीं. अशी दुहेरी कसरत करून घेऊन खात्री पटल्यावर नानांनीं त्यास जाण्यास परवानगी दिली. वाहवा, नाना पानसे, धन्य तुमची ! तुमच्या मनास हेवा, मत्सर कधीं शिवला नाहीं. थोर ते थोर ! नानांची परवानगी घेऊन त्यांच्या पायांवर डोकें ठेवून महमदखां निघाला तो बडोद्यास आला. त्या वेळीं त्याच्याबरोबर बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर व विष्णुपंत छत्रे हे दोघे होते.

बडोद्यास त्या वेळीं खंडेरावमहाराज गादीवर होते. ते मल्लविद्येचे भोक्ते व चहाते होते महमदखां शरीरानें धिप्पाड, पीळदार व देखणा होता, तो महाराजांचे भेटीस गेल्यावेळीं महाराजांनीं विचारलें, "तुम्ही पहिलवान आहां काय ? कोठून आलांत ?" महंमदखानें सांगितलें "होय महाराज, मी ग्वाल्हेरीहून आलों." महाराज म्हणाले, "कुस्ती लढाल काय ?" महमदखानें उत्तर दिलें, "हो" मग चार दिवसात त्याची कुस्ती ठरली. तेथील गवयास मोठा चमत्कार वाटला. पण कोण काय बोलणार ! कुस्तीचा दिवस आला व कुस्ती झाली. त्यांत त्यास यश मिळालें. सरकारानीं हजार रुपयाचा तोडा बक्षीस दिला विशेषेंकरून कांहीं गवयास आनंद झाला नाहीं. चार दिवसांनीं पुन्हां भेटावयास गेल्यावर महाराजांनीं विचारिलें, "तुम्हास गानांहि येतें ?" महमदखां म्हणाला, 'होय महाराज" मग सरकारवाड्यांत गाणें झालें एका बाजूस विष्णुपंत छत्रे, दुसऱ्या बाजूस बाळकृष्णबुवा ' गाण्याची बहार उडाली. सरकारांतून मोठी बिदागी मिळाली. गावांत बरेच मुजरे झाले हद्दुखांचा हा मुलगा असें समजतांच महंमदखाच्या लौकिकांत अधिकच भर पडली. त्या वेळीं मौलाबक्ष होते. ते बीन वाजवीत व गातहि. मौलाबक्षाच्या घरीं खास बैठक झाली. रागाची चर्चा होतां-होतां वाचावाची सुरू झाली मौलाबक्ष गावयास बसले; पण गाणें जुळेना, तेव्हां त्याच्या हातांतील तंबोरा महंमदखांच्या सांगण्यावरून बाळकृष्णबुवांनीं हिसकावला. गाणें मोडलें मंडळी घरोघर गेली. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं बडोद्यांतील एका सभ्य गृहस्थानें महंमदखांच्या बिऱ्हाडीं येऊन त्यास सांगितलें कीं, 'काल रात्रीं मी तेथें होतों, मौलाबक्षाचा तुम्हीं योग्य पराभव केला हें खरें तुमच्याएवढा गाणारा आमच्या शहरांत आज नाहीं. तुम्ही थोरामोठ्यांचे लेक व शिष्य, पण आमच्या शहरांत मौलाबक्ष मोठा तेव्हां तुमच्यावर एकादें संकट येईल, तर आजच्या आज तुम्ही येथून जा' हीं तरुण मंडळी भ्यालीं व त्याच दिवशीं तेथून निघून मुंबईस गेली

मुंबईस त्याना बऱ्याच तरुण व व्यसनी मंडळीनें घेरलें. एका जलशाच्या वेळीं ही स्वारी मदिराघोडीवर स्वार होऊन आली. त्या दिवशीं चांगले समजदार, श्रीमान व प्रतिष्ठित लोक महमदखांच्या बापाच्या लौकिकामुळें तेथें जमले होते अर्धा तास गाणें झालें नाहीं तोंच मदिराघोडीनें महमदखास खालीं पाडलें तेव्हां त्यानें तेथेंच लोळण घेतली ' सर्व बेरंग झाला मंडळी नांवं ठेवीत आपल्या घरोघर गेली. दुसरे दिवशीं सकाळीं एक सभ्य गृहस्थ महमदखाकडे आले आणि म्हणाले, बापाचें

नांव चांगलें बद्दू केलेंत! हें हो काय! हा पहिला मुजरा आणि काय केलेंत! व्यसनी लोकांच्या नादीं लागून आपली व बापाची लाख रुपये किंमतीची इज्जत चार आण्यांनीं घालवलीत" महमदखांस पस्तावा झाला, पण आतां काय करावें हें सुचेना. त्यानें त्या सभ्य गृहस्थाचे पाय धरले व म्हणाला "मला आतां वांचवा अशी एखादी तोड सांगा कीं, तिनें कालचा बेरंग धुवून जाईल." त्या गृहस्थानें सांगितलें "तुम्हाला पस्तावा झाला असेल तर आतां गाडी करून काल आलेल्या लोकांस तुम्ही स्वतः आजच्या गाण्यास आमंत्रण करा व बापाचें नाव राखावयाचें असेल तर शुद्धीवर राहून चांगलें गा." सगळ्यास ती योजना मान्य झाली, लगेच महमदखां काल आलेल्या लोकांची यादी घेऊन निमंत्रणास निघाले व सर्वांस निमंत्रणें करून आले. मग काय! आदल्या दिवसापेक्षां लोकांची गर्दी चिक्कार झाली. गाणं पण गाणें! तें गाणें असें बहारीचें झालें कीं, लोक अगदीं खुष झाले. आदल्या दिवसाची आठवण अगदी बुजून गेली. महमदखांचा लौकिक फार वाढला. मुजऱ्यावर मुजरे होऊं लागले हद्दूखांचा मुलगा! त्या वस्तादी जागा व हरकती, तो पहाडी, जोरकस व मधुर आवाज, तार सप्तकांतील पंचमापर्यंत सहज स्वर लावणें, अनेक स्वरांच्या ताना, बोलतानांचा तो अस्सल ढंग, निरनिराळ्या अंगांच्या चिजा, लयीची मजा, तबलजीच्या बरोबर जलद लयींत बेहद्द धावणें, हे प्रकार ऐकून मुंबईतील समजदार लोकांस त्या गाण्यानें वेडच लाविलें. अशा रीतीनें मुंबईत महमदखांची छाप बसली. समाजांत सुष्ट, दुष्ट लोक असतातच. एकदा एका मुजऱ्याच्या वेळीं बजवय्यानें प्रारंभापासून आड, परणें, तुकडे लावण्यास सुरुवात केली. महमदखां नानांच्या हाताखालीं चांगला तयार झाला होता, त्यामुळें तबलजी जसें जसें वाजवी तसें तसें महमदखानें गावें. असें एक घंटाभर चाललें. मग विश्रांतीची वेळ आली; तेव्हां खांसाहेब म्हणाले, "आतांपर्यंत आपण वाजविलें तसें मी गाइलों व आपल्या वाजविण्याचा रंग केला. मी गातों, आतां आपण मजबरोबर वाजवा व माझ्या गाण्याचा रंग करा." तबलजीस काय ठाऊक कीं, हा नानाचा शिष्य आहे! त्याला वाटलें, इतर ख्यालीये तसा हा! प्रथम आपल्या वाजविण्याबरोबर हा टिकला यानेंच तो चिडला होता. त्यानें होय म्हटलें, व गाण्यास सुरुवात झाली. स्थायी, अंतरा म्हणणें झाल्यावर तानांस सुरुवात झाली, तेव्हां तीन मात्रेची, मग चार मात्रेची, मग सहा मात्रेची अशा ताना खांसाहेब घेऊं लागले व म्हणाले, "जितक्या मात्रेची माझी तान तितक्या मात्रेचा तुम्ही तुकडा लावा, व तसें आतां वाजवा" अशा मात्रामात्रांचे तुकडे

सर्वांस कोठें ठाऊक असतात व वाजवितां येतात! तेव्हां जमलेल्या मंडळींत खांसाहेबांची वाहवा झाली व त्यांच्या विद्येबद्दल लोक अधिकच प्रशंसा करूं लागले. या बालम्या ग्वाल्हेरीस जाऊं लागल्या तेव्हां हद्दूखांस आनंद झाला

पण दिवसेंदिवस व्यसनी व हलक्या लोकांनीं खांसाहेबांस पक्कें घेरलें. खांसाहेबांस दोन सदरे करणें झाल्यास बिल सोळा सदऱ्यांचें येऊं लागलें! अशा रीतीनें त्यांचा नांवलौकिक उतरणीस लागला! त्यांचे योग्य सल्लागार छत्रे व बाळकृष्णबुवा, पण यांच्याबद्दल व्यसनी लोकांनीं त्यांचें मन कलुषित करून टाकिलें. एका मुजऱ्यास खांसाहेबांनीं गौडमल्लाराची 'पियारेयार' ही बिलपद लयीची चीज म्हणून खूप रंग भरिला व मजा आणिली होती. दुसरे दिवशीं ती चीज बाळकृष्णबुवा म्हणतांना खांसाहेबांनीं ऐकिलें व चिडून म्हणाले, "माझ्या चीजा व गायकी लुटावयास तू माझ्याबरोबर आला आहेस. चल, निघ येथून." असें म्हणून खांसाहेबांनीं बाळकृष्णबुवास घालवून दिलें! त्यांनीं जाऊन छत्र्यांच्या बिऱ्हाडीं ही हकीकत सांगितली, तेव्हां छत्र्यांनीं त्यांस आपल्या बिऱ्हाडीं जागा दिली! कांहीं दिवसांनीं महंमदखां सरदार अष्टीवाले यांच्या बोलावण्यावरून उज्जनीस गेले; छत्रे व बाळकृष्णबुवा दक्षिणेंत आले बाळकृष्णबुवा सातान्यास दाजीबा पटवर्धनांच्या आश्रयानें राहिले व विष्णुपंत तिकोट्यास आपल्या घरीं गेले उज्जनीस गेल्यावर तेथें महमदखांची फार वाहवा झाली त्याच्या आंगीं गुणच तसा होता. त्याचें व्यसन वाढतच चाललें. त्याच्या पिळदार शरीराची माती झाली. तरुण वय, कोणी बोलता दडपता नाहीं, हलक्या लोकांची संगत व दारूचें व्यसन दिवसेंदिवस प्रकृति खराब होत चालली. एक दिवस तो इतका दारू पिऊन बेहोष झाला कीं, शुद्धीवरच येईना! मग बरोबरची मंडळी घाबरली. ही बातमी सरदार नानासाहेब अष्टीवाले यांस दिली. नानासाहेब आले. प्रकृति पाहून घाबरले. वैद्य बोलावला; वैद्यबुवांनीं सांगितलें, हा दोन तासांचा सोबती आहे! झालें! हद्दूखांचा बडा लडका छोटे–महंमदखां–व्यसनाच्या पायीं तरुण वयांत इ. स. १८७४ च्या सुमारास हें जग सोडून व हद्दूखांस दुःखसागरांत लोटून चालता झाला. जाणते लोक म्हणतात कीं, बडे महंमदखांच्या पुढें हेच छोटे महंमदखां झाले. वासुदेवबुवा जोशी यांच्या मुलाच्या बरोबर शिकत असलेले, खानदेशांत नांवाजलेले गवयी पांडुरंगबुवा येवलेकर नेहमीं असें म्हणत कीं, 'महंमदखांचें गाणें ज्यानें ऐकिलें, त्याला दुसरे कोणाचें गाणें पसंत पडणार नाहीं.' काल सर्वभक्षक आहे हें खरें; पण व्यसनामुळें तरुणपणीं अशा गुणी मनुष्यास मरण येणें फार

चाईट मियां हद्दूखांस ही दुःखद बातमी समजताच त्यांस जो जोराचा धक्का बसला त्यामुळें ते दोन वर्षांच्या आंत मरण पावले !

## निसार हुसेनखां.

हद्दू हस्सूखांचे चुलतबंधु नथ्थेखां यांस मुलगा नव्हता म्हणून त्यांनीं हद्दूखांन्या मेहुणीच्या मुलास दत्तक घेतलें तोच हा निसार हुसेन याला नथ्थेखानीं गायनविद्या उत्तम प्रकारें शिकविली; इतर बंधूंपेक्षां नथ्थेखास तराणे अधिक येत; तराणे ते उत्तम गात असत. ते सर्व तराणे त्यांनीं मुलास शिकविले मुलगा फार बुद्धिमान होता. त्याची स्मरणशक्ति विलक्षण होती अशी स्मरणशक्तीची देणगी हजारांत एकाद्यास असेल नसेल. याला संस्कृत शिकविण्यासाठीं शास्त्री ठेविला होता ! यामुळें त्याचें संस्कृताचें ज्ञान चांगलें झालें होतें. भागवत ग्रंथांतील अनेक श्लोक हा शुद्ध व तोंडपाठ म्हणे याची वाणी फार शुद्ध होती. मोरोपंताच्या आर्या तो इतक्या शुद्ध म्हणे कीं, त्यावरून त्याची जात ओळखणें कठीण जाई त्यांचें वागणें मात्र व्यवस्थित नसे वडील वारल्यावर हे खांसाहेब बनले व शिष्यांस तालमी देऊं लागले ह्यांच्या वागण्यामुळें सरकारी तनखा बंद झाला. ह्यांच्या शिष्यांत नांवारूपास आलेला शिष्य म्हणजे शंकर पंडित होय. ग्वालेरचें 'पंडित' घराणें ह्यांचे शिष्य होत. श्री माधवराव महाराजांच्या वेळीं खांसाहेबांनीं ग्वालेर सोडली पुढें कांहीं दिवसांनीं हे मुंबईंत प्रसिद्ध असलेली पाटणकर संगीत मण्डळी हिचे मालक माधवराव पाटणकर यांच्या आश्रयास राहिले. इ. स. १९०२ सालीं बाळासाहेब गुरुजींची व ह्यांची मुंबईत गांठ पडली. एका श्रावणी सोमवारीं दोघांच्या गाण्याची जी बहार उडाली ती ज्यांनीं ऐकली असेल त्यांस बाळासाहेब गुरुजी व निसार हुसेनखां ह्यांची गायनकलेंत योग्यता केवढी होती हें सहज समजून आलें असतें. हा योग लेखकाच्या वडिलांस लाभला आहे. पाटणकरांची कंपनी सोडून मग खांसाहेब नाट्यकला कंपनींत राहिले. तिच्यांतील प्रसिद्ध नट गोपाळराव मराठे यास ते तालीम देत. पुण्याच्या मुक्कामांत खांसाहेब अनेक वेळां आमच्या घरीं येत. त्या वेळीं आपल्या घराण्याचा इतिहास प्रस्तुत लेखकाच्या वडिलांस ते सांगत, अनेक चीजा ते म्हणून दाखवित, गायकांच्या आख्यायिका वगैरे सांगत असत. "मला मागले जन्मीं गायन शिकण्याची इच्छा झाली म्हणून मी मुसलमानी धर्मांत जन्म घेतला व विद्या शिकलों; आतां ती इच्छा पूर्ण झाली. पुढील जन्म ब्राह्मणाचे पोटीं येणार. असें म्हणून गवयां-

तील यज्ञोपवीत दाखवीत। शिंदे सरकारचे त्या वेळचे पुण्याचे वकील कै. गणपतराव भिडे ह्यांनीं खांसाहेबांच्या स्मरणशक्तीची त्यांच्या तोंडावर स्तुति करून पुण्यापासून ग्वाल्हेरीपर्यंत, झांशी ते ग्वाल्हेर, अशीं स्टेशनें खांसाहेबांस म्हणण्यास सांगावीं व त्यांनीं तीं बिनचुक म्हणून दाखवावीं। ह्यांचें गायन जोरकस व मर्दानी असे. स्मरणशक्ति विलक्षण असल्यानें ह्यांना अनेक चिजा पाठ येत. बाळासाहेब गुरुजींचें नांव निघाल्यास तो 'भैफलका शेर' आहे असें अनेक वेळां ते म्हणत. ह्यांच्यासारखे जाडे गवयी आतां विरळा. विष्णुबुवा पलुसकरांची व ह्यांची गाठ पडून जेव्हां एखाद्या रागाची चर्चा सुरू होई तेव्हां खांसाहेब हसत म्हणत, 'तुझा गुरु, तुझ्या गुरूचा गुरु आमचे घरीं शिकले. तू मला फार गोष्टी सांगू नकोस. आणखी कांहीं वर्षें मजजवळ शिक, मग बोल." तेव्हां मोठा हशा पिके. म्हातारपणीं खांसाहेबांस कोणी 'गा' म्हणून म्हटल्यास ते मोठ्या ऐटीनें म्हणत कीं, "माझें गाणें ऐकावयाचें असल्यास शंकरला ऐका" शिकविण्याची त्यांची हातोटी ठीक होती. पुढें ग्वाल्हेरीस गेल्यावर इ. स. १९१५ च्या सुमारास ते कालवश झाले ग्वाल्हेरीस त्यांची कबर आहे. रामकृष्ण वझेबुवा आपण निसार हुसेनखांचे शिष्य असें सांगतात

## वारसअल्लीखां.

वारसअल्लीखां हे लखनौचे बडे महमदखां यांच्या घराण्यांपैकीं होते. यांचें घराणें ख्यालगायनांत नावाजलेलें होतें घरचीं विद्या, मग ती शिकण्यास लोकाची शागिर्दी करण्याची पाळी यांच्यावर कशाला येणार ! आपल्या वडिलांजवळ हसत खेळत यांना विद्या करण्यास सांपडली. अनेक शिष्य घरीं शिकावयास येणार, कोणाहि शिष्याबरोबर शिकण्यास बसले तरी काय हरकत ! प्रथम शिक्षणास लपवालपवी कोणी करीत नाहीं. घरची खास गायकी उकलून दाखविण्याच्या वेळीं शिष्यांत आवडनिवड करतात. खास तालीम देण्याच्या वेळीं एकट्या मुलास घेऊन त्याला सर्व भेद उलगडून सांगून आपण गळ्यानें गाऊन मुलाकडून तसें काढविणें असे पूर्वीं तालिमीचे प्रकार असत. तशा प्रकारची म्हणजे प्रथम 'आम' तालीम मग 'खास' तालीम व त्यानंतर पुढें खास-उल्-खास तालीम घेऊन वारसअल्ली तयार झाले व विद्या संपल्यावर पर्यटनासाठीं बाहेर पडले आपलें घर सोडून बाहेर पडण्यांत दोन हेतु असतात. एक पैसा मिळावा. दुसरा म्हणजे नावलौकिक होऊन लोकांत प्रसिद्धि

व्हावी. पूर्वी प्रवास करणें फार प्रयासाचें असे. शहरोशहरीं मुजरे करीत करीत सातारा हें मराठी राजधानीचें शहर म्हणून पुण्यास फार दिवस न थांबता ते साताऱ्यास गेले. तेथें त्या वेळीं—सुमारें १८६० च्या सुमारास आईसाहेब महाराज, आबासाहेबमहाराजांच्या मातोश्री, या होत्या. लखनौकडील गवयी आपल्या राजधानीचें नांव ऐकून आला आहे, म्हणून त्यास नोकरीस ठेवण्यात आपला मोठेपणा आहे असें जाणून त्यांनीं वारसअलीस नोकरीस ठेविलें. साताऱ्याचा तो नवा राजवाडा, नवरात्रांतील उत्सव, तो मोठा दिवाणखाना, ते गझनीचे पडदे, व तीं अनेक कारजों, हा सर्व थाट पाहून खांसाहेब खूप झाले. त्याचें पहिलें गाणें त्या मोठ्या दिवाणखान्यांत देवीसमोर झालें. लहान मोठे, ज्ञानी, अज्ञानी सर्व खूप झाले. अशा गवयाचें गाणें साताऱ्यास त्यांना कधी ऐकावयास सापडणार ! आईसाहेब महाराजहि खूष झाल्या. पुढें नोकरीत राहून बरेच दिवस झाले तरी खांसाहेबांची मर्जी वाड्यांत गाण्यास जाण्याची लागेना ! सरकारी निरोप गेला तर खांसाहेबांनीं म्हणावें, 'तबेत नहि लगती' असे बरेच दिवस गेले लोक तर त्यांचें गाणें ऐकण्याकरितां आतुर झालेले, पण काय उपयोग त्यांची तबेतच लागेना !

आईसाहेबमहाराज फार चतुर. त्यांनीं पाहिलें असें रत्न हातचें दवडणें ठीक नाहीं चार हत्ती आहेत तसा हा पांचवा ! लखनौस वारसअलीखांचा एक मित्र होता तो फिरतां फिरतां कर्मधर्मसंयोगानें साताऱ्यास आला व खांसाहेबास भेटला मग काय खांसाहेबांची कळी उमलली. त्यांनीं आपल्या मित्रास सांगितलें की, 'माझें एक गाणें येथें झालें. त्यावर सरकारवाड्यांत अद्याप गायिलों नाहीं' तो मित्र शहाणा. त्यानें सांगितलें, ' मूर्खा, दरमहा पगार घेतोस, गाण्यास जात नाहींस, हें काय ! आज तेथें गाण्यास चल, मी तुझें गाणें घरीं ऐकणार नाहीं ' मित्रानें चांगली कानउघाडणी केल्यावर खांसाहेबांनीं वाड्यांत निरोप पाठविला कीं, ' आज रात्रीं गाण्यास येतों. ' सर्वांना आनंद वाटला. सरदार मानकरी, कामगार, गांवातील शिष्ट, सावकार वगैरे सर्व मंडळी जमली. आबासाहेबमहाराज, आईसाहेबमहाराज व इतर पडदानशीन स्त्रियाहि आल्या. वारसअलीखां आपल्या मित्रासह येऊन दाखल झाले. त्या वेळच्या गाण्याचें वर्णन काय करावें ! खांसाहेबांच्या मित्रानें ' वाहवा ' दिल्यावर त्या गाण्याला दुप्पट रंग चढे. गाणें सुमारें प्रहरभर झालें. 'वाहवा' च्या वर्षावास तर सीमा नव्हतीच ! आईसाहेबमहाराजांस मोठा आनंद झाला व खर्च केलेल्या पैशाचें चीज झाल्याचें

समाधान वाटलें. यानंतर मात्र सरकारी बोलावण्याबरोबर वाड्यांत जाऊन खांसाहेब गाऊं लागले.

इ. स. १८७५ च्या सुमारास आईसाहेब महाराज वारल्यानंतर पुढें कांहीं वर्षांनी वारसअलीखां सातारा सोडून हैदराबादेस गेले; त्यानंतर कांहीं दिवसांनी तिकडेच ते कालवश झाले पुण्याचे प्रसिद्ध गवयी रावजीबुवा बेलबागकर नेहमीं म्हणत कीं 'वारसअलीखासारखी' 'तोडी मीं माझ्या जन्मांत ऐकिली नाहीं.'

वारसअलीखांमुळें महाराष्ट्रांत ख्यालगायनाची गोडी लागली, असें ज्ञात्यांचें मत आहे. त्या वेळीं सातारा जिल्ह्यांत कोणा गवयाची स्तुति करणें झाल्यास, 'तू मोठा वारसअलीच आहेस' अशी म्हण पडली होती.

## रहिमतखां.

ग्वाल्हेरचे प्रसिद्ध मीयां हद्दूखां गवय्ये यांचा हा कनिष्ठ चिरंजीव. याला एक थोरला भाऊ व दोन बहिणी होत्या. हा गोरा असून फार देखणा होता. गायनविद्या पिढीजात घरची असल्यामुळें ती विद्या शिकण्यास त्यास प्रयास पडले नाहीत त्यास वडिलानीं गायन घरीं शिकविलें. त्याचे स्वाध्यायी निसारहुसेनखां व विष्णुपंत छत्रे हे होते त्याचा आवाज बारीक पण विलक्षण मधुर, सुरेल व बांगडीसारखा खणखणीत होता. त्याच्या आवाजाचा असा विलक्षण धर्म असे कीं, उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा कोणताहि ऋतु असो; तसेंच तेलकट आंबट कांहीं खाल्लें तरी तो बिघडत नसे. मीया हद्दूखांबरोबर तो लहानपणी जयपुरास गेला होता, त्यावेळीं त्याचें गाणें ऐकून राजे सवाई रामसिंग फार खुष झाले होते त्याचा अंगलोट व बांधा फार शौकचाज होता. तो दिसण्यांत एखाद्या नबाबाप्रमाणें दिसे तरुणपणांत हा हूड स्वभावाचा होता. वडील वारल्यावर कांहीं दिवसांनीं ह्यानें ग्वाल्हेर सोडिली, व बनारस येथें जाऊन राहिला. त्या वेळी वडील, मातोश्री वारलेली, थोरला भाऊ कालवश झालेला, सरकारदरबारांत असलेला मान नाहींसा झालेला, लक्ष्मी हातची निसटून गेलेली, ह्यामुळें त्याचें मन अस्वस्थ झालें व स्वभाव चिडखोर बनला. काशीस तो एका सुस्वभावी गृहस्थाच्या शेजाराला राहिला होता.

तो ब्राह्मण गायनप्रेमी असल्यानें रहिमतखांची पूर्वस्थिति माहीत झाल्यावर तो त्याच्यावर फार प्रेम करी रहिमतखां त्याला 'पंडितजी' म्हणून संबोधित असे.

काशीस मंडळी जमण्याचा एक अड्डा होता, तेथें रहिमतखां नित्य जाई. त्यास तेथें अफू खाण्याचें व्यसन लागलें. तेथें गप्पा माराव्या, गावें, असा त्याचा क्रम चाले. आपण खानदानीचे गवय्ये, थोर घराण्यांतील, ही जाणीव रहिमतखांस असल्यानें तेथें जमणाऱ्या हलक्या लोकाचे, तसेंच भिकार गवयांचे याशीं तंटे उडू लागले, व कांहीं वेळां घातघाईवर प्रकरण येई. हा मुकेवगाल झालेला, व्यसनी, राजाश्रय नसलेला, यामुळें तेथील लोक याच्या विद्येची फारशी परवा न करितां वाटेल तसें याला बोलत. मग हाहि चिडून जाऊन अद्वातद्वा बोले. एकदां असें भांडण चाललें असता एक अवलिया फकीर तेथें आला. तो जाणता व प्रेमी असल्यानें रहिमतखांशीं बोलू लागला. पण रहिमतखानें त्यालाहि अद्वा तद्वा बोलण्यास सुरुवात केली. अवलियानें चार दोन वेळा त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! रहिमतखां अधिकच चिडला व शिवीगाळ सुरू झाली. तेव्हां तो अवलिया म्हणाला, 'तुझें तोंड आजपासून बंद होईल व तुझ्या शरीराची माती होईल, जा।' असें म्हणून तो अवलिया तेथून चालता झाला; झालें। रहिमतखां जमिनीवर काळा ठिक्कर होऊन निचेष्ट पडला. मुसलमान मंडळी घाबरून उठून चालती झाली. हा एकटाच तेथें बेशुद्ध स्थितींत पडला.

रोजची वेळ टळून गेल्यावर त्याचा शेजारी ब्राह्मण त्याच्या शोधासाठीं त्या अड्ड्यांत आला. तेथें पाहतो तों रहिमतखां बेशुद्ध. गाडी करून पंडितजीनें त्यास घरीं आणिलें कांहीं वेळानें रहिमतखां शुद्धीवर आला. त्यानें घडलेलं सर्व वर्तमान पंडितजीस सविस्तर सांगितलें पंडितजी दुसरे दिवशीं गंगाकिनारीं एका एकांत जागेंत रहात असलेल्या अवलियाकडे गेला व त्यानें त्याला सर्व वर्तमान सांगितलें. तेव्हां अवलिया म्हणाला, "ह्यापुढें तो 'होय' 'नाहीं' या मामुली शब्दांपेक्षा जास्त बोलणार नाहीं. त्याची आजपासून वृत्ति शांत राहील. त्याची तडफ नष्ट होईल तो शुद्धीवर राहील, गाफील राहणार नाहीं.' पंडितजी म्हणाला, "'त्याचें शरीर काळेंठिक्कर पडलें आहे त्याचें कसें! तेव्हां अवलिया म्हणाला, " तुमच्यासारखा परका माणूस त्याबद्दल काळजी घेत आहे तर मी हा पाला देतों, तो त्याच्या आंगास चोळा म्हणजे त्याच्या आंगावरील सर्व काळें कातडें निघून जाईल व तो पहिल्यासारखा गोरा व तेजःपुंज होईल " असें बोलून त्या अवलियानें त्या ब्राह्मणास पुष्कळ पाला दिला ब्राह्मणानें फकिराचे पाय धरले, तेव्हां अवलिया म्हणाला, "तुम्ही आतां जा, तो कांहीं मरणार नाहीं काळजी नको पहिल्यासारखा सशक्त होईल जास्त बोलणार मात्र नाहीं.

उद्यां तुम्हांस मी येथें भेटणार नाही; येऊं नका." अवलियानें सांगितल्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें रहिमतखांच्या आंगास पाला चोळण्यास सुरवात केली. असें करतां करतां पधरा दिवसांनीं त्याच्या आंगावरील सर्व कातडें गेलें व तो पूर्वीप्रमाणें गोरा व सतेज झाला. बरा झाल्यावर तो कोणाशीं बोलेनासा झाला. रस्त्यात हिंडून दोनप्रहरपर्यंत जे पैसे मिळतील ते त्या ब्राह्मणाजवळ आणून द्यावेत; ब्राह्मणानें त्यास एकदर तीन आणे द्यावेत; असा क्रम चालला. दोन वर्षांनीं कर्मधर्म-संयोगानें प्रसिद्ध विष्णुपंत छत्रे यांची सर्कस तेथें गेली. विष्णुपंतास कोणीं सांगितलें की, तेथें एक भिकारी चांगला गातो; आपण ऐकण्याजोगा आहे. तेव्हां छत्र्यांनी त्याचें बिऱ्हाड पाहून येण्यास आपल्या नोकरांस पाठविलें. मग छत्रे एक दिवस तेथें गेले, तेव्हां त्या ब्राम्हणानें रहिमतखां आल्यापासूनची सर्व हकीगत त्यांस सांगितली. इतक्यांत रहिमतखां भीक मागून घरीं आला. त्याला पाहतांच त्याचें पूर्ववैभव व त्याची प्रस्तुत स्थिति पाहून छत्र्यांच्या डोळ्यास पाणी आलें! त्यांनीं रहिमतखांस बोलावून विचारलें, "तूं मला ओळखतोस काय?" तो 'होय' एवढेंच बोलला. त्या ब्राम्हणास छत्र्यांनीं सांगितलें कीं, "ह्याच्या बापाजवळ हा व मी विद्या शिकलों. हा माझा गुरुबधु माझा चालता काल आहे, तर जिवांत जीव असेपर्यंत ह्याला मी आपल्याजवळ भावाप्रमाणें बाळगीन; आपण काळजी करूं नका." असें म्हणून भय्यास छत्र्यांनीं आपल्या बिऱ्हाडीं नेलें. चांगले कपडेलत्ते दिले. व आपण जेवावयाच्या वेळीं त्यास जेवावयास बसवीत. असा क्रम छत्र्यांच्या मरणापर्यंत चालला. त्यांनीं आपलें वचन पाळिलें. रोज एक तास नियमितपणें छत्रे त्यांजकडून गाऊन घेत छत्र्यांनीं चीज सुरू करून द्यावी, मग भय्या ती पुढें नीट म्हणे.

रहिमतखांच्या बहिणीचा नवरा इनायत हुसेनखां गवई नेपाळच्या राजांच्या बोलावण्यावरून नेपाळांत गेला. राजघराण्यांतील माणसांस तो तालमी देऊं लागला. एकदा त्याचें गाणें ऐकून राजेसाहेब खुप झाले; तेव्हां तो म्हणाला, 'महाराज, आपण ऐकण्यालायक हिंदुस्थानांत अनेक गवयी आहेत." तेव्हां महाराजांनीं एक जलशा करण्याचें ठरवून त्यासाठीं एक लाख रुपये मंजूर केले व प्रसिद्ध लोकांस निमत्रणें केलीं व इतरांस नेपाळास येण्याचें वर्तमानपत्रांतून जाहीर निमत्रण दिलें. अनेक गवयी, नायकिणी, संगीतशास्त्री नेपाळांत गेले. सर्वत्रांची गाणीं झालीं. योग्यतेप्रमाणें सर्वांस बिदागी मिळाली. रहिमतखांस पहिलें बक्षीस मिळालें. नेपाळांतील हा जलसा इ. स. १९०० मध्यें झाला. रहिमतखांचीं गाणीं महाराजांपुढें झालीं. महाराज फारच खुष झाले.

रहिमतखांचा मधुर, गोड, खणखणीत व सुरेल आवाज, म्हणण्याची विलक्षण शैली, हातवारे बिलकुल नाहींत, तानेची विलक्षण तयारी, ह्या अपूर्व गोष्टी त्याच्याकरितांच देवानें दिल्या होत्या, असें त्याचें गाणें एकदांहि ऐकणाराचें मत होत असे मुंबईस त्यांचे अनेक जलसे झाले होते. इ स. १९०३ मध्यें छत्र्यांच्या-बरोबर रहिमतखां काळ्या हौदानजीकच्या नातूंच्या बागेंत येऊन राहिला होता. त्या वेळीं रोज संध्याकाळीं व रविवारीं सकाळीं त्याचीं गाणीं नियमानें होत त्या गाण्याचा लाभ लेखकाच्या वडिलांस वर्षभर लाभला आहे. त्या वेळीं काळुराम भाऊ मनसाराम यांच्या दिवाणखान्यांत कोल्हापूरचे अलादियाखां व रहिमतखां ह्यांचा चुरशीचा सामना रात्रीं झाला तेव्हां पुण्यांतील सर्व तज्ज्ञ हजर होते. त्यांनीं रहिमतखांचा जय झाल्याचें जाहीर केलें।

विष्णुपंत इ स. १९०५ च्या सुमारास वारल्यावर रहिमतखां विष्णुपंतांचे धाकटे बंधु काशिनाथपंत छत्रे यांचेपाशीं राहू लागला. त्यांनींहि त्यांस उत्तम प्रकारें वागविलें. इ. स १९०९ च्या सुमारास काशिनाथपंत छत्रे आपली सर्कस घेऊन पुण्यास आले. त्याबरोबर रहिमतखांहि आला. त्याचीं गाणीं त्या वेळीं नियमानें होत नसत. एकदां मात्र श्री जमखंडी सरकारचे वाड्यांत सकाळीं रहिमतखां व अबदुल करीमखां यांच्या गाण्याचा सामना झाला. मडळी खुप झालीच. अबदुल करीमखां ह्यांनीं प्रस्तुत लेखकाच्या वडिलांजवळ मोकळ्या मनानें असें कबूल केलें कीं, "रहिमतखां गाण्यांतील सिंह आहे. माझा दरजा फार खालीं आहे हें मी ओळखून आहें. केवळ देवलसाहेबाच्या आग्रहावरून मी आलों आहें." काशिनाथ-पंत वारल्यावर रहिमतखां श्रीमंत कुरुंदवाडकर याच्या पदरीं राहिला. तेथेंहि त्यास चांगल्या प्रकारें वागविलें गेलें. इ. स. १९२० च्या सुमारास त्यास आपल्या गाण्याचीं 'रेकॉर्डस' देण्यासाठीं मुंबईस नेलें त्या वेळीं तो फार म्हातारा झाला होता. त्याच्या खास माहितीचा मनुष्य कोणी बरोबर नव्हता. कांहीं रेकॉर्डस घेतलीं आहेत त्यांवरून रहिमतखां अव्वल दर्जाचा गवई होता, अशी साक्ष पटत नाहीं. पुढें दोन वर्षांनी म्हणजे इ. स. १९२२ च्या जून महिन्यांत दुखण्यानें हंतरुणावर न खिळतां यानें इहलोकीची यात्रा कुरुंदवाड येथें संपविली. पतियाळा दरबारचे अलीखां ही मरणाची वार्ता ऐकून म्हणाले कीं, "गानेके बादशहा गुदर गये!" बारा वर्षे विष्णुपंत छत्र्यांजवळ असलेले एक शास्त्री व गवई रहिमतखांची निधनवार्ता ऐकून म्हणाले, 'रहिमतखां तानके कप्तान होते" त्यांच्यासारखी आवाजाची तयारी फार थोड्यांस लाभली असेल एक मात्रेचा अवकाश राहिला

असतांहि सोळा मात्रांची तान तितक्या अवकाशांत घेणारा गवयी कोणी पाहिला असेल नसेल' अशा बिकट प्रकारची तान त्याची तयार असे.

गातांना हात हलावयाचा नाहीं; पाय हालावयाचा नाहीं, मान हालावयाची नाहीं. तोंड वासलेलें दिसावयाचें नाहीं, अशा शांत मुद्रेनें गाणारा गवयी कोणी पाहिलाच नाहीं. हल्लीं कोणी हात आपटतो, कोणी पाय आपटतो, कोणी गातांना उभा राहतो, कोणी पाय फेंकतो, कोणी साथीला बसलेल्याच्या मांडीस चिमटे घेतो, कोणी कपाळ भुईला टेकवितो, तर कोणी माना वळवितो; कोणी दोन्हीहि हात जमिनीवर आपटतो, कोणी तोंड वासतो, कोणी गिरकी मारून जाग्यावर येतो, कोणी पाण्याचे दहापांच पेले पितो, असे एक ना दोन अनेक दुर्गुण हल्लीच्या गवयांच्या ठिकाणीं दृष्टीस पडतात ! हें पाहतांना रहिमतखांची आठवण कोणा रसिकास होणार नाहीं ? अशीं रत्नें वसुंधरा केव्हां केव्हा निर्माण करते पण अशांनाहि निंदणारे नाहींत असें नाहीं !

## अलीखां व फत्तुखां.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सवाई रामसिंग या नावाचे राजे जयपूरच्या गादीवर होते हे प्रजापालनदक्ष, मोठे उदार, व गुणाचे चहाते अशी यांची ख्याति होती त्यांच्या आश्रयास अनेक विद्वान् व कलावंत असत. प्रसिद्ध गायिका गोखी यांच्या पदरीं होती ती मोठी देखणी असून गायन व नर्तनकलेंत प्रवीण, अशी तिची प्रसिद्धी होती. तिचा कालू नांवाचा एक सारंगीवाला होता. त्याचे अली व फत्तु असे दोन मुलगे होते, ते बुद्धिमान व हुशार होते. त्या मुलांची हुषारी पाहून त्यांस गाणें शिकवावें अशी गोखीस इच्छा झाली व त्याप्रमाणें तिनें त्यांस गाणें शिकविण्यास आरंभ केला. याप्रमाणें बारा वर्षे विद्या शिकून त्यांत ते चांगले तयार झाले परंतु नायकिणीनें शिकवून तयार केलेल्या शिष्यांस तज्ञांत मान मिळत नाहीं अशी रीत आहे; म्हणून गोखीनें त्या वेळचे संगीतशास्त्रज्ञ व कलावंत बहिरामखां यांस विनंति केली कीं, 'माझ्या या शिष्यांचें गाणें ऐकून आपण त्यांस गंडा बांधावा.' तिच्या त्या विनंतीप्रमाणें त्या मुलांचें गाणें ऐकून ते फार खुष झाले व गोखीच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं त्यांस गंडा बांधला व आपले शागीर्द केलें. त्यानंतर बहिरामखांनीं दरबारच्या कांहीं लोकांना आपल्या या दोघां शिष्यांचें गाणें ऐकविलें. त्यांचें गानकौशल्य, मधुर कंठ, तानांची तरकीब वगैरे पाहून ती मंडळी खुष झाली व त्यांनीं सवाई रामसिंग राजाच्या

कानांवर ही गोष्ट घातली राजे कलेचे भोक्ते होतेच, तेव्हां त्यानीं भर दरबारांत या उभयतां बंधूंचें गाणें आपल्यासमोर करण्याचें ठरविलें त्याप्रमाणें लहानमोठे सरदार, गायक, गोखी, कालू वगैरे सर्व मंडळी दरबारांत हजर झाली. बहिरामखां आपल्या त्या दोन शागीर्दांसह येऊन हजर झाले त्या वेळीं गाणें असें बहारीचें झालें कीं, चोहोंकडून 'वाहवा' चा नुसता वर्षाव झाला. महाराज फार खुष झाले व त्यांनीं बहिरामखाची फार तारीफ केली. तेव्हां बहिरामखा उठून उभे राहिले व हात जोडून महाराजांस म्हणाले कीं, 'महाराजांच्या कानांवर कांहीं मजकूर घालण्याची मला परवानगी असावी' तेव्हां महाराजांनीं तशी परवानगी दिल्यावर बहिरामखां म्हणाले, 'महाराज, मी यांचा गुरु खरा, पण आपल्या पदरच्या गोखीनें याना शिकवून तयार केलें आहे. तरी याचें सर्व श्रेय तिला आहे.' हें ऐकून दरबारची सर्व मंडळी व महाराज आश्चर्यचकित झाले. या विद्यादानाबद्दल गोखीस गुरुदक्षिणा काय द्यावी याची चर्चा सुरू झाली त्या वेळीं एका वृद्ध मानकऱ्यानें सुचविलें कीं, 'ही महाराजांच्या पदरची, हिला सर्व अनुकूल आहेच ! जर कांहीं द्यावयाचेंच असेल तर हिला 'बाई' हा किताब द्यावा. कारण नायकिणीस बाई म्हणत नाहीत, तेव्हां तिला बाईचा किताब देणें हा मोठा मान आहे.' ही गोष्ट महाराजांस व सर्व जमलेल्या लोकांस फार पसंत पडली. मग महाराजानीं गोखीस त्या दिवसापासून 'गोखीबाई' म्हणावें असें फर्माविलें.

अल्लीखां व फत्तूखां यांच्या विद्यासंपादनाचा असा इतिहास आहे. त्यानंतर मोठमोठ्या शहरीं त्यांचीं गाणीं होऊन, वाहवा होऊं लागून ते प्रसिद्धीस आले. सन १८९४ सालीं मुंबईस त्यांचे अनेक मुजरे झाले. फत्तुखां टोंक संस्थानांत नोकर होते. सध्यां ते हयात नाहींत. अल्लीखा पतियाळा संस्थानचे नोकर आहेत त्यांचें वय शाहात्तराच्या पुढें आहे.

हे ख्याल गातात थोडथोड्या स्वरांच्या ताना घेऊन रागाची बढत करणें ही जी जयपूर गायकीची तऱ्हा ती यांच्या गाण्यांत दिसते उभयतां बधु जेव्हां जोडीनें गात तेव्हां श्रोत्यांच्या मनावर विलक्षण परिणाम होई. हे अनेक राग चांगले गात असत परंतु 'पूरिया' राग गाण्यांत यांचा हातखंडा असे ग्वाल्हेरचे हद्दूखां याजबरोबर सामना करण्याची या उभयता बंधूची फार मनीषा होती; पण काशीस बाबा दीक्षितांचें गाणें त्यानीं जेव्हां ऐकिलें व हद्दूखां वारल्याचे तेथे समजलें तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें व सामन्याचा नाद सोडून द्यावें भाग पडलें।

ह्यांच्या तोडीची गायकरत्नें हिंदुस्थानांत थोडींच झालीं आहेत. हे गवयी जयपूर घराण्याचे प्रतिनिधि समजले जातात.

## इनायतखां.

हे पिढीजान गायक. यांस दोन बंधु होते. प्रसिद्ध अलीहुसेन बीनकार व महंमद हुसेनखां. ह्यांची विद्या, हुषारी वगैरे गुण पाहून ग्वालेरचे प्रसिद्ध मीर्या हद्दूखां यांनीं आपली मुलगी यास देऊन जावई केलं. आपणांस ग्वालेर घराण्याची गायकी यावी अशी इनायतखां यांची फार इच्छा होती त्यांनीं ही गोष्ट हद्दूखांच्या कानांवर घातली पण हद्दूखांनीं जावयास स्पष्ट सांगितलें कीं, "मी तुम्हांस आपली मुलगी दिली, पण आमच्या घरची गायकी देणार नाहीं." ह्या उत्तरानें इनातयखां फार खट्टू झाले. त्यानीं ही गोष्ट ग्वाल्हेरचे त्यावेळचे प्रसिद्ध वैद्यराज रावजीबुवा मसूरकर यांस कळविली, तेव्हां त्यांसहि पण वाईट वाटलें. वैद्यराज फार प्रेमळ व संगीतप्रेमी होते. त्याचा व हद्दूखांचा स्नेह होता तेव्हां हद्दूखांजवळ ते तालीम घेऊं लागले, इनायतखांनीं वैद्यबुवास सतार शिकवावयाची व वैद्यबुवांनीं त्यास गाण्याची तालीम सांगावयाची असें त्यांचें ठरलें अशा रीतीनें ग्वालेर घराण्यांतील गायकी इनायतखांनीं संपादन केली. पुढें ते दक्षिण हैद्राबाद् येथें निजामाचे दरबारी नोकर झाले. नंतर कांहीं दिवसांनीं नेपाळचे महाराजांच्या इच्छेनुरूप राजघराण्यांतील स्त्री-पुरुषांस गाणें शिकविण्याकरितां ते नेपाळास गेले त्यांच्या गाण्यावर नेपाळेश्वर खूष झाले. तेव्हां खांसाहेब म्हणाले महाराज, माझा सासरा तर आतां जिवंत नाहीं, पण माझा मेहुणार हिमतखां अद्याप आहे. त्याची गायकी, त्याचा मधुर कंठ, त्याची गाण्याची विलक्षण तरकीब, ह्यासाठीं महाराजांनीं त्यास एकवार अवश्य ऐकावें.' तेव्हां आपल्या राजधानीत एक मोठा जलसा करावयाचा महाराजांनीं इ. स. १९०० मध्यें ठरविलें व हिंदुस्थानांतील कलावंतांस व पंडितांस निमंत्रणें पाठविलीं. अशा रीतीनें रहिमनखांचें गाणें नेपाळेश्वरांनीं ऐकिलें. थोरांचें सगळेंच थोर. ह्यात नेपाळेश्वराचें औदार्य व कलाप्रेम तसेंच इनायतखांच्या मनाचा मोठेपणा व्यक्त होतो. खांसाहेब नव्या चीजाहि रचीत असत. यमनकल्याण रागांतील 'आले नबी औलाद' ही चीज तर प्रसिद्धच आहे व ती सर्व गायकांस येते. हे वयातीत होऊन इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत वारले.

## सखारामबुवा अलवारकर.

अलवार शहरीं ब्राह्मणाचा एक मुलगा होता तो लहानपणीं फार उनाड असे. कधीं अभ्यास करावयाचा नाहीं, कधीं वडिलांचें ऐकावयाचा नाहीं; फार काय, पण कधीं वेळेवर जेवावयासहि घरीं यावयाचा नाहीं. अशा स्थितींत या मुलाचे वडील एकदां फार रागावले व त्यांनीं त्यास घराबाहेर हांकून दिलें। माया फार वाईट आहे घरांत वडील नसतील त्या वेळीं हा मुलगा आश्वास, आईन, त्यास जेवावयास घालावें. पण असें किती दिवस चालणार! सुमारें वीस वर्षांच्या वयात ही स्वारी ग्वाल्हेरीस निघून गेली; तोच हा मुलगा प्रसिद्ध गवयी सखारामबुवा अलवारकर होय. ग्वाल्हेरीस गेल्यावर त्यानें गाणें शिकण्याला सुरवात केली. त्या वेळीं ग्वाल्हेर शहर म्हणजे गायनकलेचें माहेरघर म्हणून सर्व हिंदुस्थानांत नांवाजलेलें होतें. हस्सूखां, हद्दुखां, वगैरे हिंदुस्थानप्रसिद्ध गवयी, अलिजा बहादुर शिंद्यांच्या पदरीं होते, तसेंच दुय्यम प्रतीचे इतर गवयीहि पुष्कळ होते सखारामानें गायनकलेचा अभ्यास मन लावून केला व रूपालिया म्हणून त्याची प्रसिद्धि झाली त्याचें लग्नकार्य झालें नव्हते. त्याचें वागणें अव्यवस्थितच असे. पण तो फार प्रामाणिक असे त्याच्या प्रामाणिकपणाची अशी गोष्ट सांगतात कीं, खाण्याची इच्छा झाली म्हणजे तो हलवायाच्या दुकानीं जाई व पोटभर मिठाई खाई. पण पैसे द्यावयास नसले म्हणजे एखादा राग गहाण ठेवी। यानंतर मैफलींत गाण्याच्या वेळीं गहाण ठेवलेला एखादा राग म्हणण्यास कोणी शिफारस केल्यास 'अमुक हलवायाच्या दुकानीं तो राग अमुक रुपयांस गहाण आहे, तो सोडवून आणा, तर मी तो गाईन' असें तो स्पष्ट सांगे. मग गहाण पडलेला राग सोडवून आणल्याची चिठ्ठी दाखविल्यावर तो राग तो म्हणे। हा मोठा 'तानतनायन' होता, अशी त्याची ख्याति होती.

## थोरले बाळकृष्णबुवा.

मीयां हस्सूखां हद्दूखांमुळें ग्वाल्हेर शहर हें गायनाचें माहेरघर म्हणून गाजलें होतें त्या वेळीं अनेक लोक गायन शिकण्याकरितां तेथें जात. त्याप्रमाणें बाळकृष्णबुवाहि तेथें गायन शिकण्याकरितां गेले पण त्यांचा ठावठिकाणा कोणता हें कोणास चांगलेंसें माहीत झालें नाहीं. तेथें गुरूजवळ गायनविद्या शिकून ते तेथेंच राहिले त्यांच्या गळ्यांत तान नव्हती ते नेहमीं म्हणत कीं, " तान मारणें

म्हणजे पहाड चढण्याइतकें कठीण आहे. " गायनकलेंत ते परिपूर्ण झाले ते ख्याल उत्तम गात गुरूंची त्यांवर फार मर्जी असे. गायनाच्या अखेरीस देवादिकांचें एकादें पद म्हणावें अशी सभ्य लोकांत ग्वाल्हेरीस वाटाघाट सुरू झाली. तेव्हां एका गृहस्थानें सुचविलें कीं, तशीं स्तुतिपर पदें जयदेवाच्या 'गीतगोविंद' काव्यांत अनेक आहेत, व तें काव्य-गायनाकरितांच कवीनें रचिलें आहे म्हणूनच त्यावर राग व ताल लिहिले आहेत पण लिहिलेल्या रागांत व तालांत आपल्यास त्या म्हणतां येणार नाहींत. असा गुरुशिष्यांचा अभिप्राय पडला. तेव्हां प्रचलित रागांत व तालांत त्या अष्टपद्या बसविण्याचें काम गुरुजींनीं बाळकृष्णबुवांकडे दिलें. त्यांनीं त्या अष्टपद्या प्रचारांतील निरनिराळ्या रागांत व तालांत बसविल्या. तोच प्रघात आज ग्वाल्हेरींत दृष्टीस पडतो ग्वाल्हेरीस जे लोक गाणें शिकून तयार होतात, ते बाळकृष्णबुवांनीं बसविलेल्या रागांत व तालांतच त्या अष्टपद्या म्हणतात व ही चाल अद्यापि आहे हे बुवा पूर्वींच्या खेपींत तयार झाले होते. पुढें जेव्हां बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ग्वाल्हेरीस शिकून तयार झाले तेव्हां ह्या बाळकृष्णबुवास 'थोरले बाळकृष्णबुवा' म्हणू लागले हे ग्वाल्हेरीसच कालवश झाले

## वासुदेवबुवा जोशी.

ठाणें जिल्ह्यांत अलीबागेजवळ नागाव म्हणून एक खेडें आहे. तेथें चित्तपावन ब्राह्मणांचें जोशी आडनांवाचें एक मोठें घराणें आहे त्या घराण्यांत वासुदेव म्हणून एक मुलगा होता. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें वासुदेवाचें मोडी व बालबोध अक्षर, मोडी लिहितां वाचतां येणं, थोडे हिशोब वगैरे लिहिणें झाल्यावर, एका हरिदासाच्या तोंडून त्यानें ग्वाल्हेर येथील गायनविद्येचीं व तेथील गायकवादक लोकांचीं रसभरित वर्णनें ऐकिलीं व आपण तेथें जावें व ती विद्या शिकावी अशी त्याला फार प्रबळ इच्छा झाली. घरांतील वडील माणसें आपल्यास इतक्या लांब एकटा जाण्यास परवानगी देणार नाहींत हें जाणून घरांत न विचारतां तिकडे पळून जाण्याचा त्यानें निश्चय केला. त्या वेळीं त्याचें वय सुमारें १५।१६ वर्षांचें होतें तेव्हां त्या वेळीं प्रवासाचीं साधनें आतांसारखीं सुखकर नव्हतीं. पडशी खांद्यावर घेऊन विंध्याद्रि, सातपुडा ह्यांसारखे पर्वत, तापी, नर्मदा ह्यांसारख्या मोठाल्या नद्या ओलांडीत स्वारी ग्वाल्हेरीस जाण्यास निघाली. त्या वेळीं चोरट्यांचें वाटेंत भय! पण प्रबळ इच्छा झाली म्हणजे देव

मार्ग दाखवितो व साह्य करितो ह्यांत कांहीं शंका नाहीं. ग्वालेरीस पोहोंचल्या-वर जेवणाची व राहाण्याची पंचाईत. पण शरीरप्रकृति अनुकूल, आरोग्य चांगलें, यामुळें सर्व कांहीं थोड्या दिवसांत जुळलें. त्या वेळीं विद्या शिकण्याचीं आतां-प्रमाणें सुलभ साधनें नव्हतीं आता कोणतीहि विद्या शिकणें झाल्यास गुरूस विद्या शिकविण्याबद्दल ठराविक पैशाचा मोबदला म्हणजे फी ( वेतन ) द्यावयाची व ठराविक वेळी शिकावयाचें यामुळें गुरूचा व शिष्याचा वेळ फुकट न जातां शिष्याला विद्या प्राप्त होते पण त्या काळी गुरूची सेवा हा शिक्षणाचा मोबदला ! वेळेला प्रमाणच नाहीं. सर्व दिवसभर गुरूच्या घरीं पडून राहावयाचें व तो सांगेल तें काम करावयाचें आणि त्याची लहर लागेल तेव्हां व त्याच्या लहरीस येईल तें शिकावयाचें. शंका विचारावयाची नाहीं. त्या वेळीं गायन विद्या शिकण्यास ग्रंथ नव्हते. गुरूनें तोंडानें-स्मरणानें सांगावयाचें हें शिष्यानें गुरूदेखत म्हणाव-याचें. घरीं उजळणी करावयाची ती जें ध्यानांत राहिलें असेल त्या धोरणानें ! प्रथम गुरु कधीं शिकवीत नसत गुरूच्या घरीं राहून जें ऐकावयास सांपडेल तेंच कांहीं वर्षांचें शिक्षण; मग गुरूच्या मागें तंबोरा वाजवीत राहणें, ही कांहीं वर्षांनीं दुसरी पायरी, व सेवेनें गुरुकृपा झाली म्हणजे शिक्षण सुरू व्हावयाचें ! सेवेंत कुचराई झाली, गुरुगृहीं जाणें कमी वेळ झालें तर गुरूची मर्जी बहुधा खप्पा होई व शिक्षण प्रत्यक्ष सुरू होण्यास अडचण येई. हाच नियम आमच्या जोशाच्या वासुदेवास लागू होता पण हा पडला एकमार्गी, यानें हस्सूखाच्या गुरुगृही सदा पडून असावें. जेवणापुरतें घरीं यावें व गुरु जें काम सांगतील तें मन लावून करावें. अंगमेहनत करण्यास त्याच्या अंगीं चुकारपणा नसल्यामुळें हस्सूखांची वासुदेवावर मर्जी बसली वस्तादाचें गानश्रवण, त्यांच्या मागें तंबोरा वाजविणें, या दिव्यांतून तो पार पडल्यावर त्यास तालीम मिळू लागली. वासुदेव स्वभावानें गरीब, कष्टाळू, मनमिळाऊ असल्यानें गुरूच्या घरच्या मंडळींची त्याच्यावर मर्जी बसली त्याचप्रमाणें एका सभ्य व श्रीमान् गृहस्थानें त्याची जेव-ण्याची सोय त्याच्या सुशील वर्तनामुळें केली होती. दुसरा कोणताहि व्यवसाय नाहीं, गायनविद्येचा मनापासून निदिध्यास; यामुळें त्या विद्येंत त्याची चांगली प्रगति होऊं लागली. ज्या सभ्य व श्रीमान् गृहस्थांच्या घरीं हा राहात होता त्यांस ह्याची चालचलणूक आवडून त्यानें वासुदेवास घरीं जाऊन लग्न करून येण्याचा सल्ला दिला गायनविद्येच्या नादांत असलेलीं तरुण मुलें बिघडतात, हें वासुदेवाच्या आश्रयदात्यास चांगलें ठाऊक असल्यानें वाटखर्ची देऊन वासु-

देवाची त्याच्या गांवीं त्यानें रवानगी करून दिली मुलगा विद्यासंपादन करून आलेला पाहून घरच्या माणसांस आनंद झाला त्याचें निर्मल वर्तन व विद्येंत प्रावीण्य पाहून गांवचे लोकहि खुष झाले. थोड्या दिवसांत त्याचा विवाह झाला. ग्वालेरच्या आश्रयदात्याचीं लवकर परत येण्याबद्दल पत्रें येऊं लागलीं; तेव्हां वासुदेव यानें ग्वालेरीकडे सहकुटुंब प्रयाण केलें.

ग्वालेरीस स्वतंत्र बिऱ्हाड करून हा राहिला व श्रीमंत लोकांच्या देवापुढें गावें व त्याबद्दल त्यांनीं याच्या निर्वाहाचा खर्च चालवावा असें ठरलें. गुरुगृहीं नेमानें वासुदेव जात होताच. त्याची निष्ठा; एकमार्गीपणा व सरळ वर्तन पाहून गुरूस त्यास विद्या शिकविण्याची हौस वाटू लागली. वासुदेवास अनेक राग व त्यांतील चीजा चांगल्याप्रकारें गातां येऊं लागल्या. वासुदेवाच्या स्वभावांत चांचल्य नसून धिम्मेपणा असल्यानें व घरीं शिकविलेल्या विद्येची कसून आवृत्ति होत गेल्यानें त्याचें गाणें पक्कें झालें. गुरूचीं मुलें अगर इतर विद्यार्थी चुकले तर गुरूंनीं 'वासुदेवास विचारा' असें मोठ्या आनंदानें म्हणावें. अशा रीतीनें वासुदेव 'कोठीवाल' बनला याप्रमाणें तो कोंकण्या वासुदेव ग्वालेरचा रहिवासी होऊन नामांकित हस्सूखांचा नामांकित शिष्य व गवयी बनला. पुढें त्यास वासुदेवबुवा जोशी या नांवानें लोक ओळखूं लागले. तरी गुरूबरोबर दरबारांत गाण्यास जावें, अशी त्यांची निष्ठा गुरु मरेपर्यंत कायम होती. जोशीबुवांनी अनेक शिष्य तयार केले त्यांत महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेले बाळकृष्णबुवा इचलकरजीकरहि, होते. बाळकृष्णबुवांनीं आपल्या गुरूस महाराष्ट्रांत आणिलें होतें पुण्यास त्यांचीं अनेक गाणीं होऊन त्यांच्या विद्येचें चीज पुणेकरांनीं केलें होतें. सातान्यास महाराजसरकाराच्या नव्या वाड्यांत त्यांचीं गाणी झाली ते आपला शिष्य बाळकृष्णबुवा यांस घेऊन नेपाळच्या महाराजाच्या बोलावण्यावरून तिकडे गेले होते. 'मन हरवा मोरिरे' ही त्याच्या अनेक आवडीच्या चिजांपैकीं जीवनपुरींतील एक चीज होय. पुण्यास आल्यावेळीं त्याच्या डोक्यावर एक केंस नव्हता व तोंडात एक दांतहि नव्हता। तेव्हां पुणेंकरांस वाटलें हा म्हातारा गाणें काय गाणार। पण उत्तर रात्रीच्या वेळीं दरबारी रागातील 'मधुवा भरदे' ही चीज म्हणून त्यांनीं असा रंग भरला कीं, वाहवाची वृष्टी झाली। कृष्णशास्त्री शुक्ल हे त्यांच्या नामांकित शिष्यांपैकीं एक होते. लक्ष्मणराव म्हणून त्यांचा दुसरा एक नामांकित शिष्य होता. तो डोंगऱ्यांच्या संगीत नाटक कंपनींत मुख्य पुरुषपार्टी होता त्याला त्यांनीं नाटकांत जाऊ नको म्हणून सांगितलें; पण त्यानें ऐकिलें नाहीं त्याला पुढें महारोग झाला व त्यानें नाटक कंपनी सोडिली तेव्हां तो म्हणे, 'गुरूच्या अवकृपेचें हें फळ आहे' असो.

एकदा किर्लोस्कराची संगीत कंपनी ग्वाल्हेरला गेली. आण्णास वाटलें कीं, नाटेकराच्या गाण्यानें आपण ग्वाल्हेरमधील गायक खुष करूं. सौभद्र खेळ लावला. जोशीबुवांस पुढील खुर्चीवर बसविलें. भूपातील नांदीस सुरवात झाली. वासुदेवबुवास त्या ताना पसंत पडेनात. ते म्हणाले 'हें काय संगीत का चिसंगीत' असें म्हणून ते उठले! दहा मिनिटांत सर्व थिएटर रिकामें झालें! आण्णा दुसरे दिवशीं तेथून निघाले. पुनः ती कंपनी ग्वाल्हेरीस गेल्यावेळीं तिचें गाणें तेथें पसंत पडलें! ही गायनाची अवनति किंवा कालमहिमा म्हणावा!

एकदां असें झालें कीं, वासुदेवबुवा आपल्या मुलास दरबारांत घेऊन शास्त्री मंडळींत जाऊन बसूं लागले. व्यवस्थापकांनीं त्यांस तेथून उठविलें. त्या वेळी त्यांनीं अशी प्रतिज्ञा केली कीं, 'शास्त्रीमंडळींत बसण्याची योग्यता प्राप्त करून घेईन तेव्हांच दरबारांत येईन.' नंतर त्यांनीं आपला मुलगा जो भय्या त्यासच व्याकरणशास्त्र वगैरे शिकवून त्यांत तयार करवून दरबारांत त्यास शास्त्रीमंडळींत बसविलें. याला म्हणावें करारीपणा! वासुदेवबुवांस कोणतेंहि व्यसन नव्हतें. यांची शरीरप्रकृति चांगली असे. हे नामांकित गुरूचे नामांकित शिष्य इ. स. १८९० त्या सुमारास कालवश झाले.

## कृष्णशास्त्री शुक्ल.

उज्जयनींतील एका सभ्य गृहस्थाच्या कुटुंबामध्यें यांचा जन्म झाला. संस्कृत व हिंदी ह्या भाषांचा अभ्यास झाल्यावर प्रपंचभार उचलण्यापूर्वी गायनविद्येचा अभ्यास करण्याची इच्छा यांस झाली. त्याप्रमाणें उज्जयनीजवळच गायनविद्येंत गाजलेलें ग्वालेर शहर, तेथें जाण्याचें त्यांनीं ठरविलें. तेथें गेल्यावर वासुदेवबुवा जोशी, प्रसिद्ध मीयां हद्दूखांचे शिष्य, यांजपाशीं त्यांनीं या कलेचा चांगला अभ्यास केला. त्या वेळच त्यांचे सहाध्यायी कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे होते. ही कला मनोरंजक असल्यानें व तेथील चांगल्या ओळखी झाल्यानें व गुरूची कृपा असल्यानें त्यांनीं तेथ बरेच दिवस मुक्काम केला. एके वेळी गायनाच्या चर्चेंत वाद विकोपास गेल्यामुळें "आपल्यासारख्या शिकलेल्या माणसाची अशिक्षित मनुष्याबरोबर 'हमरी तुमरी' होऊन इज्जत जावी हें मला पसंत नाहीं," असे एका सभ्य व श्रीमान मनुष्यानें उद्गार काढिले! तें ऐकून शास्त्रीबुवांस विषाद वाटला व म्हणाले, "आजपासून पुन्हां मी मैफलींत

गाणार नाहीं. ' अशी प्रतिज्ञा करून त्यानीं ग्वालेर शहर सोडिलें व उज्जयनीस येऊन राममंदिरांत तुळशीदासकृत हिंदी रामायण ह्या पथाधारें पुराण सांगून त्यावर आपला निर्वाह त्यानीं चालू केला. त्यांचे गुरु वासुदेवबुवा जोशी हे नेपाळास जातेवेळीं त्यांनीं गणपती भिलवडीकर यास त्यांच्या हवालीं केलें व ' याला तुझी गायनविद्या शिकीव ' अशी आज्ञा केली. गुरूची आज्ञा अमान्य करावयाची नाहीं म्हणून त्यांनीं त्यास गायनविद्येंत प्रवीण करून महाराष्ट्रांत पाठविलें. शास्त्रीबुवांस अनेक ख्याल येत असत. ते सुस्वभावी होते म्हणून त्यांनी अनेक चिजा आपला शिष्य गणपती यास शिकविल्या. ते एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## मनरंग.

दिल्लीपति महंमदशहा ( १७१९–१७४८ ) गादीवर असताना मनरंग ह्या टोपण नावाचा नामांकित गवई व ख्याल रचणारा होऊन गेला. त्याचें खरें नांव कोठें आढळत नाहीं त्यानें अनेक लहान मोठे ख्याल सर्व रागांत रचिले आहेत ते ख्याल सर्वच गवई म्हणतात. पण जयपुराकडील गवई यांच्या म्हणण्यांत ते जास्त येतात. त्या चिजांची बांधणी सदारंग, अदारंग ह्यांच्या बांधणीसारखी मनोहर आहे. त्या चिजांत बादशहाचें नांव व आपलें नाव त्यानें गोविलें आहे.

## बाबादीक्षित.

श्रीमंत अलीजाबहादूर शिंदे सरकार यांच्या सत्तेखाली जेव्हां अहमदनगर जिल्हा होता, तेव्हा त्यांचें मुख्य शहर श्रीगोंदें होतें. सरकारानीं तेथें आपला वाडा बांधल्यामुळें, सरदार, इनामदार, कामगार व आश्रित यांनींहि तेथें आपले वाडे बांधिले व त्या लहानशा गांवास राजधानीचें वैभव प्राप्त झालें; पण शिंदे सरकार व निजाम सरकार यांच्या हद्दी खर नदीजवळ एकमेकांस मिळालेल्या, चतुर व राजकारणी इंग्रज कामगारांच्या ध्यानीं हें येतांच शिंदे सरकारास उत्तरेस त्यांच्या मुलखाला जोडून मुलूख देऊन नगर जिल्हा जेव्हां इंग्रजानीं आपल्या ताब्यांत

घेतला, तेव्हां शिंदे सरकारचें ठाणें श्रीगोंदाहून उठलें त्याबरोबरच सरदार, इनामदार, कामगार व आश्रित वगैरे मंडळींनीं आपली वस्ती तेथून उठवून सर्व मंडळी ग्वाल्हेरीस जाऊन राहिली. श्रीगोंद्याची त्या वेळच्या वैभवाची, ओस पडलेले, उंटवाले, हत्तीवाले वगैरेंचे चिरेबंदी वाडे आज साक्ष देत आहेत. बाबादीक्षित याच्याहि पूर्वजांचा वाडा अद्यापि तेथें असलेला म्हातारे लोक दाखवितात.

बाबाचे वडील पागेमध्यें नोकर होते ग्वाल्हेरीस गेल्यावर बाबा वडिलांबरोबर पागेंत जात. जवळ हद्दू हस्सूचें राहण्याचें ठिकाण होतें तेथें बाबा जाऊन त्याच्या कसरतीच्या वेळीं लांब बसून त्यांचीं गाणीं ऐकत असत. त्याना गाणें ऐकण्याचा नाद विलक्षण लागला. बाबा शरीरानें हडकुळे होते, पण त्याचा आवाज पल्लेदार, गोल गोड व मधुर होता. ही त्यांस ईश्वरी देणगीच होती. अशा प्रकारच्या स्वाभाविक आवाजाच्या देणगीस '**सुशारीर** अशी संगीत शास्त्रान संज्ञा आहे. बाबा रोज गाणें ऐकत व पागेमध्यें एका बाजूस बसून तशी नक्कल करण्याची कसरत करीत. आवाजाच्या देणगीबरोबर ग्रहण व अनुकरण शक्ति यांची त्यास अनुकूलता होती त्यामुळें ऐकिलेलें गाणें जसेंच्या तसें म्हणण्याची हतोटी त्यांस उत्तम साधली होती एकदा असें झालें कीं, हद्दूहस्सूच्या घरीं एक परस्थ नामांकित गवई आला व त्याचें गाणें त्याच्या घरीं झालें, बाबानें धीटपणानें विचारलें 'मी थोडें गाऊं कां' तेव्हां हद्दूनीं परवानगी दिली, बाबानें त्या परस्थ गवयाची अशी हुबेहूब नक्कल उठवून दिली कीं, सगळे आश्चर्यचकित झाले. तो परस्थ गवयी मनात म्हणाला, माझा तर हा शागिर्द नाहीं ! इकडे हद्दूहस्सू मनांत म्हणाले, हा आमच्या घरीं रोज येतो तेव्हां ह्याची तालीम घेण्यास हा केव्हां गेला ? असा सर्व चमत्कार तेथें झाला. दुसरे दिवशीं हस्सूनीं त्याला बोलावून विचारलें तेव्हां त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, मला नक्कल करण्याची शक्ति आहे. तेव्हां हस्सूनीं एक अनावट राग, बिकट ताना, हरकती घेऊन गाइला, व त्यास नक्कल करण्यास सांगितलें तेव्हां त्यांतील अर्धें मुर्धें गाणें तो गाइला, तेव्हांपासून हस्सूची त्यावर मर्जी बसली व त्यास ते रोज तालीम देऊं लागले व आपल्या कसरतीच्या वेळीं बसवून घेऊं लागले. असें कांहीं वर्षें झाल्यावर खरोखरच बाबादीक्षित एक उत्तम गवई बनले गुरूची त्यावर बहाल मर्जी. वाटेल तेथें त्याला ते आपल्याबरोबर घेऊन जाऊं लागले, व बाबांनीं मनावर घेऊन रोज घरीं कसरत करण्यास सुरुवात केली. एकदां

असें झालें कीं, सरकारवाड्यांत एका परस्थ गवयाचें गाणें इतकें चांगलें झालें कीं, त्यानंतर कोणाचें गाणें जमणें अशक्य होतें; म्हणून हस्सूनीं बाबास सांगितलें कीं, इतकें बेसुरी बेढब गाणें गा कीं, पहिला रंग सगळा उडून जावा. बाबांनीं 'होय' म्हणून असें बेढब गाणें गाइलें कीं, त्याला बंद करून हस्सूखांस बसण्यास सरकारांनीं हुकूम केला व त्याचें गाणें चांगलेंच वठलें. घरीं आल्यावर बाबाची गुरूंनी फार वाहवा केली पुढें कांहीं दिवसांनीं सरकारपुढें बाबाचें गाणें झालें. असें गाणें आजवर ऐकिलें नाहीं असें जो, तो म्हणूं लागला. त्या दिवशीं बाबास **'नीलकंठ'** ही पदवी गुरूंनीं बहाल केली पुढें कांहीं दिवसांनीं सरकार पुढें बाबाचें गाणें झालें. त्या पुढें इतराच्या गाण्याचा रंग फिक्काच पडला। घरीं आल्यावर गुरूंनीं बाबास विचारलें कीं, इतकी उत्तम विद्या तुला आम्हीं शिकविली त्याची गुरुदक्षिणा तूं अद्यापि आम्हांस दिली नाहींस. तेव्हां बाबा म्हणाले 'मागा मी आतां देण्यास तयार आहें.' गुरु म्हणाले "मागितल्यावर मागें फिरशील" बाबा म्हणाले "मी ब्राम्हण आहे मागें फिरणार नाहीं" गुरु म्हणाले तर "ह्या पुढें सरकार समोर तूं कधीं गाऊं नकोस' ही दक्षणा दे, बाबा म्हणाले 'ही गुरुदक्षणा दिली. ह्या पुढें मी महाराजांपुढें गाणार नाहीं" झालें। त्या दिवसापासून मरेपर्यंत बाबा जयाजीराव महाराजापुढें गाइले नाहींत। एकदा असें झालें कीं, सरकारवाड्यात भोजनाची पंगत बसली. सरकार तेथें हजर नव्हते. लोकांनीं बाबास श्लोक म्हणण्यास आग्रह केला. बाबांनीं श्लोक म्हणण्यास सुरुवात केली. महाराजास ही बातमी समजतांच ते तेथें आले. बाबा गप्प झाले। तेव्हां महाराज म्हणाले, 'श्लोकाच्या प्रत्येक ओळीस एक मोहोर देतों. श्लोक म्हणा' बाबा श्लोक म्हणेनात महाराज म्हणाले "एका ओळीस एक गांव" तरी बाबा श्लोक म्हणेनात। व शेवटीं आपोशन घेऊन उठलें।। महाराज परत गेले। त्या दिवसापासून बाबांचें गाणें महाराजांस ऐकण्यास सांपडेना. महाराज गुणग्राही व थोर मनाचे. त्यांना ह्यांतील गूढ कांहीं कळेना. मग त्यांना सर्व हकीकत समजली व फार वाईट वाटलें व रागहि आला. पण आतां काय उपयोग। पुढें रात्रीं एक वाजला म्हणजे बाबा आपल्या निवडक लोकांदेखत घरीं गाण्यास बसत. मग त्या आळीच्या गस्त घालणारानें महाराजांस गाणें सुरू झाल्याची वर्दी द्यावयाची. महाराज पोषाख बदलून तेथें खालीं गाणें ऐकत उभे राहात। धन्य महाराजांच्या गुणग्राहकतेची; व त्याहून धन्य त्यांच्या थोर मनाची व सहनशीलतेची। असे राजे क्वचितच छोम छनन' ही जीवनपुरी

रागांतील चीज त्याच्या अनेक आवडत्या चीजांपैकीं एक होती. म्हातारपणीं ते काशीस जाऊन राहिले. हस्सूखां, हद्दूखां ह्यांच्या गाण्यावर जर इतर मोठ्या गवयांनीं टीका करण्यास सुरवात केली तर ते म्हणत "हें त्या घराण्याचें गाणें" असें म्हणून गात व पुढें म्हणत "तुम्ही ह्यापेक्षां चांगलें गाऊन दाखवा; उगीच थोरांची निंदा व स्पर्धा करण्यात काय अर्थ आहे ! जिवंत होते तेव्हां कां नाहीं सामना करण्यास आलां आतां काय उपयोग. मी त्यांचा शागिर्द मजबरोबर म्हातारपणीं तरी सामना करा " गवयी त्यांचें गाणें ऐकून दिङ्मूढ होत. ते इ. स. १८८३ च्या सुमारास काशीस कैलासवासी झाले त्यास मुलगा नव्हता. त्या तोडीचे गायक केव्हां निघतील तो सुदिन !

## भय्या जोशी.

भय्या जोशी हे प्रसिद्ध वासुदेवबुवा जोशी यांचे पुत्र हे आपल्या वडिलांपाशीं गायनविद्या शिकले संस्कृत व्याकरणशास्त्र शिकून ते दरबारांत शास्त्री मंडळींत बसत. ह्यांचें गाणें जोरकस व उत्तम असे. ह्यांच्या कसरतीच्या वेळीं जोडीदार म्हणून ह्यांच्या वडिलांनीं पांडुरंगबुवा चेवलकर घेतले होते त्या वेळच्या गवयी लोकांत भय्या जोशाची अशी प्रसिद्धि होती कीं, 'बोलतान भय्या जोशानींच करावी. इतरांची त्या पुढें मात्रा नाहीं, मग तो मुसलमान गवयी असो अगर हिंदु असो पुढें त्यांना भ्रम झाला होता तरी ते अनेक चीजा जोरकस रीतीनें म्हणून दाखवीत यांस चीजा फार येत असत. पुण्यास त्यांचा मुक्काम कृष्णराव देवल यांजकडे असतांना लेखकाच्या वडिलांकडे येऊन ज्या कधीं इकडे ऐकावयास मिळाल्या नाहींत अशा अनेक चीजा जोरकस आवाजानें व्यवस्थेशीरपणें म्हणून दाखवीत.

एक वेळ त्यांचा पुण्यास मुक्काम फार दिवस झाला होता. त्यावेळी बाळकृष्ण-बुवानींहि त्यांजकडून चीजा घेतल्या तेव्हां लेखकाच्या वडिलांनीं त्यास विचारिलें "बुवा तुम्हास चीजा भय्या जोशापासून घेण्याची काय जरुरी ! " तेव्हां बुवा म्हणाले 'अशा निरनिराळ्या ढंगाच्या चीजा आम्हास मर्व कोठें मिळाल्या आहेत'' ह्यावरून भय्या जोशांच्या भरतीबद्दल व त्यांच्या जवळील चीजांच्या ढंगदारीबद्दल वाचकांची खात्री होईल. हे इ. स १९२० च्या सुमारास मुंबईस कालवश झाले.

## बाळासाहेब गुरुजी.

राणोजी शिंदे ह्यांनीं जेव्हां ग्वाल्हेरींत गादी स्थापिली तेव्हां महाराष्ट्रांतून आपल्या विश्वासातल्या काही व्यक्ति तेथें नेल्या; त्या व्यक्तींपैकीं गुरुजींचे पूर्वज होते. गुरुजींचें खरें आडनांव काळे व त्यांचें गोत्र वत्स आहे. गुरुजींच्या वाडवडिलांनीं ग्वाल्हेरीस मोठमोठीं हुद्याची कामें केलीं बाळासाहेबहि मोठ्या हुद्यावर होते. बाळासाहेब व त्यांचे बंधु पन्ना गुरुजी यांस गायनाचा मोठा शोक होता हे दिसण्यात मोठे रुबाबदार असून त्यांचें शरीर धिप्पाड होतें ह्यांनीं गायनाचा अभ्यास उत्तम केला होता. ह्याचा आवाज पहाडी होता हे ख्याल गात असत श्रीमंत माधवराव महाराजाची ह्यांच्यावर मोठी मर्जी होती. गायनातील ह्यांचे सहाध्यायी निसार हुसेनखा हे होते. हे मैफलींत निर्भयपणें गात. रामेश्वराच्या यात्रेस इ. स १९०१ मध्यें गेल्यावेळीं ह्यांचा पुण्यात मुक्काम तीन महिने होता; तेव्हां ह्यांच्या गाण्याचा लाभ पुणेकरांस मिळाला ह्यांचा स्वभाव मानी व उदार होता. ह्यांनीं अनेक शिष्य तयार केले. सामवेद गायनपद्धतीवर म्हणण्याचा ह्यांनीं अभ्यास केला होता. अनेक नामांकित हिंदुमुसलमान गवयांशीं ह्याचे गायनांत सामने झाले होते. ह्यांच्यासारखा शौकीन गवयी विरळा. ग्रंथावरून गाणें शिकण्याच्या ते विरुद्ध असत. हे इ. स १९१९ च्या सुमारास कालवश झाले. ह्यांचे पुतणेहि चांगले गातात. ह्यांचा आवाज फार मधुर आहे.

## शंकर पंडित

ग्वाल्हेरीस पंडितांचें घराणें गृहस्थाचें. शंकरराव पंडिताच्या वडिलानें आपल्या मुलांस गायनविद्या यावी या हेतूनें निसारहुसेनखां ह्यांस गायन शिकविण्यास ठेविलें. शंकररावांबरोबर त्यांचे दोन बंधू गायन शिकत शंकरराव गायनांत अप्रतिम तयार झाले. निसार हुसेनखां मोठ्या प्रेमानें सांगत कीं, 'माझें गाणें हुबेहुब शंकर गातो.' ह्यांना पीनसचा रोग झाल्यामुळें ते मिरजेस गेले होते. तेथून बरे होऊन परत जातांना त्यांच्या गायनाचा लाभ पुणेंकरांस मिळाला. त्यांचें गायन जोरकस, व तानेची विलक्षण तयारी असे. त्यास तराणे पुष्कळ येत ग्वाल्हेरची ख्यालगायकीची योग्य कल्पना त्यांच्या गाण्यावरून श्रोत्यास येई ह्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता. त्यांनीं अनेक शिष्य तयार केले. माधव संगीतविद्यालयाचे हल्लींचे हेडमास्तर राजाभय्या पूछवाले त्यांच्या शिष्यांपैकीं एक होत. त्यांचे चिरंजीव कृष्णराव पंडित हेहि उत्तम गवयी आहेत.

तानेची तयारी त्यांची तारीफ करण्याजोगी आहे त्याच्या वेळच्या मुसलमान गवयांप्रमाणें लाडक्या शिष्यानेंही एखादा विशेषराग व एखाद्या रागांतील विशेष चीज सांगण्यास विनंति केली असतां त्या शिष्यावर रागावून त्याला अभद्र बोलण्याची खोड त्याच्या अंगांत नव्हती असें नाहीं. हे इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले

# विष्णुपंत छत्रे.

विजापुराजवळ तिकोटें म्हणून खेडेगाव आहे तेथील छत्र्यांच्या कुळांत ह्यांचा जन्म झाला ह्यांच्या वडिलांचें नांव मोरोपंत विष्णुपंतास घोड्यावर बसणें व गाणें ह्या दोन गोष्टींचा लहानपणापासून मोठा नाद असे गांवांत कोणाचेंहि घोडें दिसलें कीं, त्यावर बसावें व त्यास पळवावें तसेंच गाण्याचें वेडेंवाकडें जसें येईल तसें धीटपणानें गावयाचें, मग लोक काहीहि म्हणोत; ह्या नादानें ते ग्वालेरीस गेले व तेथें बाबासाहेब आपटे यांजपाशीं घोड्यावर बसण्याची विद्या त्यानीं चांगली संपादिली व तेथें असतां त्यांच्या परवानगीनें हद्दूच्या घरीं गाणें शिकण्यास जाऊं लागले. त्यांचा आवाज फारच वाईट होता. पण मेहनतीनें त्यांनीं त्याला थोडा बरा केला होता इतकेंच वाईट आवाजाच्या गवयांत यांचा नंबर फार वर लागत होता। तेव्हां ह्याना गाणें येणार कसें व शिकविणार कोण? कर्मधर्मसंयोगानें एकदां यांचे गुरु काशीस घरच्या मुलाबाळांसह नावेंत बसून सहल करण्यास निघाले. हेहि त्यांच्या बरोबर होते नाव चालली असतां नावाड्याचें एक वल्हें मोडलें व नाव धारेस लागली' ह्या मुलानें प्रसंगावधान राखून नदींत उडी टाकून नाव दोरानें कडेला ओढिली! आंतील मंडळी घाबरली तशांत विष्णु नदींत पडला अशी मंडळींची समजूत झाली हद्दूखां म्हणाले, 'बिचारा ब्राह्मणाचा पोर फुकट मेला आतां काय करावें" जेव्हां नाव कडेला लागली तेव्हां नावाड्यानें सांगितलें कीं ह्या मुलामुळें आज सर्वांचे प्राण वांचले तेव्हां मीया खुष झाले ग्वालेरीस परत गेल्यावर मीयांनीं रहिमतखां निसारहुसेन ह्यांजबरोबर गायनाचे तालमीस विष्णूस बसण्याची परवागी दिली त्यामुळें विष्णुपंतास खास तालमीचा लाभ झाला. महाराष्ट्रांत परत आल्यावर त्यांनीं गायनविद्या फुकट अनेक विद्यार्थ्यांस शिकविली घोड्याची सरकस काढून ते हिंदुस्थानभर फिरले त्यांचा स्वभाव दिलदार व उदार होता. काशीस गेल्यावेळीं आपल्या गुरुबंधूची विपन्न अवस्था झालेली पाहून त्याला मरेपर्यंत

आपल्याजवळ चांगल्या प्रकारें ठेविलें. त्याचें अफूचें व्यसन बरेंच कमी केलें. त्याचें गायन सर्व महाराष्ट्रास फुकट ऐकविलें. ह्यानीं खटपट केली नसती तर रहिमतखां फुकट गेला असता हें खास, व त्याचें गाणें लोकांस ऐकावयास मिळालेंहि नसतें. असा हा अश्वविद्या प्रवीण, गायक, उदार, दिलदार, निस्पृह पुरुष इ स १९०६ च्या मार्च महिन्यात इंदूर येथें कालवश झाला त्यावेळीं त्याचें वय ६७ वर्षांचे होतें लेखकाच्या घराण्याचा व त्याच्या घराण्याचा तीन पिढ्यांचा संबंध होता, म्हणून ते पुण्यास आल्यावर लेखकाच्या वडिलांस भेटावयास येत व रहिमतखाच्या गाण्याचें आमंत्रण करीत ही वहिवाट त्यांचे बंधू काशिनाथपंत छत्रे यांनींहि मरेपर्यंत ठेविली होती.

## बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर.

बाळकृष्ण हा महाराष्ट्रांतील राहणार त्याचें लहाणपणीं शिक्षण बेताचेंच झालें होतें. त्यावेळेस म्ह० इ स १८६५ च्या सुमारास हल्लींसारख्या सरकारी शाळा नव्हत्या. खासगी एकादी शाळा असून हिशेब करणें, मोडी लिहिणें व वाचणें मुलास आलें म्हणजे तो पंतोजी चांगला, अशी स्थिति होती बाळकृष्णास शरीरसंपत्ति अनुकूल तेव्हां गांवात उनाडकी करावी व बरोबरीचीं मुलें जमवून खेळण्यांत वेळ घालवावा ' एकदां कथेकरी बुवा गावांत आले तेव्हां त्यांची चैन चाललेली पाहून आपण गाणें शिकावें म्हणजे आपलीहि चैन होईल हें जाणून बाळकृष्णानें ग्वाल्हेरीस गाणें शिकण्यास जाण्याचा बेत केला; पण सोबती कोणी नियेनात; तरीहि एकटेंच जाण्याचा बाळकृष्णानें निश्चय केला. ग्वालेरीस जाणें त्यावेळीं सुलभ नव्हतें. सातपुडा, विंध्याद्रिसारखे पर्वत व नर्मदा, तापी, कृष्णा, ह्यासारख्या नद्या ओलांडून जावें लागे. आगगाडी नाहीं एवढेंच नव्हे तर पायरस्त्याच्या सडकाहि चांगल्या नव्हत्या. पण निश्चयी मनाला अडकाठी कोण करणार ? बाळकृष्ण निघाला तो उपासतापास काढीत त्यानें एकदाचें ग्वालेर शहर गांठिलें. तें शहर त्यावेळीं गायनाचें माहेरघर होतें. जयाजीराव महाराजासारखा गायनप्रेमी राजा, हद्दू, हस्सूसारखे एकाचढित एक गायक; कुधवसिंगासारखे वादक; मग काय चोंहोंकडून तेथें गानविद्या शिकण्याकरितां तरुण विद्यार्थी जमा होत असत, आतांप्रमाणें नियमित वेतन देऊन, नियमित वेळीं ठराविक पाठ घ्यावयाचा, असें त्यावेळीं फारच थोडें होतें ! गुरूची तो सांगेल ती चाकरी हें वेतन, गुरूची जेव्हां लहर लागेल ती शिकण्याची वेळ, व तो

लहरीनें शिकवील तो त्या दिवसाचा धडा बाळकृष्णानें हें सर्व पत्करून गायन विद्या शिकण्याचा निश्चय करून ग्वालेरीस तळ दिला. सर्व झालें पण पोटाचें काय ? पण तीहि सोय झाली। प्रथम शिक्षणास आरंभ म्हणजे गुरूच्या मागें बसून तंबोरा वाजविणें अशा रीतीनें सर्व कष्ट व हाल सोसून बाळकृष्णाच्या विद्येस सुरवात झाली वासुदेवबुवा जोशी बाळकृष्णास शिकवूं लागले जोशी बुवा फार सरळ व मोकळ्या मनाचे असल्यानें बाळकृष्णाचा अभ्यास ठीक चालला. हद्दू, नथ्थेखा ह्यांचीं गाणीं ऐकण्यास मिळूं लागलीं बाळकृष्णाचा आवाज जोरकस, गोल, गोड, पल्लेदार व सुरेल असल्यानें त्याच्यावर त्या विद्येंतील प्रवीण लोकांचें मन बसूं लागलें. अशा रीतीनें बाळकृष्णाच्या शिकण्याचा जम चांगला बसला व तो त्यांत चांगला प्रवीण होईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं. बाळकृष्णाच्या गळ्यांत तान चांगली बसली. अनेक चिजा मिळाल्या व ग्वालेरची गायकी त्याला उत्तम साधली. त्यावेळीं हद्दूखांचा थोरला मुलगा महमदखां तयार होत होता त्याचें तयारीचें गाणें ह्यास अनेकवार ऐकावयास सांपडे, अशा रीतीनें बाळकृष्णाच्या इच्छेप्रमाणें गानविद्येंत त्याची प्रगति झाली. वासुदेवबुवा जोशी यांची त्याच्यावर चांगली मर्जी बसली ते आपल्याबरोबर गाण्यास सदा त्यास घेऊन जाऊं लागले. त्यामुळें त्याची प्रसिद्धीहि चांगली झाली. जोशी-बुवांपासून त्यांस पुष्कळ राग, अनेक चिजा व ग्वालेरची गायकी पूर्णपणें मिळाली होती नंतर ते महाराष्ट्रांत आले प्रथम साताऱ्यास दाजीबा पटवर्धन ह्यांनीं त्यास आश्रय दिला. सरकारच्या नव्या वाड्याचा तो दिवाणखाना, हा तरणा तयार ब्राह्मण गवयी, त्याची शुद्ध ग्वालेरची गायकी व तानाची तरकीब, मग काय, साताऱ्यांत ती सर्वच नवलाई हां हां म्हणतां बाळकृष्णाचा लौकिक महाराष्ट्रांत पसरला व हे राजश्री बाळकृष्णाचे बाळकृष्णबुवा बनले अनेक लोक त्यांच्याभोंवती शिकण्यासाठीं जमले, व ह्यांचें बस्तान चांगलें बसलें मुंबईचे विश्वनाथबुवा काळे ह्यांनीं व बाळकृष्णबुवांनीं 'संगीतदर्पण' नांवाचें मासिक सुरू केलें. नामांकित नायकिणींच्या मोठाल्या शिकवण्या लागून बुवांच्या चरितार्थाची उत्तम सोय झाली. श्री० बाळासाहेब मिरजकर ह्यांनीं बुवास आपल्या पदरीं ठेविलें तेथें विष्णुबुवा पलूसकर, अंतुबुवा जोशी, गुंडुबुवा इंगळे हे विद्यार्थी श्री० दाजीसाहेब कुरुंदवाडकर व श्रीमंत मिरजकर ह्यांच्या वशिल्यानें बुवांनीं शिकविण्यास घेतले. हे शिष्य चांगले तयार झाल्यानें बुवांच्या लौकिकांत अधिकच भर पडली. बुवांची शिकविण्याची पद्धति ठीक असे मिरजेस बुवांनीं घरहि बांधलें. पुढें कारण काय झालें असेल तें असो, बुवांचें मिरज दरबारीं बिघडलें व ते श्री. बाबा-

साहेब इचलकरंजीकर यांच्या आश्रयास येऊन तेथील दरबार गवयी बनले. त्यांचा मुलगा आण्णाबुवा व निराशीबुवा ही त्यांच्या विद्यार्थी मंडळींतील शेवटची जोडी होय. बुवांचा मुलगा त्यांच्यादेखत वारल्यानें त्यांस फार दुःख झालें व मनास जो धक्का बसला त्यानें ते पुढें लवकरच इ. स. १९२७ च्या सुमारास कालवश झाले। त्यांचे चहाते त्यांस महाराष्ट्रांतील 'भीष्माचार्य' असें प्रेमानें म्हणत असत, ही पदवी त्यांस खरोखर शोभत होती. त्यांनीं आपल्या गाण्यात, कोणाचें ऐकून किंवा नव्या आवडीची तरकीब म्हणून, कधीहि बदल केला नाहीं वासुदेवबुवा जोशांच्या वेळचें ग्वालेरचें गाणें कसें होतें हें जर कोणास पाहण्याची इच्छा झाली तर बुवांचें गाणें हा त्याचा योग्य नमुना होता त्यांचा आवाज शेवटपर्यंत गोल, गोड, जोरकस व सुरेल राहिला. त्यांच्यासारख्या आवाजाचे गवय्ये फार थोडेच आजवर झाले असतील. आपण किती स्वरानें गाणें गातां असा प्रेमळपणानें त्यांस प्रश्न केला असतां ते म्हणत, " आम्ही बारा स्वरानें गातों; कोठें कमीजास्त स्वर लागत असल्यास त्याबद्दल आमचें म्हणणें नाहीं 'अतकोमल' व 'तर तीवर' स्वरांच्या गोष्टी बोलण्यात आहेत आमच्या गाण्यात त्या नाहीत; तसे स्वर लागतात असें म्हणत असल्यास आम्ही ते समजून लावीत नाहीं. चीजेच्या धोरणानें लागत असतील पण तसा अभ्यास करून आम्ही लावीत नाहीं व आमच्या गुरूंनीं आम्हास तसें शिकविलेंहि नाहीं ही अलीकडील सुधारणा आहे; त्यात आम्हांस खरोखर कळत नाहीं, मग आम्हांस अडाणी कां म्हणाना।" एकदां त्यांच्या मित्रानें त्यांस भैरव व रामकली राग वेगळा करून दाखवा असें विचारलें, तेव्हा तें मोठ्यानें हसून म्हणाले, 'अहो, आम्हास कोणी असें शिकविलें आहे! दोनहि रागांतील चीजा म्हणून दाखवितों; तुम्ही शास्त्र म्हणत असाल तर तें आम्हांस येत नाहीं' ह्यांना रंगदेवता प्रसन्न असे. हे गाण्यास बसले कीं, रंग आलाच ह्याचें गाणें कधीं जमलें नाहीं असें झालेंच नाहीं. आपण एक चांगलें गायक आहों अशी त्यास आत्मप्रचीति होती. एकदां ते बोलतां बोलतां म्हणाले कीं, " अल्लीखां व फत्तूखा ह्यांची मुंबईस गाठ पडली, तेव्हां मी त्यास सहज म्हटलें " आपलें गाणें एकदा स्वस्थपणें ऐकावयाचें आहे. तेव्हा ते म्हणाले, 'आपलेंहि गाणें एकदां आम्हांस ऐकवावें,' मी बरें म्हटलें' पण जेव्हां त्यांनीं आपलें गाणें मला ऐकविलें नाहीं तेव्हां आम्हीहि पण आपलें गाणें त्यांस ऐकविलें नाहीं " बुवांनीं आपले गुरु

वासुदेवबुवा जोशी यांस महाराष्ट्रांत आणून त्यांचा योग्य मान व प्रतिष्ठा केली, थोर व गुणग्राही लोकांनी त्यांची त्यावेळीं योग्य संभावना केली त्याचप्रमाणे बुवांच्या शिष्यांनीं त्यांचा योग्य सन्मान करून त्यांस व आपल्यास साजेल अशी गुरुदक्षिणाहि दिली. ह्या करण्यांत उभयतां गुरु-शिष्यांचा मोठे-पणा व्यक्त होत आहे. बुवांस गाण्यास बोलाविलें असतां एक दोन शिष्यांस बरोबर घेऊन जाऊन केवळ तबोऱ्याच्या जोडीच्या साथीवर गाणें रंगवीत. प्रथम स्थायी एकवेळ समग्र म्हणून मग अंतरा नंतर पुनः स्थायी व अंतरा डौलदार रीतीनें म्हणून मग गायकी सुरू करीत त्याचप्रमाणें कोणी विशेष शिफा-रस केल्यासच अप्रसिद्ध राग म्हणत त्यांना अप्रसिद्ध राग येत नव्हते असें मात्र कोणी भलतीच समजूत करून घेऊ नये. पण आतां मात्र सगळाच मनु फिरला आहे त्यांच्याच शिष्यशाखेंत तबोरा लावण्यास पेटीच्या सुराची मदत लागते; व साथीसहि पेटी अवश्य होऊन बसली आहे! गायन सुरू करितांच चीजेचा स्थायी व अंतरा होतां होईनों न म्हणतां तानांचें डबोलें श्रोत्यांपुढें सोडावयाचें ' कोणी शिफारस न करिता नदराग, रामदासीमल्हार, मालगुंजी, नायकी कानडा ह्यासारखे अप्रसिद्ध राग गाण्यास सुरुवात करून आपल्या ज्ञानाचें श्रोत्यापुढें प्रदर्शन करा-वयाचें । ह्या रागांची तालीम त्यास गुरूपासून मिळाली असेल असें मात्र कोणी समजू नये. एकादी दुसरी चीज ऐकिलेली म्हणावयाची व वेडीवांकडी तानबाजी त्याला जोडून द्यावयाची । अशानें ज्ञाने किंमत करितात । फिरलेल्या काळाच्या ओघांत हें बुवांच्या शिष्यशाखेचें करणें कोणास योग्यहि वाटण्याचा संभव आहे. व ' गुरूसे शिष्या सवाई ' असेंहि कोणी म्हणेल. पण ही गायनकलेची सुधारणा खचित नाहीं हें मत तज्ज्ञांस पटण्याजोगें आहे व पुढें बाळकृष्णबुवांसारखे योग्य अधिकाराचे गवई महाराष्ट्रांत निपजतील तो सुदीन होय पण तो सुदीन जवळ नसून भविष्यकाळांत फार दूर आहे असें म्हणणें भाग आहे.

## रामभाऊ सावेरकर.

हे ग्वालीयेचे इंदोरास रहात असत. ह्यांचा आवाज चांगला असून गाण्याची तरकीब ठीक होती. ग्वालेर घराण्यांतील गायकींत हे तयार झाले होते. हे अंध असत ह्यांच्यावेळीं एका घराण्यांतील एकच गुरु करावयाचा. त्या विधीस ' गंडा बांधणें ' म्हणत व त्या वेळीं ह्या विधीस फार महत्त्व असे. ह्यांची ज्ञानलालसा विलक्षण होती ग्वालेरव्यतिरिक्त दुसऱ्या घराण्यांतील

गवयाची जेव्हा ह्यांनीं गाणीं ऐकिलीं तेव्हा नव्या चीजा व नवे राग शिकण्याचा ह्यास मोह पडला त्यांच्या स्नेह्यांनीं पर घराण्यातील गवयांचा गंडा बांधणें अप्रशस्त आहे व तसें केल्यास तुम्ही लोक फजिती करतील असा सल्ला दिला. परंतु त्यास न जुमानता त्यांनी पुनः एकवार दुसरा गंडाबंधन-विधि केला कारण ते गवई गंडा बांधून घेतल्याशिवाय तालीम देईनात! अशा प्रकारचे ते विद्याभिलाषी होते. हे इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत परलोकवासी झाले

## बापू जोशी.

हे नागपूरचे राहणारे. ह्यांच्या गायनाची प्रसिद्धि सर्व मध्यप्रांतभर असे हे जातीनें ब्राह्मण असून दिमण्यांत मोठे रुबाबदार होते ह्यांनीं गायनकला कोणा गुरूपासून संपादन केली ह्याची विश्वसनीय माहिती प्रस्तुत लेखकास लागली नाहीं ह्यांचा आवाज फारच चांगला अशी त्यावेळच्या लोकांत प्रसिद्धी असे. विष्णुपंत छत्रे अनेक वेळा म्हणत कीं, "मी पुष्कळ चांगले चांगले गवयी ऐकिले, परंतु बापू जोशासारखा मधुर व सुरेल आवाजाचा गवयी क्वचितच मला दिसला." हे ख्याल गात असत ते स्वतः नेहमीं असें म्हणत कीं, 'ज्याला आवाजाची देणगी देवानें दिली नाहीं त्यानें गायनकला शिकू नये.' हे चांगले वयातीत होऊन इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले. ह्यांच्या थोड्याहि सहवासांत "कंठबिन गावें, और नयन बिन चमकावें" हें वाक्य श्रोत्यांच्या कानावर अनेकवार पडत असे.

## पांडुरंगबुवा येवलेकर.

हा ख्यालगायक होता महाराष्ट्रांत व विशेषेंकरून खानदेशांत हा फार प्रसिद्ध होता. ह्याला लहानपणापासून गायनाचा नाद त्या नादानें तो प्रथम धारेस व तेथून ग्वालेरीस गेला. ग्वालेरींत वासुदेवबुवा जोशी ह्यांजपाशी त्यानें गायनाचा अभ्यास केला ह्याचा आवाज बारीक पण गोड व सणसणीत होता. ह्याची कसरत करण्याची तऱ्हा पाहून जोशी बुवानें आपला मुलगा भय्या ह्याजबरोबर त्यास कसरत करण्यास बसवावें. त्यामुळें ह्यास बरेच अप्रसिद्ध राग आले, व चीजांचा संग्रहहि ह्यांजपाशीं फार झाला. ह्याच्या गायनाची अशी खुबी होती कीं, ह्याच्या गाण्याचा रंग तेव्हांच बसे ह्यानें फारसे शिष्य तयार केले

नाहींत. ह्याचें वर्तन फारसें व्यवस्थित नसे' तो नेहमीं म्हणे कीं, 'न कर्ता उस्ताद व कर्ता शिष्य ह्यांची बरोबरी होणार नाहीं.' पुण्याचे प्रसिद्ध महादेव मोरेश्वर कुंटे ह्यास गायन शिकविण्यास हा कांहीं दिवस शिक्षक होता हा शेवटीं खानदेशांत जाऊन राहिला व तिकडेच इ. स २० च्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## बळवंतबुवा बापट.

कोकणांत नारिंग्रें म्हणून खेडें आहे तेथील हा राहणारा. हा दिसण्यांत चांगला व चलाख होता प्रथम हा धारेस व नंतर ग्वालेरीस गेला, तेथें ख्याल गायनाचा ह्यानें चांगला अभ्यास केला. नंतर महाराष्ट्रांत येऊन कांहीं दिवस कोल्हापुरास राहिला पुढें पुण्यास येऊन पुणें गायनसमाज, फिमेल हायस्कूल ह्या संस्थांत कांहीं वर्षें ह्यानें नोकरी केली. ह्यास पुढें दम्याचा उपद्रव जडला मग हा मुंबईस खासगी शिकवण्या करून निर्वाह करूं लागला. ह्याचा स्वभाव फारसा मनमिळाऊ नव्हता. ह्याला अफूचें व्यसन होतें हा कुटुंब वत्सल होता ह्यास तीन पुत्र आहेत. हा इ स. १९०९ च्या सुमारास कालवश झाला.

## गणपतिबुवा भिलवडीकर.

महाराष्ट्रांत भिलवडी म्हणून कृष्णाकांठीं क्षेत्र आहे तेथील हे राहणारे. ह्यांचे आजोबा चांगले पुराणिक होते, त्याबद्दल त्यांना कोल्हापूर इलाख्यांत इनाम मिळालें होतें. गणपतिबुवास गाण्याचा नाद लागल्यावर थेट ते ग्वाल्हेरीस गेले, त्यावेळीं वासुदेवबुवा जोशी हयात होते, पण बरेच वृद्ध झाले होते. हे ग्वालेरीस गेल्यावर थोड्याच दिवसांत जोशीबुवा नेपाळांत गेले, तेव्हां जातांना त्यांनीं उज्जनींत कृष्णशास्त्री शुक्ल ह्यास गणपतीस गाणें शिकविण्याबद्दल सांगितलें. गुरूची आज्ञा मानून शास्त्रीबुवांनीं गणपतीस तयार केलें. पुढें ते महाराष्ट्रांत येऊन बेळगांवांत शिकवण्या करून आपला निर्वाह करूं लागले. ह्यांचा आवाज मर्दांनी, गोल व गोड होता. शिकवण्यांच्या नादानें ह्यांनीं कधीं मैफलींत गाणें फारसें गाइलें नाहीं! ह्यांना चीजांचा संग्रह करण्याचा विलक्षण नाद होता. ह्यांच्याजवळ इतर कोणत्याहि गायकांपेक्षां चीजांचा संग्रह मोठा होता. ह्यांची शिकविण्याची हतोटी चांगली होती पुणें गायनसमाज, कन्याशाळा, मुंबईचा गायनोत्तेजक समाज वगैरे ठिकाणीं ह्यांनीं अनेक वर्षें नोकरी केली पुढें ते सांगलीस जाऊन

राहिले होते; इ. स. १९२८ च्या सुमारास तेथेंच ते कालवश झाले त्यांची शिष्यशाखा मोठी आहे. त्यांना रामचंद्र नांवाचा एक मुलगा असून तो चांगला गवई आहे. तो मुंबईमध्यें न्यु स्कू. मध्यें गायनशिक्षक आहे. प्रस्तुत लेखकाच्या वडिलांचे हे गुरु सात वर्षे ह्या बुवांनीं लेखकाचे वडिलांस रोज दोन वेळ तालीम दिली. अनेक रगाडगाच्या चीजा शिकविल्या हे मोकळ्या मनाचे असल्यामुळें चीजा देण्यास त्यांनीं कधीं खळखळ केली नाहीं. आपल्या सर्व शिष्यांत 'पंतांनीं' वरचढ केली व चिकाटी धरून अभ्यास केला ह्याबद्दल त्यांस कौतुक वाटे. 'कोणी वर्षभर, तर कोणी सहा महिने, फार झालें तर कोणी दोन वर्षे अभ्यास करी व पुढें सोडून देई, ह्यामुळें माझ्याजवळील चीजांचा संग्रह पंतांशिवाय कोणास पोंचला नाहीं' असें ते अनेकवार म्हणत. पुण्यास प्लेग झाला म्हणजे लेखकाचे वडील जात तेथें हे त्यांचेबरोबर जात असत, व त्यांची बडदास्त लेखकाचे वडील चांगली ठेवीत म्हणून त्यांच्यावर त्यांचा लोभ असे. असे निष्कपटपणें शिकविणारे गायक फार थोडे चीजेच्या रागाचें नांव विचारलें असतां किंवा अमुक चीज शिकवा म्हटलें असतां चिडणारे, रागावणारे व प्रसंगीं चपराक देणारेच फार! आतां तसा प्रकार ह्या शिक्षणांत राहिला नाहीं इतर शाळेप्रमाणें फी द्यावी व शिकावें, असें झाले आहे! ह्या फरकाबद्दल समाधान व्यक्त केल्यावांचून राहवत नाहीं.

## शंकरबुवा धुळेकर.

हा धुळ्याचा राहणारा त्याचा गायनकलेचा अभ्यास विष्णुपंत छत्रे ह्यांजपाशीं झाला. त्याचा आवाज बारिक पण मधुर होता, व गायनाची लटक चांगली होती. प्रथम बरीच वर्षे तो मीयां रहिमतखां ह्यांच्याबरोबर राहून कसरत करी. त्यामुळें ग्वालेरच्या ख्यालाचें वळण त्याच्या गळ्यांत चांगलें बसलें होतें. काहीं दिवस शिकवण्या शिकवून निर्वाह केल्यावर त्यानें 'धुळें मेल ट्रेनिंग कॉलेजांत' गायनशिक्षकाची नोकरी धरिली. मैफलींत गाऊन रंग करणें त्यास चांगलें साधलें होतें. हा खानदेशांत व महाराष्ट्रांत बराच प्रसिद्ध होता. सेवानिवृत्त झाल्यानंतर तो धुळ्यास इ. स. १९२५ च्या सुमारास कालवश झाला

## दत्तुबुवा जांभेकर.

हा मूळ कोकणचा राहणारा. त्याला गायन शिकण्याची इच्छा झाल्यावर तो ग्वालेरीस गेला. तेथें बाळासाहेब गुरुजीजवळ तो ख्यालगायन सहा वर्षे शिकला.

पुढें कांहीं दिवस तो काशीस राहिला नंतर महाराष्ट्रांत आला. नाटकांतील प्रसिद्ध नट भोसले हे त्याच्या शिष्यांपैकीं होते. ह्या बुवास कोणतेंहि व्यसन नव्हतें. त्याचा स्वभाव मनमिळाऊ होता. मुंबईस तालमी देऊन हा कांहीं दिवस होता. मैफलीमध्यें आपलें गाणें रंगविण्याची हतोटी त्याला चांगली होती. पुण्यास त्याला जुदराचा आजार झाला तेव्हां त्याचे शिष्य भोसले ह्यांनीं त्याची चांगली चाकरी केली. शेवटीं तो आजार असाध्य होऊन इ स १९१५ च्या सुमारास त्यांतच त्याचा अंत झाला.

## मार्तंडराव दवणे.

हा वेरूळचा राहणारा विष्णुपंत छत्रे ह्यांजपाशीं हा गायन शिकला. बी बी सी. आय् रेल्वेमध्यें हा नोकर होता. ह्यानें नोकरी संभाळून गायनाचा बराच अभ्यास केला होता गाण्यांत ह्याचें लयीकडे फार लक्ष असे. ह्याचें गायन बरेंच मनोरंजक असे हा नोकरीमुळें सदा मुंबईत असे ह्याचें मित्रमंडळ मोठें, ह्याचा स्वभाव मनमिळाऊ होता हा इ. स. १९०० च्या सुमारास कालवश झाला.

## मनोहरबुवा जोशी.

हे ख्यालगायक होते ह्यांची महाराष्ट्रात प्रसिद्धि मागील पिढींत चांगली होती. औंधकराच्या पदरीं असलेले अनूबुवांचे हे वडील बरीच वर्षें औंध संस्थानांत हे नोकर होते हे मोठे विनोदी असत सांगली, मिरज, कुरुंदवाड येथील गणपती उत्सवात हे आपल्या मित्र गवयाबरोबर जात. कोणी "बुवा तुम्हांस बिदागी इतकी थोडी कां" असें थट्टेनें विचारलें तर ते म्हणत "अरे मी मिशाळ गवयी गुळगुळीत गालाचा लुगड्या गवयी असतों तर बिदागी जास्त मिळती!" असें म्हणून मोठ्यांदा हसत ते आपल्या मित्रास म्हणत 'अरे गातां किती! बिदागीच्या बेतानें गावें. तुम्ही तासभर गायला व मी अर्धी घटका गाइलों तरी तुम्हां आम्हांस बिदागी सारखीच!" हे प्रेमळ स्वभावाचे व मनमिळाऊ होते. हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेले.

## भिकूबुवा इंगळे.

हे ख्यालगायक होते ह्यांची गाण्याची तऱ्हा चांगली स्वभाव मनमिळाऊ; हे फारसे व्यसनी नव्हते. औंध संस्थानांत ह्यांनीं बरीच वर्षें नोकरी केली. विशेष

स्नेहीमंडळींत बसले असतां हे ठुमरी फार नटवून म्हणत. गुडूबुवा म्हणून त्यास एक मुलगा होता. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि ह्यांचे वडील श्रीमंत श्रीनिवासराव पंत ह्यांच्या कारकीर्दींत हे औंधास नोकर होते. चांगलेपणाबद्दल ह्यांची महाराष्ट्रांत प्रसिद्धि होती.

दा. क्र. ४३२६

## विष्णुबुवा पलुसकर.

महाराष्ट्रांत तासगांव तालुक्यात पलुस म्हणून एक गांव आहे. तेथें एक चित्तपावन गृहस्थ राहत असे. तो कथेकऱ्याचा धंदा करीत असे. तो कथा चांगली करी, व त्यावर आपला प्रपंच चांगल्या रीतीनें चालवीत असे. त्यास दिगंबरबुवा पलुसकर ह्या नांवानेंच त्या गांवच्यांत ओळखीत असत. त्यास एक मुलगा होता, त्याचें नांव विष्णु. तो चांगला गोरा गोमटा व बांधेसूद असे. कधीं कधीं बुवा लडिवाळपणानें त्यास आपल्या मागें कथेच्या वेळीं झांज हातांत देऊन उभा करीत. पुढें त्याचें मराठी शिक्षण त्या वेळेच्या रीतीप्रमाणें झाल्यावर मुलाची हुषारी पाहून मुलास इंग्रजी शिकविण्याची बुवास हौस वाटली व शिकण्यास त्यास मिरजेस ठेविलें. इंग्रजी शाळेंत असतांना त्याच्या वर्गांत 'केसरी' पत्राचे प्रसिद्ध संपादक रा. न. चिं. केळकर हे होते असें म्हणतात. कांहीं दिवसांनीं विष्णूचे डोळे बिघडले. कारण कांहीं होवो पण डोळे बिघडले खरे; इंग्रजी पुस्तकें वाचून डोळे अधिक खराब करणें चांगलें नाहीं असें वाटून विष्णूची इंग्रजी शाळा सुटली. पुढें काय करावें हा विचार आलाच. त्या वेळीं बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे गवई श्री. बाळासाहेब मिरजकर यांच्या पदरीं होते, तेव्हां त्यांच्याजवळ त्यास गाणें शिकण्यास ठेवावें असा विचार ठरला. ह्या विचारास श्री. बाळासाहेब व श्री. दाजीसाहेब कुरुंदवाडकर यांनीं संमति दिली, व विष्णूचें गायनशिक्षण सुरू झालें. त्याचे स्वाध्यायी अनंत मनोहर जोशी व गुंडुबुवा, इंगळे होते. ह्या सर्वांचें शिक्षण ठीक चाललें. त्या वेळीं आतांप्रमाणें शिक्षणास पुस्तकें नव्हतीं, क्रम नव्हता, व ठराविक वेळही नव्हती। शिक्षकांच्या इच्छेवर सर्व अवलंबून. शिक्षकाची सेवा ही फी. विद्यार्थ्यांस बुवांनीं मन लावून चांगलें शिकविलें. चीज शिकवावयाची त्याचा राग कोणता असें मात्र शिष्यानें विचारतां कामा नये; तें पाप त्यानें केल्यास त्या पापाबद्दल त्यास श्रीमुखांत बसावयाचीच! विष्णूचा आवाज गुरूसारखा मोठा, पल्लेदार, मर्दानी व गोड होता. बाकी दोघां शिष्यांत गुंडूचा आवाज बाईट होता व अनंताचा मध्यम होता.

बुवांनी अनेक रागांत पुष्कळ चीजा शिष्यास शिकविल्या आपल्याबरोबर मैफ-लींत गावयास लावून त्यास धीट केलें अशारीतीनें विष्णूचें शिक्षण आटोपलें बुवा जेव्हां परगांवीं जात तेव्हां विष्णूस बरोबर नेत व मैफलींत त्याचा रंग पडे शिक्षण आटोपल्यावर बाहेर निरनिराळ्या शहरीं जाऊन आपल्या विद्येचें प्रद-र्शन करून लौकिक व पैसा कमवावा अशी विष्णूस इच्छा झाली व ती योग्यच होती विष्णु धूर्त व शहाणा होता म्हणून बाहेर पडण्यापूर्वी त्यानें एक वर्ष मिरजेस राहून, उत्तम रीतीनें, रोज ७।८ तास मनापासून कसरत केली व नतर तो बाहेर पडला मोठाल्या नामांकित शहरीं आपले मुजरे करीत व लौकिक संपादन करीत शेवटी तो पंजाबांत गेला तेथील लोक श्रीमान् शौकीन् व त्या प्रांतात ख्यालाच्या गाण्याचा अभाव। मग काय ? विष्णु दिसण्यात रुबा-बदार, आवाज मधुर व मोठा, गायकी चित्ताकर्षक ह्यामुळें त्यानें पंजाब काबीज केला; व तेथें आपलें ठाणें दिलें तेथें गंधर्व महाविद्यालय' नावाची संगीत शाळा इ स. १९०१ मध्यें काढिली त्यामुळें तेथील लोकांवर चांगली छाप बसली व बुवाचा लौकिक वाढून त्यास स्थाईकपणा आला. तेथें असतांना त्यांनी अनेक शिष्य तयार केले, पुस्तकें लिहिली. पण आपला मोठेपणा व वैभव, स्वकीयजन, इष्टमित्र ह्यानीं पाहिल्याशिवाय मनुष्यास बरें वाटत नाही, असा सामान्य नियम आहे; तेव्हां बुवास वाटलें कीं, महाराष्ट्रात संपत्तीचें माहेरघर जें मुंबई शहर तेथें पंजाबाप्रमाणें आपण लौकिक मिळवावा हा हेतु मनांत धरून त्यानीं मुंबईस इ स १९०८ सालीं गांधर्वमहाविद्यालय स्थापिलें. त्यानंतर मोठी टोलेजंग इमारत बांधिली व मुंबापुरस्थ लोकांना दिपविण्याजोगें सर्व प्रकारचें सामानसुमान तयार केलें मुंबईत अशा प्रकारची संगीत शाळा पूर्वी नव्हती विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्याची संख्या पुष्कळच वाढली सर्व प्रकारें शोभिवंत असा थाट उडून गेला बुवाचें बोलणें मधुर, गाणें गोड, रुबाबदारपणा, शिष्य-शाखा मोठी, बुवा निर्व्यसनी तेव्हां मुंबईत त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचा लौकिक वाढला। मुंबईस त्यावेळी इंग्रजी हायस्कुलें सरकारी व खासगी होती, तशा धरती-वर क्रमिक पुस्तकें, दरमहाच्या परीक्षा, सहामाही परीक्षा, वार्षिक परीक्षा वगैरे व्यवस्था ठेवून शाळाखात्याच्या अधिकाऱ्याकडे मदतीकरितां अर्ज केला असता तर त्यांच्या विद्यालयास स्थाईकपणा येऊन शैक्षणिक दृष्टीनें मान मिळाला असता पण बुवांस तशा प्रकारची सल्ला कोणीं दिली नाही असें वाटतें ! काहीं वर्षांनी बुवांच्या आश्रयदात्यांनी व हितचिंतकांनी 'आपल्या संस्थेचा

ट्रस्ट करा म्हणजे तिला चिरस्थाईत्व येईल ' अशी योग्य सल्ला दिली; पण बुवानीं ती मान्य केली नाहीं ! तेथून त्यांच्या लौकिकास उतरती कळा लागली। मुंबईहून ते नाशकास गेले, पण एकदां घडी विस्कटली ती त्यांच्या जन्मांत पुनः नीट बसली नाहीं अखेर इ. स. १९२१ मध्यें ते कालवश झाले. त्यांच्या हातून ज्या चांगल्या गोष्टी घडल्या त्याची वाचकास ओळख करून दिल्याशिवाय त्यांचें चरित्र पूर्ण होणार नाही

त्यांच्या शिक्षणाच्या मानानें त्यांचें ध्येय फार मोठें व दृष्टीचा पल्लाहि मोठा, व धमकहि जबर होती. त्यानीं अनेक शिष्यास शिकविलें व विद्यार्थीदशेंत त्यांचा प्रतिपाल केला, असा कोणी केला नाहीं. संगीत विद्येवर निर्वाह करणारा त्यांच्या इतका दुसऱ्या कोणाचा शिष्यवर्ग नाहीं. सार्वजनिक जलसे, कार्यक्रम करून ते वेळेवर करण्यांत त्याची बरोबरी कोणीं केली नाहीं. नाटक कंपन्यांस जसे आण्णा किर्लोस्करांनी वक्तशीरपणाचें वळण लाविलें, तसें गाण्याच्या जलशास वक्तशीरपणाचें वळण लाविल्याचा मान विष्णुबुवास देणें योग्य होईल. संगीतावरील सर्वमान्य संस्कृत ग्रंथ छापून, त्याची भाषांतरें छापणें, आपल्या गुरूपासून अनेक रागात ज्या त्यास अनेक चीजा प्राप्त झाल्या त्या नोटेशननें छापून प्रसिद्ध करणें, ह्या गोष्टी त्यास सहज करितां आल्या असत्या; पण योग्य सल्लागार न मिळाल्यानें त्या राहून गेल्या. हरिदासाचा मुलगा व धंदेवायीक गवयी ह्या दृष्टीनें विष्णुबुवा पलुसकराकडे पाहिलें असता त्याची ध्येयें उच्च होतीं व त्यांनी आपल्या हयातींत जितकें कार्य केलें तितकें दुसऱ्या धंदेवायीक गवयाच्या हातून झालें नाहीं असें म्हणणें भाग आहे ' एकदा पंडितजींचे शिष्य विनायकबुवा पटवर्धन पुण्यास आले, त्याची बहीण लेखक राहत होता त्याच वाड्यांत रहात असे पटवर्धन बुवांनी लेखकाच्या वडिलांचें गाणें सहज ऐकिलें, तेव्हां निरोप पाठवून ते त्यांस भेटण्यास आले पटवर्धनबुवांच्या चुलत्याची व लेखकाच्या वडिलांची दाट ओळख होती, हें बोलता बोलतां समजलें तेव्हां बुवा मोकळेपणानें बोलू लागले. त्यांना विष्णुबुवांनी कसें शिकविलें, काय शिकविलें वगैरे गोष्टी चालल्या तेव्हां लेखकाचे वडिलांनीं सांगितलें कीं, ' सा, रे, ग, म हे चार स्वर घ्या व त्यामधून चार राग करून दाखवा;' तेव्हां पटवर्धन बुवा म्हणाले, ' आम्हाला कधीं आमच्या गुरूनी असें करून दाखविलें नाहीं; कृपा करून आपणच तसें करून दाखवा ' तेव्हा त्यांनीं लगेच तसें करून दाखविलें तें पाहून पटवर्धन बुवा चकित झाले; खुषहि झाले, पण थोडे वरमले. मग कांहीं वेळानें उठून गेले संध्याकाळीं

ही झालेली हकीकत त्यांनीं विष्णुबुवांस सांगितली तेव्हां दुसरे दिवशी सकाळीं विष्णुबुवा आपल्या शिष्यासह आमच्या बिऱ्हाडीं आले, व लेखकाच्या वडिलाची गांठ घेऊन म्हणाले, "काल आमच्या शिष्यास काय विचारलें व आपण काय त्याला करून दाखविलें तें आमच्यासमोर गाऊन दाखवा' तेव्हा वडील म्हणाले, 'कालचें काल गेलें आज नवें कांहीं करू. सा, नि, ध, प हे चार स्वर घ्या व तीन राग करा बुवा म्हणाले, "आम्हांस तसें कोणी शिकविलें नाहीं व आम्हीहि आपल्या शिष्यास असें शिकविलें नाही, आपल्या तोंडून आम्हांस तें ऐकवा" त्यांनी लगेच गाऊन निरनिराळे राग करून बुवांची खात्री पटविली' बुवा खुष झाले व त्यांचे खांडेकर, कशाळकर वगैरे शिष्य थक्क झाले. मग इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलून बुवा आपल्या परिवारासह गेले संध्याकाळी बुवांकडून मनुष्य आला, तेव्हां वडील व त्यांच्या बरोबर लेखकहि त्यांच्या बिऱ्हाडीं गेले. बुवा म्हणाले 'आपण आमच्या विद्यालयांत दरमहा एक व्याख्यान द्यावें, आपला जाण्यायेण्याचा खर्च देईन व आपली भोजनाची वगैरे व्यवस्था नीट ठेवीन; आमच्या ह्या म्हणण्यास रुकार द्यावा' वडील म्हणाले, "मी बारा स्वरानें राग गातों, आपण जास्त स्वरानें राग गाता; त्या जास्त स्वरांच्या जागा आपण कायम करून त्यांस देशांतील प्रमुख कलावंतांची संमति मिळविली नाहीं, तेव्हां माझ्या व्याख्यानांत जर त्याबद्दल मी टीका केली तर आपणास ती कशी पटेल व आपल्या विद्यालयांत आपल्या मतांविरुद्ध मी बोलणें मला बरें वाटत नाहीं. ह्याकरितां मी व्याख्यान देणें बरें नव्हे." तें बुवास पटलें व व्याख्यानाचा बेत रहित झाला एकदा लेखकाचे वडील मुंबईस गेल्यावेळीं विष्णुबुवांनी आपलें विद्यालय पाहण्यास त्यांस पाचारण केलें ते विद्यालयांत गेले, बुवांनीं सर्व वर्ग अभ्यास शिकवीत असतांना दाखविले व कांहीं सूचना करा म्हणूनहि सांगितलें नंतर बुवांनीं 'रामनामआधार' नावाचा दिवाणखाना दाखविला व त्यांत लावावयाच्या रागाच्या तसबीराहि दाखविल्या व म्हणाले, "ही रागाची चित्रें पहा या खाली माझ्या मनांत त्यांच्या स्वराचे लहान बाजे बसवावयाचे आहेत मालकस, भैरव वगैरे रागांचीं चित्रें दाखविलीं कीं, त्याचे स्वर काढून दाखवावयाचे" वडिलांनीं विचारलें कीं, "हीं चित्रें कशावरून तयार केलीं आहेत?" बुवा म्हणाले, "मजपाशीं 'संगीतदर्पण' नावाचा संस्कृत ग्रंथ आहे त्यावरून." वडील म्हणाले, "तो ग्रंथ इ स च्या सतराव्या शतकांत लिहिलेला आपण त्या रागाचे आजचे स्वर वाजविणार' ह्याचा कांहीं विचार केला आहे का?

त्या ग्रंथांत भैरव रि, प वर्जित आहे व मालकौंस कसा आहे? तेव्हां हें कसें जमणार? दुसरें असें कीं, आपण जे राग ह्या चित्रास दिले आहेत त्यांचा व त्या रागास लागणाऱ्या स्वरांचा कांहीं संबंध आहे का? दिवाणखाना सजविण्यास हीं चित्रें उपयोगीं येतील पण संगीताच्या दृष्टीनें त्याचा कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं।" पंडितजी मानी पुरुष त्यास आपली चूक लक्षांत आली असावी पण उपयोग काय? बोलून तर गेले। प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे हे प्रस्तुत लेखकाच्या वडिलांचे परमस्नेही होते ते आमच्या घरीं येत असत, तर कधीं वडील आनंदाश्रमात जात. गाण्याच्या गोष्टी निघाल्या म्हणजे ते म्हणत, "मला पलुसकरांचें गाणें आवडतें. कारण त्याचा आवाज गोड म्हणून कानास आनंद होतो हातवारे ते करीत नाहींत म्हणून डोळ्याला त्रास होत नाहीं, व मराठी चीजा म्हणतात तेव्हां अर्थ कळतो म्हणून मनास समाधान होतें।" ते अनेकवार वडिलांबरोबर पलुसकरांच्या गाण्याला गेले होते.

## गुंडुबुवा इंगळे.

भिकुबुवा इगळे ह्यांचे हे चिरंजीव ह्यांचें शिक्षण इचलकरंजीकरबुवा यांजपाशीं झालें. हे स्वभावानें थोडे तिरसट होते ह्यांचा आवाज चांगल्यापैकीं नव्हता. वडिलांच्या मागें औंध संस्थानांत हे फार दिवस नोकरीवर नव्हते औंध सोडल्यावर हे सांगली संस्थानांत नोकर झाले त्यांचे दोन मुलगे ह्या कलेंत तयार झाले आहेत. ह्यांनीं बरेच विद्यार्थी तयार केले आहेत हे सांगली येथें इ. स. १९२५ च्या सुमारास कालवश झाले

## रामभाऊ अलीबागकर.

हा कोंकणचा राहणारा लिहिण्यावाचण्याची गोडी नसल्यानें तो शाळेंत कधीं नियमानें गेला नाहीं. उनाड मुलांची संगत लागली त्यामुळें हरिदासाच्या मागें झांज वाजविण्यातहि टगळमगळ। मग स्वारीनें ग्वाल्हेरचा रस्ता धरिला. तेथें राहून पांचसात वर्षें गायनाचा अभ्यास मात्र मन लावून केला ईश्वरकृपेनें आवाजाची देणगी लाभली होती, त्यामुळे बऱ्या गायकांत गणना होऊं लागली तेथून मग तो महाराष्ट्रांत आला इकडे तिकडे फिरून पोट भरेना तेव्हां बेळगांवास राहिला. तेथें त्याचें बस्तान चांगलें जमलें पैसाहि ठीक मिळाला व लौकीकहि

चांगला झाला आवाज चांगला, गाण्याचा ढंग योग्य, त्यामुळें मैफलीची रंगत चांगली होऊं लागली. शिकवण्या मिळाल्या, वकील मंडळींत परिचय जडला, ग्वालेरची गायकी चांगली संपादन केल्यानें प्रतिष्ठा चांगली झाली. अशा रीतीनें आयुष्य आक्रमून हा गवई इ. स. च्या १९ व्या शतकाच्या शेवटीं कालवश झाला

## तान्रसखां.

हा घरंदाज गवयी होता आपण श्रीचंद ह्याच्या घराण्यातील आहों असें तो मोठ्या डौलानें सांगे. हा ख्याल गाई. तराणे गाण्याबद्दल यांची प्रसिद्धि होती. हा दिल्लीचा राहणारा ग्वाल्हेर दरबारचे प्रसिद्ध ख्यालगायक मीयां हद्दूखां वारल्यावर, श्री. जयाजीराव महाराजांनी त्यास दरबार–गवयी नेमिलें हद्दूखांपेक्षां यांना पगार कमी होता एकदां महाराजांस त्यानें विनंति केली की, ' महाराज मला पगार वाढवून तो हद्दूखां इतका करावा ' महाराज हसून म्हणाले, " तुम्हाला दरबार–गवयी म्हणून ठेविलें आहे खरें, पण तुमची योग्यता हद्दूखां इतकी मी समजत नाहीं हद्दूखां इतका पगार मिळणार नाहीं " पुढें कांहीं दिवसांनी हा ग्वाल्हेर सोडून हैदराबादेस गेला. तो इ स १८८५ च्या सुमारास वारला उमरावखां म्हणून त्यास एक मुलगा आहे.

## बहिरामखां.

सवाई रामसिंग जयपूरच्या गादीवर होते त्या वेळीं जयपुरांत कलावंत लोक बरेच जमले होते. त्यांत गायन, वादन व नर्तन या एकाएका कलेंत प्रवीण असे अनेक लोक दिसत होते त्यांपैकीच बहिरामखां हे होत. यांना आवाजाची अनुकूलता नव्हती तरी उत्तम गवयी म्हणून त्या वेळीं यांची ख्याति होती त्यांनीं अनेक प्रसिद्ध अप्रसिद्ध रागांची चर्चा करून जयपुरास एक पद्धत लाविली व इतर कलावंतांस ती मान्य होऊन त्याप्रमाणें लोक गाऊं लागले. अशा रीतीनें ते गायनशास्त्रज्ञ बनले व लोक बहिरामखांचा शब्द प्रमाण मानू लागले तेव्हांपासून पुढें जयपुरांत हा राग असाच गावयाचा, कारण बहिरामखां असा गात, असें लोक म्हणत। हीच परंपरा आजतागायत गवयांत मान्य होऊन रूढ झाली आहे जयपुरांत अनावर रागांची चर्चा व गायनाची गोडी बहिरामखांच्यामुळें प्रचारांत आली म्हणून त्या वेळीं व आतां त्यांच्या नांवाला मोठा मान आहे.

गायनावर त्यांनीं एकादा ग्रंथ लिहिला असल्यास प्रस्तुत लेखकास तो माहीत नाहीं ग्वाल्हेर पद्धतीच्या गायनावर त्या वेळीं कोणी ग्रंथ लिहिला नव्हता, हें तेथें शिकून आलेल्या लोकास विदित आहेच

## हैदरखां.

हैदरखा नेहमीं धार येथें राहत असे. जयपूरचे प्रसिद्ध संगीतशास्त्रज्ञ बहिरामखां यांचा हा शागिर्द होता, हें सांगितलें म्हणजे त्याच्या शास्त्रज्ञतेबद्दल वाचकांस जास्त सांगण्याचें कारण नाहीं हा एक नामांकित गायकांपैकी होऊन गेला जयपूर घराण्यांतील जे प्रसिद्ध गवयी होऊन गेले त्यांत ह्याची गणना आहे. हा एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत होऊन गेला.

## महंमद अलीखां.

हा जयपूरचा राहणारा पिढीजात गवयाच्या घराण्यांत हा जन्मला ह्याचे वडील जयपूरचे प्रसिद्ध गवई होते मोठे झाल्यावर महमद अलीखां सागन कीं, " मला खास तालीम देण्यास वडिलांस वेळ नसे; कारण खास तालीम म्हणजे स्वतःच्या घराण्यांतील गायनकलेच्या विशेष खुब्या; तसेंच मला वडिलांनीं तालीम सुद्ध केली ती केवळ स्वरांची दोन वर्षे झालीं तरी सारखे स्वर घोटावयाचे ! मला कटाळा येऊं लागला, येवढेंच नाही तर मनांतून वडिलांचा रागहि येई; कारण इतर शिष्य शिकावयास येत ते भराभर चीजा घेत व म्हणत ' मला मात्र एकहि चीज येईना ' स्वर मात्र वाटेल तसे सावकाश, जलद, उलटे पालटे, अकारानें, कोणताहि स्वर अगर स्वरांच्या कोणत्याहि संगती अडत नसत; गळा तयार झाला असल्यानें वाटेल तो तीव्र अथवा कोमल स्वरांचा पलटा वाटेल त्या लईंत इषारा केल्याबरोबर तय्यार; तसेंच तीव्रकोमल मिश्र स्वरांचे वाटेल तेवढे मोठे पलटे वाटेल त्या लयींत मधुर व मनोरंजकतेनें म्हणण्याची मला दिक्कत वाटेनाशी झाली ' मग चीजा काय भराभर येऊं लागल्या ! तेव्हां मला वडिलाबद्दल रागाच्याऐवजीं प्रेम वाटू लागलें ' मला अनेक राग व अनेक चीजा वडिलांनीं मनापासून शिकविल्या. माझा आवाज मर्दानी व योग्य होता मला ध्रुवपदें येत; परंतु मुख्य तालीम मला ख्यालाची पोंचली होती मला इतक्या चीजा येत कीं, जयपुरांत गवई मला कोठीवाला म्हणूं लागले "

प्रस्तुत लेखकाच्या वडिलाचे मुंबईचे मित्र वि. ना. भातखंडे ह्यांस मुंबईस येऊन ह्यानें अनेक चिजांची तालीम दिली एवढेंच नव्हे तर २००।३०० वस्नादी चीजांची रेकर्डसुद्धि ह्यानें आपल्या शिष्यांस भरून दिलीं। प्रसिद्ध अप्रसिद्ध रागांची माहितीहि मोकळ्या मनानें सांगितली असा हा जयपूर शहरांतील नामांकित गवई, इ स १९०५ च्या सुमारास ८० च्या पुढें आयुष्य लाभून जयपुरांत कालवश झाला हा आपल्यास मनरंगाच्या घराण्यांतील म्हणवीत असे

## आषक अलीखां.

आषक अली हा महमद अलीखांचा मुलगा तोहि गानकलेंत तयार होता. पण बापाच्या मरणानंतर तो लवकरच कालवश झाला.

## कल्लनखां.

हा प्रसिद्ध ख्यालिया जयपूरचा रहिवासी होता ह्याला अनेक चीजा येत असत तसेंच ह्याला अनावट रागांची माहितीहि बरी असे. हा बराच वयांत होऊन इ. स १९२६ च्या सुमारास कालवश झाला.

## नथनखां.

हा एक चांगला ख्यालिया म्हणून ह्याची प्रसिद्धि असे. ह्यानें गायनकलेचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला ह्याचें गायन भारदस्त असे आवाज तारिफ करण्याजोगा नव्हता असें लोकमत आहे. ह्यानें म्हैसूरदरबारची नोकरी धरली होती त्याच्या गाण्याचा रंग तेव्हांच बसे, अशी ह्याच्या गाण्याची ह्यातोटी होती ह्यानें अनेक शिष्य तयार केले हा इ स १९२० च्या सुमारास दिवंगत झाला. जयपूर घराण्याच्या गायकीचा हा एक प्रतिनिधि समजला जातो

## फैजमहंमद.

हा बडोद्यास रहात असे हा मोठा मर्मीदार गवई म्हणून समजला जाई. ह्यानें बडोद्यास गायनवर्ग काढिला होता मागल्या पिढीतील हा एक नामांकित गवई अशी ह्याची तारीफ करीत हा ख्याल गात असे ह्यानें अनेक शिष्य तयार केले ह्याचें गाणें साधें व सरळ असे ह्याला अनेक राग येत

असत व चीजांची भरतीहि त्याच्याजवळ चांगली असे. "अति कोमल व 'तरतीवर' ह्या संबधीं आपलें मत काय, असें विचारिलें असता, 'मला त्याबद्दल समाधानकारक उत्तर देतां येणार नाहीं" असें तो म्हणे त्याचा आवाज तारिफ करण्याजोगा उत्तम नव्हता ह्य इ. स. १९२० च्या सुमारास कालवश झाला.

# भास्करबुवा बखले.

एक वेळ अशी होती कीं, नाटकांत जाणें त्यावेळीं कमीपणाचें समजलें जात होतें. स्त्रीपार्टाकरितां देखिणीं मुलें नाटकवाले पळवून नेत असत. कंपनीमध्यें स्वैच्छपणानें वागण्यास सांपडे यासाठी नाटकांत जाणें मुलास आवडे, पुढें कांहिं दिवसांनी लोक पैशाकरिता नाटकांत जाऊं लागले संगीत नाटकें निघाली त्या वेळीं मुलास थोडेंतरी गातां आलें पाहिजे मग रूप थोडें कमी असलें तरी चाले पण आतां अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं, कोणाचाहि धंदा किफायतशीर राहिला नाही, मग मनुष्य शिकलेला असो अगर नसो. चैनीच्या संवयी लागल्या व निर्वाहाची साधनें मात्र महाग झालीं! तेव्हां सुशिक्षित व अशिक्षित उभयतांसहि नाटकांत जाण्याची इच्छा होऊं लागली त्यामुळें नाटकांत काम करणारांकडे आतां लोक पहिल्या इतके तुच्छतेनें पाहिनासे झाले आहेत बेकारी वाढल्यामुळें लोकांस नाटक व सिनेमा हे नवे धंदे किफायशीर वाटून 'नाट्यकलेची उन्नति करण्याकरितां आम्ही त्यात शिरतों' असें सुशिक्षित म्हणू लागले आहेत पण आर्थिक फायदा हें त्याचें खरें ध्येय आहे! असो आमचा चरित्रनायक भास्कर नाटकांत गेला तो पैशाच्या आशेनें देखणा तर तो होता, पण आवाज कोणत्याहि प्रकारें त्यास अनुकूल नव्हता अशा स्थितीत 'किर्लोस्कर' कंपनीमध्यें असता, कारणें काय झाली असतील तीं असोत, नाटकांत बाई होऊन राहण्यापेक्षां नाटककंपनीबाहेर दरिद्री स्थितांत बुवा होऊन राहणें बरें असा मनाशी निश्चय करून भास्करानें कबरेचें लुगडें व कंपनी सोडिली व गवईबुवा बनण्याचा निश्चय करून बडोद्यास फैजमहमद् उस्तादाजवळ गाणें शिकण्यास गेला। तेथें त्याची सेवा करून त्याने गाणें पैदा केलें; नंतर प्रसिद्ध नथ्थनखां ख्यालिया या जवळ शिकण्यास राहिला पुढे त्यानें कोल्हापूरचा अल्लादियाखां ह्यास गुरु केलें तीन गुरूची वाटेल तशी चाकरी करून भास्करानें चांगली विद्या संपादन केली मग दक्षिण भागच्या शाळासात्याचे इन्स्पेक्टर

बळवतराव सहस्रबुद्धे याच्या इच्छेनुरूप धारवाडच्या ट्रेनिंग कॉलेजात नोकरी धरली. पण कांहीं दिवसांनी ती सोडून देऊन मुंबईस शिकवण्या करून निर्वाह करू लागला; व तेथूनच भास्करबुवा म्हणून त्याची कीर्ति वाढत चालली पुण्यास 'भारत गायन समाज' ही संस्था त्यांनीं काढली अशी बुवांची कीर्ति वाढत चालली. बुवांचा आवाज जातीचा चांगला नव्हता पण मेहनतीनें त्यानीं तो योग्य केला होता त्याच्या वेळेस तरुण होतकरू गवई असा तोच; असें लोक म्हणू लागले त्याचें गाणें जयपूर घराण्याचें होतें ख्यालियामध्यें त्यांच्यांत तालांत पक्केपणा चागला होता अशा रीतीनें त्यांची गवई म्हणून कीर्ति चांगली झाली मुंबईची हवा मानेना म्हणून ते शेवटीं पुण्यास येऊन राहिले. एकदां त्यांचीं व लेखकाच्या वडिलांची गांठ पडली, तेव्हां बुवांनीं विचारलें 'आपण शास्त्रज्ञ तेव्हां आपल्यास माझें गाणें कसें काय आवडतें,' वडील म्हणाले सांगेन' बुवांनीं आपल्या चिन्हाडीं येण्याबद्दल निरोप पाठविला पण वडिलांनी निरोप पाठविला, 'आपल्या सभोंवनालची प्रभावळ ठीक नाहीं तेव्हां मी आपल्या समाजांत येणार नाहीं बुवांनी वडिलांची गांठ दुसरीकडे घेतली व विचारलें 'बोला, माझें गाणें आपणांस कितपत आवडतें" वडील म्हणाले, "विलंबित लयीचे ख्याल व जलद-लयीचे ख्याल ह्यांत जर आपण भेद मानितां तर त्याच्या तानांत भेद कां दिसत नाहीं ?" बुवा गप बसले व म्हणाले, "इतकी विचक्षणा कोणी करीत नाहीं आतां हें ध्यानांत ठेऊन सुधारणा करीन" पुढें एका गाण्याच्या वेळीं मधल्या सुट्टीत बुवांनीं हांक मारून विचारलें, 'पंत कांहीं सुधारणा आज वाटली कां?" वडील म्हणाले, "चार आणे सुधारणा खास आहे." बुवा म्हणाले, "एका वर्षांत आपणांस मान डोलविण्यास लावीन" प्रभावळीपैकीं एकानें म्हटलें, "हे कां आपल्या-पेक्षा आपण श्रेष्ठ समजतां" बुवा म्हणाले, "त्यांची किंमत तुम्हांस नाहीं मला आहे." पुढें बुवा ॲनिमियाच्या आजारानें आजारी पडले व इ स १९२२ मध्यें पुणें येथें कालवश झाले। अलिकडील पिढींत त्यांच्यासारखा गवई झाला नाहीं त्यांच्या शिष्यांत रा. फुलंब्रीकर शिष्य ठीक आहे. पण ह्यानें जशी गुरूची विद्या घेतली तशी गुरूची तडफ घेऊन कबरेचें लुगडें फेकून जेव्हां तो बुवा बनेल तो सुदिन होय।

## जैनुल अबदुलखां.

हे घरंदाज गवयी होते हे इ स. १८९० च्या सुमारास उत्तर हिंदुस्थानांतून मिरज प्रांतीं येऊन राहिले सांगली, मिरज, कुरुंदवाड वगैरे संस्थानांतील उत्स-

याचे वेळीं यांचीं अनेक गाणी होत. त्यांच्या गायकीची तारीफ अद्यापि परंपरेनें ऐकू येते. हे ख्याल गात असत त्यांस ध्रुवपद व धमार गातानाहि लोकांनीं ऐकिलें होतें पण त्यांचा मुख्य करीना ख्यालगायकीचा होता. यांनीं त्या प्रांतीं अनेक शिष्यांस ही विद्या शिकविली महादेवबुवा गोखले, मिरजकर, अनूबुवा आपटे, रामदुर्गकर व पुण्याची मिश्रा नायकीण हे त्यांचे शिष्य पुढें प्रसिद्धीस आले याच्या ख्यालगायकीची एक निराळी तऱ्हा होती असें वृद्धाच्या तोंडून ऐकिवांत येतें. त्या प्रांतात ख्यालगायनाची गोडी उत्पन्न करण्यास हे कारणीभूत झाले अशी लोकांची समजूत आहे. गणेशवाडीचे सुखवस्तु गृहस्थ बाळूकाका कानिटकर यांच्या विनंतीस मान देऊन हे कांहीं दिवस त्यांच्याजवळ जाऊन राहिले होते हे बरेच वृद्ध होऊन इ स च्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## महादेवबुवा गोखले.

हे मिरजेचे राहणारे जैनुल अबदुलखा जेव्हां मिरजेस राहण्यास आले तेव्हां महादेवबुवा त्यांजपाशीं गायनविद्या शिकू लागले गुरूजवळ हे ख्यालगायकी शिकले. अनूबुवा रामदुर्गकर हे गोखलेबुवांचे सहाध्यायी होते याचें गाणें ग्वाल्हेर तऱ्हेचें नव्हतें व जयपूर तऱ्हेचेंहि वाटत नसे आपल्या गुरूबरोबर हे गाण्यास बसत असत गुरूची मर्जी यांच्यापेक्षां अनूबुवा आपटे याजवर जास्त असे. गोखलेबुवास चारपांच मुलगे होते या सर्व मुलांस त्यांनीं गायनविद्या शिकवून तयार केलें. कोल्हापूर व मिरजप्रांत यांत गोखलेबुवाची प्रसिद्धि होती व हल्लीं आहेहि. जैनुल अबदुलखां वारल्यावर जेव्हां गोखले व आपटे यांच्यामध्यें कांहीं रागांविषयीं व चीजेविषयीं चर्चा होई, तेव्हां ते दोघे गुरुबधु पुण्यास त्यांची गुरुभगिनी मिश्रा नायकीण असे तिकडे येत गोखले घराण्यांतील गवयी आपली पद्धति स्वतंत्र व शास्त्रशुद्ध आहे असें प्रतिपादितात पण त्यांच्या चीजा पाहिल्या तर त्या ग्वाल्हेरपैकींच आहेत असें दिसून येतें. महादेवबुवा ध्रुवपद व धमार या चीजाहि म्हणत. हे इ स च्या एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस कालवश झाले

## अंतुबुवा आपटे.

दक्षिण महाराष्ट्रांत रामदुर्ग नांवाचें एक संस्थान आहे, तेथील अधिपति भावे आडनांवाचे ब्राह्मण आहेत रामदुर्गांत आपटे ह्या आडनांवाचें कुटुंब रहात

होते त्यांचा अंतु नावाचा एक मुलगा होता. त्या काळांत शाळेंत जावें, अभ्यास करून नोकरी मिळवावी ही मुलांची मनीषा नसे. शाळेंत न जाणें, उनाडक्या करणें, गांवांत भटकत फिरणें, ह्यांतच मुलास मजा वाटे। दिवस स्वस्ताईचे तेव्हां मुलास जेवावयाला घालणें म्हणजे कांही मोठीशी गोष्ट आहे असें आईबापांस वाटत नसे अंतूच्या बापानें त्याला पुष्कळ सांगून पाहिलें पण कांहीं उपयोग झाला नाहीं यामुळें बापाची त्यावर अवकृपाच होती एक दिवस अंतूच्या बाळमंडळींत गप्पा सुरू झाल्या, त्यांत मिरजेस कोणी मुसलमान गवयी आला असून तो चांगलें गातो व वाटेल त्यास गाणें शिकवितो, हें ऐकून अंतूनें विचार केला कीं, आपण मिरजेस जाऊन गाणें शिकावें मिरज रामदुर्गापासून फार लांब नव्हती. एक दिवस कोणास न विचारतां अंतु निघाला तो मिरजेस गेला, उस्ताद जैनुल अबदुलखांस भेटला व त्यानें आपली मनीषा त्यास कळविली गवईबुवानें मुलगा हुषार पाहून व गाणें शिकण्यासाठीं घर सोडून आला आहे हा विचार करून त्यास शिकविण्याचें कबूल केलें पण अंतूस सांगितलें कीं, 'पडेल तें काम करावें लागेल.' अंतूनें तें कबूल केलें गायनशिक्षण सुरू झालें अंतूचा स्वाधायी महादेव गोखले होता दोघांनीं मनापासून अभ्यास करण्यास सुरुवात केली दोघां शिष्यांत अंतूवर उस्तादांचें मन अधिक जडलें ५।६ वर्षांत दोघे चांगले तयार झाले उस्ताद कुरुंदवाडास गणपतिउत्सवांत गाण्यास जात, तेव्हां दोघां शिष्यांस बरोबर घेऊन जात तेथें अर्थात् दोघां शिष्यांनी गुरूबरोबर गावें लोकांस ह्या शिष्यांचें गाणें आवडलें तेव्हां उस्तादांची तारीफ झाली व त्यामुळें जैनुलखांचा लौकिक त्या प्रांतांत वाढला अशा रीतीनें विद्या संपादून तो घरी गेला अंतुचे अंतूबुवा झाले; लोकांत त्यांची वाहवा झाली सरकारनीं त्यांस दरबारगवई नेमिलें अशारीतीनें अंतूबुवांचें बस्तान चांगलें बसलें चीजांची भरती पुष्कळ, गायकी चांगली मग काय पाहिजे बळवंतरावाच्या बोलावण्यावरून अंतूबुवा कांहीं दिवस गणेशवाडीस जाऊन राहिले होते बळवंतराव केतकर हे अंतूबुवांच्या शिष्यांपैकींच होत. अंतूबुवा स्वभावानें नम्र असून निर्व्यसनी होते त्यांचें गाणें त्या गहाळांत चांगल्यापैकीं समजलें जात असे त्यांचे मित्र गोखलेबुवा ह्यांचाहि लौकिक मोठा झाला होता अशा रीतीनें आपल्या दोन शिष्यांचा लौकिक वाढला पाहून जैनुल अबदुलखांस समाधान झालें अंतूबुवा नांवलौकिक संपादून इ स च्या १९ व्या शतकाच्या शेवटी कालवश झाले.

## बाळुकाका कानिटकर.

हे गृहस्थ मिरजेजवळ गणेशवाडी म्हणून गांव आहे तेथील राहणारे हे मोठे टपिबाज व व्यवस्थित वागणारे, अशी यांची प्रसिद्धि होती चित्रकला, गायनकला, कातरकाम यात हे मोठे प्रवीण होते जैनुलअबदुलखां व त्याचे शिष्य अंतुबुवा आपटे ह्यांजपाशीं ह्यांनीं गायनाचा अभ्यास केला हे गृहस्थ मार्मिक व गुणज्ञ होते ह्यांच्या उतारवयांत बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हिंदुस्थानांतून गवई तयार होऊन नुकतेच इकडे आले होते त्यांचें गाणें सदर कानिटकरास पसंत पडे कोणापासून कांहीं न घेतां ह्यांनीं अनेक शिष्य तयार केले होते. हे वयातीत होऊन गणेशवाडीसच इ स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## भाऊबुवा कानिटकर.

हे गणेशवाडीचे राहणारे बाळुकाका कानिटकर याचे हे चिरंजीव. ह्यांनीं गायनाचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला शंकराचार्य स्वामीच्या जवळ हे गवई म्हणून नोकरीस असत ह्यांचें गाणें जोरकस व मर्दानी असे हे ध्रुवपद व धमारहि चांगले गात. ह्यांचा मुलगा धंदेवाईक गायक म्हणून पंढरपुरास हल्लीं राहत आहे. हे ख्यालहि चांगले म्हणत ह्यांचें व प्रसिद्ध गवयी विष्णुबुवा पलुसकर यांचें जवळचें नातें आहे. इ स च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत हे कालवश झाले

## बळवंतराव केतकर.

हे रामदुर्गचे राहणारे ह्यांनीं अंतुबुवा आपटे रामदुर्गकर ह्याजपासून गायनविद्या संपादन केली हे जरी धंदेवाईक गवयी होते तरी ह्यांचें वर्तन एखाद्या सभ्य गृहस्थाप्रमाणें असे बीनवाद्यांत होणारें खरजांतील काम हे तोंडानें हुबेहुब करीत, त्यामुळें ह्यांची फार प्रसिद्धि झाली होती हे ख्यालगायक होते. ह्यांजपाशीं चीजांचा भरणा बेताचा होता. ह्यांस दोन मुलगे असून ते गायनकलेंत प्रवीण होते ह्यांनीं अनेक शिष्य शिकविले हे इ स विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेले

# बाळकोबा नाटेकर.

बाळकोबा नाटेकर यांचा जन्म इ स १८५५ साली पुण्यास झाला त्यांचें मराठी शिक्षण झाल्यावर ते बाबा गोखले याच्या इंग्रजी शाळेंत गेले व तेथें त्यांचें इंग्रजी शिक्षण प्रवेशपरीक्षेपर्यंत झालें त्यांना संगीतकलेचा नाद लहानपणापासून होता. ह्यांचा कंठ फार मधुर होता आवाज बारीक पण गोड व सुरेल असे हे आपल्या वडिलांजवळ कांहीं ध्रुवपदें शिकले सतारीचा अभ्यास त्यांनीं एका मुसलमान वस्तादाजवळ केला; त्यांस तबला व बीनहि वाजविता येई इ स. १८८० पासून १८९० पर्यंत हे 'किर्लोस्कर नाटक मंडळीत' पुरुष पार्ट करीत असत निर्वाहासाठीं ते गाणें, तबला, सतार यांच्या तालमी देत. स्वतः सतार वाजवून तिच्या साथीवर बहुधा गात ख्याल, ध्रुवपद मैफलींत फार थोडे गात. नाटकांतील पदें व लावण्या ते फार चांगल्या म्हणत. कांहीं कांहीं लावण्या त्यांनींच म्हणाव्या असें त्या वेळीं लोकांचें मत होतें 'पंचकल्याणी घोडा अब-लक' ही लावणी ते म्हणू लागले म्हणजे श्रोते चित्रासारखे स्तब्ध होत. 'पुणें गायन समाजात' संगीत शिक्षकाचें काम त्यांनीं सुमारें ६ वर्षे केलें पुढें ट्रेनिंग कॉलेजांत गायक शिक्षकाच्या जागा सरकारानें मंजूर केल्या तेव्हां 'पुणें ट्रेनिंग कॉलेजांत' त्याची गायकशिक्षक म्हणून नेमणूक झाली ते इ स. १९१० मध्यें वारले. त्यांचा स्वभाव आनंदी, रंगेल, विनोदी व मनमिळावू होता त्यांना मित्रमंडळी फार होती सतार ते थोडीच वाजवीत, परंतु त्यांचें वाजविणें फार मधुर असे ते चांगल्यापैकीं नटहि होते आण्णासाहेब किर्लोस्कर असतांना त्यांची कंपनी इंदुरास गेली नाटकांची चांगली वाहवा झाली बाळकोबा त्यांत गवयी, तेव्हां त्यांस भेटण्यास मंडळी येत असत. आण्णाचा स्वभाव दिलदार, त्यामुळें गृहस्थलोकहि त्यांजकडे येत एकदां असें झालें कीं, हिंदुस्थान प्रसिद्ध बजवय्ये नाना पानशे ह्यांच्या कंपनींत आले बजवय्यासारखी त्यांची अक्कड नव्हती, म्हणून इतरास ते बजवय्ये आहेत असें वाटत नसे; बाळकोबा गवई, तेव्हां मंडळींनीं आण्णाजवळ आग्रह केला कीं, 'आम्हास नाटेकरांचें बैठकीचें गाणें ऐकवा' आण्णांचा स्वभाव आनंदी, त्यांनीं लगेच बाळकोबास बोलाविलें व गाण्यास सुरवात झाली. ठेका नाना पानशांनीं धरिला बाळकोबास नाना माहीत नव्हते आपण पुण्याचे, मंडळी आपलें गाणें ऐकण्यास उत्सुक, तेव्हां डौलानें गाण्यास सुरवात करून तबलजीकडे वळून "ठीक चलो" असें ऐटीनें ते नानास म्हणाले. नाना पानशे फार विनीत स्वभावाचे। त्यांनीं म्हटलें, "ठीक आहे." आण्णास कसेसेंच झालें, ते आंत उठून

गेले व बाळकोबास त्यांनीं आंत हांक मारली व म्हणाले, "अहो, तुमच्याबरोबर वाजविण्याची साथ करणारे कोण आहेत हें तुम्ही ओळखलें नाहीं वाटतें?" बाळकोबा म्हणाले, "नाहीं" आण्णा म्हणाले, "ते नाना पानशे आहेत।' तेव्हां बाळकोबा चपापले व ओशाळले; लवकर बाहेर येईनात। नानानींच मग त्यास हाक मारिली. तेव्हां बाळकोबानी त्यांची क्षमा मागितली; पण नाना फार सात्विक, त्यांनीं ती गोष्ट हंशावारी नेली पुढें गाणें ठीक झालें एकाद्या वेळीं इच्छा नसतां अशी भलतीच गोष्ट घडून येते! बाळकोबा ही गोष्ट मजेनें सांगत व हसत; कारण त्यांचा स्वभाव मोठा रंगेल असे एकदां बळवंतराव सहस्रबुद्धे 'पुणें गायनसमाजाचे सेक्रेटरी' यांच्याशीं बोलत बसले असतां, बाळकोबा त्यांना म्हणाले, "आपण माझ्या बोलण्याचा राग मानीत नाही म्हणून बोलतों." बळवंतराव म्हणाले, "खुशाल बोला.' बाळकोबा म्हणाले, "आपण गायनसमाजाचे सेक्रेटरी, त्याला ऊर्जितदशा आणिली हें खरें, पण आपणांस गाणें कांहींच कळत नाहीं. आपले जोडीदार दत्तोपंत जोशी प्रथमत संगीतांत प्रवीण होते; प्रत्यक्ष गायन त्यांस येतानाचें समजे; पण आतां त्यांनीं गणपतिबुवाजवळ रोज दोन वेळ शिकण्यास जाऊन व घरीं मेहनत करून विलक्षण तयारी केली आहे! मी समक्ष त्याचें गाणें ऐकून गारच पडलों। फार मेहनत करितात पुष्कळांनीं यत्न केला, कोणी त्यांत प्रवीण झाला नाहीं, पण पंतांनीं मात्र कमाल केली आहे! रोज वर्गावर हिंडतात तेव्हां गवयास त्यांची भीति वाटू लागली आहे माझ्या आयुष्यांत गृहस्थांत वाकब झालेला येवढाच इसम मीं पाहिला" त्यावर बळवंतराव म्हणाले, "आमची परिक्षा योग्य झाली! चवटीस गव्यानें गाता येत नाहीं; जोशानीं फार परिश्रम केले खरें!" कै. हरीभाऊ आपटे गायनसमाजाचे खजीनदार होते, एकदां बाळकोबा आनंदाश्रमांत हरीभाऊकडे गेले असतां हरीभाऊनीं बाळकोबास विचारलें, "नवे सेक्रेटरी कसे काय आहेत?" त्यावर बाळकोबा म्हणाले, "फार सभ्य, कोणास कधींहि वांकडें बोलत नाहींत; त्यांनी गायनाची मेहनत चालविली आहे ती पाहून मी चकित झालों; त्यांचें गाणें मीं समक्ष ऐकिलें. तेव्हां मला समाधान झालें. आपण शिवभक्तबुवाकडे जातां, आपलें गाणें कोठवर आलें आहे?" हरीभाऊ म्हणाले, "मीं तो नाद सोडला; कारण आमच्यानें मेहनत होत नाहीं." "मग पंतानीं आपल्यावर ताण केली म्हणावयाची," असें बाळकोबा म्हणाल्यावर हरीभाऊ म्हणाले, "मलाहि त्यांत समाधान आहे; ते माझे मित्र आहेत, व मीच त्यांची शिफारस करून बळवंतरावांस मदत करण्याकरितां गायनसमाजात त्यांची योजना केली आहे." ह्या गोष्टी बाळकोबानीं

आमच्या घरीं येऊन गणपतीबुवा वगैरे मडळी बसली असताना मोठ्या आनंदानें व अभिमानानें सांगाव्या

## मीयाजान.

हा दिल्लीचा राहणारा गायनाचा अभ्यास त्यानें आपले मामा अलीखां ह्याच्यापाशीं केला. गायन विद्येंत हा चांगला प्रवीण झाला होता मामानें त्यास ही कला चांगली शिकविली होती कांहीं दिवस तो मुंबईस राहिला होता. ह्याचें गाणें मनोरंजक व चांगलें होतें ह्याचा मामा ख्यालिया असल्यानें ख्यालगायनांत त्यानें चागलें प्राविण्य संपादिलें होतें ह्याचें गाणें जोरकस असे कांहीं दिवसांनी त्याच्या गळ्यांत कोणी शेंदूर घातल्यामुळें त्यानें गायकीचा धंदा सोडून दिल्लीस वाण्याचें दुकान घालून चरितार्थ चालविला; पुढें कर्मधर्मसयोगानें एका हकीमानें त्यांस दवा देऊन त्याचा आवाज पहिल्यासारखा केला। तेव्हा पुनः तो मुबईस राहून तालमी देऊन निर्वाह करू लागला पुण्यास त्याचीं बरींच गाणी झालीं. एक वेळ भैरवी गाऊन अबदुल करीमखां यांच्यावर यानें नाण केली, असें लोक सांगतात तो इ स १९२० च्या सुमारास कालवश झाला

## हैदरखां.

हा जयपूरकडील राहणारा ह्याचें घराणें मूळचें ध्रुवपदीयाचें ह्याचा चुलता चांगला ध्रुवपदीया म्हणून नांवाजला होता ह्यानें ख्याल गायकीचा चांगला अभ्यास करून लौकिक सपादन केला विद्या परिपूर्ण झाल्यावर हा कांहीं दिवस मुंबईस राहत असे व कांहीं दिवस कोल्हापुरांत राही महाराष्ट्रांत प्रसिद्धि पावलेला अलादियाखा गवई ह्याचा भाऊ. प्रसिद्ध गायिका लक्ष्मी ही त्याची शिष्यीण आहे. लौकिक सपादून हा इ. स च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## परशरामबुवा बर्वे.

हा मुंबईस रहात असे हा ख्यालगायक होता ह्याचा मुंबईत एक समाज होता ह्याला जयदेवाच्या अष्टपद्या म्हणण्याचा फार नाद असे नरसिंह सरस्वती नामक आळंदीचे साधु पुरुष होते त्यांचा हा भक्त होता ह्यानें गायनावर एक मराठी पुस्तकहि लिहिलें होतें हा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला

## बळवंतबुवा पोरे.

हा कोल्हापुरांत राहत असे. हा ख्यालगायक होता हा आपणांस इनायत हुसेनखांचा शिष्य म्हणवीत असे ह्यानें बरेच शिष्य शिकविले. ह्याच्या गाण्यांत रजकपणा बरा होता. महाराष्ट्राबाहेर ह्याचें नांव फारसें माहित नाही. हा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला

## गुलाम आब्बास.

हा ख्यालिया आग्न्याचा राहणारा हा आपणास 'रगीले' घराण्यापैकीं समजत असे 'रगीले' घराण्यांत नामांकित कलावंत कोण झाले व ह्या घराण्याचा उत्पादक कोण ह्याबद्दलची विश्वसनीय माहिती लेखकास अद्यापि मिळाली नाही. गुलाम आब्बास हा मागील पिढीतील एक प्रसिद्ध गायक होता बडोदे दरबारचे प्रसिद्ध ख्यालिये फैयाजखां यांचा हा जवळचा नातेवाईक होता अशी माहिती मिळते

## भाऊबुवा कागवाडकर.

हा कागवाडचा राहणारा; हा गांव मिरजेपासून सुमारें १५ कोसावर आहे. हा गायक महाराष्ट्रांत प्रसिद्ध होता ह्याचा आवाज फार मधुर होता. ह्याची गायनाची तऱ्हाहि चांगली होती ह्याची सांपत्तिक स्थिति साधारण होती. ह्याचा स्वभाव मनमिळाऊ होता. हा ख्याल गात असे. इ. स च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत हा कालवश झाला

## छोटे मुन्नेखां.

हा लखनौचा राहणारा त्याची गाण्याची तरकीब बरी होती. ह्याची शिष्यशाखा बरीच मोठी आहे. लखनौचे संगीत कॉलेजांत हा प्रारंभीं गायन शिक्षक होता. ह्याला प्रसिद्ध व अप्रसिद्ध रागाच्या बऱ्याच चीजा येत नोटेशन केलेल्या चीजा छापलेलीं पुस्तकें पाहून हा म्हणे कीं, 'ही नव्या काळांतील अजब गोष्ट आहे. आमच्या वेळीं असें कांहीं नव्हतें. ह्या पुस्तकावरून आम्हांस कसें शिकविता येईल ! आतां गुरूची चाकरी कोणता शिष्य करील ! हीं पुस्तकें नवीं, ही शाळा नवी ! सगळेंच नवें !' हा बराच वयातीत होऊन इ. स. १९२७ मध्यें लखनौ येथें वारला.

## आबा दीक्षित वाटवे.

हा पेशानें गृहस्थ होता. श्रीमत सरकार कुरुंदवाडकर यांच्या आश्रितांपैकीं याचें घराणें यानें वेद म्हटला होता विष्णुपंत छत्रे याच्याजवळ ह्यानें गायनाचा अभ्यास अनेक वर्षें केला ह्याच्या गळ्यांत ग्वाल्हेरची ख्यालगायकी उत्तम बसली होती ह्याचा आवाज मधुर व म्हणण्याची ढब वाखाणण्याजोगी होती अनेक वर्षें ह्यानें मीयां रहिमतखां ह्याजबरोबर गायनाची साथ केली होती हा स्वभावानें नम्र व मनमिळाऊ होता हा इ स च्या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## अलादियाखां.

हा एक चांगल्यापैकीं गायक म्हणून ह्याची प्रसिद्धि आहे ह्याचें घराणें नामांकित असें समजलें जातें ह्यानें गायनाचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला. महाराष्ट्रांत आल्यावर ह्यानें कोल्हापूर दरबारची नोकरी धरली ह्याचें गाणें सामान्य श्रोत्यांस समजण्यास अवघड जातें हा एक भरतीदार गवई अशी ह्याची तारीफ आहे ह्यानें अनेक शिष्य तयार केले आहेत मुंबईस ब्राह्मण सभेंत ग्वालेरचे बाळासाहेब गुरुजी व अलादियाखां ह्यांचा सामना झाला, त्या वेळीं निरनिराळ्या घराण्याची गायकी कशी असते ह्याच योग्य प्रदर्शन झालें ह्याचा आवाज फार तारीफ करण्यासारखा नाहीं मैफल रंगाविण्याची हातवटी ह्याला चांगली आहे. तसेंच अनावट राग गाऊन श्रोत्यांवर छाप बसविण्याची कलाहि ह्यास उत्तम अवगत आहे. ह्याच्या गायकींत जयपूर घराण्याच्या तेढ्या नाना दिसतात

## उमरावखां.

दिल्लीचे प्रसिद्ध तानरसखां ह्यांचा हा मुलगा ह्यानें गायनाचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला हा ख्यालगायक आहे हा बरींच वर्षें हैद्राबादेस होता इ स. १९२६ च्या सुमारास ह्यानें ग्वाल्हेरीस दरबारगायक म्हणून नोकरी पत्करिली ह्याचें गायन तारिफ करण्याजोगें आहे हा एक घरंदाज गवई आहे व तसें त्याचें गाणेंहि आहे, हें जो त्याचें गाणें ऐकेल त्यास कबूल करणें भाग पडेल. ही विद्या त्याची घरची असल्यामुळें अनेक रागांतील खांचाखोंचा त्याच्या गायनांत दृष्टीस पडतात ह्याचा आवाज मोठा व सुरेल आहे

## अबदुल करीमखां

हा एक चागल्यापैकी ख्यालगायक आहे ह्याचें घराणें उच्च नाहीं असें लोक म्हणतात, पण प्रस्तुत लेखकास त्याबद्दल नक्की माहिती नाहीं, एवढें मात्र खरें कीं ह्याचा भाऊ सारगी वाजवितो असें उत्तरेकडील लोक बोलतात. अबदुल करीमखाचा आवाज गोड व सुरेल आहे परतु तो मोठा नाहीं त्याची म्हणण्याची तरकीब चांगली आहे. पण चीजांची भरती फार नाहीं तसेंच एकादा अनावट राग गाऊन ज्ञात्या श्रोत्यांचें मन ह्यास राजी करतां येणार नाहीं, असें लोक म्हणतात रा ब देवल ह्यांच्या सहवासांत हा कांहीं दिवस असल्या-मुळें श्रुती वगैरेंच्या गोष्टी ह्याला सांगतां येतात हा स्वभावानें नम्र आहे, व निर्व्यसनी आहे. मैफल रंगविण्याची व गाणें सुरू करिताच आपल्या गाण्याचा रंग जमविण्याची हतोटी ह्याला चांगली साधली आहे. ग्वालेर घराण्यातील प्रसिद्ध रहिमतखा व अबदुलकरीमखां ह्यांचें गाणें जमखडी-करांच्या वाड्यांत झालें, तेव्हां ह्यानें माजलपणानें कबूल केलें कीं, "रहिमतखां हा गायनांतील 'शेर' आहे. त्यापुढे आमच्या सारख्यांचें कांहीं चालणार नाहीं." ह्याची अशी तारीफ आहे कीं हा कधीं अपस्वर होत नाहीं व श्रोत्याच्या मर्जी-प्रमाणें गाणें गातो

## फैयाजखां.

बडोदे सरकारचा कलावतखाना चांगल्यापैकी आहे. फैयाजखां त्यांतील नामां-कित गवयी आहे तो ख्यालगायक आहे. त्याचें गायनशिक्षण घरच्या वडील माणसाजवळ झालें तो आपणास 'रगीले' घराण्यापैकीं समजतो. त्याची गायन-पद्धति तारीफ करण्याजोगी व तानबाजी फार प्रशसनीय आहे. त्यानें आज वर फारसें कोणास शिकविलें नाहीं ग्वालेरचे महमदखां, रहिमतखा, नागपूरचे बापु जोशी, महाराष्ट्रांतील बाळकृष्णबुवा इचलकरजीकर, ह्या नामांकित गवयांसारखा ह्याचा आवाज तारीफ करण्याजोगा नाहीं हल्लीं जे ख्यालगायक हिंदुस्थानांत हयात आहेत त्यामध्यें ह्याचा नबर फार वर आहे

## रामकृष्णबुवा वझे.

रामकृष्णबुवा वझे हे गोव्याकडील राहाणारे ह्यांनीं गायनाचा अभ्यास ग्वालेरचे निसार हुसेनखां ह्यांजपाशीं केला ह्याचा आवाज चांगल्यापैकीं नाहीं एवढेंच नाहीं तर

नो वाईट आहे, असें कोणी म्हटल्यास त्यांत पुष्कळसा खरेपणा आहे ह्यांजपाशीं चीजांची भरती फार आहे, अशी लोकांची समजूत आहे बुवांची शिष्यशाखा बरीच मोठी आहे. बुवांचा स्वभाव मनमिळाऊ व प्रेमळ आहे. शिकवण्याच्या योगानें त्याचा मुक्काम मुंबई, बेळगांव ह्या शहरीं असतो केव्हां केव्हां ते नाटक कंपनीतहि शिकविण्यासाठी असतात आजच्या गायक मंडळीमध्यें ते भरतीदार गवयी आहेत, हें खोटें नाहीं

## अंतुबुवा जोशी.

मनोहरबुवा जोशी ह्यांचे हे पुत्र. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध ख्यालिये बाळकृष्ण-बुवा इचलकरंजीकर ह्यांजपाशीं ह्यांचें गायन शिक्षण झालें विष्णुबुवा पलुसकर व गुंडुबुवा हे ह्यांचे स्वाध्यायी होते पलुसकरांबरोबर ह्यांनीं बरेंच देशपर्यटन केलें. ह्यांनी मुंबईस 'गुरुसमर्थ विद्यालय' नांवाचा गायन समाज बरींच वर्षें चालविला व अनेक विद्यार्थी तयार केले. नंतर कांही दिवस रिकामे राहून हल्लीं ते औंधास नोकर झाले आहेत ह्यांनीं काहीं गायनोपयोगी पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत हे निर्व्यसनी असून ह्यांचा स्वभाव मनमिळाऊ आहे. ह्यांचा एक मुलगा गायन वादन कलेंत चांगला तयार झाला आहे. ह्यांचें गायन समजदारांस संतोष देतें, हे समजून गातात ह्यांचा आवाजहि बऱ्यापैकीं आहे.

## राजाभैय्या पूंछवाले.

हे ग्वाल्हेरचे राहणारे असून, ग्वाल्हेरचे प्रसिद्ध गवयी शंकर पंडित ह्यांचे हे शिष्य आहेत. हे स्वभावानें फार गरीब व मनमिळाऊ आहेत ग्वाल्हेर घराण्याची खास गायकी ह्यांनीं उत्तम संपादन केली आहे ग्वाल्हेरच्या 'माधव संगीत विद्यालयाचे' हे प्रिन्सिपल आहेत ह्यांची शिकविण्याची हातवटी फार चांगली आहे ह्यांनीं 'तानमालिका' नांवाचें पुस्तक तयार करून प्रसिद्ध केलें आहे. प्रस्तुत लेखकाच्या वडिलांस हे गुरु समजतात व भेटण्यास येतात तेव्हां त्यांच्या पायावर डोकें ठेवितात । हें दृश्य अनेकवार लेखकास पाहण्यास सांपडलें आहे.

## नजीरखां.

हा उत्तम ख्यालगायक रामपूर संस्थानांत नोकर आहे. ह्याची ह्या विद्येंत मोठी प्रसिद्धी आहे. अप्रसिद्ध रागहि ह्यास पुष्कळ येत असून ते म्हणण्याची ह्याची

इलोटी चांगली आहे. हा कांहीं दिवस प्रसिद्ध गायिका गोव्हर हिला शिकविण्यास होता.

## रजाखां.

हे रामपूर संस्थानांत ख्यालिये म्हणून नोकर आहेत. ह्यांची गायनाची ढब चांगली आहे हे जुन्या पिढींतील उत्तम शिकलेले गायक अशी ह्यांची प्रसिद्धी आहे. तसेंच अमीर खुशरूच्या घराण्यांतील परंपरेच्या ख्याल वगैरे चीजा हे उत्तम जाणतात असा ह्यांचा लौकीक आहे

## कृष्णा पंडित.

हे ग्वालेरचे राहणारे; ख्यालिये म्हणून याची प्रसिद्धि आहे शंकरराव पंडित याचे हे चिरंजीव ह्यांनीं गायनाचा अभ्यास आपल्या वडिलांजवळ केला आहे ह्याचे चुलते व चुलत बंधू चांगले गातात तथापि कृष्णा पंडिताचा नंबर सगळ्यांत वर आहे आज त्याचे घराण्यांत त्यांच्यासारखा गायक ग्वालेरीस नाहीं त्यानीं गायनावरील कांहीं पुस्तकें प्रकाशीत केलीं आहेत आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ त्यांनीं ग्वालेरीस एक गायन समाज काढिला आहे त्यांची तानबाजी तारीफ करण्याजोगी आहे अनेक अप्रसिद्ध, प्रसिद्ध रागांत त्यास पुष्कळ चीजा येतात ते सुस्वभावी आहेत. महाराष्ट्रास त्यांच्या गायनाचा लाभ वेळोवेळीं होतो सरकारी नोकरीत गुतून पडण्याची त्यांची मनीषा नाहीं आपल्या घराण्याचा लौकिक हे चांगला वाढवतील ह्यांत शंका नाही

## अचपल.

ह्याने ख्यालादिक अनेक चीजा रचिल्या आहेत त्याची बांधणी योग्य व कविताहि ठीक आहे. हा नामांकित ख्याल गायक होता स्वतः गातां आल्यावांचून योग्य प्रकारें चीजा रचितां येत नाहींत हा आपल्या चीजेंत 'अचपल' असें नांव घालितो कोणी कलावंत त्याचा अर्थ 'चपळ,' 'खोडकर' असा करितात ! हें त्यांचें अज्ञान हास्यास्पद नाहीं असें कोण म्हणणार नाहीं ? हा इ स. अठराव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला

## हररंग.

जयपूरचे महमद अलीखां ह्यांनीं 'हररंग' असें टोपण नांव घेऊन अनेक चीजा रचिल्या आहेत मुंबईचे प्रसिद्ध गायनाचार्य प वि ना भातखंडे यांच्या गुरूंपैकीं हे एक आहेत कांहीं लोक असेंहि म्हणणारे आहेत कीं, प भातखंडे यानीं स्वतःच कांहीं चीजा रचून त्यांमध्यें आपल्या गुरूचें 'हररंग' हें टोपण नांव घातलें आहे. ह्यांतील खरी गोष्ट फक्त हरीलाच ठाऊक। इतरांनी केवळ तर्क करीत बसावयाचें सदर चीजा कशा आहेत हें गायकाशिवाय इतरांस समजणेस मार्ग नाहीं सदारंग, अधारंग ह्यांस आपलीं खरीं नांवें न घालतां चीजांत टोपण नांवें का घालावीं लागलीं ही गोष्ट न समजून हे चीजा बांधणारे आतांहि तसेंच करीत आहेत, तेव्हां त्यांच्या अज्ञानाची व अंधपरंपरेची कींव करावी तेवढी थोडीच आहे!

# टप्पा गायक.

## मीयां शौरी.

ह्याचें खरें नांव गुलाम नबी. हा लखनौचा राहणारा ह्याच्या वेळीं असफ उद्दवला हा लखनौचा नबाब होता (१७७६-१७९७) शौरीसांचा बाप गुलाम-रसूल शौरी हा आपल्या बापाजवळ ख्याल-गायन शिकला, पण त्याचा आवाज फार पातळ; तेव्हा ख्यालांतील तानबाजीनें ह्याची तृप्ति होईना, यासाठीं आपल्या आवाजास योग्य असें तानबाजीचें गाणें पाहिजे, असें त्यांस वाटूं लागलें, म्हणून त्यानें टप्प्यांचें नवें गाणें काढिलें. टप्प्यास पंजाबी भाषा सोईची आहे असें त्यास वाटल्यावरून त्या भाषेचा त्यानें अभ्यास केला व त्या भाषेंत टप्पे रचिले टप्पे ठराविक अशा थोड्याच रागांत असतात हा साधुवृत्तीनें राहत असे एकदा आसफ उद्दवला रस्त्यांतून जात असतां शौरीची व त्याची गांठ पडली आपल्या राजधानींतील गायकरत्न तें हेंच, असें नबाबास जवळील सरदारानें सांगितल्यावरून नबाबानें त्यांस राजवाड्यांत येण्यास फर्माविलें पण हे पडले साधु। ह्यानी झटदिशीं उत्तर दिलें, "मला तुझें मकान माहित नाहीं।" नबाबसाहेब हंसले व म्हणाले, "विचारीत विचारीत या" ठरल्याप्रमाणें शौरी राजवाड्यांत गेला. तेथें त्याचें गाणें इतकें अप्रतिम झालें कीं, तसें गायन नबाबानें व दरबारी मंडळींनी पूर्वी कधीच ऐकलें नव्हतें. नबाबानें खूष होऊन शौरीस मोठी रक्कम बक्षिस दिली.

पण घरीं जातांना ती सर्व रक्कम शौरीनें फकिरास वांटून टाकली. ही बातमी कळताच नबाबानें पुनः तितकीच रक्कम त्याच्या घरीं पाठविली. शौरीस मूलबाळ कांही नव्हतें गम्मू नांवाचा त्याचा एक पट्टशिष्य होता. हा लखनौ येथें इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला

## मीयां गम्मू.

हा टप्पा गायक लखनऊमध्यें रहात असे ह्याचा आवाज फार पातळ व गोड असल्यानें ह्याच्या बापानें मीयां शौरीजवळ ह्यास टप्प्याची तालीम घेण्यास ठेविलें. हा टप्पा म्हणण्यांत फार प्रवीण झाला हा मीयां शौरीचा पट्टशिष्य होता. खुद्द शौरीची तालीम, मग ह्याच्या गायकीचें वर्णन काय करावें हिंदुस्थानांत टप्प्याचें गाणें ह्यानें लोकप्रिय केलें ह्यानें अनेक चीजा रचिल्या असून टप्पा गायकामध्यें त्या फार प्रसिद्ध आहेत ह्यास शादीखा नांवाचा एक मुलगा होता. हा इ स च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत लखनऊ येथें कालवश झाला

## ताराचंद.

हा खुद्द शौरीचा शिष्य असल्यानें ह्याची टप्पा गाण्याबद्दल फार तारीफ असे ह्याचा आवाज मधुर व पातळ असल्यानें टप्प्यामध्यें तो तानांचा केवळ पाऊस पाडी. आपलें गाणें रजविण्याची कला ह्यास चांगली साधली होती. हा इ. स. एकोणिसाव्या शतकांत लखनौ येथें कालवश झाला.

## बाबुराम सहाई.

हे अलाहाबाद येथें रहात असत ह्यांची टप्पा गाण्याबद्दल फार प्रसिद्धि होती. त्यांच्या गायनप्राविण्यावरून त्या वेळचे लोक त्यास 'नायक' म्हणत. हे गृहस्थ होते ते गायकाचा धंदा करीत नसत त्यांनीं पुष्कळ शिष्य तयार केले हे ध्रुवपद, धमार, ख्याल इत्यादि चीजा फारच कुशलतेनें गात, म्हणून कलावंतांमध्यें ह्यांस फार मान असे. हे टप्पे फारच बहारदारीनें गात त्यांच्यासारखा गायक झाला नाहीं, अशी त्यांची प्रसिद्धी आहे. ह्यांच्यासारखा टप्पे म्हणणारा ह्यांच्या शिष्यांत एकच निघाला, तो म्हणजे मीयां शादीखां होय आतां टप्प्याचें गायन नामशेष झालें आहे टप्प्याची खास तालीम फार थोड्यांस मिळाली आहे. टप्पा

गायनास आवाज फारच पातळ लागतो व कसरतहि फार करावी लागते. ह्या गोष्टीचा आता अभाव आहे असें म्हणणें सत्याला फारसें सोडून नाही हे वयातीत होऊन अलाहाबाद येथें इ. स. च्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## शादीखां.

हा गम्मूचा मुलगा व बाबुराम सहाईंचा शिष्य होता. ह्याला तालीम घरची, म्हणून ह्याच्या टप्पा गाण्याची तारीफ योग्यच होती ह्याच्या गाण्याचा लौकीक ऐकून बनारसचे राजे उदीत नारायणसिंग ह्यानीं त्याला आपल्या पदरीं ठेविला होता ह्याच्या गाण्यावरून ह्यास प्रति बाबुराम सहाई असे म्हणत असत हा इ स. १८५० मध्यें निवर्तला.

## मुम्मीखां.

हा लखनऊमध्यें राहत असे टप्पा गाण्यांत ह्याची फार प्रसिद्धि असे ह्याचा आवाज मधुर, व पातळ होता. हा इ स. १८६५ च्या सुमारास वारला

## छज्जूखां.

हा लखनऊचा रहिवाशी होता. ह्याचा आवाज मधुर व पातळ होता. टप्पा गाण्याबद्दल ह्याची फार प्रसिद्ध होती हा इ. स. १८७० च्या सुमारास वारला.

## मीरअलीसाहेब.

हे लखनौचे राहणारे ख्वाजा वासीद पीरजादा हें ह्याच्या आजाचें नांव. हे उत्तम गायक होते ह्यांच्या वेळीं ह्याची बरोबरी करणारा कोणी नव्हता हे लखनौचे नबाब महमदअलीशहा (इ स १८३७–४२) याच्या पदरीं असत ह्यांना बाराशें रुपये पगार होता. ते गाण्यास कधीं राजमहालांत गेले नाहींत; तसेंच कोणाच्या घरीं गाण्यास जात नसत ज्यांना त्यांचें गाणें ऐकावयाचें असेल त्यांनीं त्यांच्या घरीं जाऊन ऐकावें ह्यांच्या वेळचा नबाबाचा दिवाण नासीरउद्दीन ह्यास आपले अन्नदाते नबाब महमद अलीशहा ( १८३७–१८४२ ) ह्यांचा हा अपमान आहे असें वाटत असे त्यानें ह्यांचा पगार कमी केला तरी देखील हे राजमहालांत गाण्यास येत नाहींत म्हणून त्यांस राजधानी सोडून जाण्याचा हुकूम

केला राजधानीतील प्रख्यात व श्रीमत रहीस असला चांगला गुणी राजधानी सोडून जातो म्हणून हळहळू लागले पण सरकारी हुकुमापुढें कोणाचें चालणार; परंतु जेव्हां हे खरोखरीच जाण्याची तयारी करीत आहेत असें नबाबास समजलें, तेव्हां नबाबानें तो हुकूम रद्द केला; त्यांचा निस्पृहपणा व करारीपणा ह्याबद्दल खुष होऊन त्यांचा बहुमान करून त्यास ठेवून घेतलें ह्यावरून गायनविद्येंत हे किती वाकब असतील हें ध्यानांत येईल ह्याचें नांव विद्वत्ता व विद्येची अभिरुचि!

मीर अली साहेब ध्रुवपद छज्जूखां सेनिये यांजपाशीं, ख्याल गुलाम रसूल याजपाशीं, टप्पा मीयां शोरीपाशीं, शिकले होते ह्यावरून त्यांच्या गायन विद्येच्या ज्ञानाची गहनता ध्यानांत येईल. ते पर्शियन भाषा एका नामांकित मुल्लाजवळ शिकले होते ह्यावरून ते कलावान् व विद्वान् होते हे सहज समजून येणार आहे. असा हा कलावान् व निस्पृह पुरुष लखनौचे शेवटचे नबाब वाजिद अलीशहा (१८४७–५६) ह्याच्या अमदानींत वारला

## नबाब हुसेनखां.

ह्याच्या वडिलाचें नांव कासमअलीखां व वडील बधूचें नांव सुलतानअलीखां. हा आपल्या वडिलांजवळच ही कला शिकला ह्याचा आवाज फार मधुर व सुरेल होता हा टप्पा फार उत्तम म्हणे अशी प्रसिद्धी आहे. हा लखनौस राहत असे हा इ. स च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## परसादु.

हा बनारसचा कथ्थक होता. ह्याचा आवाज गोड व पातळ होता. म्हणून हा टप्याचें गाणें शिकण्यासाठीं प्रसिद्ध टप्पेवाला मीया गम्मू ह्याचा मुलगा व शिष्य शादीखां याजपाशीं जाऊन राहिला; त्याला गुरु करून टप्प्याचें गाणें तो त्याजपाशीं उत्तम शिकला हा कथ्थक उत्तम नाचत असे, तशीच टप्पा गाण्यांत ह्याची फार तारिफ होती हा इ स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला

## रामकृष्ण देव.

हा धारचा रहाणारा गायनकलेच्या शोकामुळें हा ग्वालेरीस गेला. तेथें बरींच वर्षें राहून त्यानें ध्रुवपद व ख्यालगायनाचा चांगला अभ्यास केला. ह्याचे स्वाध्यायी थोरले बाळकृष्णबुवा होते ह्याचा आवाज फार पातळ तेव्हां

त्यास अशी सल्ला मिळाली कीं, " मुला, तू ख्याल शिकलास हें चागलें झालें, पण तुला टप्पा चांगला साधेल, कारण तुझा आवाज पातळ आहे, तेव्हां तू टप्पा शीक. टप्प्यांत तानांचा पाऊस पाडावा लागतो, तें काम तुला चांगलें साधेल. " तेव्हां रामकृष्णबुवा पंजाबात गेला. तेथें जाऊन शोरीच्या शिष्यशाखेंत टप्प्याचें गायन उत्तम तऱ्हेनें हस्तगत करून तो परत धारेस येऊन राहिला त्यास ध्रुवपद गायकीहि उत्तम लाभली होती त्यानें अनेक शिष्यांस टप्पे शिकविले. ज्याचा आवाज टप्प्यास योग्य नसेल त्यास तो त्याच्या आवाजास अनुकूल असें ध्रुवपद गायन शिकण्याची सरळ सल्ला देई व ध्रुवपदें शिकवी त्यानें अनेक रागांत सरगमी बांधिलेल्या मागील पिढींतील गवयी मोठ्या हौसेनें शिकत त्याला शिकविण्याची हातवटी चागली साधली होती त्याच्यासारखा टप्पा म्हणणारा हिंदूत झाला नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे महाराष्ट्रांतील रावजीबुवा गोगटे हा त्याचाच शागिर्द होता. हा वयातीत होऊन धार येथेंच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत वारला

# रावजीबुवा गोगटे.

महाराष्ट्रांतून जे तरुण उत्तर हिंदुस्थानांत गाणें शिकण्यास गेले, त्यापैकीं रावजीबुवा गोगटे हा एक होता. त्यावेळीं आतांसारखा प्रवास सुखकर नव्हता, म्हणून ज्याला खरी विद्येची आवडच असे, असे इसमच असला खडतर प्रवास पत्करीत. ग्वालेरच्या खालोखाल धार हें शहर गायनाकरितां प्रसिद्ध झालें होतें; त्याचें कारण असें कीं, रामकृष्ण देव हा ग्वालेर वगैरे शहरीं राहून गायनांत तरबेज होऊन धारेस येऊन राहिला होता. तो शिष्यांस ध्रुवपद अथवा टप्पा शिकवी. ज्याचा आवाज पातळ तो टप्पा शिके, व ज्याचा आवाज जाड तो ध्रुवपदांत रंगून जाई. आमचा रावजी निघाला तो त्यानें धार शहर गांठिलें तेथें देवजीबुवाजवळ तो टप्पा शिकला, कारण त्याचा आवाज तशा गायकीस अनुकूल होता. बुवाजवळ गायनाचा अभ्यास संपवून घरीं महाराष्ट्रांत परत आल्यावर त्यास इचलकरंजी संस्थानांत आश्रय मिळाला. महाराष्ट्रांत परत आल्यावर गायनाच्या जोरावर रावजीचा तो रावजीबुवा बनला महाराष्ट्रांत गोगटे घराणें टप्प्याकरितां जें प्रसिद्ध झालें, त्याला कारण रावजीबुवा होय पुढें योगायोग असा आला कीं, रावजीबुवाचे दोघे मुलगे टप्पेच चांगले गाऊ लागले, त्यामुळें त्या घराण्याचा लौकिक फारच वाढला. रावजीबुवास खास तालीम देवजीची असल्यानें त्यांचा टप्पा

फार रंगदार असे. हा बुवा बराच वयातीत होऊन व चांगला नावलौकिक मिळवून इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटी कालवश झाला.

## केशवबुवा गोगटे.

महाराष्ट्रांतील बावडे संस्थानांत हा नोकर होता. ह्याचा आवाज बारिक होता. हा टप्पा चांगला म्हणे. 'आमचें गोगटे घराणें टप्पेवाल्याचें' असें तो मोठ्या आढ्यतेनें सांगे. नारायणबुवा म्हणून त्यास एक बंधु होते. महाराष्ट्राबाहेर हा फारसा गेला नाहीं, म्हणून ह्याचें नांव फारसें ऐकूं येत नाहीं. ह्याचा स्वभाव प्रेमळ असून मंडळी ह्याला फार आवडत असत. ह्याचा गायनाचा अभ्यास आपल्या वडिलाजवळ झाला. बावडेकर संस्थानाधिपतींनीं ह्यास फार चांगल्या प्रकारें वागविलें, असा त्यांचा लौकीक आहे. हा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला.

## नारायणबुवा फलटणकर.

महाराष्ट्रांत कथेकरी म्हणून हे प्रसिद्ध आहेत. गोगटे घराण्यांत हें एक रत्न होऊन गेले. हे मैफलमध्यें टप्पा म्हणत. ह्यांचा आवाज पहाडी, मोठा, गोल व गोड असे. महाराष्ट्रांत जे चांगल्या आवाजाचे गवई होऊन गेले त्यांत ह्यांची गणना आहे. ह्यांच्या कथेला जी लोकांची गर्दी लोटे ती टप्प्याच्या चालीवर हे अभंग म्हणत ते ऐकण्यासाठीं. ह्यांच्या आवाजावर खुष होऊन आण्णा किर्लोस्कर ह्यांनी ह्यास आपल्या नाटकांत ओढण्याचा विलक्षण यत्न केला. पण ते नाटकांत गेले नाहींत! त्यांच्या वेळीं नाटकांत जाणें समाजांत कमीपणाचें मानलें जात असे. ते आण्णास म्हणाले, "मला आपण पैसे चांगले द्याल, पण आज माझ्या पायावर जे लोक डोकें ठेवीत आहेत, तेच लोक मग मला आपल्या पायाजवळ उभे राहूं देणार नाहींत, म्हणून मी तुमच्या नाटकांत येत नाहीं." एकदां कोल्हापुरांत आण्णाचें नाटक थिएटरांत, व नारायणबुवाची कथा देवीचे देवालयांत। पण गम्मत अशी कीं, बुवानी कथेंत सौभद्र आख्यान लाविलेलें, व त्यांच्या साथीला मागें उभे केशवबुवा! त्यावेळीं थिएटर ओस पडून देवीचे देवळांत उभें राहाण्यास जागा मिळेना इतकी गर्दी झाली। अशी हकीकत वृद्ध लोक सांगत. ह्यावरून त्याच्या आवाजाची व गायकीची कल्पना वाचकास करितां येईल. अशा प्रकारचा हा टप्पेवाला कथेकरी इ. स. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## विष्णुबुवा रेडे.

हे पुण्यास राहत असत ह्यांचा आवाज तारिफ करण्यासारखा वाईट होता. एका मुसलमान उस्तादापासून ह्यांनीं टप्प्यांचें गाणें संपादन केलें होतें ह्यांचा स्वभाव चिडखोर व तामसी होता टप्पा म्हणण्याची ह्यांची तरकीब फार चांगली होती हे उतारवयांत पर्वती संस्थानात नोकर होते ह्यांस मूलबाळ कांहीं नव्हतें. हे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत वारले

# ठुमरी गायक.

## अख्तरपिया.

लखनौचे शेवटचे नबाब वाजिदअलीशहा ह्यांनीं रचिलेल्या चीजांत 'अख्तर पिया असें आपलें टोपण नांव घातलें आहे. हे नबाब आपल्या बापाच्या मागें लखनौच्या गादीवर इ स १८४७ त बसले ह्यांच्या राज्य करण्याच्या गैर लायकीमुळें ह्यास इंग्रज सरकारांनीं इ स १८५६ मध्यें पदच्युत केलें; व बारा लाख रुपये पेनशन देऊन कलकत्त्यास नेऊन ठेविलें हे फार देखणे, मोठे चैनी, रंगेल व विलासी होते असा राजा हिंदूंत अगर मुसलमानांत हिंदुस्थानात तरी झाला नाहीं हे उत्तम गान व अप्रतिम नाचत असत कन्हैया नर्तक ह्यांचा शिष्य होता तो नर्तनकलेंत अप्रतिम होऊन गेला अशी तज्ञांची समजूत आहे. नबाबाच्या ३६० नाटकशाळा होत्या त्या कैसरबागेंत वाडे बांधून ठेविल्या होत्या होळीच्या सणानिमित्त रंगास केशर दहा हजार रुपयांचें खर्च होई हे कृष्ण व त्यांच्या नाटकशाळा गोपी होऊन रंग खेळण्याचें काम चाले त्या रंगेल क्रीडेचें वर्णन करण्यास कसलेला कलमबहादूरच पाहिजे। हे आपल्या वाड्यांत संगीत इंद्रसभा हें नाटक करीत नबाब स्वतः इंद्राची भूमिका घेत व त्यांच्या सर्वांत देखण्या नाटकशाळा पऱ्यांचीं कामें करीत त्या गायनाचें वर्णन कोण करू शकेल ! ह्यांच्या गैरवर्तनासाठी पदच्युत केल्याचा हुकूम इंग्रज बहादुराच्या अधिकाऱ्यानें इ स. १८५६ च्या फेब्रुवारी महिन्याच्या एका सकाळीं यांस कळविला, तेव्हां हे परत येऊन आपल्या दरबारहालमधील तख्तावर बसले, व भैरवी रागांत "बाबुल मोरा" ही चीज म्हणून 'आपण पदच्युत झालों' हें वर्तमान सर्व लोकास त्यांनीं विदित

केलें तेव्हां सर्व लोक ढळढळां रडले। तो प्रसंगच तसा शोकजनक व दुःखोद्रेक होता। कलकत्त्यास जातांना त्यांनीं आपल्याबरोबर वेंचक नाटकशाळा व गवयी घेतले होते. वाजिदअलीशहाकडे नबाब म्हणून न पहातां कलाप्रेमी व कलावंत ह्या दृष्टीनें पाहाणारास त्यासारखा रंगेल व गायनानें नखशिखांत वेडा झालेला दुसरा इसम खास सांपडणार नाहीं! हे कलकत्ता येथें इ. स. १८८७ मध्यें कालवश झाले.

## कदरपिया.

ह्या नावानें प्रसिद्ध असलेले गृहस्थ लखनौस राहत असत. हे लखनौच्या नबाबाचे दूरचे संबंधी होते. ह्यांस इंग्रज सरकारांतून दरमहा मोठी नक्त नेमणूक असे. हे मोठे रंगेल, तसेंच मोठे चैनी होते. नबाब वाजिद अल्लीशहाच्या वेळचा रंगेलपणा ह्यानीं पाहिला होता. तेव्हां ऐपतीनुसार त्याची नक्कल करण्याकडे ह्यांच्या मनाचा कल असे. ह्यांच्या जवळ कांहीं नाटकशाळाहि होत्या. होळीच्या रंगप्रीत्यर्थ हेहि दरसाल केशरखरेदींत हजार दोन हजार रुपये उडविण्यास कमी करीत नसत। रंगेलपणांत ह्यांनींहि लाखों रुपये उडविले। ह्यांनीं आपल्या पदरीं चार पांच गवई बाळगले होते. ठुमरी हे स्वतः रचून इच्छित रागांत ती गवयाकडून बसवून घेत. ते स्वतःहि चांगले गायक होतेच. ह्या ठुमऱ्या यू. पी. मध्यें फार लोकप्रिय आहेत. त्यांनीं अनेक ठुमऱ्या रचिल्या आहेत. ह्यांच्या ठुमऱ्यांचा विशेष असा आहे कीं, त्या ते स्वतःवर घडून आलेल्या प्रसंगावर रचीत. त्या बऱ्याचशा शृंगारपर आहेत. भाषा व अर्थगांभीर्य ह्या दृष्टीनें ह्यांच्या ठुमऱ्या चांगल्या आहेत. ते स्वतः चांगले गायक असल्यानें ह्यांच्या ठुमऱ्या गायकास म्हणण्यास बोजड लागत नाहींत. ह्यांना दोन मुलगे आहेत, पण त्यांची सांपत्तिक स्थिति कींव करण्यासारखी झाली आहे. वडिलांच्या ठुमऱ्या त्यांना चांगल्याशा गातां येत नाहींत! हे इ. स. १९ शतकाच्या अखेरीस कालवश झाले.

## सनदपिया.

हा चांगलीं कवनें करणारा होता. ह्यानें अनेक ठुमऱ्या व इतर चीजा रचिल्या आहेत. ह्याच्या ठुमऱ्या व इतर हलक्या रागांतील चीजा बऱ्याच प्रसिद्ध असून गायक व गायिका ह्यांच्या तोंडी आहेत. हा इ. स. १९ व्या शतकांत कालवश झाला.

## ललनपिया

ह्या टोपण नावानें प्रसिद्ध असलेला हा इसम लखनौ जवळच्या एका खेडेगांवीं राहत असे. हा जातीनें हिंदु ब्राह्मण होता ह्यानें अनेक ठुमऱ्या रचिल्या आहेत. ह्याची सांपत्तिक स्थिति चांगली नव्हती. हा स्वभावानें गरीब व सभ्य होता. हा ठुमरी कवन रचणारा आहे असा दिसत नसे. ह्याचीं दुसऱ्या प्रकारचीं पुष्कळ कवनेंहि प्रसिद्ध आहेत ह्याच्या ठुमऱ्या यु पी. मध्यें फार प्रसिद्ध आहेत. ह्याच्या ठुमऱ्या अर्थानें व भाषेच्या दृष्टीनें भारदस्त असून इतर ठुमऱ्यांपेक्षां वरच्या दर्जाच्या आहेत ह्याच्या ठुमऱ्या व इतर चीजा छापून प्रसिद्ध झाल्या आहेत हा इ स. १९२६ च्या सुमारास कालवश झाला

## मोजुद्दीनखां.

हा चव्यांपैकी गवई होऊन गेला ह्याची ठुमरी गाण्याबद्दल प्रसिद्धि होती हा बरेच दिवस बनारसमध्यें रहात होता ह्यानें अनेक गायिकास ठुमऱ्या शिकविल्या. ह्याची ठुमऱ्या शिकविण्याची व म्हणण्याची हतोटी वाखाणण्याजोगी होती ताना बेताच्या घेऊन ठुमरी नटविणें हें ह्याला चागलें साधलें होतें ह्याचा आवाज तारिफ करण्याजोगा नव्हता हा इ. स १९२० च्या सुमारास कालवश झ.ला.

## दिलीपराय.

हे बगाली सुशिक्षित तरुण आहेत ह्याचे वडील चांगल्यापैकीं कादंबरीकार अशी त्यांची प्रसिद्धि आहे. हे श्रीमानहि आहेत दिलीपराय दोन वेळ विलायतेची सफर करून आले आहेत ह्यांना सगीताचा मोठा नाद आहे ह्याचें म्हणणें असें आहे कीं, ठुमरी गायनाच्यायोगानें गायन चागलें प्रतीत होण्याजोगें आहे, तव्हा ठुमरी ही ध्रुवपद, ख्याल ह्यापेक्षां कमी दर्जाची मानू नये आपलें मत प्रतिपादण्यासाठीं हे आटोकाट प्रयत्न करीत असतात हे ठुमरी चांगली नटवून म्हणतात ह्यांचा कंठ मधुर आहे ठुमरी म्हणण्याची ह्यांची लटक चांगली आहे गायनाचा अधिक अभ्यास करण्याची ह्यांना हौस आहे त्यासाठीं चांगले उस्ताद ठेऊन शिकण्याची त्यांची मनीषा आहे. तरुण व शिकलेल्या मंडळींत ह्यांच्यासारखी ठुमरी गाणें फार थोड्यांसच साधलें आहे

# लावणी गायक

## राम जोशी.

जगन्नाथ जोशी नांवाचे यजुःशाखी ब्राह्मण सोलापुरास इ. स. च्या १८ व्या शतकांत रहात होते ते आपला निर्वाह जोसकीवर करीत असत. त्यास दोन पुत्र होते थोरला मुद्गल व धाकटा राम राम हा इ. स. १७६२ त जन्मला मुद्गल संस्कृत शिकून देवालयांत पुराण सांगे राम हा कांहीं अभ्यास न करितां हलक्या लोकांच्या संगतीत राहून कडे वाजवावे, तमाशे पहावे, अशा रीतीनें कालक्षेप करी । त्यामुळें मुद्गलभटजीस आपला धाकटा भाऊ राम हा आवडत नसे एकदां त्यानें रामास पुष्कळ राग भरून घरातून घालवून दिलें तेव्हा उपरति होऊन राम सोलापुराहून निघाला तो थेट पंढरपुरास गेला. प्रसिद्ध शास्त्रज्ञ बाबा पाध्ये यांचें शिष्यत्व पत्करून त्यांजपाशीं त्यानें संस्कृताचा चांगला अभ्यास केला तो जातीनें बुद्धिमान व हुषार असल्यानें गुरूची त्याच्यावर चांगली मर्जी बसली तेथें राहून चांगलें ज्ञान संपादून स्वारी सोलापुरीं परत गेली मुद्गलभटास हा शिकून आला ही कल्पनाच नाही मुद्गल भटजी आजारी असतां हा त्याची पोथी घेऊन ते ज्या देवालयांत पुराण सांगत होते, तेथें पुराण सांगण्यास जाऊं लागला त्याच्या पुराणाची वाहवा थोरल्या भावाच्या कानावर आली, तरी हा संस्कृत शिकून सुविद्य झाल्याचें त्यास खरेंहि वाटेना पण त्याचें पुराण समक्ष ऐकल्यावर त्याची रामावर मर्जी बसली; परंतु रामास लागलेला तमाशाचा नादमात्र गेला नव्हता. तमाशा घेऊन शिमग्याच्या दिवसांत तो पुण्यास गेला तेथें पेशव्यापुढें तमाशा करून त्यानें त्यांस खुष केलें व हजार रुपये इनाम मिळविलें एका सद्गृहस्थानें ह्याची वाणी, हुषारी व विद्वत्ता पाहून ह्यास म्हटलें "ब्राह्मण जन्मास येऊन चांगले करितोस; अक्कलेचें व बुद्धीचें सार्थक केलेंस !" पुढें स्वारी तमाशा घेऊन बारामतीस गेली व इतिहासप्रसिद्ध बाबूजी नाईकाचे चिरंजीव व प्रसिद्ध आनंदीबाईचे जामात पांडुरंगराव नाईक ह्यांच्या वाड्यांत गुढीपाडव्यास ह्यानें तमाशा केला. महाराष्ट्रांतील नामांकित कवि मोरोपंत त्या नाईकांचे आश्रित तेहि तमाशा ऐकावयास बसले होते 'भला जन्म हा व 'दो दिवसाची' ह्या लावण्या गाऊन रामजोशानें मोरोपंताचें मन प्रसन्न करून घेतलें मोरोपंत म्हणाले, "ह्या विद्वत्तेला हें साजत नाहीं हरिकीर्तन करून सार्थक करा' तेव्हां रामजोशानें

पंतास विचारलें, 'हरिकीर्तनांत काय म्हणूं' पंत म्हणाले, "अनेक आर्या मी तुमच्या-साठींच केल्या आहेत त्या म्हणा." तेव्हांपासून रामजोशी ह्यानें तमाशा सोडिला व तो हरिकीर्तन करूं लागला त्यांत त्यानें चांगली कीर्ति व द्रव्य संपादिलें ह्या काळासावळा पण सुस्वरूप, व बांधेसूत, आणि रंगेल, फक्कड होता. निर्व्यसनींहि नव्हता.

रामजोशानें 'छंदोमंजरी' म्हणून एक ग्रंथ लिहिला, तो ज्ञात्यास मान्य आहे. ह्यानें शृंगारिक, उपदेशपर, पुराणांतील उपआख्यानपर अनेक लावण्या रचिल्या. एक चरण संस्कृत, एक कानडी, एक मराठी अशीहि त्यानें लावणी रचिली आहे. ह्यावरून तीन भाषांवरील ह्याचें प्रभुत्व प्रतीत होत आहे. ह्याची छेकापह्नुती असलेली लावणी गुणज्ञास फार प्रिय आहे अशा प्रकाराचें कवित्व ह्याच्या वेळच्या कोणाहि शाहीरांत नव्हतें ह्याची योग्यता शाहीरापेक्षां श्रेष्ठ दर्जाची होती ह्याच्या अनेकविध व मनोहर लावण्यांस त्याच्याजवळ असलेल्या बया नावाच्या गायिकेनें चाली लाविल्या आहेत ह्याच्या तोडीचा शाहीर महाराष्ट्रांत तरी अद्याप झाला नाहीं ह्याच्या कवितांची जो बरबर पाहणी करील त्याचेंहि आमच्याप्रमाणें मत झाल्यावांचून राहणार नाहीं ह्या आपणांस 'तुरेवाला' म्हणवीत असे ह्याचे अनुयायीहि आपणास 'तुरेवाले' म्हणवितात. अशीं नररत्नें वसुंधरा कधीं कधींच जन्मास आणिते. ह्या इ. स. १८१२ मध्यें वयाच्या ५५ व्या वर्षी कालवश झाला.

'पंडित जगन्नाथ ह्यांची रंगेलपणाची व चैनबाजीची हौस त्या जन्मीं न पुरल्यामुळें तेच पुनः जन्म घेऊन रामजोशी झाले व चैनीची हौस त्यांनी फेडून घेतली!' असें एक सभ्य व विद्वान सनातनी प्रस्तुत लेखकाजवळ म्हणाले त्यांच्या म्हणण्यांत काहीं तथ्य आहे कां, ह्याचा विचार सुज्ञ वाचकांनीं करावा।

## अनंतफंदी.

अनंतफंदी ह्याचें उपनाम घोलप. हा यजुर्वेदी कौंडिण्यगोत्री ब्राह्मण. ह्याचें राहण्याचें गांव संगमनेर. लहानपणी ह्यानें फारसा अभ्यास केला नाहीं वाक्-चातुर्य, निस्पृहपणा हे गुण ह्याच्या अंगांत लहानपणापासून होते भवानीबोवा नांवाचा एक साधु संगमनेरीं रहात असे; त्याच्या वरप्रसादानें ह्याला कवित्वस्फूर्ति झाली, असें म्हणतात ह्याच्या वेळीं तमाशा हें सार्वत्रिक करमणुकीचें साधन होतें, म्हणून ह्यास हा नाद लागला एक तमाशा तयार करून त्यासह हा गांवोगांव

फिरत असे प्रसिद्ध पुण्यश्लोक अहल्याबाई होळकरीण हिच्या उपदेशानें व धाका-मुळें ह्यानें तमाशा सोडून कीर्तन करण्याचें स्वीकारलें ह्याच्या तमाशाचा जसा लौकिक झाला होता त्याहिपेक्षा ह्याच्या कीर्तनाचा लौकिक झालेला आहे. ह्यास दोन पुत्र झाले थोरला सवाईफंदी व धाकटा बापूफंदी

ह्यानें श्रीमंत सवाई माधवरावावर 'माधवग्रंथ' नांवाचा ग्रंथ ओवीबद्ध लिहिला. ह्यात्यात त्याची फार वाखाणणी आहे. ह्यानें खर्ड्यांची लढाई, श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे, नाना फडणवीस, यशवंतराव होळकर, फत्तेसिंग गायकवाड, चिंता-मणराव आप्पा पटवर्धन, वगैरेवर वर्णनपर उत्तम पोवाडे रचिले आहेत त्याच-प्रमाणें पुष्कळ लावण्याहि रचिल्या आहेत सर्वांपेक्षां ह्याची कीर्ति ह्यानें रचिलेल्या अनेक उपदेशपर फटक्यावर झालेली आहे ह्याचें कवित्व मधुर, सरळ, रसभरित व उपदेशपर आहे हा वयातीत होऊन इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला

## बाळा.

बाळाच्या बापाचें नांव सातप्पा शिलारखाने. हा पुण्यास राहत असे हा आपला चरितार्थ गवळ्याचा धंदा करून करीत असे. कविता करण्याची कला त्याला आनुवंशिक होती. हा लावण्या चांगल्या रचीत असे बापाप्रमाणें ह्याला चांगलें गानां येत असे. लावणी हा छंद ह्याच्या वेळेस नवाच निघाला होता, तेव्हां लावणी चांगल्या प्रकारें म्हणून लोकांची मर्जी संपादावी, असें ह्यास वाटे लावणी हें कवन करण्यांत व तें रागदारीत गाण्यांत ह्याचा बहिरू नांवाचा एक जिव-लग मित्र असे, म्हणून लावण्यामध्यें जोडीनें ह्या दोघांचीं नांवें येतात त्याचप्रमाणें लावण्या म्हणतांना हे दोघे मिळून त्या गात. हा रंगेल व हुषार शाहीर इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटीं कालवश झाला.

## बहिरू.

महाराष्ट्राचें राजधानीचें शहर जें पुणें येथील हा राहणारा ह्याचा धंदा रंगाऱ्याचा होता, व त्यावरच तो आपला चरितार्थ चालवी ह्याचा जिवलग मित्र बाळा गवळी म्हणून असे. बाळाप्रमाणें ह्याला लावण्या करण्याचा नाद होता. हे दोघे मिळून नव्या लावण्या रचीत, व त्यांत दोघाचें जोडून नांव घालीत गाण्याच्या वेळीं दोघे मिळून लावण्या गात दोघांचे आवाज गोड व सुरेल होते बैठकीच्या व फडाच्या लावण्या हे फार डौलदार रीतीनें म्हणत. महाराष्ट्राचा विशेष प्रबंध जो

लावणी ती म्हणण्यात ह्यांचा हातखंडा होता हा इ. स च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटी वारला

## होनाजी.

होनाजीच्या आजाचें नांव साताप्पा शिलारखाने हा पुण्याचा राहणारा. ह्याच्या नांवावरून हा लिंगाइत असावा असें वाटतें सातापासहि लावण्या करण्याचा नाद असे ह्यावरून होनाजीच्या अंगीं ही विद्या आनुवंशिक होती असे दिसतें. होनाजीच्या बापाचें नाव सयाजी होनाजीचा चुलता बाळा हा कवि असून चांगला गाणारा होता होनाजीच्या चुलत्याचा सोबती बहिरू रगारी होता तोहि बाळाबरोबर नव्या लावण्या रची चुलत्याचा सोबती जसा बहिरू होता तसा होनाजीचा स्नेही बाळा करजकर शिंपी हा होता ह्याच्या चुलत्याच्या लावण्यांत जसें बाळा बहिरू हे जोडनांव दृष्टीस पडतें, तसेंच होनाजीच्या लावण्यांतहि 'होनाजी बाळा' असें असतें ह्यावरून ध्यानांत येईल कीं, होनाजीबाळा म्हणजे दोन व्यक्ति होत्या! एक होनाप्पा गवळी व दुसरा बाळा शिंपी होनाजी हा श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे ह्यांच्या पदरीं होता हा सशक्त, बांधेसूद व मोठा विनोदी होता ह्याची बसण्याची उठण्याची जागा, पुण्यांत भुतकराच्या वाड्याजवळ जेथें त्र्यबकजी डेंगळ्याचा वाडा होता, त्यामध्यें एक खोली होती. ह्याच्या अंगच्या गुणामुळें ह्याला पेशवे, होळकर, गाईकवाड वगैरेकडून अनेक देणग्या मिळाल्या होत्या ह्याचा शेवट मात्र वाईट रीतीनें झाला ह्याला मारेकऱ्यांनीं मारून ह्याच्या घरीं आणून टाकिला! ह्याला कारण काय झालें हें अद्यापि नक्की समजलें नाहीं अनेकांचे अनेक तर्क आहेत ह्याच्या आजाची समाधि पुण्यांत जशी संगमावर आहे, तशीच याचीहि तेथेंच आहे. भाद्रपद कृष्ण त्रयोदशीचे दिवशीं म्हणजे होनाजीच्या मृततिथीस पुण्यांतील सर्व तमासगीर तेथें जाऊन अद्यापि हजेरी देऊन येतात हा इ. स च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत पुण्यास कालवश झाला.

होनाजी हा 'तुरेवाला' होता म्हणून ह्याचें 'कलगीवाल्यां'शीं भांडण व चुरस असे ह्यानें आपल्या चुलत्याप्रमाणें 'बैठकीच्या व 'फडाच्या अशा दोनहि प्रकारच्या लावण्या रचिल्या आहेत ह्याची रचना सुबोध, गंभीर, शब्दाची ठेवण चांगली, गाण्यास योग्य, उपमा अलंकारयुक्त अशी होती. ह्यानें रचिलेली 'घनःशाम सुंदरा . ' ही भूपाळी इतकी उत्तम आहे की, ती आबालवृद्धांच्या

तोंडीं अद्यापि आहे ह्याच्या लावण्या शृंगारिक, उपदेशपर, वर्णनपर अशा आहेत ह्याचा प्रतिस्पर्धी जो **सगनभाऊ** त्याच्या तोडीस तोड अशा ह्याच्या लावण्या आहेत ह्याच्या लावण्या गंगद्वागीत म्हणतात व त्यांच्या चाली फार चांगल्या व कर्णमधुर आहेत एकंदरीत ह्यानें व ह्याचा प्रतिस्पर्धी **सगन** ह्यानें लावणी हा छंद नवा रचून त्याची छाप महाराष्ट्र जनतेवर इतकी पाडली कीं, श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे ह्यांस तमाशाचा मोठा नाद लागला व त्यामुळें तमाशा ही संस्था शिष्ट लोकांत मान्य व बरीच प्रिय झाली

## बाळा.

हा पुण्यात राहत असे हा जातीचा शिंपी असून शिवण्याचा धंदा करून त्यावर आपलें पोट भरी ह्याला लावण्या करण्याचा मोठा नाद असे 'व्यसनेषु सख्यम्' ह्या न्यायानें होनाप्पा गवळ्याचा आणि ह्याचा स्नेह जडला. दोघांनीं मिळून लावण्या रचाव्या व त्यांत शेवटीं 'होनाजीबाळा' असें जोडनाव घालावें फडावर लावण्या म्हणण्यास दोघे मित्र मित्र उभे राहत व म्हणण्यांत वाहवा मिळवीत दोघांचे आवाज गोड व पहाडी, तेव्हां त्यास श्रोत्यांचीं मनें मोहून टाकण्यास व प्रतिपक्षावर जय मिळविण्यास वेळ लागत नसे होनाजी मेल्यावर थोड्याच दिवसांनी हा परलोकीं गेला

## प्रभाकर.

ह्या शाहीराचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील मुरूड गांवीं राहत असत ह्याच्या वडिलांचें नांव जनार्दनपंत दातार हे कोंकणप्रांत सोडून नाशिक जिल्ह्यांत गंगापूर येथें येऊन राहिले. ह्याच गांवीं प्रभाकराचा जन्म इ स १७६९ सालीं झाला प्रभाकर यास दोन बंधु होते; पण दोघेहि ह्याच्या देखत मृत्यु पावले. प्रभाकराचें पहिलें कुटुंब निवर्तल्यावर त्याचा द्वितीयसंबंध मुरुबाडचे साठे ह्यांच्या मुलीशीं झाला. नंतर प्रभाकर आपल्या घरांतील मंडळीसह इ स १७९० च्या सुमारास गंगापूर सोडून पुण्यास राहण्यास आला ह्यास चार मुली व एक मुलगा होता दोन मुली व एक मुलगा त्याच्या देखत वारला. एक मुलगी घाणेकर यांस दिली होती व एक मुलगी पुण्यास इतिहासप्रसिद्ध गंगाधरशास्त्री पटवर्धन ह्यांच्या घराण्यात दिली होती पुण्यांत आल्यावर श्रीमंत खंडेराव रास्ते ह्यांच्या पदरीं

शागिर्दपेशांत ह्यास कारकुनाची नोकरी मिळाली. त्या वेळी इतिहासप्रसिद्ध बाळाजी-पंत नातु रास्त्याकडे शागिर्दपेशांत होते प्रभाकर गौरवर्ण, सडपातळ व सुदृढ होता ह्याची राहणी ठाकठिकीची असे ह्याचा स्वभाव मनमिळाऊ, आनंदी व चैनी होता. ह्यास कविता करण्याचा नाद वयाच्या १५।१६ व्या वर्षी लागला देवताच्या स्तुतिपर व वर्णनपर कविता; शृंगारपर लावण्या; श्रीमंत सवाई माधव पेशवे याचा रग, खर्ड्याची लढाई, श्री सवाई माधवरावाचा मृत्यु वगैरे विषयावर पोवाडे ह्यानें रचिले आहेत प्रभाकर ह्यानें स्वतः कथा कीर्तन केलें नाहीं व तमा-शाहि कधी केला नाहीं. दादावीर, बचाजी दिवटे, बापु कान्होरे, महादया सुतार व गगु हैबती ही मंडळी त्याच्या लावण्या व पोवाडे गात रामजोशी, होनाजी-बाळा, सगनभाऊ वगैरेंच्या लावण्या व पोवाडे यांचा त्यास चांगला परिचय होता महाराष्ट्रांतील ह्या वर्गापैकी शाहीर म्हणून याची प्रसिद्धि आहे. हा इ स १८४३ त वयाच्या ७५ वर्षी वारला.

## परशराम.

परशराम ह्याचें राहण्याचें गाव नाशिक जिल्ह्यांत शिन्नर तालुक्यात राजाची वावी म्हणून होतें. हा इ स १७५४ च्या सुमारास जन्मला हा जातीचा शिंपी होता परशरामाचे वडील वावीसच राहत असत परशराम लहानपणीं बापाजवळ कपडे शिवण्यास शिकला आपला निर्वाह तो कपडे शिवून करीत असे ह्यास लिहितां, वाचतां येत असे हा गौरवर्ण असून देखणा होता ह्याचा पोषाक साधा असे ह्याची राहणी साधी असून, हा मितभाषी व विनयशील होता हा बहुश्रुत होता. रामायण, महाभारत इत्यादि ग्रथांतील गोष्टी त्यास चांगल्या माहित होत्या देवपूरचे बावा भागवत ह्याचे गुरु होते पंढरपूरचा विठोबा त्याची आराध्य देवता होती. रामकृष्ण नांवाचा ह्याला एक मुलगा होता

लावणी गाणारांमध्यें 'कलगीवाले' व 'तुरेवाले' असे दोन भेद आहेत. 'कलगी-वाले' शक्तिउपासक असून ते शक्ति श्रेष्ठ मानितात त्याच्या डफावर उत्सव प्रसगीं शक्तीचें द्योतक कलगी हें निशाण असतें 'तुरेवाले हे परमेश्वर अथवा शिव उपासक असून ते शिव श्रेष्ठ समजतात त्यांच्या डफावर शिव द्योतक तुरा हें निशाण असतें. ह्या उभयतां शाहिरांमध्यें मोठी चुरस असते. प्रसगविशेषी ते

एकमेकांस अपशब्द प्रचूर लावण्या म्हणून चिडवितात. त्यांचीं मोठीं भांडणेंहि होतात परशराम हा कलगीवाला होता त्याला लावण्या करण्याचा नाद लहानपणापासून होता. परशरामानें देवादिकाच्या स्तुतिपर, पुराणांतील गोष्टींवर, शृंगारपर, मैदिक वगैरे लावण्या रचिल्या आहेत त्याचा तमाशा प्रसिद्ध होता. बडोदे, इदोर ह्या संस्थानिकाकडून त्याला अनेक बक्षिसें मिळाली होतीं त्यानें कोणापासून इनाम घेतलें नाहीं तो म्हणे 'माझ्या सुईदोऱ्याला हयात असो.' असा तो निस्पृह असे त्यानें होळकर, गायकवाड, इंग्रज, देशस्थिति इत्यादि विषयांवर बरेच पोवाडे रचिले आहेत श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांची स्वारी एकदां कोपरगावीं गेली असतां, स्वारीबरोबर पेशव्याच्या पदरचे तमासगीर सगनभाऊ, होनाजीबाळा, धोंडी मेहऱ्या, बापु डांग्या, मार्तंड इत्यादि होते ह्या तमासगीरांपुढें परशरामाचें कांही तेज पडणार नाहीं असें कांहींजण म्हणाले, तेव्हा त्यास बावीस बोलावणें पाठवून कोपरगांवीं आणविलें; परंतु ह्यानें त्या सर्वांवर ताण केली। तेव्हां श्रीमंत ह्यास इनाम देत होते, पण तें ह्यानें घेतलें नाहीं असो. महाराष्ट्रांतील नामांकित शाहिरांपैकीं हा एक होता गगथडीस ह्याच्या लावण्यांची चांगली प्रसिद्धि आहे. हा ९० वर्षांचा होऊन इ. स. १८४४ मध्यें वारला

## सगनभाऊ.

सगनभाऊ हा पुण्याजवळील खंडोबाचें क्षेत्र जें जेजुरी तेथील राहणार हा जातीचा मुसलमान होता ह्याचा जन्म इ स १७९० च्या सुमारास झाला हा जातीनें जरी मुसलमान होता तरी ह्याचे स्नेहीसोबती मराठे व ब्राह्मण असल्यामुळें ह्याला मराठी भाषेचें ज्ञान चांगलें होतें हा शिकलगारीचा धंदा करून आपला चरितार्थ चालवी हा ऐन उमेदींत कवन करूं लागल्यावर पुण्यास येऊन राहिला होता त्याच्या वेळचा होनाजीबाळा शाहीराचें व ह्याचें वांकडें होतें

ह्याला लावण्या करण्याचा नाद पूर्ववयांतच लागला श्रीमंत बाजीराव ह्यांस लावण्या ऐकण्याचा शौक आहे, तेव्हां आपलें कवन आपणच म्हणून त्यांच्या कानावर घालावें, ह्या इरादानें एका मध्यरात्रीच्या सुमारास तो बुधवारच्या वाड्याजवळ गेला पहारेकऱ्यानें मज्जाव केल्यावर त्याची विनवणी करून एक लावणी म्हणण्याची त्यानें परवानगी घेतली मग तंबूरी लावून लड्या सुरावर ह्यानें अशी एक लावणी म्हटली कीं, ती ऐकतांच श्रीमंतांनी खिडकी उघडली

व हातातील अंगठी ह्याच्या अंगावर टाकून दुसरे दिवशीं ह्याला भेटण्यास सांगितलें. दुसरे दिवशीं हा ती आंगठी घेऊन श्रीमंतांस भेटला. श्रीमंत ह्याच्या लावणी म्हणण्यावर फार खुष झाले होतेच. त्यांनीं ती आंगठी ह्यास बक्षीस म्हणून दिली व ते दिवसापासून ह्याला आपल्या पदरीं ठेविलें. ह्याचा प्रतिस्पर्धी होनाजीबाळा तुरेवाला होता व हा कलगीवाला होता. हें एक त्यांच्या चुरशीचें कारण; दुसरें दोघेहि लावण्या, पोवाडे रचणारे; तेव्हां एकाचा मोठेपणा दुसऱ्यास कसा पाहवणार ? आपल्या लावण्यांत एकमेकांस लागतील अशी शब्दयोजना त्यांनीं केली आहे. अशा प्रकारें त्यांचा बांकुडपणा आमरणांत चालला. सगनभाऊनें देवादिकांवर, क्षेत्रवर्णनपर, संभोगशृंगार, विप्रलंभशृंगार, वगैरे विषयांवर अत्युत्तम लावण्या रचिल्या. त्याच्या लावण्यांच्या चाली फार मजेदार आहेत. पुष्कळ लावण्यांस रागदारीच्या चाली आहेत. रामजोशाशीं ह्याच्या लावण्यांची तुलना केल्यास जोशीबुवांच्या लावण्या कविता या दृष्टीनें फार सरस, परंतु त्यांच्या चाली अगदीं साध्या. जोशीबुवा सोलापुरास राहणारे असल्यानें त्यांच्या चाली जगमाच्या पदासारख्या होत्या; परंतु सगन हा पुण्यांत राहिल्यामुळें त्यानें अनेक गवयांचीं गाणीं ऐकिली होतीं, म्हणून त्यानें रागदारीच्या चाली आपल्या लावण्यास लाविल्या होत्या. पानिपतचा रणसंग्राम, खडकीची लढाई वगैरे वर उत्तम पोवाडे ह्यानें रचिले आहेत. ह्याची कविता श्रेष्ठ प्रतीची आहे. त्यांत कवित्व दिसून येतें. ह्याच्या लावण्या बैठकीच्या, फडावरील, भेदिक आदि विषयांवर असून श्रोत्यांचें मन मोहून टाकण्याची त्यांत जादु आहे. ह्याला 'लाल' नांवाचा एक मुलगा होता तो ह्याच्या देखत मेल्यामुळें हा थोडा खिन्न व उदासीन झाला होता. 'लाल गया, संसार गया' ही त्यास उद्देशून त्यानें लावणी रचिली आहे. महाराष्ट्रांतील नामांकित शाहीरांत ह्याची गणना आहे. हा इ. स. १८५३ च्या सुमारास वयातीत होऊन कालवश झाला.

## रामा गोंधळी.

हा जातीचा गोंधळी असून गाणें हा ह्याचा धंदाच होता. तशांत सगनभाऊच्या बैठकींत राहून ह्यास लावण्या म्हणण्याचें ज्ञान चांगलें लाभलें होतें. ह्याचा कंठ मधुर, लावण्यांची रचना चांगली व म्हणण्याची लटक उत्तम, त्यामुळें लोकांस

ह्याचें म्हणणें फार पसंत पडे रामा गोंधळ्यामुळें सगनच्या लावण्यांस उत्तम प्रसिद्धि मिळाली ह्या नामांकित लावणी म्हणणारा म्हणून ह्याची त्यावेळीं प्रसिद्धी झाली होती हा इ स. च्या १९ व्या शतकाच्या मध्यांत मरण पावला

## गोपाळ कृष्ण.

हे दोघे बंधु सांगलीचे राहणारे; हे जातीनें गोंधळी होते ह्यांचे कंठ फार मधुर असत लावणी हें जें महाराष्ट्राचें खास गाणें त्यांत ह्या बंधुद्वयानें चांगलें प्राविण्य संपादिलें होतें फडावरील लावण्यांपेक्षां बैठकीच्या लावण्या हे फार उत्तम म्हणत. लोकरंजन करण्याची हातवटी ह्यांस चांगली साधली होती हे इ स च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले

# भाग ३.

# वादक.

## बीनवादक.

### समोखनसिंग.

बीन हें वाद्य खास रजपूतांचें असून त्या वाद्याचा त्यांस विलक्षण शौक असे. एका सोन्याच्या नाण्यावरहि राजा बीन वाजवीत आहे असें कोरलें आहे। समोखनसिंग हे जातीनें रजपूत राजपुतान्यांत खंडार गांवचे हे राहणारे ह्याना बीन वाजविण्याचा मोठा नाद. हे नुसता नाद करूनच राहिले नाहींत, तर बीन वाजविण्यांत ह्यानीं फार परिश्रम करून चांगला लौकिक संपादिला होता त्यावेळीं राजपुतान्यांत ह्यांच्या सारखा दुसरा बीनकार नाहीं अशी प्रसिद्धी होती अकबरबादशहा विद्येचा व कलांचा मोठा प्रेमी त्याच्या दरबारांत जसा तानसेन पहिल्या प्रतीचा गायक, तसा पहिल्या प्रतीचा बीनकार दरबारांत नव्हता समोखनसिंगाचा लौकिक कानावर येतांच बादशहानें ह्यास बोलावून नेलें व आपल्या पदरीं दरबारवादक म्हणून ठेवून घेतलें ह्यांचें बीनवादन ऐकून बादशहा खुष झाला व ह्यांस त्यानें 'राजा' ही पदवी दिली तानसेन फार मोठा गायक व बादशहाची त्याच्यावर सोळा आणे मर्जी त्यास वाटलें हें रत्न आपलेंसें करावें त्यानें ह्याशीं दोस्ती जमविली. 'मी पूर्वींचा हिंदूच. पुढें मुसलमान झालों तसा तू मुसलमान होत असल्यास तुला माझी मुलगी देतों विचार कर.' असें तानसेन ह्याला म्हणाला समोखनसिंगानें पाहिलें, 'हा बादशहाच्या प्रेमांतला, आपण बाटल्यास बादशहाची मर्जी आपल्यावर अधिक बसेल, व ह्याशीं नातें जोडल्यानें आपल्यास मोठाच आधार सांपडेल. अनेक रजपूत आपल्या मुली मुसलमानांस देतात; मग ह्यांत काय वावगें आहे?' ह्यानें आपली अनुकूलता तानसेनास कळविली तानसेनानें ती गोष्ट बादशहाच्या कानावर घातली. बादशहाची

अनुमति मिळताच धर्मांतर करण्याचा विधि झाला। समोखनसिंग बीनकार बादशहाच्या कृपेनें **नौबदखां** बनले. नौबतखास अनेक रागांत अनेक ध्रुवपदें येत होतीं. ह्याची ध्रुवपद म्हणण्याची जी तऱ्हा तिला **खंडारबाणी** असें नांव पडलें अशा रीतीनें बादशहाच्या दरबारीं नौबतखांचें मोठें प्रस्तच झालें ह्याचा हात वाजविण्यांत फार मधुर, व्यासग दांडगा, खंडारबाणीचें नवें वळण, त्यामुळें ह्याचा लौकिक फार झाला. ह्यास दोन मुलगे झाले एक **रसबीनखां** व दुसरा **रागरसखां** सासऱ्या, जावयास अत्यानंद झाला; पण दोघेहि स्वभावानें नम्र व त्यांस विद्येचा गर्व नव्हता तानसेनानें एक नातू गवई बनविला, तर नौबत-खानें एकास बीनकार केलें अशा रीतीनें संतति, संपत्ति, यश व आयुष्य लाभून नौबतखा इ. स च्या १७ शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले

## रसबीनखां.

हा नौबतखांचा थोरला मुलगा. नौबतखां मीया तानसेनाचे जामात; रस-बीनखां हा तानसेनाच्या मुलीचा मुलगा म्हणजे त्याचा नातू होय. आजाकडून अनेक उत्तम व घराणेदार ध्रुवपदांची तालीम, व वडिलांकडून खास–उल–खास बीनाची तालीम मग ह्याच्या विद्येत कमीपणा कसा राहाणार? हा जातीनें हुषार व शिक्षण घरचें. मग बीनवादनांत तो प्रवीण झाला यांत नवल काय! रसबीनखांचा हात फार गोड, वाजविणें बिलपदी, अनेक ध्रुवपदें पाठ; बीनाचे सर्व कायदे घरचे; तेव्हां बादशहाच्या दरबारात याची वाहवा कां न व्हावी! हा चांगला ध्रुपद गायक होता. परतु वडील बीनकार असल्यानें तो स्वतःस बीन-कारच म्हणवून घेत असे. हा फार देखणा होता हा दीर्घायु होऊन बापाच्या पश्चात इ स. च्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत दिल्ली येथें कालवश झाला

## सदारंग व अधारंग.

न्यामतखा व फिरोजखां हे दोघे बंधु दिल्लीपति महमदशहा याच्या वेळीं (इ. स. १७१९–१७४८) उदयास आले यांच्या वडिलाचें नाव लाल-खांसानी असें होतें. अकबर बादशहाच्या वेळीं प्रसिद्ध बीनकार म्हणून नांवाज-लेले नौबतखां यांच्या वंशांतील हे दहावे पुरुष होत हे खांसाहेब बीन हें वाद्य अप्रतिम वाजवीत. महंमदशहाच्या दरबारी तानसेनाच्या वंशांतील ध्रुवपदगायक

जसे दरबार गायक होते, तसें हे बीनकार म्हणून दरबारवादक होते. पुढें कांहीं दिवसांनीं दरबार-गायक, बीनकारादि वादकांस कमी मानू लागले; कारण गायकाच्या गाण्यानें जितकें मन तल्लीन होतें तितकें वाद्याच्या योगानें होत नाहीं. वाद्य हें निर्जीव व गायक सजीव असल्यानें निरनिराळे आविर्भाव करून त्यास श्रोत्यांचें मन रंजविण्यास अधिक सोय असते. पुढें दरबारात, गायकांच्या गाण्यास बीनाची साथ मिळाल्यानें गायन अधिक रंजनकारी होईल, या समजुतीनें या बीनकारास गायकाची साथ करण्याची कामगिरी आली. हा आपला अपमान आहे, असें बीनकार म्हणू लागले पण बादशहाच्या हुकुमापुढें कोणाचें काय चालणार ! बीनकार म्हणत, 'आम्ही स्वतंत्र बीन वाजवून रंग आणू.' बादशहास तें पटेना. तो म्हणे, 'तुमच्या वाजविण्यानें गायनास अधिक रंग चढतो, तेव्हां तुम्ही गायकांच्या मागें बसून त्यांची साथच केली पाहिजे.' म्हणजे जसे सारगे, पखवाजिये तसे हे बीनकार **साजिंदे**, अशी समजण्याची पाळी आली ! तेव्हा या बीनकारांनीं गवयांच्या मागें बसून त्यांची साथ करण्याचें साफ नाकारिलें. असें होताच त्यास दरबार बंद झाला. त्यांनीं दिवाणांच्या घरीं जाऊन सर्व मजकूर विदित केला कीं, "ध्रुवपदिये गायक जसे तानसेनाच्या मुलाचे वंशज, तसे आम्ही बीनकार तानसेनाच्या मुलीचे वंशज तेव्हां आम्ही त्याच्या बरोबरीचे असतां आम्हास हे काय म्हणून साजिंदे बनवितात ?" "हुजूर हुकुमापुढें माझा इलाज नाहीं तुम्हांस दरबारांत बसता येणार नाहीं," असें दिवाण म्हणाले तेव्हां नाइलाज होऊन हे दोघे बंधु दिल्ली राजधानी सोडून गेले त्यांना हजारों ध्रुवपदें अनेक रागांत येत होतींच. त्या नमुन्यावर ह्यानी **ख्याल** नांवाचीं नवीं गाणीं अनेक रागांत रचिलीं. ह्यांनीं मोठे ख्याल ध्रुवपदाच्या नमुन्यावर रचिले म्हणून त्यांस 'मुडी ध्रुवपदें' असें म्हणतात त्या गाण्यात बादशहाची स्तुति करून **सदारंग** व **अधारंग** अशीं आपली टोपण नांवें ह्यांनीं घातलीं व दोन तीन वर्षांनीं तीं गीतें दरबारांत आपल्या शिष्यांकडून गावविलीं. तीं ऐकून बादशहा खूष झाला व त्यानें ह्यांचा अपराध माफ करून पुनः दरबारांत मानानें बसण्याची ह्यांस परवानगी दिली हेच ख्यालगायनाचे प्रवर्तक व ख्याल नांवाच्या प्रबंधाचे कर्ते होत मोठे ख्याल म्हणणारे गायक आपली परंपरा ह्या सदारंग अधारंगांशीं लावितात, ह्यांच्या वेळेपासून ख्यालगायन शिष्ट समाजांत प्रसृत झालें व ध्रुवपद गायनाची गोडी कमी झाली. ख्यालगायन लोकप्रिय झालें हें पाहून ख्याल नांवाच्या नव्या चीजा तयार करण्यांत बऱ्याच

लोकानीं भाग घेतला. सदारंग व अधारंग ह्यांनीं अशीं टोपण नांवें आपल्या चीजेंत कां घातलीं, ह्याचें कारण माहीत नसल्यानें म्हणा अगर अनुकरण-प्रियतेचा मनावर जबरदस्त पगडा बसल्यानें म्हणा, पुढील ख्याल रचणारानीं आपलीं खरी नांवें गुप्त ठेवून, 'मनरंग,' 'सबरंग,' 'कोडीरंग' अशीं टोपण नांवें घेऊन ख्याल नांवाच्या चीजा रचिल्या, हल्लींच्या गायकाच्या गाण्यांत त्या चीजा आपणास दिसतात. प्रथम अशी प्रथा पडण्याचें कारण न समजून ख्यालांच्या चीजांत असेंच केलें पाहिजे असा सर्वत्र भ्रामक समज होऊन बसला आहे. आपल्या वेळींहि ख्याल रचणारे 'हररंग' इत्यादि टोपण नांवें घेऊन चीजा रचतांना दिसतात हें ह्याचेंच द्योतक आहे.

## हसनखां

दिल्लीपती महमदशहा याच्या वेळीं ध्रुपद्गायन ख्यालगायनामुळें जें मागें पडलें त्याला कारण सदारंग व अधारंग ह्यांच्या चीजा व गायनाची तरकीब होय. त्या वेळीं 'आपणांस नवे ख्याल व बीन वाद्य शिकण्याची फार इच्छा झाली आहे, तरी आम्हास शिकविण्यास सदारंग व अधारंग हे जनानखान्यांत पाठवावे' अशी विनंति जनानखान्यांतील स्त्रियानीं बादशहाकडे केली. बादशहानें तसा हुकूम दिवाणाच्या मार्फत सदारंग व अधारंग यांस फर्माविला पण 'आम्ही जनानखान्यांतील स्त्रियास तालीम देणें कमीपणाचें समजतों,' असें त्यांनीं दिवाणास सांगितलें. वजीर म्हणाला 'तुमच्यावर आता कोठें बादशहाची मर्जी प्रसन्न झाली आहे ती पुनः बिघडेल ह्याचा विचार करा.' तेव्हा त्यानीं आपल्या शिष्यांपैकी हसनखां धाडी यास जनानखान्यांत तालीम देण्यास पाठवून आलेलें संकट टाळिलें. तेव्हांपासून पुढें झालेल्या बीनकारांपैकी जे आपणास पिढीजात बीनकार म्हणवितात त्यांतले बरेचसे बीनकार हसनखां धाडी यांच्या वंशांतील आहेत, व फार थोडे सदारंग, अधारंग यांच्या खास वंशांतील आहेत, असें जुन्या पिढीतील सभ्य मुसलमान गायकवादक म्हणत असत. केवल जाती-वरून मोठेपणा मिळत नसतो, अंगच्या विद्येनें लोक आजवर मोठेपणास चढले आहेत, हें विसरतां कामा नये.

## उमरावखां.

हा छोटे नौबतखाचा मुलगा याला ह्याचा चुलता निर्मूलशा याची मुलगी दिली होती हा रामपूरचा राहणारा याच्या इतका प्रसिद्ध बीनकार ह्याचे वेळीं कोणी नव्हता, अशी ह्याची प्रसिद्धी आहे. रामपूरचे प्रसिद्ध बीनकार वजीरखां यांचा हा आजा होय हा इ स १८४० च्या सुमारास कालवश झाला.

## महंमदअलीखां.

प्रसिद्ध बीनकार उमरावखां यांचा हा भाऊ. हाहि उत्तमांपैकीं बीनकार होता. हा बनारसच्या राजाजवळ नोकर होता हा इ. स. च्या १८५५ चे सुमारास कालवश झाला

## मीर नासर अहंमद.

हा मुसलमानांतील सय्यद्पंथी होता, परंतु ह्याला गायनकलेची फार गोडी असून बीन वादन शिकण्याची इच्छा झाली बीन चांगलें शिकावयास मिळावें यासाठी ह्यानें आपली धार्मिक मतें बाजूस ठेविली व दिल्ली येथें वादन शिकण्यासाठीं जाऊन तेथील एका कलावंत घराण्यांतील मुलीशीं लग्न लाविलें. लखनऊचे प्रसिद्ध गायनप्रेमी नबाब वाजदअलीशहा यांनी ह्यास आपल्या पदरीं ठेवण्यासाठी बोलाविलें. परंतु ह्यानें ते पत्करिलें नाहीं हा सरळ स्वभावाचा होता व प्रेमळ लोकांस हा आपलें वादन फुकट ऐकवीत असे ह्याच्या वेळच्या उत्तम बीनकारांत ह्याची गणना होत असे हा इ स १८६० चे सुमारास कलावश झाला.

## अमीरखां.

रामपूरचे प्रसिद्ध बीनकार व नबाब हमीद अलीखा याचे गुरू व सासरे वजीरखां, यांचे हे वडील हे उत्तम ध्रुपदिये गवई व प्रसिद्ध बीनकार होते ह्यांस अनेक रागांतील पुष्कळशीं ध्रुपदें येत असत, हे उत्तम बीनकार म्हणून ह्यांची कीर्ति आहे. हे म्हणत कीं, 'अनेक ध्रुवपदें आल्याशिवाय बीनकार चांगला तयार होत नाहीं ' हे इ. स १८७० सुमारास कालवश झाले

## वजीरखां.

हे सदारंगाच्या घराण्यांतील असून सदारंगापासून पांचवे पुरुष होत. ह्याच्या वडिलांचें नांव अमीरखां. अमीरखां हे गवई व बीनकार होते. वजीरखा आपल्या वडिलाजवळ बीन वाजविण्यास शिकले; ह्यांस अनेक रागांत अनेक ध्रुवपदें येत असत. ह्यांच्यासारखा बीनकार हिंदुस्थानांत झाला नाही असा ह्यांचा लौकिक आहे. अनेक रागांचें त्यास मार्मिक ज्ञान होतें. ह्याच्या गुणावर भुलून रामपूरचे त्यावेळचे मरहूम नबाब हामीदअलीखा यांनीं ह्यास आपले गुरु व दरबार गवईहि केले. मोठी गुरुदक्षिणा दिली व ह्यांस रामपुरास ठेऊन घेऊन तेथील रहिवाशी केले. पुढें कांही दिवसांनीं ह्याच्या मुलीशीं लग्न लावून ह्यास आपले श्वशुर केले! वजीरखास नबाबसाहेबानीं मोठें उत्पन्न करून दिलें. ह्यांचा स्वभाव मोठा मानी होता. ह्यानीं फारसें कोणास शिकविलें नाहीं. नबाबसाहेबांच्या आग्रहावरून कांहीं अवघड रागांची माहिती, व कांहीं वस्तादी चीजा, प्रस्तुत लेखकाच्या वडिलाचे परमस्नेही प. विष्णु नारायण भातखंडे यांस मात्र शिकविल्या. ह्याचा हात फार मधुर व वाजविण्याची शैली फार गोड व विलक्षण होती. ह्यांनीं आपल्या **प्यारखां** नांवाच्या मुलास बीनवादनांत तयार केलें होतें. पण तो तरुणपणीं ह्याच्या देखतच वारला. त्या दु:खामुळें हे इ. स. १९२६ च्या सुमारास वारले. असा बीनकार व कलाभिज्ञ ईश्वराच्या कृपेनें केव्हां निपजेल तो निपजो.

## अलीहुसेनखां.

गायनविद्येंत नावाजलेल्या अशा एका घराण्यामध्यें ह्याचा जन्म झाला. ह्याचे वाडवडील लखनौ येथें रहात असत. हे एकंदर तिघे बधू होते. अलीहुसेन, इनायतहुसेन व महंमद हुसेन. रामपूरचे बहादर हुसेनखा हे ह्याचे गुरु होत. त्यांचेपाशीं हे बीन शिकले. हे एक उत्तमांपैकीं बीनकार होऊन गेले. याशिवाय हे गातहि असत. ह्याचें गाणें ख्यालियांच्या पद्धतीचें होतें. ह्याचा नांवलौकिक झाल्यावर हे मुंबईस गेले होते व तेथें ह्याचा बरेच दिवस मुक्काम होता. तेथें ह्याची फार वाहवा झाली. मुंबईहून मग पुढें हे बडोद्यास गेले व तेथें गायकवाडीत नोकर झाले.

हे दिसण्यांत मोठे देखणे होते. ह्यांची रहाणी एखाद्या अमीराप्रमाणें मोठ्या थाटाची असे. ह्या दोनहि गुणांमुळें ह्याची कोणावरहि चटकन छाप बसे; व ह्याचेबद्दल अनुकूल ग्रह होई. ज्यांचा जनतेशीं संबंध येतो व त्यांच्या अनुकूल

अहावर धद्याची मिळकत अवलबून असते, अशांना व त्यातल्या त्यात केवळ शोकाच्या व मनरंजनाच्या विषयाच्या धदेवाईकांना अशा तऱ्हेची देणगी असणें फार फायद्याचें असतें; परंतु सर्वांना ती लाभणें शक्य नसतें अल्लीहुसेन सारखे भाग्यशाली विरळाच।

प्रसिद्ध बीनकार बंदेअल्ली व अल्लीहुसेन याच्यात तरतमभाव पाहू लागले तर कोण पहिला व कोण दुसरा ह्याचा निर्णय होणार नाहीं कोणी एकास पहिला नबर द्यावा, तर कोणी दुसऱ्यास ह्यानीं कोणास बीन शिकविलें नाहीं गडा बांधण्याचें कबूल केल्यावर ह्यानीं आपला धाकटा भाऊ महंमद हुसेन ह्यास बीन मोठ्या नाखुशीनें शिकविलें! काही थोड्यास सतार शिकविली ह्याच्या गुरूनें ह्यास बीन शिकविलें पण सुरसिंगार हें वाद्य वाजविण्यास शिकविलें नव्हतें। एकदा हे मुब-ईस असतां एका प्रसिद्ध सतारियाचा मुजरा ठरला. तो ऐकण्यास हे गेले होते. हे मोठे बीनकार तेव्हां तो सतारिया साहजीकच थोडा चपापला तेव्हां ते पाहून ह्यांनी तो वाजवीत असतां 'गांधारची तार नीट लावा,' असें म्हटलें त्याबरोबर तो अधिकच घाबरला व त्यांचें वाजविणें जमावें तसें जमलें नाहीं दुसऱ्या एका वेळीं अल्लीहुसेनचे गाण्याचा मुजरा ठरला, कारण हे चांगले गातहि असत. त्यावेळीं त्या सतारवाल्याची साथ करणारा तबलजीच ह्यांच्या साथीस आला होता ह्याच्या बोलण्यानें सतारवादनाचा बेरंग झाला होता; हें त्या तबल-जीच्या चांगलें ध्यानांत होतें। गायन सुरू झालें. तबला वाजवून तो साथ करू लागला, पण समेवरच येईना। एकदोन आवर्तनें झाली, तेव्हां खांसाहेबानीं तबलजीस म्हटलें, 'भाई, दरवाजा खोलो;' तेव्हां तबलजी ह्यास हसत म्हणाला 'मीया गधारकी तार अटक रही है।!' मग मीयांनीं त्याची अर्जेव केल्यावर' गाण्याचा बेरंग होण्याचें टळलें. अशा गोष्टी अनेकवार घडतात पण त्याची नोंद कोण ठेवतो. ह्यांत कलावंताच्या मनाची ठेवण कशी असते, हें दाखवि-ण्याचाच हेतु आहे ह्यात कोणास दोष देण्याची इच्छा नाहीं हे इ. स च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले

## बंदेअल्लीखां.

हा प्रसिद्ध बीनकार हसनखान धाडी याच्या वंशातला. हिंदुस्थानांत जे प्रसिद्ध बीनकार होऊन गेले त्यामध्यें ह्याची गणना होते. ह्याचा हात फार गोड व वाजविणें अति मधुर होतें. ह्यानें कोणास बीनाची तालीम दिली नाहीं.

तथापि अलीकडील बीनकार 'आपण बंदेअलीखाचे शिष्य' म्हणून सांगतात । ह्यांची वागणूक बरीच अव्यवस्थित असे ह्रा शिंदे सरकारच्या पदरी होता तेथून सुट-ल्यावर मुंबईस गेला व कांही वर्षे तेथें राहून पुण्यास आला ह्रा मरेपर्यंत प्रसिद्ध नायकीण चुन्ना ह्याचेजवळ होती ग्वालेरचे प्रसिद्ध गवयी हदूखां ह्यांची मुलगी ह्यास दिली होती व प्रसिद्ध ध्रुवपदिये जाकुदिनखा हे याचे जावई होते याला एक भाऊ होता. ह्रा शेवटी पुण्यास इ स. १८९३ चे सुमारास वारला पुण्यातील नव्या पुलाजवळील दर्ग्यामध्यें ह्याचें थडगें आहे.

## बळवंतराव भैय्या.

श्रीमत जयाजीराव महाराज शिंदे यांचे हे दासीपुत्र हे स्वभावानें सरळ व शांत असत. तसेंच हे मोठे धर्मनिष्ठ होते. ह्यांना गायनाचे फार प्रेम असे बंदे-अलीखां यांजपाशीं हे बीन वाजविण्यास शिकले होते हे कविताहि करीत असत. ह्यांचा हात फार गोड असे ह्यास मूलबाल कांहीं नव्हतें गायकवादकांना ह्यांचा मोठा आश्रय होता मोठ्या हुद्यावर असतांहि, ह्यांचें वर्तन सभ्यपणाचें असे हे मोठे मनमिळाऊ असत हे स १९२५ चे सुमारास ग्वालेरीस वारले.

## मुरादखां

ह्रा इंदूरचा राहणारा ह्रा आपणास बंदेअलीखांचा शिष्य म्हणवीत असे. ह्रा राजपुतान्यांत एका संस्थानात कांहीं दिवस नोकर होता नंतर निर्वाहासाठीं महा-राष्ट्रातील प्रसिद्ध शहरीं ह्रा मुजरे करीत फिरत असे ह्रा बीन वाजविण्यांत बरा होता. इदुरांत यांच्या देखत याचा मुलगा वारल्यामुळें याला धक्का बसला व पुढें ह्रा अर्धांगवायूनें इ. स. १९२७ चे सुमारास वारला

## मौलाबक्ष.

ह्रा बरींच वर्षे दक्षिणेंत होता. ह्रा बऱ्यांपैकीं गायक व बीनकार होता. ह्रा पुढें बडोद्यास गेल्यावर तेथें ह्यास राजाश्रय मिळाला ह्रा तेथें बीनकार म्हणून प्रसिद्धीस आला. श्रीमंत सयाजीरावमहाराज ह्यांच्या आज्ञेनें तेथें ह्यानें एक गायनशाळा काढिली त्या शाळेसाठीं कांहीं पुस्तकेंहि ह्यानें लिहिलीं. ह्यानें आपली एक स्वतंत्र नोटेशनपद्धति काढिली. गायनामध्यें बहारराग ह्याच्या

आवडीचा असे हा स्वभावानें सरळ होता या कलेमध्यें बरेंच प्रावीण्य ह्यानें संपादन केलें होतें; अशी लोकांची समजूत आहे श्रीमत सयाजीरावमहाराज गायकवाड यांची याच्यावर बरीच मर्जी असे बडोद्यांत गायनकलेची गोडी उत्पन्न करण्यास हा बराच कारणीभूत झाला ह्याला संतती असून ती या कलेंत बरीच प्रवीण आहे. ह्यानें आपल्या एका मुलास श्रीमंताच्या हुकमानें विलायतेस पाठवून संगीतप्रवीण करून आणिलें. हा इ स १९१० चे सुमारास कालवश झाला.

## दत्तोपंत फडके

हे जमखिंडीचे राहणारे. गणेशपंत म्हणून ह्यांना एक बंधु होते. हे दक्षिणेंत जाऊन रुद्रवीणा शिकून आले होते, व पुढें हे रुद्रविण्यामध्यें आपल्याकडील राग वाजवीत ह्यांचा हात हें वाद्य वाजविण्यांत तारीफ करण्याइतका गोड नव्हता असें नाही, असें त्यावेळच्या तज्ञांचें मत आहे हे तालांत फार पक्के होते. हे जव्हार संस्थानांत नोकर होते व तेथेंच इ स १९२३ च्या सुमारास वयाच्या ८१ वर्षी कालवश झाले

## जमालुद्दिनखां.

हा बडोद्याच्या रियासतीपैकीं एक बीनवादक आहे. हा बन्यांपैकीं बीनकार आहे. ह्याचा हात साधारण बरा आहे.

## वहीदखां.

हा इंदोर संस्थानापैकीं असून बीन वाजविण्यांत बराच प्रसिद्ध आहे ह्याचें वाजविणें चांगलें आहे

## लतीफखां.

हा बीनकार इंदोरचा राहणारा. आजकालच्या प्रसिद्ध बीनवादकांत ह्याचा समावेश होण्यासारखा हा ह्या कलेंत प्रवीण आहे.

## मुस्लफखां.

हा अलवारचा राहणारा. हा बीनकार म्हणून प्रसिद्ध आहे त्याच्या हातांत चांगली गोडी आहे. हा अलवार संस्थानचा नोकर आहे

## मसजीदखां.

हा बीनकार इंदूरचा राहणारा त्याची बीन वाजविण्यांत बरीच प्रसिद्धि आहे. त्याचा हात गोड आहे.

## करमीनखां.

हा बीनकार इंदूर संस्थानांतील त्याचा हात बऱ्यापैकीं आहे. हा हल्लींच्या प्रसिद्ध बीनकारांत मोडतो.

## सादिकअलीखां.

हा अलवारचा राहणारा असून त्या संस्थानचा नोकर आहे. तेथील चांगल्यांपैकीं हा एक बीनकार आहे.

## दामोदरपंत मालपेकर.

हे गृहस्थ असून रेल्वेमध्यें नोकर होते. हे नेहमीं मुंबईस रहात असत. हे धंदेवाईक बीनकार नसून देखील हे वाद्य फार उत्तम वाजवीत त्यांचा स्वभाव साधा व सरळ होता कोणी अनोळखी बीन ऐकण्यास आला असतां हे त्यांस बीन वाजवून दाखवीत असत हे इ स १९१५ च्या सुमारास वारले.

## मंगेशराव तेलंग.

हे गृहस्थ मुंबई हायकोर्टांत नोकर होते आतां पेन्शनर आहेत. हे कारवारकडचे राहणारे. त्यांना बीन वाजविण्याचा मोठा नाद आहे. गृहस्थमंडळींत हे बऱ्यापैकीं बीनकार असा त्यांचा लौकिक आहे. त्यांचा न्याय व वेदांताचा अभ्यास फार आहे त्यामुळें त्यांनीं संगीतावरील ग्रंथ फारसे वाचले नाहींत असें म्हणतात. परमतसहिष्णुता त्यांच्यांत कमी आहे 'संगीत रत्नाकर' ग्रंथ त्यांनीं संपादित केला असल्यानें तो ग्रंथ त्यास कळतो, असें मानणे चुकीचें होणार नाहीं. लेखांत व भाषणांत हे बरेच निर्भीड आहेत

# सतारवादक.

## फिरोजखां.

प्रसिद्ध सरदार, गायनप्रेमी व शास्त्रकार अमीर खुशरू यांचा हा वडील मुलगा. ह्यास गळा अनुकूल नाहीं असें जाणून अमीर खुशरूनें ह्याच्यासाठी नवें वाद्य तयार केलें. खुशरूच्या वेळीं जी वीणा होती तिला म, सा, प, सा असे ध्वनि उत्पन्न करणाऱ्या चार तारा असत त्यांपैकीं सा स्वराचा ध्वनि उत्पन्न करणारी एक तार ठेऊन दुसरी त्या ध्वनिची तार त्यानें काढून टाकिली. असा तारेच्या संख्येंत फरक केला, व तारांचा क्रम बदलला. वीणेस अचल म्हणजे मेणांत बसविलेले पडदे असत ते त्यानें चल ठेविले, व पडद्यांची संख्या वाढविली. अशा प्रकारें नवें तयार केलेले वाद्यास त्याच्या तारांच्या संख्येवरून सेः तार असें नांव दिलें व त्यांत वाजविण्याच्या गती स्वतः तयार करून त्या मुलास वाजविण्यास शिकविल्या त्या गतीवर त्यानें ज्या चिजा रचिल्या तेच चलत्या लयीचे ख्याल होत. गुरु असा कल्पक व हुषार, तेव्हां शिष्य तेव्हाच वादन-कलेंत तयार झाला वाद्य नवें, वाजविणें मधूर; मग काय समाजांत ह्याची वाहवा होऊन तिचा प्रचार सर्वत्र झाला. हा अमीरपुत्र असल्यानें श्रीमंत, तेव्हां करमणुकीचें साधन म्हणून सतार वाजविण्याचा ह्यानें अभ्यास केला होता; तसेंच वाडिलास संगीत विद्या उत्तम येत असल्यानें आपणास ती येते, या प्रसिद्धीसाठीं ह्यानें तो अभ्यास उत्तमप्रकारें केला होता. हा वादक इ. स. च्या १५ व्या शतकांत होऊन गेला.

## मसजीदखां.

प्रसिद्ध शूर सरदार व संगीतप्रवीण अमीर खुशरू याचा हा दुसरा मुलगा. ह्यास बापानें आपण कल्पकतेने नवें तयार केलेलें वाद्य जें सतार त्यात प्रवीण केलें. मसजीदखा हा बुद्धिमान् असल्यानें बापापासून मिळविलेल्या ह्या वादनकलेंत बरीच सुधारणा करून आपला हा नवा बाज त्याने समाजांत प्रचलित केला. तो अद्यापि 'मसीदखानीबाज' असा ह्याच्या नांवानें सतारवादकांत प्रसिद्ध आहे. आलाप-द्वारीं वाजविण्यांत ह्याची फार प्रसिद्धि असे. गत, तोडा तर हा उत्तम वाजवीच. अशा प्रकारें दुहेरी बाज हा वाजवी. ह्याची शिष्यशाखा फार मोठी होती. ह्यानें

आपल्या मुलास ह्या कलेंत चांगलें तयार केलें होतें. ह्याच्या वडील भावाचें नांव फिरोजखा. राजदरबारीं प्रतिष्ठा, घरची श्रीमंती; तेव्हां करमणूक कांहीं पाहिजे, शिवाय वडिलांनीं शिकविलेली विद्या हस्तगत करून त्यांत सुधारणा केल्याचा डौल मारण्यासाठीं ह्यानें मोठी मेहनत घेऊन त्या कलेत प्राविण्य संपादिले होतें, व वडील भावावर ताण करण्यासाठीं ह्यानें तींत सुधारणा करून नवा बाज काढिला. हा इ. स. च्या १५ व्या शतकांत कालवश झाला.

## बहादुरखां.

हा मसजीदखाचा मुलगा मसजीदखानें सतारीचा नवा बाज काढिला, व त्यांत आपल्या ह्या मुलास चांगला तरबेज केला; मुलगा हुषार, मेहनती व बुद्धिमान असल्यानें बापाचा नवा बाज त्यानें समाजांत फैलाऊन दिला. अशा रीतीनें सतार हें नवें वाद्य व मसजीदखानें काढिलेला नवा बाज लोकांत फार प्रिय झाला. ह्याची शिष्यशाखा मोठी असल्यामुळें सतारवादन सहजींच चोहोंकडे पसरलें. हा इ. स च्या सोळाव्या शतकांत झाला

## दुल्हनखां.

हा बहदुरखांच्या बहिणीचा मुलगा. ह्याला बहादुरखानें सतारवादनांत तरबेज केले. हा मोठा अभ्यासू असल्याने ह्यानें ही कला थोड्या दिवसांत आत्मसात केली, त्यामुळें वादक म्हणून ह्याचा लौकिक फार झाला ह्याची शिष्यशाखा मोठी होती. ह्यानें आपली मुलगी रहीमसेन नांवाच्या एका सेनिये घराण्यांतील हुषार इसमास दिली व आपली वादनकलाहि त्यास शिकविली. हा इ. स. च्या १६ शतकाच्या उत्तरार्धांत झाला

## रहीमसेन.

हा तानसेनाच्या घराण्यापैकीं होता हा मोठा चलाख, बुद्धिवान् व मेहनती असल्यानें तो सतारवादनकलेमध्यें पारंगत झाला ह्यांच्या घराण्यांत रबाबवादन परपरागत असल्यानें त्यांत हा प्रवीण होताच; पण आपल्या बायकोच्या माहेराकडून मिळालेली सतारवादनाची ही नवी विद्या ह्याने थोडे दिवसांत आपलीशी केली अशा रीतीनें ह्या वेळेपासून सतारवादन तानसेनाच्या वंशांत शिरले. हा इ स. च्या १७ व्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला.

## नारो अपाजी भावे.

श्रीमंत नानासाहेब पेशवे ह्यांच्या पदरीं हा होता. हा सतार हें वाद्य उत्तम वाजवीत असे; तें वाद्य वाजविण्याची ह्याची तयारी विलक्षण असून ह्याचा हात फार गोड होता

## बाळाजीपंत.

श्रीमंत राघोबादादा पेशवे ह्यांच्या पदरीं हा होता हा सतार वाद्य फार तयारीनें व उत्तम वाजवीत असे ह्याचें वाजविणें गोड असे ह्याला दरमहा पगार ५०० रु. होता असें सांगतात.

## नवाब गुलाम हुसेनखां

हा दिल्लीचा राहणारा गततोडा व रागदारी या दोनहि प्रकारच्या वादनांत हा फार प्रवीण होता. हा इ स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## गुलामरझा.

हा लखनऊचा राहणारा हा उत्तमापैकीं सतारिया होता ह्यानें आपला एक स्वतंत्र बाज काढिला तो बाज अतायी लोकांना फार आवडतो असें म्हणतात. ह्यांत नियमांचें फारसें बंधन नसतें त्याच्या गती दुबरचिया तऱ्हेवर असतात. त्यांत 'ठोंक' व 'झाला' यांना योग्य स्थान नाहीं. मोठाले उस्ताद लोक तो बाज वाजवीत नाहींत व मार्मिकांस तो आवडत नाहीं हा इ. स च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत मरण पावला.

## गुलाम महंमद.

हा बांद्याचा राहणारा. हा सतार उत्तम वाजवीत असे याच्यासारखी 'ठोंक' फारच थोड्यांना साधली होती, असें त्या वेळच्या तज्ज्ञांचें मत होतें. ह्याचा हात फार तयार होता व लयीलाहि तो ठोंक होता हा बळरामपूर येथें इ. स. १८५५ च्या सुमारास वारला

## सज्जादहुसेन.

हा गुलाम महमदचा मुलगा. सतार हा आपल्या बापाजवळ शिकला. हें वाद्य वाजविण्यांत याची तयारी फार असे लयीलाहि हा फार पक्का होता. बाप वारल्यावर हा कलकत्त्यास गेला व सुरेंद्र मोहन टागोर यांचे नोकरींत राहिला. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तर अर्धांत कालवश झाला.

## बाबु इसरीप्रसाद.

हा बंगालचा राहणारा. हा प्रसिद्ध बाबुराम सहाईचा मुलगा. त्या वेळच्या उत्तम सतारियांमध्यें हा श्रेष्ठ म्हणून ह्याची प्रसिद्धि होती. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## वाजपेयी.

हा आपणास प्यारखां, जाफरखां यांचा शिष्य म्हणवीत असे हा दोन मिजराफींनीं सतार वाजवीत असे. ह्याचा हात गोड होता; परतु रागदारी वाजविण्यांत त्याचें विशेष प्राविण्य नव्हतें, असें त्यावेळच्या लोकांचें मत होतें. हा इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## सनबहा.

हा प्यारखाचा शिष्य होता. हा फरुखाबाद येथें रहात असे. सतारवाद्य वाजविण्यांत ह्याची फार प्रसिद्धि होती इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत हा कालवश झाला.

## घसीटखां.

हा हैदरखांचा शिष्य. हा बागल्यापैकीं सतारिया होता. ह्याचा हात फार तयार होता; व हा लयींत पक्का होता. हा इ. स च्या १९ व्या उत्तर अर्धांत कालवश झाला.

## कुतुबअली.

हा बरेली येथील राहणारा हा आपणास प्यारखाचा शिष्य म्हणवीत असे. हा सतार बऱ्यापैकीं वाजवी. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तर अर्धांत कालवश झाला

## नबीबक्ष.

हा आपणास गुलाम महमदचा शिष्य म्हणवीत असे. ह्याचा हात सतारवादनांत फार तयार व गोड होता. हा इ. स. च्या १९ व्या शतकांत होऊन गेला.

## हुसेनखां.

हा रहिमसेन ह्याचा पट्टशिष्य होता. ह्यानें गुरूची सेवा मनोभावें करून गुरूस प्रसन्न करून घेतलें व सतारवादनकलेमध्यें हा प्रवीण झाला ह्यास इम्रतसेन, लालसेन, व न्यामतसेन असे तीन पुत्र होते तेहि ह्या कलेंत चांगले प्रवीण झाले. हा जयपुरांत राहत असे. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला.

## इम्रतसेन.

हा प्रसिद्ध सतारवादक हुसेनखांचा मुलगा. बापानें ह्याची हुषारी व विद्या शिकण्याची हौस व अभ्यासाची चिकाटी पाहून ह्यास सतारवादनकला मनापासून शिकविली. त्या विद्येंत ह्याचा लौकिक फार झाला. अनेक राजेरजवाड्यांकडून ह्यास बोलावणीं येत. स्वभावानें हा फार नम्र व मनमिळाऊ होता ह्या विद्येवर ह्यानें चांगले पैसे मिळविले व लौकीकहि उत्तम संपादिला. ह्याची शिष्यशाखा मोठी होती. ह्याची राहणी फार डौलदार होती. ह्यास दोघे भाऊ होते. हा नेहमीं जयपुरात राहत असे. हा इ. स च्या १९ व्या शतकाच्या उत्तर अर्धांत होऊन गेला.

## हाफीजखां.

प्रसिद्ध इम्रतसेन यांचा हा शिष्य. इम्रतसेनाचा लौकीक फार म्हणून हा जयपुरास त्यांजकडे शिकण्यास गेला. त्या विद्येंत हा चांगला वाकब झाला. राजपुतान्यांत इम्रतसेन व त्यांचे शिष्य ह्यांचा ह्या कलेबद्दल लौकीक फार आहे. त्या बाजूचा कोणताहि सतारिया आपली गुरुपरंपरा इम्रतसेनाशीं नेऊन भिडवितो. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या अखेरीस कालवश झाला.

उ. ८०८

## बिच्चूखां.

हा उत्तर हिंदुस्थानांतून सातान्यास आला. ह्याच्या सतारवादनाच्या गुणामुळें ह्यास महाराजाकडे नोकरी मिळाली. तेथें असतांना सातारचे रहिवाशी मटांगे ह्यांस त्यानें सतार शिकविली. कांहीं वर्षांनीं पुण्याचे डॉ. विनाकराव लिमये ह्यांनीं त्यास पुण्यास आणिले. पुण्यास आल्यावर ह्यानें डॉ. विनायकरावास सतार शिकविली ह्याच्या वेळीं सतार वाजविणारा ह्यासारखा नव्हता, अशी ह्याची ख्याति होती. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तर अर्धांत दिवंगत झाला.

## विष्णुबुवा मटांगे.

हा सातारचा राहणारा हा बिच्चूखांजवळ सतार शिकला. ह्याच्या घराण्यांत गायनविद्येची गोडी फार त्या वेळच्या चांगल्या सतार वाजविणारांत ह्याची गणना असे. हा इ. स च्या १९ व्या शतकाच्या उत्तर अर्धांत होऊन गेला.

## डॉ. विनायकराव लिमये.

हे पुण्याचे राहणारे असून सरकारी नोकर होते हे मोठे गायनप्रेमी होते. सातान्यास बिच्चूखां असतां त्याचा लौकिक ह्यांचे कानांवर आला तेव्हां त्यास डॉक्टरसाहेबांनीं पुण्यास बोलाविलें व त्याजपाशीं सतार शिकण्यास सुरवात केली. ह्यांनीं सतारवादनाचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला प्रसिद्ध सतारिये आण्णा घारपुरे हे ह्यांचेच शिष्य असें लोक म्हणतात. हे रसिक असल्याकारणानें ह्यांचेकडे वारंवार मैफली होत असत. हे हाताचे उदार होते. हे इ स. १८७५ च्या सुमारास कालवश झाले.

## नागेशभट काशीकर.

हे काशीस रहात असत. पण हे मूळचे दक्षिणी. ह्यांनीं सतारवादनाचा अभ्यास कोणापाशीं केला हें समजत नाहीं. हे महाराष्ट्रांत दोनचार वेळां आले होते. ह्यांच्या वादनाची तारीफ तज्ज्ञांमध्यें फार होती. हे महाराष्ट्रांतून काशीस गेले, ते तेथेंच इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत दिवंगत झाले.

## आष्टीवाले.

हे उज्जनीचे सरदार. ह्यांचा सतार वाजविण्याबद्दल मोठा लौकिक होता. हे स्वभावानें मोठे उमदे व मोठे मर्मज्ञ होते. गुणी लोकांचा सत्कार करण्याबद्दल ह्यांची ख्याति असे. विलपद व गतकाम ह्या दोनहि बाजांत हे प्रवीण असत. हिंदुस्थानांतील संगीतप्रसिद्ध शहर ग्वाल्हेर त्याच्या लगत्याला उज्जन असल्यानें अनेक गुणी लोक ह्यांच्याकडे जात. श्रीमंत व सरदार घराण्यांत इतका गुणी मनुष्य झाला नाहीं असा ह्यांचा ह्या कलेबद्दल लौकिक आहे. हे इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत दिवंगत झाले. ह्यांचे चिरंजीव **भय्यासाहेब** हेहि आपल्या वडिलांच्या लौकिकास साजेल अशा प्रकारचे सतारवादक आहेत.

## जिवनजी महाराज.

गुर्जर जातीचे हे धर्मगुरु होते. हे सदा मुंबईस राहत असत. हे सतार वाजविण्यांत फार प्रवीण होते. ह्यांची सतार घेऊन सामान्य मनुष्यास ती वाजवितां येणें शक्य नव्हतें, कारण ह्यांच्या सतारीच्या तारा तशाच मोठ्या जाड असत. हे सधन असल्यानें अनेक उत्तम उस्तादांजवळ सतारवादनकला शिकणें ह्यांस शक्य झालें. ह्यांचा हात फार गोड असे. विलंपद व गतकाम ह्या दोनहि प्रकारांत हे निष्णांत होते. हे बुद्धिवान व मोठे मार्मिक होते. कोणताहि संगीत कलावंत मुंबईस आला, तर त्याची हजिरी ह्यांच्या घरीं लागावयाची. हे गुणग्राहक व सधन असल्यानें कलावंतांच्या गुणाप्रमाणें हे त्यांस बिदागी देत. त्यामुळें ते लोक संतुष्ट होऊन जात. ह्यांनीं कांहीं जणांस सतार शिकविली. ह्यांचा स्वभाव सरळ व मनमिळाऊ; तसेंच हे कलेचें मर्म जाणते व स्वतः उत्तम वाजविणारे असल्यानें ह्यांचें नांव मुंबई शहरांत फार मशहूर झालें होतें. हे इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत दिवंगत झाले.

## विश्वनाथबुवा काळे.

हे फार वर्षं मुंबईस असत. गुजराथ्यांचे गुरु जिवनजी महाराज ह्यांच्याजवळ हे सतार शिकले. हे स्वभावानें फार सालस असत. ह्यांना गर्व कसा तो माहीत नव्हता. वाटेल त्याला वाटेल तेव्हां हे आपली सतार वाजवून दाखवीत. मुंबईस

हे मुखत्यार वकीली करीत असत. तबलावादन, सतारवादन ह्यांवर ह्यांनीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं. 'संगीतदर्पण' नांवाचें मराठी मासिक पुस्तक बाळकृष्णबुवा ह्यांच्या मदतीनें हे काढीत होते. तें मासिक पुस्तक इ. स. १८८५ सुमारास बंद पडलें. राजेरजवाडे ह्यांच्या निमन्त्रणावरून परठिकाणीं हे सतारवादनास जात असत. केव्हां केव्हा राजेरजवाड्यांच्या वाड्यांत ह्यांच्या व आण्णा घारपुरे ह्यांच्या गाठी पडलेल्या आहेत! ह्यांच्या एका मुलास सतार व एकास मृदंग वादनाचा चांगला नाद असे. परंतु ते दोघेहि आतां दिवगत झाले आहेत. विश्वनाथबुवा इ. स. १८९५ च्या सुमारास दिवगत झाले.

## पन्नालाल गोस्वामी.

हे दिल्लीचे रहिवासी. हे नामांकित सातरिये होते. ह्यांचा मुक्काम अनेक वेळ मुंबईंत होत असे. ह्यांची वादनशैली वाखाणण्याजोगी होती. हात फार तयार व वाजविणें फार मोहक होतें. गततोडा वाजविण्यांत ह्यांचा फार लौकीक असे. हे स्वभावानें फार चांगले असत. ह्यांनीं 'नादविनोद' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. ह्यांच्या ह्या पुस्तकास मुख्य आधार 'कल्पद्रुम' नावाच्या पुस्तकाचा! ह्यावरून तें पुस्तक कसें असेल हें सहज ध्यानांत येईल! जुनी माहिती कल्पद्रुमकारास नव्हती तेव्हां ह्यास ती कोठून मिळणार! ह्यांस संस्कृत येत नव्हतें, पण येतें असें ते म्हणत! हे चांगले बोलके असल्यानें लोकांवर ह्यांची चांगली छाप पडे. लोक ह्यांस साधुहि समजत. हे इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## अमीरखां.

हे ग्वालेरचे रहाणारे; श्री० जयाजीमहाराज व श्री० माधवरावमहाराज ह्यांच्या कारकीर्दींत हे होते. हिंदुस्थानांत जे फार प्रसिद्ध सतार वाजविणारे होऊन गेले त्यांत ह्यांची गणना होती. हे स्वभावानें नम्र व निगर्वी होते. कोणासहि हे आपलें वाद्य वाजऊन दाखवीत. ह्यांच्या शिष्यांत नाव घेण्याजोगा शिष्य कोणी नाहीं. एकदा एका गृहस्थानें अमीरखांस विचारलें, "खांसाहेब आपण बीन कां बरें वाजवीत नाहीं? पुष्कळ सतारिये कांहीं दिवसांनीं बीन वाजवूं लागतात." खांसाहेब तेव्हां हसून म्हणाले, "पण माझ्या खांद्यावर बीन

कोणी ठेविलें नाहीं।" ते प्रेमी गृहस्थ म्हणाले, "मी बीन आणवितो आणि आपल्या खांद्यावर ठेवितो. मग झालें ना? मग आपण बीन वाजऊं लागा" यावर खां साहेब फारच हसले व त्या गृहस्थास म्हणाले, "महाराज माझ्या बोलण्याचें मर्म आपल्या ध्यानात नाहीं आलें. अहो, सतारीचे कायदे निराळे व बीनाचे कायदे निराळे. बीनाचे कायदे निराळे असल्यानें त्याची तालीमच पोंचली पाहिजे. आतां पहावें तों सतारवाला बीनकार तेव्हांच बनतो! पण मला तसें होण्याची इच्छा नाहीं. तसें केल्यास माझी सतार जाईल व बीन मात्र येणार नाहीं। आपण मला आज जो मान देत आहां तो मात्र जाईल." खांसाहेब भले मनुष्य असल्यानें त्यांनीं खरें सांगितलें. हल्ली प्रचारात हा मासला कोण पहात नाहीं? पण हें उघड बोलण्याची कोणाची छाती आहे! असें बोलणारा निघाल्यास ते ऐकणार कोण? व खरें कोणास वाटणार? खांसाहेबाच्या गति पूर्वपरंपरेंतील असून, त्यांचे तोडे वगैरे काम फार चांगलें अशी प्रसिद्धि आहे. पुणें येथील 'इतिहाससंशोधक मंडळा'नें ह्याच्या गती वगैरे पैदा करून मंडळांत ठेविल्या आहेत अशी माहिती लागते हें खरें असल्यास ह्या जुन्या संग्रहाचा केव्हां तरी योग्य उपयोग होईल खास. हे खांसाहेब बरेच वयांतीत होऊन इ. स. च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत दिवंगत झाले.

## इमदादखां.

हा इंदूर येथील रहाणारा असून ह्याला सरकारी आश्रय आहे. हें वाद्य वाजविण्यांत ह्याची चांगली तयारी आहे. गतकाम व रागदारी हा फार चांगली वाजवितो हा प्रारंभीं राजा सुरेंद्र मोहन टागोर यांचे नोकरींत होता व तेथें सज्जाक हुसेनचें वाजविणें ऐकून ह्यानें आपली तयारी केली असें म्हणतात. हा इ. स. च्या २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत मरण पावला.

## आण्णा घारपुरे.

ह्यांचे वडील पुण्याचे रहिवाशी असून संस्कृतज्ञ होते. आण्णाचा अभ्यास प्रवेश-परीक्षेपर्यंत झाल्यावर त्यांनीं सरकारी नोकरी धरिली होती. नोकरीवर असतां सतार वाजविण्याचा अभ्यास ह्यांनीं डॉ. विनायकराव ह्याजपाशीं केला असें म्हणतात. ह्यांच्या वाजविण्यांत गोडी फार असे. पुढें ह्यांनीं सरकारी नोकरी सोडिली 'संगीत मीमांसक' नांवाचें एक मासिकपुस्तक ह्यांनीं काढिलें होतें. संगीतावरील कांहीं संस्कृत ग्रंथ ह्यांनीं छापून प्रसिद्ध केले. ह्यांच्या वेळीं हे

संगीतशास्त्रज्ञ अशी ह्यांची प्रसिद्धि होती. राजेरजवाड्यांच्या बोलावण्यावरून हे त्यांच्याकडे सतार वाजविण्यास जात असत. हे बीनहि वाजवीत असत. 'पुणें गायनसमाजा'शा ह्यांचा संबध होता त्या समाजासाठी 'स्वरशास्त्र' व तबला-वादनावरील एक लहानसें पुस्तक ह्यांनीं मराठींत लिहिलें. सतारवादनावरील ह्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत हे इ. स. १९२० मध्यें पुण्यास वारले.

## बरकतउल्ला.

हा प्रथम पखवाज वाजवीत असे पुढें हा सतार वाजविण्यास शिकला. ह्याची सतार वाजविण्यांत फार प्रसिद्धि असे. शेवटीं हा पतियाळा दरबारांत नोकर झाला. लेखकाच्या वडिलांस ह्या खांसाहेबाची सतार अनेक वेळां ऐकण्याचा योग आला आहे. ह्याचें घराणें उच्च नसल्यानें घरंदाज गायकवादक ह्यास तितका मान देत नसत हा पतियाळा संस्थानांत नोकर असतां इ. स. १९२८ च्या सुमारास दिवंगत झाला.

## इनायतखां.

हा गोरखपूरचा रहाणारा. गतकाम वाजविण्यांत ह्याची विलक्षण तयारी आहे. ह्याचें वाजविणें सुरेल आहे व लयीला हा फार पक्का आहे हल्लीं जे नामांकित सतारिये गतकामांत प्रसिद्ध आहेत त्यांत ह्याचा नंबर पुष्कळ वर लागेल.

# सारंगीवादक.

## रमजानी.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या पदरीं हा इ. स. १७५५ मध्यें होता. सारंगी वाजविण्यांत व साथ करण्यांत ह्याची फार तारिफ असे. ह्याचा हात फार तयार व वाजविणें फार मधुर असे. हा स्वभावानें फार नम्र व मनमिळाऊ होता.

## रजाअली.

हा सारंगीवाला, श्रीमंत नानासाहेब पेशवे ह्यांच्या पदरीं होता सारंगी वाज-विण्यांत ह्याचा हातखंडा होता ह्याचा हात तयार असून वाजविणें फार गोड असे. हा निर्व्यसनी असून सर्वत्रांशीं मिळूनमिसळून वागत असे.

## देवीदास.

श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पदरीं हा होता. सारंगी वाजविण्यांत ह्याचा हातखंडा असे. हें वाद्य वाजविण्यात हा फार तयार होता. तसा साथ करण्यांतहि फार कुशल होता ह्याचा स्वभाव प्रेमळ व आनंदी असे. ह्याला कोणतेंहि व्यसन नव्हतें.

## अलीबक्ष.

हा दिल्लीचा रहाणारा. हा सारंगी उत्तम वाजवीत असे व साथ करण्यात फार कुशल होता. इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत हा होऊन गेला.

## हुसेनबक्ष.

हा लखनऊचा रहाणारा. हा सारंगी हें वाद्य उत्तम वाजवी व साथहि चांगली करी. हा इ. स १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## साबित अलीखां.

हा ग्वालेरचा रहाणारा. सारंगी वाजविण्यांत हा फार पटाईत असे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## इब्राहिमखां.

हा बांद्याचा रहाणारा. हा सारंगी हें वाद्य चांगलें वाजवी. ह्याचा हात फार गोड असे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## महंमद अलीखां.

हा बांद्याचा रहाणारा. उत्तम सारंगीवाला म्हणून ह्याची प्रसिद्धी होती. हा इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## ख्वाजाबक्ष.

रामपूरचा प्रसिद्ध बीनकार अमीरखां याचा हा शिष्य होता. हा सारंगी शुद्ध वाजवी. ह्याचें वाजविणें फार मोहक असे हा इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला

## अल्लादाद्.

हा जलंदरजवळ रहात असे. त्या वेळेस दुआबांत ह्याच्या सारखा सारंगी वाजविणारा दुसरा कोणी नव्हता अशी प्रसिद्धि होती. हा इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## काळू.

जयपूरच्या सवाई रामसिंगाच्या पदरीं गोखी नांवाची प्रसिद्ध नायकीण होती तिचा हा सारंगीवाला होता. गायनामध्यें हा तिची साथ उत्तम करी, म्हणून ह्याच्यावर तिची फार मर्जी असे. हा स्वभावानें फार नम्र व आपल्या कलेमध्यें निष्णात होता. ह्यास अल्ली व फत्तु असे दोन मुलगे होते. काळूवरील मर्जीमुळें गोखीने ह्याच्या या दोन मुलांस गाणें शिकवून उत्तम तयार केलें. यामुळेंच ते पुढें गायनात अलौकिक निघाले ह्याच्या ह्या मुलास त्यांचे द्वेष्टे 'कालूके बच्चे' असें निंदाव्यंजक विशेषण लावित असत. हा गोखीबाईजवळ मरेपर्यंत होता.

## हैदरबक्ष.

ह्यानें गायनाचा अभ्यास उत्तम प्रकारें केला होता; पण ह्याचा आवाज गायनास प्रतिकूल असल्यामुळें ह्यानें सारंगी वाद्य वाजविण्याचा अभ्यास करून त्यांत प्राविण्य मिळविलें. नगरची प्रसिद्ध गायिका गुलाब इला ह्यानेंच तयार केली होती. ह्याला एक मुलगा होता. तोहि सारंगी वाद्य वाजविणेंत कुशल होता हा इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## गोविंदराम.

हा मुंबईचा राहणारा. हा सारंगीवादनांत कुशल असे. साथ करण्यांत ह्याचा हातखंडा होता हा स्वभावानें साधा व सरळ होता. हा इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला.

## मामुखां.

हा पतियाळाच्या महाराजाजवळ नोकर आहे. सारंगीवादनात हा फार कुशल असून सारंगीवादनाचें शास्त्र व मर्म ह्याला उत्तम कळलें आहे.

### बुंदुखां.

हा इंदुरच्या श्रीमंत होळकर सरकारच्या नोकरीत आहे. हा उत्तम सारंगी वाजवितो. श्रोत्यांचें मनरंजन करण्यांत ह्याची फार तारीफ आहे. हा राग शुद्ध तन्हेनें वाजवितो

## रबाबवादक.

### प्यारखां.

हे तानसेनाच्या घराण्यांतील नामांकित गायक व वादक होते. ह्यांच्या भावाचें नांव जाफरखां हे रबाब व बीनहि वाजवीत लखनौचा शेवटचा नबाब वाजिद्अल्लीशहा याचे हे गायकगुरु होते. सुरसिंगार वाद्य ह्यांनीं नवीन काढिलें. हें वाद्य हे उत्तमच वाजवीत. ह्यास पुत्र नव्हता म्हणून ह्यांनीं आपल्या बहिणीचा मुलगा दत्तक घेतला व त्यास आपल्या विद्येंत प्रवीण केलें, व आपण काढिलेलें नवें वाद्य सुरसिंगार यांतहि त्याला पटाईत केलें. ही गोष्ट ह्यांच्या बंधूस आवडली नाहीं. ह्यांच्यासारखा पुरुष गायनवादनांत विरळा; अशी त्या वेळच्या लाेकांची समजूत होती. ह्याचा दत्तक मुलगा म्हणजे बहादूर हुसेनखां हा होय. हाहि पुढें लोकोत्तर निघाला हे वयातीत होऊन लखनौ येथें एकोणिसाव्य शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले.

### जाफरखां.

हे गायक व वादकहि होते. ह्यांच्या वडिलांचें नांव छज्जूखां. ह्यांना एक भाऊ व एक बहीण होती हे तानसेनाच्या घराण्यांतील होते. रबाब वाद्य हे उत्तम वजावीत असत. ह्यांस चार मुलगे होते. त्यांपैकीं सादकअल्लीखां हे वाजीद्अल्ली, लखनौचे नबाब, ह्यास पदच्युत करून कलकत्त्यास ठेविल्यावर तेथें त्यांजपाशीं होते. जाफरखा फार करारी व हट्टी असत. आपल्या घराण्यांतील विद्या दुसऱ्यास शिकवावयाची नाहीं असा ह्यांचा आग्रह असे. ह्यांच्या बंधूंनीं आपल्या बहिणीच्या मुलास दत्तक घेऊन त्यास आपल्या घरची विद्या शिकविली म्हणून हे बंधूचा द्वेष करीत. तो द्वेष इतक्या थराला गेला होता कीं, बंधूच्या मरणाचे वेळीं हे त्यास भेटावयास गेले नाहींतच, पण पुढें मरतीकासहि

गेले नाहींत। ह्यांच्या गुणाबद्दलच मान द्यावा तितका थोडा; पण ह्यांच्या ह्या गैरस्वभावाबद्दल कोणीहि ह्यांस नांवेंच ठेवील. हे चांगले वयातीत होऊन लखनौ येथें एकोणिसाव्या शतकांत कालवश झाले

## सादक अलीखां.

हा लखनौचा राहणारा हा रबाब वाजविण्यात मोठा पटाईत असे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला.

## काझम अलीखां.

हा लखनौचा राहणारा. हा रबाब वाद्य फार चांगलें वाजवी. ह्याचा हात फार गोड असे. हा इ. स १९ व्या शतकांत पूर्वार्धांत झाला.

## निसार अलीखां.

हा संयुक्त प्रांतातील राहणारा. हा रबाब वाद्य वाजविण्यांत अतिशय तयार होता. हा इ. स. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला.

## बायाझिंदखां.

हा शिखरसेनाचा गुरु ह्याला दारूचें फार व्यसन असे. या व्यसनाचे अंमलांतच हा मरण पावला. हा रबाब फार उत्तम तऱ्हेनें वाजवी. हा इ. स. १८५० चे सुमारास वारला.

## शिखरसेन.

बायाझिंद याचा हा शिष्य होता. रबाब वाद्य वाजविण्यांत ह्याच्यावेळीं ह्याच्या इतका प्रवीण कोणी नव्हता. हा इ स. १८६० चे नंतर वारला.

## हयाति.

हा रबाबवादनात फार कुशल होता ह्याचा हात फार गोड असे. हा इ. स. १८६५ च्या सुमारास वारला.

## साले रबाबी.

हा काश्मीरच्या सुभेदाराच्या नोकरीत होता रबाब हें वाद्य हा सफाईनें वाजवी. हा इ. स. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होता.

# सरोद वादक.

## गुलामअली.

हा रामपूरचा राहणारा. ह्याच्या वेळच्या सरोदवादकांत हा उत्तम सरोदीया, अशी ह्याची ख्याति होती. हा सुमारें इ स १८५० मध्यें वारला.

## सादतखां.

हा ग्वालेरदरबारचा सरोद वादक होता. हा तें वाद्य उत्तम वाजवीत असे त्या वेळीं ह्याच्या जोडीचा सरोदिया नव्हता. ह्याचा हात फार गोड होता. स्वभावानें हा मोठा सरळ असे. ह्याच्या शिष्यांत नांव घेण्याजोगा कोणी निघाला नाहीं. हा जयाजी महाराजाच्या वेळी होता. ह्याला एक नह्लेखां नांवाचा मुलगा होता.

## नह्लेखां.

हा प्रसिद्ध सरोदिया श्रीमंत जयाजीराव महाराज यांच्या वेळीं होता. ह्याचा या वादनाचा अभ्यास ह्याच्या वडिलांजवळ झाला होता. सरोद वाद्यवादन-कलेंत हा अप्रतिम होता. ह्याची वाजविण्याची तरकीब विलक्षण होती. हा ग्वालेर येथें कालवश झाला. ह्याला एक हाफीजखां नांवाचा मुलगा आहे.

## हाफीजखां.

हा ग्वालेरीस असतो. सरोद हें वाद्य हा चांगलें वाजवितो. ह्याच्या वाजविण्यांत फार गोडी आहे. ह्याला ह्या वादनाची तालीम बापापासून मिळाली आहे. हाहि स्वभावानें चांगला मनमिळाऊ आहे. हा ग्वालेरदरबारचा नोकर आहे.

## फिदा हुसेनखां.

हा रामपूर दरबारांत नोकर होता. सरोद हें वाद्य हा चांगलें वाजवी. ह्याचा हात फार गोड असे. ह्याला आपल्या विद्येचा आत्मविश्वास फार होता वाजवितांना तार तुटल्यास न घाबरतां पुनः तार लावून भरलेला रंग यत्किंचित् कमी होऊं न देतां श्रोत्यांच्या मनावर हा चांगली छाप पाडी. लय वाटेल तशी वाढवून श्रोत्यांचीं मनें आपल्या मधुर वाजविण्यानें हा मोहून टाकी नामांकित सरोदियांत ह्याची गणना असे. ह्या विद्येंत तयार झालेला ह्याचा मुलगा एकाएकीं वारल्यामुळें ह्याच्या मनास धक्का बसला व हा आजारी पडला व त्यांतच इ. स. १९२७ च्या सुमारास रामपुरास वारला.

## करामत उल्लाखां.

हा कलकत्त्याचा राहणारा हा उत्तमापैकीं सरोद वाजविणारा आहे. हा कांहीं दिवस राजा टागोर ह्यांच्या नोकरींत होता.

## सखावतखां.

हा संयुक्त प्रांतांतील रहिवाशी. सरोद वादनविद्या ह्याचा सासरा करामतउल्ला याजवळ हा शिकला. ह्याचा हात वाजविण्यांत बरा आहे. हल्लीं हा लखनऊ येथील 'मारिस कॉलेज आफ हिंदुस्थानी म्युझिक' ह्या संस्थेमध्यें वादक म्हणून काम करीत आहे. हा स्वभावानें सरळ आहे.

# सुरसिंघारवादक.

## बहादूर हुसेनखां.

हे रामपुरांत रहात होते. ह्यांचा मामा प्यारखां तानसेनाच्या मुलाच्या वंशांतील असून फार प्रसिद्ध वादक होता. त्याला मुलगा नव्हता म्हणून त्यानें आपल्या ह्या भाच्याला दत्तक घेऊन सुरसिंघार व बीन हीं वाद्यें वाजविण्यांत प्रवीण केलें. हे सुरसिंघार वाजविण्यांत इतके प्रवीण झाले कीं, ह्यांच्या वेळीं हें वाद्य वाजविण्यांत ह्यांची बरोबरी करणारा दुसरा कोणी नव्हता. ह्यांनीं हें वाद्य

वाजविण्यास रामपूरचे हैदरअलीखां साहेब बहादूर यांस शिकविलें हें वाद्य वाजविण्यास शिकविल्याबद्दल हैदरअलीखां साहेबांनी ह्या आपल्या गुरूस तीन लाख रुपये गुरुदक्षिणा दिली असें त्याचे चिरंजीव छमनसाहेब अनेक वेळा प्रस्तुत लेखकाच्या वडिलांजवळ सांगत असत. ह्यांनीं हें वाद्य दुसरे कोणास शिकविलें नाहीं. अलीहुसेनखांस फक्त बीन शिकविलें बहादूर हुसेनखां एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत वयातीत होऊन कालवश झाले

## साहेबजादा हैदरअलीखां.

रामपूरचे मरहूम नबाब याचे हे बधु हे सुरसिंघार वादन बहादुर हुसेनखांजवळ शिकले. ह्यांच्यासारखा सुरसिंघार वाजविणारा कोणी झाला नाहीं अशी ह्यांची प्रसिद्धि आहे. ह्यांनीं आपल्या गुरूस तीन लाख रुपये गुरुदक्षिणा दिली अशी ख्याति आहे. ह्यांनीं हें वाद्य आपल्या मुलास उत्तम शिकविलें होतें. हे वयातीत होऊन इ स. १९ व्या शतकांत कालवश झाले.

## सादतअलीखां उर्फ छमनसाहेब.

हे रामपूरचे राहणारे असून रामपूर संस्थानचे होममेंबर होते. मुबइचे प्रसिद्ध संगीतशास्त्रज्ञ श्री. विष्णुपंत भातखंडे यांचे हे मित्र होते. हे संगीतकला व शास्त्र उत्तम प्रकारें जाणत असत सुरसिंघार वाद्य वाजविण्यास आपल्या वडिलाजवळ हे शिकले, व त्यांत फार पारंगत झाले होते हे इ. स. १९२५ चे सुमारास वारले. सुरसिंघार हें वाद्य वाजविणारा आतां ह्यांच्यामागें कोणी राहिला नाहीं असें म्हणतात.

# हार्मोनियमवादक.

## गणपतराव भैय्या.

हे ग्वाल्हेरच्या बळवंतराव भैय्याचे सख्खे बंधु. ह्यांच्यासारखा हार्मोनियम वाजविणारा कोणी झाला नाहीं अशी ह्यांची ख्याति आहे. ह्यांच्या स्वभावामुळें ह्यांस ग्वाल्हेरीस जाण्याची बंदी असे. हे व्यसनीहि होते. कांहीं दिवस हे कलकत्त्यास गोव्हरजानजवळ होते, व कांहीं दिवस रामपूरच्या नबाबाजवळ

होते. ह्यांच्या स्वभावामुळें ह्याची किंमत कमी झाली होती. पेटी वाजवावयास बसले म्हणजे ह्यांचें वादन ऐकताना ह्यांच्याविषयीं प्रेम उत्पन्न होई, व ह्यांच्या आंगच्या दुर्गुणाचा विसर पडे! व्यसनाधीन माणसांच्या आंगच्या गुणाची व्यसनानें कशी मातीमोल किंमत होते ह्याचें हें उत्तम उदाहरण आहे. श्री. माधवराव महाराज गादीवर असतांना दतिया संस्थानांत हे वारले. ह्यांनीं कोणास शिकविलें नाहीं, तरी 'आपण गणपतराव भैय्यांचे शिष्य आहों' असें म्हणवि-णारे कांहीं आहेतच.

## गोविंदराव टेंभे.

हे हार्मोनियम (पेटी) चांगली वाजवितात. त्या वादनपटुत्वाबद्दल ह्याचा प्रसिद्धि आहे. ह्यांचें शिक्षण प्रवेशपरीक्षेपर्यंत झालें आहे. हे सुस्वरूप असून चांगले नट आहेत. लोकांच्या नाटक कंपनींत कांहीं दिवस घालविल्यावर ह्यांनीं स्वतःची कंपनी काढिली होती. हे चांगले मराठी लेखक आहेत. ह्यांनीं अनेक संगीत नाटकें लिहिलीं आहेत. कांहीं दिवस हे म्हैसूरदरबारचे नोकर होते. हल्लीं ते सिनेमा ॲक्टर व म्युझिक डायरेक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत.

# जलतरंगवादक.

## अमीरखां

हे बडोदें संस्थानांतील नामांकित जलतरंगवादक होऊन गेले. हे इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले.

# पखवाज व तबलावादक.

## धर्मा गुरव.

श्री. नानासाहेब पेशवे यांचे वेळीं हा पेशवाईंत नोकर होता. ह्याची मृदंग-वादनाबद्दल फार प्रसिद्धि होती. ह्याचा हात मधुर असून वाजविण्यात फार तयार होता. हा साथहि उत्तम करी.

## नागु गुरव.

श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांचे वेळीं हा पेशवाईंत नोकर होता हा मृदुंग-वादनांत फार प्रवीण असे. ह्याचें वाजविणें मधुर असून वाजविण्यांत ह्याची फार तयारी होती. हा ध्रुवपदींयांची साथ उत्तम करी.

## फिरोजखां धाडी.

हा लाहोरचा राहणारा. हा पखवाज फार उत्तम वाजवीत असे. ह्याचे वेळेस हें वाद्य वाजविणारा हा अद्वितीय आहे अशी ह्याची ख्याति होती.

## अमानउल्ला.

हा काश्मीरच्या सुभेदाराच्या नोकरींत होता. हा उत्तम पखवाज वाजवी. हा इ. स १८६० चे पुढें वारला.

## कर्यायी.

हा काश्मीरचा राहणारा. हा पखवाज इतका उत्तम वाजवी कीं, ह्याला वादन-प्राविण्याबद्दल 'मृदंगराज' अशी पदवी असे. हा इ. स. १८६५ च्या सुमारास वारला

## लाला भगवानदास.

हा नामांकित बजवैय्या होता. ह्याच्या गुरु घराण्याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. ह्याचें वाजविणें शुद्ध, स्पष्ट व गोड असे. पजावाट करून परणें बांधणें, व तीं कुशलतेनें वाजविणे, हे दोनहि गुण ह्याच्यामध्यें होते. ह्यानें अनेक शिष्य तयार केले, त्यांत कुदवसिंगाचें नांव प्रामुख्यानें सांगण्यांत येतें. हा स्वभावानें शांत व नम्र असे हा इ स. १८ व्या शतकाच्या अंतीं कालवश झाला.

## कुदवसिंग.

हा जातीनें तद्देशीय ब्राह्मण असून बांद्याचा राहणारा होता. ह्याचा गुरु लाला भगवानसिंग हा होता. ह्याच्याजवळ हा विद्या परिपूर्ण होईतोंपर्यंत राहिला होता. वाजिद् अलीशहा लखनौच्या गादीवर असतां एकदां वाजविण्याबद्दल कांहीं

वाद उत्पन्न झाला त्यांत ज्याची सरशी होईल त्याला हजार रुपयाचें बक्षीस देण्याचें नबाबानीं ठरविलें होतें त्यावेळीं त्या वादांत ह्याची सरशी होऊन तें बक्षीस ह्यास मिळालें. अयोध्येच्या नबाबांनीं ह्यास 'कुवरदास' ही पदवी ह्याच्या वाजविण्यावर खूष होऊन दिली होती. कुदवसिंग व जोतसिंग ह्यांमध्येंहि स्पर्धा होती. हा फिरत फिरत ग्वालेरीस गेला आपण अप्रतिम-वाजविणारे तेव्हां आपणास अजिंक्यपत्र मिळावें अशी ह्यानें श्री. जयाजी राव महाराजांस विनंति केली. तेव्हां महाराजांस फार राग आला. 'आपल्या दरबारात ह्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं का?' असा प्रश्न त्यांनीं मंडळींस केला, तेव्हां ख्यालीये म्हणाले, 'हे काम आमचें नाही' यावर नारायण-शास्त्री वयातीत, पण ध्रुवपदीये तेव्हा त्यांस विचारतां 'आपण त्याजबरोबर सामना करण्यास तयार आहों,' असें त्यांनीं उत्तर दिलें; तेव्हां महाराजांस आनंद झाला. त्यांनीं सामान्याचा दिवस ठरविला. सरदार, गवय्ये, बजवय्ये, व ह्या कलेचे शौकीन सर्व जमले. कुदवसिंग येऊन हजर झाला शास्त्रीबुवांस बोलावणें पाठविलें. तेथें ते मेण्यांतून येऊन उतरले त्यांस पाहतांच कुदवसिंग म्हणाला, 'माझ्यासारख्या जवानाचा म्हाताऱ्याबरोबर कसा सामना लाविता!' तेव्हां एक गृहस्थ म्हणाला, 'येथें सामना शक्तीचा नाहीं, विद्येचा आहे.' शास्त्रीबुवानीं ध्रुवपद गायनास सुरवात केली. कुदवसिंगास सम ध्यानांत येईना. चार वेळ त्याचा यत्न फसला. तेव्हां त्याचा गर्वपरिहार झाला, व भर दरबारांत ह्यानें 'आपण हरलों' असें कबूल केलें. अर्थात्च नारायणशास्त्र्यांचा महाराजानीं बहुमान केला महाराजांनीं कुदवसिंगाचें वाजविणें नंतर ऐकिलें. ह्याचें वाजविणें अप्रतिम ह्यांत शंका नव्हती हात मधुर, वाजविणें स्पष्ट व नियमबद्ध, तेव्हां महाराजांनी ह्यास आपल्या पदरीं ठेविलें. एकदां कुदवसिंगाच्या गजपणांची परीक्षा पहाण्या-करितां ह्याच्यावर हत्ती सोडिला. ह्यानें गजपर्ण वाजविण्यास सुरुवात केली त्याबरोबर हत्ती भ्याला व मागें सरून पळून गेला। अशी आख्यायिका वृद्ध लोक सांगतात. ह्या आख्यायिकेवरून इतकेंच समजावयाचें कीं, ह्याचें वाजविणें चांगलें होतें. ह्यानें बरेच शिष्य तयार केले हे लोक सुशिक्षित नसल्यानें कोणास काय बोलावें, ह्याचा ह्यांना सुमार रहात नसे. एकदां खासगी मंडळींमध्यें 'महाराज बेतालीये आहेत' असें हा म्हणाला ही गोष्ट महाराजांच्या कानावर गेली. श्री जयाजीमहाराज ह्या लोकाची किंमत ओळखून होते; शिवाय ते गुणाचे चहाते व थोर मनाचे असल्यानें त्यांनीं ह्याला त्याबद्दल कांहीं शासन केलें नाही। पण हंसून म्हणाले, 'अडाण्याच्या शब्दाला किंमत काय द्यावयाची?'

ह्या कलेंत कुद्‌वसिंगासारखे फार थोडेच आजवर निपजले, हें मात्र खरें हा इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत दिवंगत झाला

## जोतसिंग

हा जातीनें तद्देशीय ब्राह्मण ह्यानें पखवाज वाजविण्यांत चांगलें प्राबोण्य मिळविलें होतें. हा कांहीं दिवस लखनौस ऱ्हात असे पुढें काशीस जाऊन राहिला तेथें तुळशी रामायणाचें पुराण सांगावें, पखवाज वाजविण्याची कसरत करावी व कोणी शिकण्यास आल्यास त्यास शिकवावें, अशा प्रकारें ह्यानें आपलें आयुष्य घालविलें कुद्‌वसिंगाच्या सामन्यांत ह्याचा पराभव झाला होना तरी हा उत्तमांपैकी बजवैय्या होता. ह्याच्या अनेक शिष्यांत नाना पानसे हा फार उत्तम निघाला, व त्याच्या मोठेपणामुळें गुरूचें नांव चिरस्मरणीय झालें आहे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत काशींत कालवश झाला

## जोरावरसिंग.

ग्वालेरीस श्री० जयाजीरावमहाराजांच्या वेळीं हा नोकरींत होता. तबला वाजविण्यांत ह्याचें प्रावीण्य वाखाणण्याजोगें होतें. कुद्‌वसिंगाचा हा स्नेही होता. ह्याच्या वेळीं अनेक ख्यालिये ग्वालेरीस होते. त्यांच्या साथींत ह्याच्या कलेचें प्रावीण्य दिसून येई. ह्याच्या वाजविण्यांत माधुरी व स्पष्टता हे गुण नेहमीं दृष्टीस पडत हा इ स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत ग्वालेरीस कालवश झाला.

## अघवान.

लखनौजवळ उनाऊ म्हणून गांव आहे तेथील हा राहणारा. हा तबला फार उत्तम वाजवी ह्याचें वाजविणें फार मधुर असे हा साथ करण्यांत फार हुषार होता इ स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत हा कालवश झाला.

## हाजी विलायतअली धाडी.

हा लखनौमध्यें राहत असे तबला वाजविण्यांत ह्याची फार प्रसिद्धि असे. ह्याचा हात फार मऊ व साथ करण्यांत हा फार प्रवीण होता. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला

## बक्षु धाडी.

लखनौमध्यें हा राहत असे तबला वाजविण्याबद्दल ह्याची फार प्रसिद्धि होती. ह्याची वादनाची तयारी दांडगी असे ह्याच्या वाजविण्यांत लयकारी व माधुरी असे. हा इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला

## मक्खू.

हा लखनौचा राहणारा. ह्याचा हात तबला वाजविण्यांत फार तयार असे. ह्याचें वाजविणें स्पष्ट व मधुर असे. हा इ स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला

## नज्जू.

हा बक्षूचा शिष्य. हा लखनऊमध्यें राहत असे. ह्यानें गुरूची मर्जी संपादन करून तबला वाजविण्याची कला त्याजपासून पैदा केली. हा इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला.

## नाना पानसे.

लहानपणापासून ह्यास पखवाज वाजविण्याचा नाद होता, परंतु लहानपणचे छंद मोठेपणांत कायम राहून त्यांत प्रावीण्य संपादून ज्यांचा नांवलौकिक झाला असे पुरुष थोडेच त्या थोड्या पुरुषांपैकीं नाना हे एक होते नाना आपल्या वडिलांबरोबर काशीस गेले, तेथें ज्योतसिंग नांवाचा एक रजपूत ब्राह्मण ह्यांनीं पाहिला. तो तुलसी रामायणाचें पुराण देवालयांत सांगून आपला निर्वाह करी, व राहिला वेळ पखवाजवादन व शिष्य पढविणें ह्यांत घालवी तो मोठा प्रेमळ स्वभावाचा असून शिष्यांस मोठ्या आनंदानें व निष्कपटपणाने वादनकला शिकवी. त्याचें वादन ऐकून नाना संतुष्ट झाले व त्याच्याजवळ पखवाज वाजविण्यास शिकण्याचा हट्ट नानांनीं वडिलांजवळ घेतला. मुलाचा विशेष आग्रह पाहून वडिलानीं ह्यास परवानगी दिली. ज्योतसिंगाजवळ सुमारें बारा वर्षें शिकून नाना इंदुरास गेले. काशीस ह्यानीं वाजविण्याची कसरत मनापासून रोज दोन प्रहर करण्यास सुरवात केली होतीच, ती इंदुरास गेल्यावर कायम ठेविली. पखवाज वाजविण्याची ह्यांनीं इतकी मेहनत केली कीं, ह्याचें वाजविणें अडा-

ण्यासहि गोड लागूं लागलें, इतका ह्यांचा हात नरम झाला होता. हे स्वतः बुद्धिवान् व हुशार असल्यानें गणित दृष्टीनें ठेक्यांत, बोलांत, पर्णांत ह्यांनीं कसर राहू दिली नाहीं जेथें गैर दिसलें तेथें बदल केला; जास्त होतें तेथें कमी केलें; कमी दिसलें तेथें नवी भर घातली, अशा रीतीनें ह्यांनीं आपल्या विद्येंत कोठें न्यूनपणा राहू दिला नाहीं नवे ठेके, पर्णे वगैरे बाधून शिष्यांस शिकविलें. शिकविण्यात ह्यांचा हातखंडा होता. ह्यानी अनेक शिष्य तयार केले. गरीब शिष्यांस हे जेवावयास देखील घालीत ह्यांच्यासारखा ढोलस पखवाजी झाला नाहीं असें तज्ञ मोठ्या आनंदानें सांगून ह्यांची स्तुति गातात. महाराष्ट्र, सी पी., यु. पी. ह्या प्रांतभर ह्यांची शिष्यशाखा पसरलेली आहे हे समाधानवृत्तीचे व आनंदी स्वभावाचे असत. इंदोर दरबारांत ह्यास नोकरी होती पगार ह्यांच्या विद्येच्या मानानें फार थोडा होता. राजवाड्यात कथा झाल्यास ती वाजविण्याचा प्रसंग ह्यांच्यावर येई। पण तें काम हे आनंदानें करीत. एकदां श्री. तुकोजीरावांस भेटण्यास श्री. जयाजी महाराज इंदुरास गेले; कारण ते एकमेकांस भाऊ समजत असत. नानांचें बजावणें ऐकून श्री. जयाजीमहाराज खूष झाले, ते कलाप्रेमी व मर्मज्ञ होते. त्यानीं नानाची मागणी श्री. तुकोजीरावा जवळ केली; कारण त्यांस वाटलें होतें कीं, अशा गुणी पुरुषास इंदुरात योग्य तनखा पोंचत नसेल श्री. तुकोजीराव म्हणाले, "नाना आपल्याकडे येत असल्यास माझी ना नाहीं." श्री. जयाजीमहाराजांनीं नानाकडे पाहिलें नानांनीं हात जोडून म्हटलें, "येथें काय कमी आहे! मला दोनहि महाराज सारखेच, तेव्हां येथें काय व तेथें काय! तरी आहे येथेंच राहण्याची परवानगी असावी" हें भाषण ऐकून श्री. जयाजीमहाराजांनीं नानाची तारीफ केली. कोणाहि गायकाचा नाना मैफलींत उपमर्द अथवा बेरंग करीत नसत लहानमोठ्या गवयाची वाहवाच करीत तसेंच परठिकाणचा बजवैया आला असतां त्याचा हे गौरव करीत ह्या ह्यांच्या मनाचा मोठेपणा फार थोडक्यांत दिसून येतो. बडोद्याचे बडे नासरखां पखवाजीये इंदुरास गेल्या वेळीं नानांनीं त्याच्या विद्येची तारीफ करून दरबारांत त्याचा मोठा मान केला व महाराजांकडून त्यास मोठी देणगी देवविली. बाळकोबा नाटेकराची गोष्ट त्याच्या चरित्रांत दिलीच आहे पखवाज व तबला दोनीहि बाज ह्यांस उत्तम येत होते. तबल्याचा बाज विशेषेंकरून वामनराव चांदवडकर निसबत निजाम सरकार यांस ह्यांनीं शिकविला होता चार दोन ठेक्यांपासून शंभर

पर्णापर्यंत अधिकाराप्रमाणें हे शिष्यांस शिकवीत; नाहीं म्हणत नसत. बळवंतराव वैद्यांच्या आग्रहावरून हे महाराष्ट्रांत त्यांच्याबरोबर आले होते. श्रीक्षेत्र नरसोबावाडीस श्रीदत्तगुरूचें दर्शन घेऊन, मिरज संस्थानाधिपति श्री बाळासाहेब ह्यांच्या आग्रहावरून हे तेथें गेले होते. श्री. बाळासाहेब ह्या कलेचे चांगले मर्मज्ञ आहेत, त्यांनाहि नानांचें वाजविणें ऐकून समाधान झालें व त्यांनीं ह्यांची योग्य संभावनाहि केली. पुणें येथील चिनीवाले ह्यांच्या वाड्यांतील दिवाणखान्यांत ह्यांचें वाजविणें झालें, तेव्हां नानाच वाजविणें काय योग्यतेचें होतें ह्याची खत्री पुण्यांतील ज्ञात्यांस पटली. ह्यांची राहणी फार साधी असे. ह्यांची अंगयष्टि सडपातळ असून उंच होती. ह्यांस नर्तनकलाहि उत्तम येत होती. ह्यांनीं आपल्या कांहीं शिष्यांस ती शिकवलीहि होती. ह्यांस एक मुलगा व एक मुलीचा मुलगा होता. त्या दोघांस ह्यांनीं उत्तम तयार केले होते. ह्यांचा स्वभाव फार नम्र व विनयशील असे. ह्या विद्येंत असा पारंगत पुरुष फार दिवस झाला नाही असें ज्ञात्यांचें मत आहे. गवयानें सम दाखवून वादकास ती नीट समजली नाहीं, व त्याची इज्जत जाण्याची वेळ आली, अशी वादकाची दीन स्थिति एखादे वेळीं होण्याचा प्रसंग आल्यास त्यांतून बचावण्यासाठीं 'सुदर्शन' नांवाचा एक नवा ठेका ह्यांनीं बांधिला. त्याची अशी खुबी आहे कीं, त्यात प्रत्येक दुसऱ्या मात्रेवर सम ठेविली आहे. त्यामुळें वादकाचा बचाव होऊन ज्ञात्यांनीं त्याची तारीफच करावी. पखवाजाच्या वादनकलेंतील व त्या शास्त्रांतील हे नायक होते असें म्हटल्यास म्हणणारावर अतिशयोक्तीचा दोष येणार नाहीं. हे इ. स एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंदुरास दिवंगत झाले.

## बळवंतराव पानसे.

हे इंदुरचे प्रसिद्ध पखवाजवादक नाना पानसे यांचे चिरंजीव. ह्यांचें ह्या कलेचें अध्ययन वडिलांजवळ झालें. त्या कलेंत हे उत्तम निष्णात झाले. ह्यांचें वाजविणें ऐकून 'बापसे बेटा सवाई' असें तज्ञ म्हणूं लागले होते. हे दिसण्यांत फार झोंकदार होते. हे स्वभावानें वडिलांसारखे विनयशील असत. इ. स १८८६ मार्चमध्यें सरदार बापुसाहेब रेशिमवाले ह्यांच्या कन्येचा विवाह पुण्यास झाला. त्यावेळीं सरदार बापुसाहेब यांजबरोबर हे पुण्यास आले होते. लग्नसमारंभ आटोपल्यावर शिमग्याचा सण आला. साहजिकच रोज रात्रीं गाणींबजावणीं सुरूं असत. एकदां असा प्रसंग आला कीं, त्या सणात बाळकोबा नाटेकरांचें गाणें सुरूं झालें. बापुसाहेब त्यास म्हणाले, "बुवा, लावणी म्हणण्यांत

तुमची फार प्रसिद्धि आहे, असें मी ऐकितों; ध्रुवपद व ख्याल ऐकून मला कंटाळा आला आहे, तर आज तुमची दक्षिणची लावणी ऐकवा." नाटेकराचा स्वभाव गोड. ते लगेच म्हणाले, 'फार चांगलें.' लगेच त्यांनीं लावणी म्हणण्यास सुरुवात केली, पण वाजविण्याची साथ नीट जमेना. तेव्हां बापुसाहेबांनीं पानशांकडे पाहिलें. पानसे म्हणाले, "काय हुकूम?" बापुसाहेब म्हणाले, "साथ करा.' पानसे म्हणाले, "ही साथ मी नाहीं करणार." बापुसाहेब म्हणाले, "नानानीं हा बाज तुम्हाला शिकविला नाहीं का?" पानसे म्हणाले, "आपण काहीं म्हणा, पण मी लावणीची साथ करणार नाहीं!" मग नाटेकराचा नेहमींचा साथीदार ग्यानबा गुरव आला व गाणें चालूं झालें. ह्या प्रसंगीं प्रस्तुत लेखकाचे वडील हजर असल्यानें त्यांनीं हीं प्रश्नोत्तरें ऐकिलीं आहेत. तसेंच त्या सणांत पानशांचें वादनहि अनेक वेळा त्यांनीं ऐकिलें आहे. हा गुणी पुरुष वडिलांच्या पूर्वीं वारल्यानें नानांस फार दुःख झालें व मनास धक्काहि बसला. ह्यांचा हात वाजविण्यात इतका मुलाइम व सफाइदार होता कीं, तळहातास बत्तासे बांधून पखवाज वाजविण्यास सुरुवात केली तरी बत्तासे फुटत नसत, अशी दंतकथा त्या वेळच्या लोकांच्या तोंडीं होती. हे इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत इंदुरास कालवश झाले.

## वामनराव चांदवडकर.

हे गृहस्थ नाना पानसे ह्यांचे पट्ट शिष्य होते. पानसे ह्यांनीं तबल्याचा बाज ह्यांस उत्तम प्रकारें शिकविला होता. त्या बाजांत ह्यांच्यासारखा प्रवीण पानशांच्या शिष्यांत दुसरा कोणी झाला नाहीं अशी ह्यांची कीर्ति होती. ह्यांचा हात फार मुलाइम, वाजविणें मधुर, स्पष्ट व नियमबद्ध असे. पुढें हे निजाम हैदराबादेस नोकर झाले. ह्यांनीं कोणास फारसें शिकविलें नाहीं. मिरजेचे दत्तोपंत पटवर्धन ह्यांस फक्त शिकविलें. निजाम हैदराबादेस बरेच कलावंत सरकारांत नोकर आहेत, तसेंच कलावंतांचा धंदा करून पोट भरणारेहि पुष्कळ होते व आहेत; पण त्या मंडळींत चांदवडकर ह्यांची चांगली चहा असे. 'मला शिकवा मी आपला शिष्य होतों' असें कोणी म्हटल्यास, 'ही कला मजबरोबर मी नेणार, मी कोणास शिकविणार नाहीं' असें ते त्यास म्हणत. ह्याच्या उलट ह्यांच्या गुरूचें असे. असो. हा गुणी पुरुष इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## नासरखां.

हे पखवाज बजवैय्ये होते ही विद्या हे आपले वडील ताजखां यांजपाशीं शिकले. विद्यार्थीदशेंत ह्यांचा लौकिक असा होता कीं, काहीं दिवसांनीं हे कुधवसिंग ह्यांची बरोबरी करितील वाजविण्यांत ह्यांचा हात फार मुलाइम असे. हे केवळ पखवाज वाजवून श्रोत्यांचें मनरंजन करीत; तसेंच साथ करूनही मोठी मजा आणीत. बडोदा रिसायतींत हे नोकर होते. रामपुरचे माजी नबाब हमीदअल्लीखां बहादूर ह्यांनीं नासरखांस रामपुरास बोलावून, वादनाचे अनेक मुजरे करून ह्याच्या गुणांची योग्य संभावना केली होती; श्रीमंत तुकोजीराव होळकर यांनीं ह्यास बोलावून नेऊन ह्यांच्या कलेबद्दल योग्य पारितोषिक ह्यास दिलें होतें. ह्याचा स्वभाव मोठा प्रेमळ होता. ह्यानीं कांहीं शिष्य तयार केले. त्यांत कांताप्रसाद फार प्रसिद्धीस आले हे फार डौलानें वागत असत. ह्यांच्या पखवाजास गलेफ किनकाफाचा व हातोडी चांदीची होती; पखवाज मिळविण्याची ह्यांची तऱ्हा डोकें उठेल अशी नसे. हल्ली पहावें तर दुमजल्यावर गाणें असतां पखवाज मिळवूं लागलें कीं, तळमजल्यावरील राहणारास किंवा मालकास भयच उत्पन्न होतें ! ह्यांच्या इतपत विद्या नाहीं पण योग्य गोष्टींचें तरी ह्यांचें अनुकरण इतरांनीं करावें ह्यांचें वर्तन सभ्य असे. हे बडोदा येथें इ. स १९०३ मध्यें कालवश झाले.

## मोगरी रामय्या.

दक्षिण महाराष्ट्रांत कागवड नांवाच्या संस्थानात गणपतीचा उत्सव मोठ्या थाटानें होत असे संस्थानाधिपति सुसंस्कृत व मोठे मार्मिक असत. त्यांना गायनाची मोठी गोडी असे उत्सवांत लांबलांबचे गायकवादक येत. त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस बिदागीहि मिळत असे. दरसाल पखवाजवादक रामय्याहि येत असे. हा पखवाज फार चांगला वाजवी व साथहि चांगली करीत असे. हा वाजविण्यास बसण्यापूर्वी आपल्या पखवाजापुढें रुप्याची मोगरी ( हातोडी ) ठेवी, व मैफलींत सांगे कीं, 'जर मी वाजविण्यांत चुकलों तर ह्या मोगरीनें मी आपला पखवाज फोडून टाकीन व पुनः वाजविण्याचा धंदा करणार नाहीं.' पुष्कळ ध्रुवपदीयांनीं ह्यास चुकविण्याचा यत्न करावा पण हा कधीं चुकला नाहीं शाबास ह्याच्या विद्येची व परिश्रमाची। अशीं रत्नें कधीं कधीं दृष्टीस पडतात. ही गोष्ट इ. स. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील आहे.

## मन्याबा कोडीतकर.

हे सातारा जिल्ह्यांतील कोडित गावचे राहणार. हे जातीचे गुरव होते. हे पखवाज वाजवीत. ही विद्या हे आपल्या बापाजवळ शिकले. ह्यांचे वडील वाजविण्यांत प्रवीण होते. हे म्हणत, 'आमचा स्वतन्त्र बाज आहे. आम्ही गणित जाणत नाही, आमचे हात व वाजविणें हेंच आमचें गणीत!' स्वभावानें हे फार नम्र असत. पुण्यांतील प्रसिद्ध हरिदास वे. शा. सं. त्र्यंबकबुवा नाशिककर याच्या पाठीमागें कथेंत हे पखवाज वाजवीत असतां, बुवांच्या घरीं कथेचा चांगला थाट जमून कथा रंगांत आली. बुवा आपल्या गोड आवाजानें शंकराच्या स्वारीचें वर्णन ज्यांत केलें आहे त्या पदांतील 'भं भं भ भ शंख पुकारत' हीं अक्षरें तोंडानें म्हणत आहेत व मन्याबा तीं अक्षरें मृदंगामधून स्पष्ट काढीत आहेत, असें एक वेळ झालें. पण दुसऱ्या वेळीं 'भं भ भं भ' हीं अक्षरें पखवाजांतून हातांनीं काढीत असतां ह्यांनीं पखवाजावर कपाळ टेंकिलें तें टेंकिलें! तेथेंच ह्यांचें प्राणोत्क्रमण झालें!! त्र्यंबकबुवास व जमलेल्या मंडळीस वाईट तर वाटलेंच. पण अशा तऱ्हेनें, चांगल्या वेळीं व चांगल्या जागीं ह्यांचें देहावसान झाल्याबद्दल सर्वांस आश्चर्य वाटलें व समाधानहि झालें. ह्यांनीं कांहीं शिष्य तयार केले होते. हे इ. स. १८७४ च्या सुमारास हा लोक सोडून गेले.

## दादा खरे.

हे जमखंडीचे राहणारे. ह्यांना पखवाज वाजविण्याचा मोठा नाद होता. हे कधीं फारसे बाहेर गेले नाहींत. ह्यांच्या वेळच्या परंपरेचें या कलेचें ज्ञान ह्यास चांगलें असे. हे चांगले वादक अशी ह्यांची प्रसिद्धि होती. हे गृहस्थ असून संस्थानांत कारकुनीपेशांत नोकर असत. हे श्री. थोरले आपासाहेब यांच्या वेळीं होऊन गेले.

## विठोबा शाईवाले.

हा तासगांवचा राहणारा. तबला व पखवाज हे दोनहि बाज वाजविण्यांत हा कुशल होता. साथ करण्याचे कामांत हा बराच वाकब असे. ह्याचा हात मोठा गोड असे. 'इंदूरचे नाना पानशे यांचा मी शिष्य आहें,' असें हा सांगे. हा इ. स. १९०० चे सुमारास वारला.

## मार्तंडबुवा चौंडे.

हे वाईचे राहणारे असून पखवाज वाजविण्यात चांगले प्रवीण होते. 'आमच्या घराण्याचा बाज स्वतंत्र आहे,' असें हे म्हणत. हल्लीं गोभक्त म्हणून प्रसिद्ध असलेले चौंडे महाराज यांचे हे वडील. आपल्या चिरंजीवास ह्यांनीं पखवाजवादन शिकविलें आहे. हे इ. स. १९०५ चे सुमारास कालवश झाले.

## सखाराम गुरव.

हा नाना पानशांच्या पट्टशिष्यांपैकीं एक होता. नाना वारल्यावर हा इंदुरास राहून पानशांच्या पठडीचें वादन शिकविण्याचें काम करीत असे. कांहीं वर्षांनीं हा बऱ्हाणपुरास सरदार भुस्कुटे ह्यांच्या आश्रयास जाऊन राहिला होता. ह्याचा हात गोड व वाजविणें सफाईदार असे. ह्यानें अनेक शिष्य शिकविले, ह्याच्यासारखा प्रवीण पानशांच्या शिष्यशाखेंत आज कोणी राहिला नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे. हा इ. स. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## बळवंतराव वैद्य.

हे जमखंडीचे राहणारे. वाजविण्याचा नाद ह्यांना लहानपणापासून होता. जमखंडीस खरे म्हणून एक वादक असत, त्यांच्यामुळें बळवंतरावास हा नाद लागला. एकदां हे पुण्यास आले असतां एका गुरवाची व ह्यांची बोलाचाली होऊन, त्याचें पर्यवसान अपशब्दांत झालें. तेव्हां बळवंतराव म्हणाले, "उत्तम वादक होईन नंतर पुण्यास तोंड दाखविण्यास येईन." अशी प्रतिज्ञा करून हे मधुकरी मागत इंदुरास नाना पानशाकडे गेले व आपली सर्व हकीकत नानास ह्यांनीं निवेदन केली. नानांनीं ह्याचा निश्चय व विद्येबद्दल आस्था पाहून ह्यांस शिकविण्यास सुरुवात केली. बळवंतरावांचा हात फार कडक तेव्हां लाकडाच्या फळ्यावर हात वळविण्यास सुरुवात झाली. शिष्य एकनिष्ठ व श्रद्धाळू पाहून नानांनीं त्यास प्रेमानें शिकविण्यास सुरवात केली. व त्यास पखवाजाचें वाजविणें चांगलें शिकविलें. बळवंतराव चांगले तयार झाले. नानांनीं थोडे टप्पे तसेंच थोडी नृत्यकलाहि त्यांस शिकविली. तयार झाल्यावर गुरूचा आशीर्वाद घेऊन हे महाराष्ट्रांत परत आले, पुढें श्री० बाळासाहेब मिरजकरांच्या पदरीं राहिले. ह्यांचा विशेष गुण म्हणजे

हे विलक्षण लयकार होते; त्यामुळें साथ करतांना भांडणें जुंपत. पुण्यांत ह्यांनीं गायनसमाज काढिला होता ह्याची शिष्यशाखा तयार झाली व महाराष्ट्रांत चागला लौकिक झाला आपले गुरु नाना ह्यास महाराष्ट्रांत ह्यानीं आणलें व त्यांचें वादन चोहोंकडे करविलें. तसेंच त्यांचा सन्मान करून त्याच्या अंतःकरणास समाधान होईल अशा तऱ्हेनें त्याशीं वागून, त्यांस परत ह्यांनीं पोंचविलें. मोठमोठ्या तज्ञ लोकांत ह्यांच्या वाजविण्याची तारीफ होई पखवाजवादनाचें ज्ञान ह्यांस पूर्ण झालें होतें. ह्यांची शिष्यशाखा महाराष्ट्रात बरीच आहे. लोक ह्यांना एककल्ली असें जरी समजत, तरी हा पुरुष मनाचा प्रेमळ होता ह्यांची साथ कोठें जुळत नसे, ह्याचें कारण असे कीं, गायकाची लय गातां गाता वाढते. पण ह्यांच्यांत हा गुण विलक्षण असे कीं, पूर्वी गवयानें दाखविलेली लय शेवटपर्यंत ह्यांच्या हातात राही; त्यांत बदल होत नसे. हे शंकरभक्त असत सातारप्रांतीं कृष्णाकाठीं गोवें म्हणून एक क्षेत्र आहे, तेथें महाशिवरात्रीस मोठा उत्सव होतो. हे त्यावेळेस तेथें जात त्याठिकाणीं असेपर्यंत मधुकरी मागावयाची, अशी ह्यांची वहिवाट असे एकदां एका शिवरात्रीस नारायणबुवा गोगटे फलटणकर तेथें गेले होते त्यांना 'आपण मोठे तालिये आहों' असें वाटत असे. तेव्हां बळवतरावाशीं सामना करून आपला गुण लोकांस दाखवा अशी सल्ला त्यांच्या कांहीं स्नेही मडळींनीं त्यांस दिली तो त्यांस पटली रात्रीं बुवांनीं बळवतरावास म्हटलें, "बळवतराव, आज मी कोटेश्वरापुढें गाणार, तेव्हां तुम्ही माझी वाजविण्याची साथ करा" बळवत-रावाचे ते स्नेही होते. बुवा असें म्हणाल्यावर बळवतराव हसून म्हणाले, "तुम्ही हरिदास, तुमच्या मागें वाजविणें ठीक नाहीं." यावर बुवा म्हणाले, "आज तुमची विद्या दाखवा." बळवतराव म्हणाले, "हरिदासाच्या मागें वाजवावयाचें असतें तर इंदुरास जाऊन नानाचें शिष्यत्व पत्करण्याचें कारण काय होतें? हरदासाची साथ मी पूर्वीं करीतच होतों! मी गवयाची साथ करितों, हरि-दासाची करीत नाहीं." तेव्हां मडळींत एकच हशा पिकला. एकदां जमखंडीस असतांना बळवंतरावांचें गाणें ठरलें; मडळी जमली ह्यांस साधारण गाता येत होतें. दोनतास गाणें बरें झालें नंतर कारभारी साहेबांनीं बळवंतरावास 'एकादी ठुमरी म्हणा' अशी शिफारस केली तेव्हां ह्यांना राग आला! 'हें काम नायकिणीचें आम्ही टुंबऱ्या गात नसतों।' असें म्हणून ह्यांनीं जलसा संपविला! पण आतांचा काल तसा नाहीं. वाटेल तें गाण्यास सांगा, गवयी न रागावतां गातो व आपणांस वाटेल तें गाता येतें यात धन्यता मानितो. हा कालमहिमा आहे! हा सरळ व सालस स्वभावाचा पुरुष वयाच्या ७२ व्या वर्षीं इ. स. १८९५ सालीं परलोकवासी झाला.

## मुरारबा गोवेकर.

हे गोव्याचे राहणारे गाणें, सतार, पखवाज व तबला वाजविणें ह्या कला ह्यास येत असत. नायकिणीस तालमी देऊन हे आपला निर्वाह करीत. कलावंतांत ह्यांची मोठी बडेजाव व ह्यांच्या शब्दास मान असे ह्यानीं पखवाज, सतार व गायन ह्या विषयांवर मराठींत पुस्तकें लिहिलीं आहेत. हे कधीं कधीं पुण्यासहि रहात असत ह्याचें वर्तन कांहींसें सडेतोड असे. त्यावेळीं ह्या कलेंतील मंडळी फारशी सुशिक्षित नसल्यानें पक्षाभिमान ह्यांच्यांत जाज्वल्य असे, त्यामुळें शुष्कवाद विनाकारण होत असत. मुरारबा गुणाचे चहाते असल्यानें योग्य माणसाचा मान करून त्यांस आपल्या शिष्यिणींकडून पैशाची मदतहि करवीत असत. हे इ. स एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत वयातीत होऊन कालवश झाले.

## बंडोपंत जोगळेकर.

हे मूळचे जमखंडीचे राहणारे, पण पुढे ठाणे जिल्ह्यात आगाशीस राहत असत. तबला वाजविण्यांत हे मोठे कुशल होते. ठुमरी वगैरे हलक्या गाण्याची साथ हे फार उत्तम करीत. तसेंच नाच कामाचीहि साथ चांगली करीत वाजविण्यांत ह्यांचा हात फार गोड होता नायकिणीच्या गाण्यास ह्यांची साथ असली म्हणजे तिच्या गाण्यास दुप्पट रंग चढे हे स्वभावानें प्रेमळ पण थोडे व्यसनींहि होते. हे इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाले.

## दादा कुंटे.

हे सांगलीचे राहणारे. ह्यांचा कारकुनी पेशा. पण हे बुद्धिमान् असल्यानें पखवाजाचे ठेके नवे तयार करावे, परणें बांधावीं, हा ह्यांस नाद असे. केवळ जुनें तें चांगलें असें म्हणूं नये, योग्य असेल तें ग्रहण करावें अशा मताचे हे होते बोलण्यांत हे निर्भीड असत हे नवीं तयार केलेलीं परणें तोंडानें म्हणून, हातानें ताल धरून दाखवीत, तेव्हां जमलेल्या जुन्या पद्धतीच्या मंडळींस उत्तर देतां येत नसे. अशाच प्रकारचे नाचाचेहि बोल ह्यांनीं तयार केले होते. ह्यांच्या कुटुंबांतील पुढील मंडळी सुशिक्षित आहेत, तेव्हां त्यांच्या संग्रहीं ह्या गोष्टी असण्याचा संभव आहे. हा बुद्धिमान्, शौकीन् व निस्पृह गृहस्थ इ स. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सांगली येथें कालवश झाला.

## सुखदेवसिंग.

श्री. जयाजीराव महाराजांच्या वेळीं तबला वाजविण्यांत प्रसिद्ध असलेला दरबारवादक जोरावरसिंग याचा हा मुलगा हा तबला वाजविण्यांत फार तयार झाला होता त्याच्या बापानें त्याला तबला उत्तम वाजविण्यास शिकविलें होतें. साथ करण्यांत हा चांगला कुशल होता. ह्याचे बोल स्पष्ट असत. हा स्वभावानें नम्र व गरीब असे. हा श्री. माधवराव महाराजांच्या वेळीं कालवश झाला

## ग्यानबा.

हा पुण्याचा राहणारा. हा कोंडितकरापासून पखवाज व पिंगळ्यापासून तबला शिकला. ह्याचा हात फार गोड होता. साथ करण्यांत हा फार प्रवीण असे. पर्वती देवस्थानांत हा नोकर होता. स्वभावानें हा चांगला होता. ह्यानें फारसें कोणास शिकविलें नाहीं. इ. स. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत हा पुण्यास काल-वश झाला.

## कांताप्रसाद.

हा बडोद्यास राहत असे. हा तबल्याचा बाज फार उत्तम वाजवी. हा पखवा-जहि वाजवीत असे. पण त्याबद्दल ह्याची तितकी ख्याति नव्हती. ह्याचा स्वभाव फार प्रेमळ असे. एकदां हुबळीस वाजविण्यासाठीं गेला असतां तेथून परत जातांना हा वाठार ह्या नांवाच्या गैरसमजुतीनें वाट चुकून आमच्या गांवीं आला होता. पण तेथें खेड्यांत ह्याची काय किंमत ! मग हा आमच्या घरीं आला. तेथें रात्रीं जेवण झाल्यावर ह्यानें आपलें वाजविणें आमच्या सर्व मंडळीस ऐकविलें. "मला फार येत नाहीं; 'नादी धीना' फक्त वाजविता येता," असें हा विनयानें म्हणाला. पण 'ना दी धी ना' हें वाजाविणें साधें खरें, पण इतकें सफाईदार, स्पष्ट व गोड क्वचितच कोणाचें उमटत असेल. हा बाज ह्यानेंच वाजवावा असें तज्ज्ञ म्हण-तात पुढें हा गोव्हरजानच्या नोकरींत मरेपर्यंत होता. हा इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## गुरुदेवजी पटवर्धन.

हा मिरजेचा राहणारा. ह्याच्या घराण्याला गायन-वादन कला प्रसन्न आहे. पखवाज वाजविण्याची कला हा निजाम हैद्राबादचे वामनराव चांदवडकर ह्यांज- पाशीं शिकला व तींत चांगला प्रवीण झाला. हा बरींच वर्षें विष्णुबुवा पलुसकर यांच्याजवळ होता. दोघेहि गुणवान् व प्रेमळ स्वभावाचे, असें असतां पुढें त्यांचें- ह्यांचें पटेनासें झालें ' कारण कांहींहि असो ! ह्यानें पलुसकरबुवांची नोकरी सोडली व मग हा मिरजेस जाऊन राहिला ह्याचें वाजविणें फार मधुर व स्पष्ट असे, असें तज्ञ म्हणतात. स्वभावानें हा फार नम्र होता. हा इ स. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मिरज येथें कालवश झाला.

## गणपतराव रास्ते.

हा जमखडीचा राहणारा पखवाज व तबलावादन हा बळवतराव वैद्यांपाशीं शिकला ह्या कलेंत ह्यानें फार परिश्रम केले होते. ह्याचें वाजविणें कडक नसून मधुर होतें साथ करण्यांत हा चांगला प्रवीण असे. ह्याची गुरुभक्ति चांगली होती ह्याचें नुसतें पखवाजवादनहि होत असे, तेव्हां तोंडानें बोल म्हणून पख- वाजांत ते बोल स्पष्ट काढून श्रोत्यांचें मनरंजन हा चांगलें करी हा इ. स. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं कालवश झाला

## बाळकृष्ण रास्ते.

हा जमखडीचा राहणारा बळवतराव वैद्य ह्यांच्या पट्टशिष्यांपैकीं हा एक होता. ह्याच्या वाजविण्यांत गोडी फारशी नसे ह्या कलेमध्यें हा प्रवीण म्हणून ह्याची त्या प्रांतात प्रसिद्धि होती. ह्यांचें शिक्षण बेताचेंच व स्नेही मंडळी हलक्या दर्जाची, त्यामुळें ह्यास व्यसनांनी गांठिलें होतें. ह्याचें घराणें सडेतोड स्वभावाचें असल्यानें ह्याचें कोणाशीं फारसें जमत नसे. उतारवय लागतांच ह्यानें चतुर्था- श्रम घेतला होता हा इ स. २० शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाला.

## पुरुषोत्तमपंत दामले.

हे गृहस्थ असून पखवाज चांगला वाजवीत. B. B. C. I. कंपनींत हे नोकर होते मुंबईत राहणारांनीं ज्यांनीं ह्यांचें वाजविणें ऐकिलें असेल, त्यास ह्यांच्या वाजविण्याची खुबी व प्रावीण्य कळून आलें असेल हे इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाले.

## जगन्नाथ.

हा नेहमीं मुंबईत राहत असे हा आपणास 'पानशांचा शिष्य' म्हणवी. ह्याचें वाजविणें व्यवस्थेशीर, गोड व स्पष्ट असे अनेक गवयांची साथ करण्याचा ह्याला प्रसंग आल्यानें साथ करण्यांत प्रवीण असे. बऱ्यापैकीं एक वादक म्हणून हा मुंबईत प्रसिद्ध होता इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत हा कालवश झाला.

## रामचन्द्र गोवेकर.

मुंबईत जे तबलावादक आहेत त्यांतील चांगल्या वादकांमध्यें ह्याची गणना असे ह्याचें वाजविणें व साथ करण्याची शैली चांगली होती हा इ. स. २० व्या शतकाच्या प्रथमार्धांत दिवंगत झाला.

## काळूराम

तबला वाजविण्यांत व साथ करण्यात हा कुशल होता ह्याचा हात मऊ व वाजविणें स्पष्ट व गोड असे. हा नेहमीं मुंबईत राहत असे. हा इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत दिवंगत झाला

## विष्णुपंत जोशी.

हा कोंकणचा राहणारा. हा आपणास बडोद्याचे प्रसिद्ध पखवाजीये 'नासरखां यांचा शिष्य' म्हणवीत असे ह्याना तबला व पखवाज हीं दोनहि वाजवितां येत असत काहीं दिवस हा रा. ब देवल यांच्या आश्रयास होता पुढें हा कन्याशाळेंत नोकर झाला. ह्याला थोडेंबहुत गाण्याचें ज्ञान होतें हा इ स. १९२२ मध्यें क्षयरोगानें कालवश झाला.

## लाला हरिचरण.

हा जातीचा ब्राह्मण होता. नि-हागड संस्थानांत हा नोकर होता ह्या कलेचा अभ्यास ह्यानें कुदवसिंगाजवळ केला होता. ह्याची तयारी व वाजविण्याची हातवटी चांगली होती. 'अखिल भारतसंगीत परिषदेंत' ह्यास बोलावणें असे व त्यावेळीं ह्याचें वाजविणे ऐकण्याचा योग प्रस्तुत लेखकाच्या वडिलांस आला आहे. हा

स्वभावानें प्रेमळ असून नम्र होता. अलवार दरबारच्या प्रसिद्ध ध्रुवपदींचा अला बंदे ह्याची साथ करीत असतां ह्याच्या वाजविण्याची योग्यता परिषदेच्या निमित्तानें काशीस जमलेल्या लोकांस चांगली कळली. हा इ. स १९२५ च्या सुमारास कालवश झाला.

## रामा गुरव.

हा कुरुद्वाडचा राहणारा. हा तबला फार चांगला वाजवी साथ करून गवयांचा रंग वाढविणें ही कला ह्यास उत्तम साधली होती. हा कुरुंद्वाडकरांच्या पदरीं होता. ह्याच्या वाजविण्यांत गोडी असे. मींयां रहिमतखां ह्याची साथ ह्यानें अनेक वर्षें केली हा इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला

## माखन.

हा मुंबईचा राहणारा. पखवाज वाजविण्याची ह्याची शैली चांगली असून साथ करण्यात हा मोठा प्रवीण आहे. हल्लीं एका व्यापाऱ्यानें ह्याला आपल्या पदरीं ठेविलें आहे.

## अबीद हुसेन.

हा लखनौस राहतो. हा घराणदार तबलजी आहे. वाजविण्यांत ह्याचा हात फार गोड आहे नाचाच्या साथीबरोबर हा वाजवितो तेव्हां ह्याचें कलाप्रावीण्य दिसून येतें स्वभावानें हा फार गोड आहे हा कांहीं वर्षें 'मॉरिस कॉलेजमध्यें' तबलाशिक्षक होता. ह्याचें वाजविणें प्रत्यक्ष ऐकण्याचा योग प्रस्तुत लेखकास लखनौस असता अनेक वेळां आला आहे. ह्याच्या बोलाचें अक्षर तबल्यावर इतकें स्पष्ट व मधुर उठतें कीं, ह्याचें तें वाजविणें सारखें ऐकत रहावें असें वाटतें. ह्याची चाट इतकी स्पष्ट व मधुर निघते कीं, तशी फार थोड्यासच काढितां येईल.

## बीरु मिस्र.

हा बनारसचा राहणारा हा उत्तम तबला वाजवितो जलद लयीच्या गायनाची साथ करितांना ह्याचें प्रावीण्य दिसून येतें बनारसमधील प्रसिद्ध वादकांमध्यें

ह्याची गणना आहे. ह्याच्या वाजविण्यांत गोडी व स्पष्टता फार आहे. 'अबीद्-हुसेनपाशीं आपण कांहीं शिकलों ' असें हा सांगतो.

## शंकर भैय्या.

हा पुण्याचा राहणारा हा जातीनें गुरव आहे. पुण्यांत बळवंतराव वैद्य ह्यांचा गायनवाद्नाचा समाज असतां तेथें हा मृद्ग व तबला हे दोनहि बाज वाजविणेस शिकला. स्वभावानें हा फार सरळ व मनमिळाऊ आहे 'बेलबाग' देवस्थानांत हा नोकर आहे. अनेक गवय्यांबरोबर साथ करण्याचा प्रसंग ह्याला आल्यामुळें साथ करण्याचें काम ह्यास चांगलें साधलें आहे. अलीकडे ध्रुवपद गाणारे गवई कमी झाल्यानें मृद्ग वाजविण्याचें काम ह्यास फार पडत नाहीं, कथा वाजवितांना काय असेल तेवढेंच ! हल्लीं तबलावाद्नाची जरूर जास्त आहे. मार्मिक दृष्टीनें पाहिल्यास ह्याच्यामध्यें तबल्यापेक्षां मृद्गवाद्नाचें प्रावीण्य जास्त दिसून येतें.

# भाग ४.

## नर्तक.

### कन्हैया.

हा लखनौस राहत असे. ह्याच्या वेळीं, म्हणजे इ. स १८५० च्या सुमारास, ह्या कलेस फार उत्तेजन मिळालें होतें, कारण त्या वेळचा लखनौचा नवाब ह्या कलेंत फारच वाकब होता वाजिद अल्लीशहानें स्वतः ह्यास नर्तनकलेंत प्रवीण केलें होतें. त्याच्या दरबारीं अनेक कलावंतिणी व अनेक पुरुष नर्तक होते. सुमारें ५० तर निरनिराळीं वाद्यें वाजविणारे वादक व ६० गायक होते. ते सर्व कन्हैय्याची नाचकाम व भाव ह्याबद्दल स्तुति करीत. हा हुबेहुब आपल्या वस्तादाप्रमाणें त्या कलेंत प्रवीण झाला होता. हा फार देखणा होता स्वभावानें हा मोठा मनमिळाऊ व रंगेल असे. ह्या शतकांत ह्या विद्येचा लोप होत चालला आहे हा नर्तक इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

### कालिकादीन.

हा बनारसचा रहिवाशी. नर्तनविद्येंत हा फार प्रवीण होता. भावहि हा उत्तम करी. मरेपर्यंत हा बनारसमध्येंच होता. बनारसच्या अनेक नायकिणींस ह्यानें तालीमी दिल्या होत्या. ठुमरी म्हणून त्याचा भाव दाखविणें ह्या गोष्टीहि ह्यानें त्यांस शिकविल्या होत्या. बनारसची ठुमरी प्रसिद्धच आहे. ह्याचा भाऊ बिंदादीन लखनौस राहत असे ह्याचें वर्तन गृहस्थाप्रमाणें असे. सभ्य लोकांत ह्याला फार मान असे हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

### बिंदादीन.

हा बनारसचा रहिवाशी. नर्तन व भाव ह्या कलांचा अभ्यास ह्यानें बनारस शहरीं केला. ह्या कलेमध्यें प्रावीण्य संपादल्यावर व ५७ सालचा बंडाचा वणवा शम-

त्यावर हा लखनौस जाऊन राहिला हा विशेष देखणा होता. ह्या कलेवर ह्याला चांगले पैसे मिळाले. लखनौस ह्यानें घर केलें व जिनगी चांगली मिळविली. ह्यानें अनेक शिष्यास ही कला शिकविली. सकाळीं ९ वाजल्यापासून ११ वाजेपर्यंत आपल्या घरीं नाचावयाचें, असा ह्याचा नित्यक्रम असे; नाच पाहण्यासाठीं ह्याच्या घरीं लोकांची रोज गर्दी जमत असे उभें राहून निरनिराळ्या तालांत व लयींत हा नाचकाम करी व त्यावेळीं पायानें रागोळीवर अनेक चित्रें काढून दाखवी तसेंच पायात बांधिलेल्या घुंगरांपैकीं एकच वाजविणें, दोनच वाजवून दाखविणें इत्यादि कसब ह्याच्या अंगांत होतें. हा ह्याचा क्रम उतार वयातहि चालत असे अभिनय व भाव करण्यांतहि हा प्रवीण असे. 'आपिये' म्हणजे या ' हा शब्द निरनिराळ्या आवाजानें व निरनिराळ्या आविर्भावांसह हा जेव्हां उच्चारी तेव्हां ज्ञाते चकित होत. उतार वयात हा जरी स्थूल झाला होता तरी त्यामुळें ह्याच्या नाचकामात कांहीं कमतरता आली नव्हती. ह्याला दोन मुलगे आहत तेहि हें काम चांगलें करितात. ह्यानें शिकविलेल्या स्त्रियांमध्यें बिचवा व तिची धोरली बहीण ह्या फार प्रसिद्ध आहेत. हा गुणी कथ्थक इ स १९१५ च्या सुमारास लखनौ येथें कालवश झाला.

## लालूजी.

हा लखनौचा राहणारा. हा जातीनें कथ्थक होता गत, भाव व अभिनय ह्यात हा फार प्रवीण होता. ह्याचा स्वभाव फार थट्टेखोर असे. हा इ. स एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## प्रकाश.

हा जातीचा कथ्थक होता हा लखनौत राहत असे. गत, भाव व अभिनय ह्या कामात हा फार प्रवीण होता. हा स्वभावानें नम्र व मनमिळाऊ होता हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत वारला

## दुर्गा.

हा लखनौच्या प्रकाश कथ्थकाचा पुतण्या गत, भाव, व अभिनय ह्यांत हा फार तयार होता. हा फार देखणा व स्वभावानें मोठा रंगेल होता नटणें ह्याला फार आवडे हा आपल्या चुलत्याच्या देखत वारला

## वेणीप्रसाद.

हा बनारसचा राहणारा. हा नृत्य व अभिनय ह्यांत फार कुशल होता ह्याचें वागणें फार मोहक असे. हा दिमण्यांत सुरेख होता हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

## मानसिंग.

हा लखनौंचा राहणारा हा नाचकामात फार प्रवीण होऊन गेला. हा इ. स. १९ व्या शतकाच्या अंतीं कालवश झाला

## रामसहाई.

हा हंडियाचा राहणारा नाचकलेंत हा फार चांगला होऊन गेला. हा आदाहि उत्तम करी. हा स्वभावानें विनयशील होता. हा इ. स १९ व्या शतकाच्या अखेरीस कालवश झाला

## बांदा.

हा जातीनें कथ्थक होता. नाचकामांत ह्याची फार तारीफ असे. ह्याचें वर्तन फार सभ्यपणाचें असे. हा मोठा विनोदी असे. हा इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत वारला

## रमझानी.

हा लखनौंत राहत असे. नाचकामांत हा फार कुशल होता हा फार देखणा व नटवा असे. हा इ स. १९ व्या शतकाच्या अतीं वारला

## हुसेनवक्ष.

हा लखनौत राहत असे हा नृत्य व भाव ह्यात प्रवीण असे ह्याचें नृत्त व नर्तन हे दोन प्रकार पाहण्याजोगे असत. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत वारला.

## कायमअली.

हा लखनौत राही नाचकाम व अभिनय ह्या कलांत हा मोठा कुशल असे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या अंतीं वारला.

## मिरझावहीद.

हा काश्मीरचा राहणारा, पण पुढें लखनौस जाऊन राहिला होता. नृत्य व भाव ह्या कलेंत हा फार चांगला, अशी त्या वेळेस प्रसिद्धी असे. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत वारला.

## गुलबदन.

हा बनारसचा राहणारा. हा नाच व भाव ह्यांत फार कुशल होता. हा फार देखणा व थट्टेखोर असे; स्त्रीचा पोषाख केल्यावर तो स्त्री नाहीं असें कोणास वाटत नसे. हा इ. स. १९ व्या शतकाअंतीं वारला.

## सुखबदन.

हा बनारसचा राहणारा. नृत्य व भाव ह्या कलांत हा चांगला वाकब होता. हा दिसण्यांत फार सुरेख असे, ह्याचा स्वभाव विनोदी होता. ह्याची मित्र मंडळी फार असे. नृत्याच्या वेळीं निरनिराळ्या प्रकारचे रसाविर्भाव दाखवितांना हा जे चेहरे करी ते प्रेक्षक पहातच रहात. हा इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाला.

# भाग ५.

# स्त्रिया.

## मिराबाई.

उदेपूरच्या राण्याची ही बायको ही महापतिव्रता व कवयित्री होती. हिला कृष्णाची मोठी भक्ति होती; दुष्ट लोकांनीं हिचा छळहि पुष्कळ केला, पण अंगच्या पुण्याईमुळें त्याच्या छळापासून हिला कांहीं त्रास झाला नाहीं. प्रपंच अथवा संसारिक सुखापेक्षां ईश्वरभक्तींतच हिजला अधिक सुख वाटे. हिचीं ईश्वरभक्तीपर अनेक पद्यें अद्यापि लोकांच्या तोंडीं आहेत. हिनेंहि 'मीरामल्लार' नांवाचा एक मल्लार प्रकार काढिला; परतु तो सर्वच गवयास येत नाहीं. हिचा आवाज मधुर होता; हिची म्हणण्याची ढबहि चांगली होती. भक्तिरस पद्यें ही फार उत्तम म्हणे, असा हिचा लौकीक आहे. गायनविद्येच्या नैपुण्यापेक्षां भगवंताची भक्ति करण्याबद्दल हिचा लौकिक फार आहे; दिल्लीपति अकबर बादशहा हिचें गाणें ऐकून फार खुष झाला, असें इतिहासकार लिहितात. त्याच-प्रमाणें पातिव्रत्याबद्दल व पवित्र आचरणाबद्दल लोक हिला फार मानीत होते, व अद्यापि मानितात. ही इ. स. १६ व्या शतकाच्या शेवटीं कालवश झाली.

## सरूपी.

ही नायकीण फार मोहक, बांधेसूत व सुंदर होती; ही इ. स १७५५ सालांत पेशवाईत नोकर होती. हिचें गाणें व नाच तारिफ करण्याजोगा होता.

## अम्माक्का सावनूरकरीण.

ही श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या पदरीं होती. ही फार नामांकित गाणारीण म्हणून हिची प्रसिद्धी होती.

## मुसाहेब.

श्रीमत नानासाहेब पेशवे यांचे वेळीं ही होती ही नाचणारीण होती. हिची नाचकामात विशेष प्रसिद्धी होती हिला गाणें येत नव्हतें असें नाहीं, पण नाचकामांत ही गाण्यापेक्षां प्रेक्षकाचें मन मोहून टाकी.

## मैना.

ही सोलापूरची राहणारी. 'ही गाण्यात व नाचण्यात फार वाकबगार आहे,' असा हिचा लौकिक श्रीमंतांचे कानीं गेल्यावरून हिला श्रीमंत नानासाहेब पेशवे यानीं पुण्यास आणून आपले पदरीं ठेविलें हिला दरमहा १५० रुपये पगार होता. ही फार देखणीहि होती.

## मना.

श्रीमत नानासाहेब पेशवे यांचे पदरीं ही होती. ही गाण्यात फार तरबेज होती. परंतु नाचकामांत हिचा हातखडा नव्हता हिला दरमहा १५० रुपये पगार मिळत असे

## हेमंती.

ही फार देखणी, मोहक व बांधेसूत होती ही गायन व नर्तन ह्या कलांत प्रवीण होती हिचा आवाज मधुर असून हिची गाण्याची पद्धति वाखाणण्याजोगी होती ही श्रीमत राघोबादादा ह्यांच्या पदरीं होती हिला दरमहा सातशें रुपये पगार होता ह्यावरून तिच्या स्वरूपाची व कलेची कल्पना वाचकांस येईल.

## मोहना पालकर.

ही सुस्वरूप नायकीण इ. स १७७२ सालांत पेशवाईत नोकर होती. ही जातीनें गोवेकरीण होती. ही नाचकामांत फार वाखाणण्याजोगी होती. हिचा नाच साताराचे महाराज पुण्यास आले होते, तेव्हा पेशव्यांनीं त्यास मेजवानी दिली, त्यावेळीं करविला होता. गायन व नर्तन ह्या कलांत ही फार प्रवीण, असा त्यावेळीं हिचा लौकिक होता.

## गुलाब पुणेंकरीण.

ही नाचकीण इ. स. १७७२ सालांत पेशवाईंत नोकर होती. स्वरूप, गाणें व नाच ह्याबद्दल ही फार प्रसिद्ध होती.

## हिरा.

इ. स. १७७२ मध्यें पेशवाईंत ही नोकर होती. हिचें नाचकाम तारिफ करण्याजोगें होतें. ही ठुमरीहि फार नटवून म्हणे. ही देखणी असून फारच मोहक होती. हिचा अभिनय फार वाखाणण्याजोगा होता. ठुमरीचा आदा करीत असतां प्रेक्षकाच्या मनाची ही लटपट उडवून देत असे. ही बांधेसूत असल्यानें हिचें 'नृत्य' वाखाणण्याजोगें वठे.

## सगुणा.

श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब ह्यांच्या पदरीं ही होती. ही फार मोहक व देखणी असे. हिजला श्रीमतांनीं शुक्रवार पेठेंतील आपल्या वाड्याजवळ राहण्यास घर बांधून दिलें होतं. नाचकाम व गायन ह्यात ही तरबेज होती म्हणून श्रीमतांची हिच्यावर फार मर्जी असे. ही लावणीहि चांगली म्हणे.

## हिरा.

श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांचे पदरीं ही होती. बाजीरावसाहेबांची कलाविलासांतील गुणग्राहकता सर्वप्रसिद्ध आहे. हिरा ही अप्रतिम नाचणारी तशीच मोठी देखणी होती. एक वेळ हिच्या नाचकामावर खूष होऊन श्रीमंतानीं हिला हजार रुपये बक्षीस दिले ही गोष्ट इ. स. १८०७ चे सुमारास घडली.

## चंद्रा.

ही नायकीण श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पदरीं होती. स्वरूपांत ही वाखणण्याजोगी असून गायन व नर्तन ह्यामध्येंहि तरबेज होती. लावण्या म्हणून त्यांचा भाव ही विलक्षण मोहक प्रकारें करी, अशी हिची प्रसिद्धी होती.

## व्यंकटनरसी.

श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांच्या दरबारीं ही कलावंतीण होती दक्षिणेच्या सौंदर्याचा मासला म्हणून श्रीमंतांनीं हिला पुण्याला आणविली होती ही फार देखणी व नाजूक होती. विडा खातांना हिच्या गळ्यांत पीक दिसत असे, असें हिच्या नाजूकपणाचें वर्णन करतात शारीरशास्त्रदृष्ट्या ही गोष्ट असंभवनीय आहे हें जरी खरें आहे, तरी तीवरून ही फार नाजूक होती येवढें समजावयाचें. ही नृत्य व गायन या कलांत फार प्रवीण होती हिचें खरें नांव 'नरसी' असें होतें. हिच्या गुरूनें हिला ह्या दोन कलांत परिपूर्ण ज्ञान दिल्यानें त्याबद्दल उतराई होण्यासाठीं हिनें आपल्या नांवाआधीं आपल्या गुरूचें 'व्यंकट' हें नाव धारण केलें होतें पण हिचे गुरु म्हणजे विश्वगुणादर्शचंपूकार 'व्यंकटाध्वरी' मात्र नव्हत, हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें; कारण ते संस्कृत कवि इ स १७१० च्या सुमारास झाले श्रीमंतांस गायन व नर्तनाची विशेष गोडी असल्यानें हिचें नाचगाणें दरबारात नेहमीं होत असे. हिला बाहेर जाण्याची बंदी असे, परंतु चिंचवडचे मोरया गोसावी यांस हिनें गुरुस्थानी मानिलें असल्यामुळें तिकडे जाण्यास व त्यांस भेटण्यास हिला परवानगी असे हिच्या नाचाच्या वेळीं आपण ह्या कलेचे तज्ज्ञ आहोंत हें दर्शविण्यासाठींच नाच पाहण्यास हजर असलेल्या लोकांत हिला 'वाहवा' देण्यांत चढाओढच लागून राही; व दर वेळेस सलाम करण्याचा सांप्रदाय असल्यामुळें ही कंटाळून जाई तेव्हां एकदा हिनें श्रीमंतास नम्रपणें अशी विनंति केली, 'आपणावांचून मला कोणी वाहवा देऊं नये' श्रीमंतांनीं हंसून ती विनंति मान्य केली व सर्वांस तसें फर्माविलें; त्यामुळें 'वाहवा'च्या वर्षावाचा दुष्काळ पडला। पण थोड्याच वेळांत असें झालें कीं, तेथें एका बाजूस उभा असलेला जनोबा पाटणकर नांवाच्या कोठींतील एका कारकुनानें 'वाहवा' दिली! त्याबरोबर त्यास तेथून बाहेर घालवून देण्यांत आलें, व आज्ञा मोडिली म्हणून पाहऱ्यांत बसविलें नाच व गाणें बहारीचें झालें. श्रीमंत खुष होऊन हिला म्हणाले, "तुला काय पाहिजे तें माग" तेव्हां हात जोडून हिनें विनंति केली कीं, "महाराज, जनोबास माझ्या तैनातीस द्यावें" श्रीमंत म्हणाले, "हें काय मागतेस? कांहीं मोठें मागणें माग" त्यावर ही नम्रपणें म्हणाली, "महाराज, आपण मला काय कमी दिलें आहे? पण इतक्या मंडळींत शिक्षेची पर्वा न करता ज्यानें मला योग्य जागीं वाहवा दिली त्याच्या मार्मिकपणाची तारीफ करावी तेवढी थोडी आहे, तेव्हां माझी हीच विनंति मान्य व्हावी."

श्रीमंतांनीं हसून हिची विनति मान्य केली; व गरीब बिचारा जनोबा पाटणकर तेव्हांपासून नरसीच्या परिवारांत सामील झाला. मार्मिकपणाच मोल केवढें आहे पहा एका गरीब बिचाऱ्या क्षुद्र कारकुनाचें नांव आपल्या स्मरणांत राहिलें आहे पण त्या वेळच्या मोठ्या सरदारांचीं नावें स्मरणांतून नाहींशीं झालीं आहेत. हें केवळ त्या बिचाऱ्याच्या चांगल्या परिपूर्ण मार्मिकपणाचें फळ होय. कोणतीहि विद्या-मग ती कितीहि हलक्या दर्जाची असो-तिच्यांत परिपूर्ण असणें हा गुणच होय.

## गोखीबाई.

सवाई रामसिंग राजाच्या पदरीं जयपुरास ही होती. ही गायनांत फार प्रवीण होती नर्तनहि हिला येत होतें. ठुमरी नटवून म्हणण्यांत हिचा हातखंडा होता ही फार देखणी असे ही स्वभावानें सरळ व मनमिळाऊ होती. हिच्या जवळचा काळु नावाचा सारंगीवाला हिचा साजिंदा होता त्याच्या दोन मुलांस हिनें गायनांत अप्रतिम तयार केलें म्हणून महाराजांनीं हिला 'बाई' हा बहुमानाचा किताब दिला ही रामसिंग राजाच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं कालवश झाली.

## रहिमानबाई.

ही चरखारीची राहणारी ही गाणें गात असे ही ख्याल व होरी इतक्या उत्तम तऱ्हेनें गात असे कीं, त्या वेळचे नामांकित गवई देखील हिची फार तारीफ करीत असत. 'कोणाहि गवयापेक्षां ही चांगली गाते,' असें हद्दूखां हिच्याबद्दल म्हणत होते वयाला पन्नास वर्षे झालीं तरी देखील ही बाबुराम साईजवळ शिकत होती, इतकी हिला विद्येची गोडी असे. ही सुमारें पाऊणशें वर्षांची होऊन इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाली.

## सुंदराबाई.

ही रहिमान बाईची बहीण. ही आपल्या बहिणीजवळ चरखारीलाच रहात असे. ख्याल गाण्याबद्दल हिची फार तारीफ होती रागाची शुद्धता व शास्त्रीयता पहावी तर हिच्याच गाण्यांत असा हिच्या गाण्याचा विशेष होता, असें त्या वेळचे लोक म्हणत.

## लतफन.

सुप्रसिद्ध रहिमानची ही सर्वांत धाकटी बहीण. ही चांगल्यापैकीं गाणारी व नाचणारी होती.

## पीरबाई.

ही लखनऊची रहाणारी. ही ख्याल व ठुमरी गात असे. ठुमरी हें नायकांचें गाणें त्यात ही अशा प्रकारें आदा करून ठुमरीचा अर्थ व्यक्त करी कीं, पुरुषगायकांस तो साधणें शक्य नव्हतें. पण पुरुषाचें गाणें जें ख्याल त्यांतहि ही पुरुषांवर ताण करी, अशारीतीनें ही गाण्यांत वरचढ होती. ही स्वभावानें नम्र असे; ही चांगली देखणी होती. हिला एक मुलगी होती. ही इ. स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाली

## सरफूबाई.

ही पीरबाईची मुलगी पीरबाई व ही अशा दोघीजणीहि ख्याल फार चांगल्या प्रकारें म्हणत असत. ह्यांची गाण्याची तऱ्हा महमदखां सारखी होती ख्याल-गायनांत ह्यांची बरोबरी करणें झाल्यास गवयानें फार परिश्रम केले पाहिजेत असें त्या वेळचे तज्ज्ञ म्हणत. ही इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाली.

## बया.

ही रूपानें फार सुंदर असून गायनकलेंत फार पटाईत होती. रामजोशी ह्या प्रसिद्ध महाराष्ट्र शाहीराची ही मैत्रीण होती लावण्या म्हणण्यांत हिचा हातखंडा होता. रामजोशाच्या नव्या नव्या लावण्यास चटकदार चाली हिनेंच लाविल्या आहेत. ही सुमारें इ. स. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेली.

## चंद्रभागा.

श्रीमंत जयाजीराव महाराज याचे वेळीं ग्वालेर दरबारची ही नोकर होती. ही फार देखणी होती हिचें गाणें बऱ्याच श्रेष्ठ दर्ज्याचें होतें महाराजानीं हिला गाणें शिकविण्याकरितां नामांकित गवई ठेवले होते व त्या कामीं बराच पैसा

खर्च केला होता हिचा आवाज मधुर असून चांगला सुरेल होता. शेवटीं शेवटीं ही ग्वालेर दरबार सोडून गेली. हिला दोन मुलगे होते थोरला मुलगा बळवंतराव भैय्या व अप्रतिम हार्मोनियम वादक गणपतराव भैय्या हा धाकटा. ही जातीनें मुसलमान होती, पण हिनें नांव मात्र हिंदु सारखें घेतलें होतें. ही इ. स. १९ शतकाच्या अखेर कालवश झाली.

## मिश्रा.

जैनुल अबदुलखा ह्याजपाशीं ही गाणें शिकली. ही पुण्यांतील मागल्या पिढींतील नामांकित नायकिणींपैकीं एक होती. ही नाचतहि असे. हिनें आपलें गाणें शुद्ध ठेविलें होतें, म्हणून सशय उत्पन्न झाल्यास हिचे गुरुबंधु महादेवबुवा गोखले व अंतूबुवा आपटे हिच्याकडे पुण्यास येत. ही घरंदाज नायकीण होती असें जुने लोक सांगत. जैनुल अबदुलखां हिचे गुरुजी पुण्यास हिच्या घरीं नेहमीं राहण्यास येत, व तीहि गुरूची तबेत चांगली सभाळीत असे ही सुमारें १८९० च्या सुमारास पुण्यांतच कालवश झाली.

## छटाकी.

हिचें खरें नांव प्रस्तुत लेखकांस निश्चितपणें माहीत नाहीं. ही फार देखणी व [illegible] होती हिचा आवाज फार मधुर होता. ठुंबरीगायनाची हिची [illegible] विलक्षण मोहक असे. आग्र्याचे प्रसिद्ध ध्रुवपदिये वजीरखां यांच्या गायनकलेवर व स्वरूपावर फिदा होऊन ही त्यांचेजवळ राहिली होती. वजीरखांबरोबर बडोद्याहून ही मुंबईस गेली एक वेळ वजीरखांचें गायन गुजराथ्यांचे गुरु व गायनकलेचे मर्मज्ञ जीवनजी महाराज यांच्याकडे झाल्यावर हिनें उठून हात जोडून नम्रपणें जीवनजी महाराजांस विनंति केली कीं, 'मी वजीरखांची दासी आहे. आपण यांचें अप्रतिम गाणें तर ऐकिलेंच पण माझें म्हणजे यांच्या दासीचें गाणें दहा मिनिटें ऐकण्याची मेहेरबानी करावी ' तेव्हां मडळींच्या आग्रहावरून महाराजांनीं हिच्या बोलण्यास रुकार दिला. हिनें ठुंबरी गायनास सुरवात केली व जमलेल्या मंडळींवर अशी छाप पाडिली कीं, वेळ किती झाला याचें कोणास भान राहिलें नाहीं। ठुंबरी हिनें अशी नटवून म्हटली कीं पूर्वींचा रंग सर्व नाहींसा करून टाकिला ! सर्वजण हिची वाहवा करूं लागले. हिची ठुंबरी

गायनाची कला कशी होती हें दिसून येतें. हिचा मुक्काम मुंबईस असतां पुण्याचे एक संगीत शास्त्रज्ञ हिच्या तेथें भेटीस गेले गाण्याच्या गोष्टी चालल्या असतां हिनें त्या शास्त्रज्ञास स्पष्ट सांगितलें कीं, 'केवळ गोष्टी बोलून कला येत नसते; तसें असतें तर उस्ताद व श्रम, यांची काय जरूर होती ' तेव्हा ते गप्प बसले व हिरमुसलें तोंड करून पुण्यास परत आले ! हिचें वागणें अव्यवस्थित असे त्यामुळें हिचा अंतहि वाईट प्रकारें झाला. ही इ स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बडोद्यामध्यें मारली गेली

# चुन्ना.

प्रसिद्ध बीनकार बंदेअलीखां यांच्याजवळ ही असे त्यापूर्वी ही कोणाजवळ होती याची माहिती बरोबर लागत नाहीं. ही सामान्य देखणी होती. हिला बंदेअलीखांनीं गायनांत उत्तम प्रकारें तयार केली होती. ही ख्याल उत्तम म्हणे व ठुंबरीहि चांगली नटवून गात असे. ही कधीं नाचत नसे. पुण्यास हिचीं अनेक गाणीं झाल्यानें व हिचा मुक्काम येथें अनेक वर्षें असल्यानें हिची गायनांत कशा प्रकारची योग्यता होती हें मागल्या पिढींतील लोकांस ठाऊक आहेच हिचा आवाज मजूळ व गोड होता. हिचें वागणें नम्र व सभ्यपणाचें असे बंदेअलीखां पुण्यास वारल्यावर नव्या पुलाजवळच्या दर्ग्यांत त्याची कबर आहे. त्यावर दर गुरुवारीं फुलें घालावीत व तेथें थोडा वेळ गावें, असा हिचा क्रम असे हिनें पुढें हा गायकीचा पेशा सोडून दिला व एका मुसलमानाशीं निक्का लाविला. बंदेअलीखांजवळ असतांना पुण्यांत इसबजान नांवाची एक तयार नायकीण आली तेव्हां पुण्यातील शौकीन लोकांनीं एक जलसा ठरविला व गाण्यांत जिची सरशी होईल तिला शंभर रुपये बक्षीस द्यावयाचें म्हणून ठरविलें. दोघींना ही गोष्ट मानवली. जलशास मार्मिक लोकांसच पाचारण होतें. जलशास रात्रीं दहा वाजतां सुरुवात झाली. दीड तास प्रत्येकीनें गावें असें ठरलें होतें. दोघींचें गाणें झाल्यावर परीक्षकांनीं चुन्नानें पैज जिंकली असा आपला अभिप्राय दिला. त्यावरून हिचें गायनपटुत्व प्रतीत झालें त्या जलशाच्या वेळीं प्रस्तुत लेखकाचे वडिल हजर होते.

## इसब जान.

ही हिंदुस्थानांतील प्रसिद्ध नायकीण होती. गायनकलेंत ही तयार होती. ही दिसण्यात कुरूप होती. हिचें विशेष कसब म्हणजे आदा करणें हें होय. विष्णुपंत छत्रे यांनीं हिला महाराष्ट्रांत आणून हिच्या अंगचा गुण लोकास दाखविला पुण्यास हिचा मुक्काम असतांना चुन्नाचा व हिचा गायनाचा सामना झाला त्यांत गायनांत चुन्ना उत्तम ठरली व आदा करण्यामध्यें हिचा नंबर वर लागला. ही वागण्यांत फार सभ्य व मनमिळाऊ असे ही विसाव्या शतकाच्या प्रथम पादांत कालवश झाली

## झोराबाई.

ही आग्र्याची रहाणारी. ही फार देखणी होती. विशेषंकरून हिचे डोळे विलक्षण पाणीदार व मोठे होते हिच्या सौंदर्याचा तो एक विलक्षण गुण समजला जात असे ही गाण्यांत साधारणपणें बरी असे नाचणें हा गुण हिच्यात साधारणच होता एकदा उत्तरेकडील एका मोठ्या राजाच्या लग्नसमारंभांत हिला व कलकत्त्याची प्रसिद्ध गोव्हरजान हिला बोलाविलें होतें भरमंडपामध्यें गाण्यावरून या दोघींची बरीच बाचाबाच झाली। ही गोष्ट झोराबाईस फार लागली। एक नामांकित गवई हिनें गाणें शिकविण्याकरितां ठेवला व गायनाच्या अभ्यासासाठीं सहा वर्षें एका खेडेगांवांत जावून ही राहिली गायनाचा अभ्यास परिपूर्ण केल्यावर आपण गोव्हरजानची बरोबरी करूं व वेळेस तिला हटवू अशी हिच्या मनाची खात्री झाल्यावर एका राजाच्या महोत्सवप्रसंगीं हिनें गाण्याचें आमन्त्रण पत्करिलें. कर्मधर्मसंयोगानें तेथें गोव्हरजानहि गेली होती. त्या ठिकाणीं या दोघींचीं गाणीं लागोपाठ झालीं. हिचें गाणें ऐकिल्यावर गोव्हरजाननें मोकळ्या मनानें भर मंडपांत झोराबाईजवळ उद्गार काढिले कीं, "बहिणी, तूं खरोखर धन्य आहेस ! माझ्या बोलण्यावरून तूं जी ही गायनांत तयारी केली आहेस ती ऐकून मला तुझें कौतुक केल्यावांचून राहवत नाहीं।" व सर्व लोकांदेखत या दोघींजणी एकमेकांस तेथें प्रेमानें भेटल्या लोकांस ह्या गोष्टीमुळें मोठें कौतुक वाटलें राजेसाहेबांच्या कानांवर ही गोष्ट गेल्यावर त्यांनीं दोघींचीं स्वतन्त्र गाणीं करवून दोघींनाहि मोठी बिदागी दिली, व झोराबाईच्या करारीपणाची तारीफ करून त्याबद्दल हिला निराळें बक्षीस दिलें हिचा आवाज फार

चांगला होता व म्हणण्याची ढब गवयाप्रमाणें असे. ठुमरीहि ही फार नटवून गाई; हिचा आदा प्रसशनीय असे हिची वागणूक साधी असे. ही २० व्या शतकाच्या प्रारंभीं मृत्यु पावली.

## बुद्धासानी.

ही फारशी देखणी नव्हती, परंतु आगच्या गुणामुळें ही फार लोकप्रिय झाली होती. हिचा गायनाचा अभ्यास बळवंतराव वैद्यापाशीं झाला होता. तालामध्यें ही पक्की होती. कंठ मधुर असल्यानें हिचें गाणें मनोरंजक होई; नर्तन कला हिला चांगली अवगत होती नर्तनाचा अभ्यास हिनें वैद्यांच्या जवळच केला होता वैद्यास ही कला चांगली अवगत होती. ह्या कलेचा अभ्यास त्यांनीं आवळे पखवाजवादन गुरु नाना पानसे याजपाशीं केला होता ही इ स. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत मयत झाली.

## जन्नासानी.

ही जमखंडीची राहाणारी ही चांगली देखणी होती हिच्या आईनं गाण्यांत व नाचण्यांत हिला चांगली प्रवीण केली होती ही जमखंडींतील घरंदाज नायकिणीपैकीं एक होती. हिला राजाश्रय नव्हता. ही स्वभावानें नम्र व सरळ असे. ही इ. स १९ व्या शतकाच्या अखेरीस मृत्यु पावली.

## मन्नासानी.

ही जमखंडीची रहाणारी ही स्वरूपानें चांगली देखणी होती. ही जन्नासानीची बहीण बहिणीप्रमाणें गाण्यांत व नाचण्यांत हिला चांगलें शिक्षण मिळालें होतें. या घरंदाज नायकिणींपैकीं होत्या. हिला कांहीं उत्पन्नहि आहे. ही स्वभावानें सरळ होती नाचकाम बऱ्यांपैकीं करी. ही इ स १९ व्या शतकाच्या अखेरीस मृत्यु पावली.

## अंबू बडोदेकरीण.

पुण्यांतील मागील पिढींत ही एक नामांकित नायकीण होती. ही फार देखणी व सभ्य होती पुण्यांत 'फक्कड' म्हणून नांवाजलेले गृहस्थ असत ते दिवसा

तून एकदां तरी हिच्या घरीं गेले नाहींत असें व्हावयाचें नाहीं. हिची राहणी फार सभ्यपणाची असे. हिचा आवाज फार मधुर असून गाणेंहि चांगलें होतें. ही लावणी चांगली म्हणे. ही इ. स १८९० चे सुमारास वारली

## विठा डाळवाली.

ही पुण्याची रहिवासी होती ही साधारण देखणी होती. हिचें गाणें बेताचेंच होतें, परंतु लावणी म्हणण्यांत ही फार तरबेज होती. मागल्या पिढींत हिचा लावणी म्हणण्याचा फार लौकिक होता व लोक त्या ऐकण्याबद्दल उत्सुक असत. ही इ. स. १९०६ चे सुमारास वारली.

## कृष्णा पनवेलकरीण.

ही कोंकणची रहाणारी. ही आपल्या आईबरोबर पुण्यास आली. पुण्यास आल्यावर ही गावयास शिकली. ही चांगली देखणी होती हिचा कंठ फार मधुर होता हिची लावण्या म्हणण्याबद्दल फार प्रसिद्धी असे. लावणी म्हणून त्या कवनाचा अर्थवाचक भाव ही चांगली करी हिचें गाणें ह्यामुळें लोकांस फार पसंत पडे. ही इ. स. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात पुण्यास कालवश झाली

## कृष्णा झुलपी.

ही मुंबईस रहात असे. ही जातीनें गोवेकरीण होती. हिला गायन शिकवि-ण्याकरितां महाराष्ट्रांतील प्रसिद्ध ख्यालिये बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ठेविले होते. त्यांनीं हिला गायनांत चांगली तयार केली होती. बैठकीचें गाणेंहि चांगलें गात असे. ही ठुबरी फार नटवून म्हणे. हिचा आदाहि चांगला असे व ही लाव-णीहि चांगली म्हणे हिचें नाचकाम फारसें वाखाणण्याजोगें नव्हतें. लग्नाकार्यांत ही पिसवाज घालून नाचास उभी राही, पण नाचापेक्षां हिच्या गाण्याचीच तारीफ विशेष असे. हिचा आवाज जोरकस व गोड होता. ही विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाली.

## आवडा.

ही महाराष्ट्रांतील रहाणारी ही साधारण देखणी होती विष्णुपंत छत्रे यानीं हिला गायन शिकवून उत्तम तयार केली होती. हिचा विशेष असा होता कीं, ही

नालामध्यें फार पक्की होती. गायनावर चांगली संपत्ति मिळऊन हिचा हिनें कांहीं दिवस चांगला उपभोग घेतला. पुढें कांहीं कारणानें हिला उपरती झाली व तिची अशी विलक्षण छाप हिच्या मनावर पडली कीं, चांगला दिवस पाहून एका सत्पात्र ब्राह्मणास हिनें आपली सर्व इस्टेट दान केली' एका पांढऱ्या पातळानिशीं ही घरातून बाहेर पडली व नरसोबाचे वाडीस जाऊन तेथें दत्ताची सेवा करून राहिली अशा प्रकारें दत्ताच्या सेवेंत राहिलेलें आपलें आयुष्य घालवून इहलोकची यात्रा हिनें संपविली. ही इ स. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत कालवश झाली.

## बया गणेशवाडीकरीण.

गणेवाडीतील श्रीमान, सभ्य व संगीतज्ञ गृहस्थ बाळुकाका कानिटकर यांजपाशीं ही गाणें शिकली ही सुस्वरूप असून हिचा आवाज मधुर होता ही सुस्वभाव होती. हिच्या गाण्यांत ढंगदारपणा व रंगत चांगली असे. ही घराणेदार चीजा फार नटवून म्हणे म्हणून हिचें गाणें सर्वत्रास पसंत पडे. ही इ. स १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कालवश झाली.

## बनु कोल्हापुरकरीण.

ही कोल्हापूरची राहाणारी होती. ही फार देखणी नव्हती, काळीसावळीच पण बांधेसूद होती हिला नौचकाम येत नव्हतें. ही बरी गात असे. ठुंबऱ्या वगैरे चांगल्या म्हणे. विशेषेंकरून ही लावण्या म्हणण्यांत चांगली तरबेज होती. हिला एक धाकटी बहीण होती पण ती हिच्याइतकी गाण्यांत तयार नव्हती. ही इ. स. १९ व्या शतकाच्या शेवटीं कालवश झाली.

## गुलाब.

ही हिंदु नायकीण जयपुराकडील होती प्रसिद्ध हैदरखां सारंगिया यानें हिला गायनांत उत्तम तयार केली होती. ही कांहीं दिवस मद्रासकडे गायनाच्या हेतूनें गेली होती तेथें हिची गायनाबद्दल चांगली वाहवा होऊन राजाश्रयहि मिळाला होता. नंतर ही इकडे येऊन अहमदनगर येथें कायमची राहिली होती. हिचें गाणें एकाद्या गवयासारखें असे. आवाज गोड व म्हणण्याची ढब चांगली असे. हैद-

रखा हिच्या गायनाच्या वेळी सारंगीनें साथ करी तेव्हां हिच्या गाण्याचा विलक्षण परिणाम होई. नाचकाम हिला बिलकुल येत नसे, त्याचप्रमाणें ठुंबरी गावून अदा करणें हेंहि हिच्या गाण्यांत दृष्टी पडत नसे. 'कृष्ण मुरारी' ही हिची आवडती ठुंबरी मागल्या पिढींतील लोकांच्या अद्याप स्मरणांतून गेली नसेल हैदरखां वारल्यानंतर हिच्या गाण्यात थोडें वैगुण्य आलें असें मार्मिकांना वाटू लागलें. म्हैसुरास हिला नवरात्राच्या उत्सवाचें वर्षासन होतें हिचें वर्तन फार साधें, सभ्य असे; कोणी समजदार हिच्या घरीं गेल्यास त्याला ही आपलें गाणें ऐकवीत असे. ही इ स १९१० चे सुमारास म्हैसुरांत वारली.

## नर्मदा.

ही नेहमीं नाशिक येथें रहात असे. ही चांगल्यापैकीं गाणारीण होती कांहीं दिवस ही विष्णुपंत छत्रे यांचेपाशीं गाणें शिकत असे. ठुंबरी गायनात व अदा करण्यांत हिचा हातखंडा असे. विष्णुपंत छत्रे जेव्हां रहिमतखांला बरोबर घेऊन नेपाळांत गेले होते त्यावेळीं ही त्यांजबरोबर नेपाळांत गेली होती. हिचा स्वभाव एककल्ली होता ही नाचकामांत चांगली प्रवीण होती पण हिचें नर्तन सर्वत्रांस पाहण्यास सांपडत नसे. ही इ. स. १९१५ चे सुमारास मरण पावली

## कृष्णा कोल्हापुरकरीण.

ही कोल्हापुरची राहणारी हिला गाणें शिकविण्याकरितां नामांकित गवई ठेविले होते. हिचे गाणें बऱ्याच उच्च दर्ज्याचें असे. ही लावणीहि चांगली नटवून म्हणे. ही विशेष देखणी नव्हती ही पुण्याची रहिवाशी झाली होती ही सुमारें इ. स. १९१५ चे सुमारास वारली.

## बावली.

ही गोवेकरीण असून मुंबईची रहाणारी होती. हिला गायन शिकविण्यासाठीं चागले चांगले गवई ठेविण्यात आले होते. प्रसिद्ध ख्यालिया नथ्थनखां याची ही शिष्यीण होती असे म्हणतात तयार झाल्यावर राजपुतान्यांतील एका राजाच्या पदरीं ही होती. एखाद्या पुरुषगवयासारखे गावून ही मैफल रंगवी अशी हिची ख्याति होती. ही ठुबरीहि चांगली म्हणत असे. ही इ. स. १९२५ चे सुमारास मुंबईस मृत्यु पावली.

## ततैया.

ही ग्वालेरची रहिवासी. हिचा आवाज फार गोड होता. ही गाण्यांतहि फार तरबेज होती. ठुंबरी हा तिचा विशेष होता ही १९१२ च्या सुमारास वारली.

## चंद्रावती.

ही बनारसची रहाणारी. ही ख्याल उत्तम गाई. बनारस शहर हें ठुंबरीकरितां प्रसिद्ध आहे, हें गायनप्रेमी लोकांत मशहूर आहे. ही ठुमरी उत्तम गाई व आदाहि उत्तम करी ही स्वभावानें फार नम्र व सरळ होती. हिचा आवाज मधुर होता ही इ स १९२० चे सुमारास बनारस येथें कालवश झाली.

## गोव्हरजान.

ही गायिका इ स. १८७० च्या सुमारास जन्मली. हिच्या आईबापांचें प्रथम एकमेकांवर फार प्रेम होतें, परंतु पुढें काय कारणें झालीं देवास ठाऊक, त्यांच्या-मध्यें प्रेमाच्या जागीं द्वेषभावना प्रगट झाली; त्याचा परिणाम असा झाला कीं, त्याचें प्रायश्चित ह्या मुलीस भोगण्याची पाळी आली ! हिला आपल्या बाळपणांतच हें जग सोडून जाण्यासारखें संकट प्राप्त झालें होतें, परंतु ईश्वरानें त्यांतून हिला बचावलें. कारण आपणा सर्वांत हिचें तें मोहक गायन ऐकाव-याचा योग होता। ही फार देखणी, गोंडस व बांधेसूत असे वयांत आल्यावर ही गायनकला उत्तम शिकली; रामपूरचा नजीरखां, व प्रसिद्ध प्यारासाहेब ह्या सारखे उत्तम गवई हिला ही कला शिकण्यास उस्ताद मिळाले. ख्याल, होरी वगैरे उच्च दर्जाचे गाण्याचा हिनें उत्तम अभ्यास व कसरत केली; पुढें ही ठुमरी गायन इतकं उत्तम शिकली कीं, त्या विद्येंत हिचा पाडाव करणाऱ्या गायिका क्वचि-तच निपजल्या हिचा आवाज गोड, गोल, सुरेल असून भरदार होता. अभिनय या कलेंत हिनें चांगलें प्रावीण्य संपादिलें. विद्या शिकणें झाल्यावर, ऐन तारु-ण्यामध्यें कांहीं वर्षें दरभंगा दरबारची गायिका म्हणून तेथें ही राहिली होती. पुढें ही प्रायः कलकत्त्यासच राहत असे. मुंबई, पुणें, मद्रास वगैरे शहरांत हिचीं खासगी गाणीं व अनेक प्रसिद्ध जलसे झाले, तेव्हां हिच्या गायकीची व त्या कलेंतील हिच्या प्राविण्याची लोकांस खात्री पटली. हिचीं ग्रामोफोन रेकर्ड्स ऐकून लोक मोहून गेले. पुरुषी गाणें म्हणजे ख्याल, होरी वगैरेंत ही तयार

असेच; पण हिचें खास गाणें म्हणजे ठुमरी हें होय; तें ही गाऊं लागली व योग्य अभिनय करूं लागली म्हणजे श्रोते चित्रासारखे तटस्थ होत हिचा आवाज मोठा असून फार गोड व मोहक असे, त्यामुळें ऐकू येत नाहीं व आलें, नाहीं ही तक्रार हिच्या गाण्याच्या वेळीं रहात नसेच. शिवाय नाटकगृहासारख्या मोठ्या जागेंत जरी हिचे जलसे झाले तरी लोक राजीच होत प्रस्तुत लेखकास हिच्यापासून दोन हात अंतरावर बसून हिचें खासगी गायन ऐकण्याचा व हिचा अभिनय पाहण्याचा सुयोग लखनौ शहरीं दोन वेळां लाभला आहे; त्यावेळीं हिच्यासमोर गायनांतील पंडित व शास्त्रकार बसले असल्यामुळें हिनें आपल्या कलेचें प्रदर्शन शक्य तितक्या कसोशीनें केलें. ही स्वभावानें सरळ व विनयशील असे. ह्या कलेवर हिच्याइतकी संपत्ति आजवर कोणीं मिळविली नाहीं. उतार वयांत हिनें म्हैसूर दरबारची नोकरी पत्करिली व तेथेंच इ. स १९३० च्या सुमारास हिचें देहावसान झालें.

## मंगु.

ही ग्वालेरची राहणारी असून एखाद्या गवयासारखी गाते. हिच्या गाण्यांत एक प्रकारची मोहनी आहे. ही ठुमरी नटवून म्हणते. ही प्रसिद्ध मेंदी हुसेन यांची शिष्यीण आहे.

## विद्याधरी.

ही बनारसची राहणारी ही दिसण्यांत चांगलीच आहे. ख्याल ही चांगला म्हणते ठुमरी हिच्या तोंडून ऐकिली म्हणजे बनारसची ठुमरी ही काय चीज आहे हें श्रोत्यांच्या ध्यानीं येतें. हल्ली गायनकलेंत प्रवीण म्हणून ज्या स्त्रिया गणल्या आहेत त्यात हिचा नंबर फार वर आहे. ही स्वभावानें नम्र असून हिची वागणूक सरळ व साधी आहे.

## सिद्धेश्वरी.

ही बनारसची राहणारी. ही फार देखणी व मोहक आहे. गायनकला ही चांगली जाणते गायनांतील ठुमरीचे गाण्यांत हिचा हातखंडा आहे. हिची ठुमरी ऐकून हिच्यावर फिदा झाला नाहीं असा कोणीं नाहीं. ही स्वभावानें नम्र आहे.

बोलण्यांत मिठास आहे, पण मतलबास जागृत आहे. हिची सांपत्तिक स्थिति चांगली आहे. कंठ मधुर व म्हणण्याची शैली गोड, ह्यामुळें बनारसमध्यें गेल्यावर हिचें गाणें ऐकण्याचा मोह सर्वांस पडतोच हिच्या गुणांमुळें व रूपामुळें सहजीं हिला श्रीमंतांचा आश्रय लाभला आहे.

## इंदिरा.

ग्वाल्हेरचे श्री. माधवराव शिंदे यांचे वेळेपासून ही दरबारची नोकर आहे. ही उत्तम देखणी असून हिचें गाणेंहि फार मोहक आहे. हिच्या गाण्याचा विशेष म्हणजे ही ठुमरी चांगली म्हणते व त्याबरोबर हिचा 'भाव' हि पहाण्यासारखा असतो.

## बिचवा.

ही लखनौची राहणारी. ही तेथील घरंदाज असून हिला तेथें चांगला मान आहे. बिंदादीन म्हणून लखनौस जे नामांकित नर्तक होते त्यांची ही शिष्यीण आहे. त्यांच्याजवळ नर्तनांतील जे दोन भेद 'नृत्य' आणि 'नृत्त' ते ही उत्तम प्रकारें शिकून, त्यांत प्रवीण झाली आहे. आज 'नृत्त'मध्यें हिच्यासारखी प्रवीण उत्तर हिंदुस्थानांत दुसरी कोणी नाहीं अशी समजूत आहे. प्रस्तुत लेखकास तिचें 'नृत्त' दोन वेळां पाहण्याचा योग लखनौमध्यें आला आहे. नृत्यांतहि ही चांगली प्रवीण आहे. ही स्वभावानें फार सरळ व सभ्य आहे हिची वडील बहीणहि या कलेमध्यें अशीच प्रवीण आहे, पण ती आतां फार वृद्ध झाल्यानें तिनें तो व्यवसाय अजिबात सोडला आहे. अलिकडे या दोघी बहिणी आनंदानें घरा स्वस्थ राहत आहेत ह्यांची सांपत्तिक स्थिति चांगली आहे त्यांचे स्वतःचें उत्तम घर आहे; प्रतिष्ठित लोक नेहमीं ह्यांच्या घरीं जातात

## नूरजहान.

ही कलकत्त्याची राहणारी ही गवयाप्रमाणें जोरकस व ढंगदार गाणें व ठुमरीहि चांगली नटवून म्हणते. हिचा आवाज गोड आहे. दिसण्यांतहि ही बरी आहे. प्रस्तुत लेखकानें हिचे गाणें प्रत्यक्ष ऐकिलें आहे.

## लक्ष्मी.

ही कोल्हापुरची राहणारी असून अलादियाखाचे बंधु हैदरखा ह्यांच्याजवळ गाणें शिकली आहे. ख्यालाचें गाणें ही ऐकण्याजोगें गातें व ठुमरीहि चांगली नटवून म्हणते. बडोद्याच्या दरबारची ही नोकर आहे

## केसर.

मुंबईंत गोवेकरणींची जीं कांहीं नामांकित व श्रीमंत घराणीं आहेत त्यांतील एका घराण्यांपैकीं ही एक आहे. हिला गायनकला शिकविण्यासाठीं कोल्हापुरच्या आलादियाखांसारखे गुरु ठेवण्यांत आले होते. ही एखाद्या गवयासारखें मैफलींत बसून गाते हिच्या तानेची तयारी ऐकण्यासारखी आहे. ही ठुमरीहि नटवून व हावभावांसह उत्तम गाते आज मुंबईंत ज्या नामांकित गाणारणी आहेत त्यांत हिचा नंबर चांगलाच वर लागेल.



# सूची.


| नांव | पृ. |
|---|---|
| **अ** | |
| अख्तरपिया ... ... | १२८ |
| अघवान ... ... | १७० |
| अघोर बाबू ... ... | ४९ |
| अचपल ... ... | १२१ |
| अधारंग ... ... | १४१ |
| अनत फंदी ... ... | १३२ |
| अबीद हुसेन ... ... | १८३ |
| अब्दुल करीमखां ... | ११९ |
| अमानउल्ला ... ... | १६८ |
| अमीरखां ... | १४४, १५७, १६७ |
| अमीर खुशरू ... ... | ६ |
| अम्याका सावनुरकरीण ... | १८९ |
| अल्लादाद ... ... | १६१ |
| अल्लादियाखां ... ... | ११८ |
| अलीखां ... ... | ७९ |
| अलीदाद ... ... | ३९ |
| अलीबक्ष ... ... | १६१ |
| अलीमुल्लाखां ... ... | ४४ |
| अलीहुसेनखां ... ... | १४५ |
| अष्टीवाले ... ... | १५६ |
| अहमदखां ... ... | ५३ |
| अहोबल ... ... | १० |
| अनुबुवा आपटे ... | १११ |
| अनुबुवा जोशी... ... | १२० |
| अंबू बडोदेकरीण ... | ११८ |
| **आ** | |
| आण्णा घारपुरे... ... | १५८ |
| आप्पा तुळशी ... ... | २१ |
| आबा दीक्षित वाटवे ... | ११८ |
| आला बंदेखां ... ... | ५० |
| आवडा ... ... | १९९ |
| आषक अलीखां ... | १०८ |
| **इ** | |
| इदेसिंग ... ... | ४२ |
| इनायतखां ... | ८१, १५९ |
| इब्राहिमखां ... ... | १६० |
| इमदादखां ... ... | १५८ |
| इम्रतसेन ... ... | १५४ |
| इसबजान ... ... | १६७ |
| इंदिरा ... ... | २०४ |
| **उ** | |
| उमरावखां ... | ११८, १४४ |
| **क** | |
| कदरपिया ... ... | १२९ |
| कन्हैया ... ... | १८५ |
| करमीनखां ... ... | १४९ |
| करामतउल्लाखां ... | १६५ |
| करीमखां ... ... | ५७ |
| कर्यायी ... ... | १६८ |
| कल्लनखां ... ... | १०८ |

| नाव | पृ. |
| --- | --- |
| काझिमअलीखां .. ... | १६३ |
| कादरबक्ष ... ... | ५८ |
| कानखां ... ... | ४२ |
| कान्ताप्रसाद ... ... | १८० |
| कायमअली ... ... | १८८ |
| कालिकादीन ... ... | १८५ |
| काळू ... ... | १६१ |
| काळूराम ... ... | १८२ |
| कुतुबअली ... | ५४, १५३ |
| कुदवसिंग ... ... | १६८ |
| कृष्णधन बानर्जी ... | २० |
| कृष्णशास्त्री शुक्ल ... | ८६ |
| कृष्णा कोल्हापुरकरीण ... | २०१ |
| कृष्णा झुलपी .. ... | १९९ |
| कृष्णा पनवेलकरीण ... | १९९ |
| कृष्णा पंडित ... ... | १२१ |
| कृष्णानंद व्यास ... | १९ |
| केशवबुवा आपटे ... | ५१ |
| केशवबुवा गोगटे ... | १२७ |
| केसर ... ... | २०५ |

**ख**

| | |
| --- | --- |
| ख्वाजाबक्ष ... ... | १६० |
| खुशहालखां ... ... | ३९ |
| खुशालखान ... ... | ३८ |

**ग**

| | |
| --- | --- |
| गणपतराव भैय्या ... | १६६ |
| गणपतराव रास्ते ... | १८१ |
| गणपतिबुवा भिलवडीकर ... | ९८ |
| गणेशपंत फडके ... | ४९ |

| नांव | पृ. |
| --- | --- |
| गुणसेन ... ... | ४० |
| गुरुदेवजी पटवर्धन ... | १८१ |
| गुलबदन ... ... | १८८ |
| गुलाब ... ... | २०० |
| गुलाब पुणेकरीण ... | १९१ |
| गुलाम अब्बास ... | ११७ |
| गुलाम अली ... ... | १६४ |
| गुलाम महंमद ... ... | १५२ |
| गुलाम रझा ... ... | १५२ |
| गुलाम रसूल ... ... | ५२ |
| गुले इमामखां ... ... | ६५ |
| गोखीबाई ... ... | १९३ |
| गोपाळ ... ... | २५ |
| गोपाळ कृष्ण ... ... | १३९ |
| गोपाळलाल .. ... | ३५ |
| गोपेश बानर्जी ... | ५१ |
| गोविंदराम ... ... | १६१ |
| गोविंदराव टेंभे ... ... | १६७ |
| गोव्हरजान ... ... | २०२ |
| गुडुबुवा इंगळे .. ... | १०५ |
| ग्यानबा गुरव ... ... | १८० |

**घ**

| | |
| --- | --- |
| घसीटखां ... ... | १५३ |

**च**

| | |
| --- | --- |
| चतुर कल्लिनाथ ... | ५ |
| चरजू .. .. | २७ |
| चुन्ना ... ... | १९६ |
| चचलसेन ... ... | ३० |

| नांव | पृ. |
|---|---|
| चंद्रभागा ... ... | १९४ |
| चद्रा ... ... | १९१ |
| चंद्रावती ... ... | २०२ |
| चांदखां ... ... | ३० |
| चिंतामण मिश्र ... | ४४ |

**छ**

| | |
|---|---|
| छज्जूखां ... ... | १२४ |
| छटाकी ... ... | १९५ |
| छोटे महंमदखां . | ६७ |
| छोटे मुन्नेखां ... ... | ११७ |

**ज**

| | |
|---|---|
| जगन्नाथ ... | ४०, १८२ |
| जन्नासानी ... ... | १९८ |
| जमालउद्दिनखां .. | १४८ |
| जाकुद्दिनखां .. ... | ५० |
| जाफरखां ... ... | १६२ |
| जीवनजीमहाराज ... | १५६ |
| जैनुलअबदुलखां . . | ११० |
| जोतसिंग ... ... | १७० |
| जोरावरसिंग ... ... | १७० |

**झ**

| | |
|---|---|
| झोराबाई ... ... | १९७ |

**ड**

| | |
|---|---|
| डल्लू ... ... | २७ |

**त**

| | |
|---|---|
| ततैय्या ... ... | २०२ |
| तानतरंगखां ... ... | ३७ |
| तानसेन ... ... | ३१ |
| तान्द्रजखां ... ... | १०६ |
| ताराचंद ... ... | १२३ |
| तुळाजीराजे भोसले ... | १७ |
| त्र्यंबक आत्माराम ... | ३८ |

**थ**

| | |
|---|---|
| थोरले बाळकृष्णबुवा ... | ८२ |

**द**

| | |
|---|---|
| दत्तिल ... ... | २ |
| दत्तुबुवा जांभेकर ... | ९९ |
| दत्तोपंत जोशी ... ... | २३ |
| दत्तोपंत फडके ... ... | १४८ |
| दादा कुटे ... ... | १७९ |
| दादा खरे ... ... | १७६ |
| दामोदर ... ... | १५ |
| दामोदरपंत मालपेकर ... | १४९ |
| दावलखान ... ... | ३९ |
| दिरंगखां ... ... | ४१ |
| दिलावर अल्लीखां ... | ४३ |
| दिलावरखां ... ... | ५५ |
| दिलीपराय ... ... | १३० |
| दुर्गा ... ... | १८६ |
| दुलहनखां ... ... | १५१ |
| देवीदास ... ... | १६० |
| दौलतखां ... ... | ५१ |

**ध**

| | |
|---|---|
| धर्मा गुरव ... ... | १६७ |
| धोंडू ... ... | २७ |

| नांव | पृ. |
|---|---|
| **न** | |
| नजीरखां ... ... | १२० |
| नज्जू ... ... | १७१ |
| नथ्थनखां ... ... | १०८ |
| नथ्थन पीरबक्ष ... | ५८ |
| नहेखां ... ... | १६४ |
| नबाब कासमअलीखां ... | ४३ |
| नबाब गुलाम हुसेनखां ... | १५२ |
| नबाब सालरजंग ... | ४३ |
| नबाब सुलतानअलीखां ... | ४३ |
| नबाब हुसेनखां | ४३, १२५ |
| नबीबक्ष ... ... | १५४ |
| नर्मदा ... ... | २०१ |
| नागु गुरव ... | ३९, १६८ |
| नागेशभट काशीकर. ... | १५५ |
| नाना पानसे ... ... | १७१ |
| नारद ... | १, १२, १३ |
| नारायणबुवा फलटणकर ... | १२७ |
| नारायणशास्त्री ... ... | ४४ |
| नारो आप्पाजी भावे ... | १५२ |
| नासरखां ... ... | १७५ |
| निसार अलीखां ... | १६३ |
| निसार हुसेनखां ... | ७२ |
| नूरजहान ... ... | २०४ |
| **प** | |
| पन्नालाल गोस्वामी ... | १५७ |
| परशुराम ... ... | १३६ |
| परशुरामबुवा बर्वे ... | ११६ |
| परसादु ... ... | १२५ |
| पावा भीमराव ... ... | ३८ |
| पार्श्वदेव ... ... | ४ |
| पीरबाई ... ... | १९४ |
| पुरुषोत्तमपंत दामले ... | १८१ |
| पूजा ... ... | ४२ |
| पांडुरंगबुवा येवलेकर .. | ९७ |
| पांड्ये ... ... | २८ |
| पुंडरीक विठ्ठल ... ... | ९ |
| प्यारखां ... ... | १६२ |
| प्रकाश .. ... | १८६ |
| प्रभाकर ... ... | १३५ |
| **फ** | |
| फजल अली ... ... | ५५ |
| फत्तुखां ... ... | ७९ |
| फिदा हुसेनखां ... ... | १६५ |
| फिरोजखां ... ... | १५० |
| फिरोजखां धाडी .. | १६८ |
| फैज महंमद ... ... | १०८ |
| फैयाजखां ... ... | ११९ |
| **ब** | |
| बडे महंमदखां ... ... | ५३ |
| बडे मुन्नेखां ... ... | ५७ |
| बना ... ... | १९० |
| बना भोसेकरीण ... | ५७ |
| बनु कोल्हापुरकरीण ... | २०० |
| बन्नेखां ... ... | ६६ |
| बया ... ... | १९४ |
| बया गणेशवाडेकरीण ... | २०० |

| नांव | | | पृ. |
|---|---|---|---|
| बरकत उल्ला | ... | ... | १५९ |
| बळवतबुवा पोरे ... | | ... | ११७ |
| बळवंतबुवा बापट | | ... | ९८ |
| बळवंतराव केतकर | | ... | ११३ |
| बळवतराव पानसे | | ... | १७३ |
| बळवतराव भैय्या | | ... | १४७ |
| बळवंतराव वैद्य ... | | ... | १७७ |
| बहादुरखां | ... | ... | १५१ |
| बहादुर हुसेनखां | | ... | १६५ |
| बहिरामखां | ... | ... | १०६ |
| बहिरू | ... | ... | १३३ |
| बक्षू | ... | | २८, १७१ |
| बाजबहादूर | ... | ... | २९ |
| बांदा | ... | ... | १८७ |
| बापु जोशी | ... | .. | ९७ |
| बाबली | ... | | २०१ |
| बाबा दीक्षित ... | | ... | ८७ |
| बाबु इसरिप्रसाद | | ... | १५३ |
| बाबुराम सहाई ... | | ... | १२३ |
| बायाशिंदखां | ... | ... | १६३ |
| बाळकृष्ण रास्ते | | ... | १८१ |
| बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर | | | ९३ |
| बाळकोबा नाटेकर | | ... | ११४ |
| बाळा | ... | | १३३, १३५ |
| बाळाजीपत | .. | ... | १५२ |
| बाळासाहेब गुरुजी | | ... | ९१ |
| बाळुकाका कानिटकर | | ... | ११३ |
| बिचबा | ... | ... | २०४ |
| बिच्चूखां | ... | ... | १५५ |
| बिलासखां | ... | ... | ३६ |
| बीरुमिश्र | ... | ... | १८३ |
| बुद्धासानी | ... | ... | ११८ |
| बैजु | ... | ... | २६ |
| बैजूबावरे | ... | ... | ३५ |
| बडोपंत जोगळेकर | | ... | १७९ |
| बंदेअल्लीखां | ... | ... | १४६ |
| बिंदादीन | ... | ... | १८५ |
| बुंदुखां | ... | ... | १६२ |
| ब्रिजचन्द | ... | ... | ३० |


### भ


| नांव | | | पृ. |
|---|---|---|---|
| भगवान | ... | ... | २७ |
| भडजी बापू | ... | ... | ४९ |
| भरत | ... | ... | २ |
| भलोबा लिमये ... | | ... | ४७ |
| भाऊबुवा कागवाडकर | | ... | ११७ |
| भाऊबुवा कानिटकर | | ... | ११३ |
| भानू | ... | ... | २६ |
| भावभट्ट | ... | ... | १६ |
| भास्करबुवा बखले | | ... | १०९ |
| भिकुबुवा इंगळे ... | | ... | १०० |
| भैय्या जोशी | ... | ... | ९० |


### म


| नांव | | | पृ. |
|---|---|---|---|
| मख्खनखां | ... | ... | ५७ |
| मख्खु | ... | ... | १७१ |
| मतंग | ... | ... | ३ |
| मनरंग | ... | ... | ८७ |
| मनोहरबुवा जोशी | | ... | १०० |
| मन्नासानी | ... | ... | ११८ |

| नांव | पृ. |
|---|---|
| मन्याबा कोडितकर ... | १७ |
| मसजीदखां ... | १४९, १५० |
| महंमद अलीखां | ५०,१८७,१४४,१६० |
| महंमद बागी ... ... | ४२ |
| महंमद रझा ... .. | १८ |
| महादेवबुवा गोखले ... | १११ |
| महिपती ... ... | ३६ |
| माखन ... ... | १८३ |
| मार्तंडबुवा चौंडे... ... | १७७ |
| मार्तंडबुवा दवणे ... | १०० |
| मानसिंग ... ... | १८७ |
| मामुखां ... ... | १६१ |
| मियाजान ... ... | ११६ |
| मिरझाखान ... | १८ |
| मिरझावहीद ... ... | १८८ |
| मिराबाई ... ... | १८९ |
| मिश्रा .. ... | १९५ |
| मिश्रखांधाडी ... | ४० |
| मीयां गम्मू .. ... | १२३ |
| मीयां छज्जूखां .. ... | ४३ |
| मीयांजानि ... ... | ५६ |
| मीयां जीवनखां... ... | ४३ |
| मीया तानसेन ... ... | ३१ |
| मीयां नथ्थेखां ... ... | ६४ |
| मीयां शक्करखां .. ... | ५२ |
| मीयां शौरी ... ... | १२२ |
| मीयां हद्दुखां ... ... | ६० |
| मीयां हस्सुखां ... ... | ५८ |
| मीर अलीसाहेब ... | १२४ |

| नांव | पृ. |
|---|---|
| मीर अहंमदसाहेब ... | ४३ |
| मीर नासरअहंमद ... | १४४ |
| मुनवरखां ... ... | ५४ |
| मुबारक अलीखां ... | ५४ |
| मुम्मीखां ... ... | १२४ |
| मुराद अलीखां ... ... | ५४ |
| मुरादखां ... | ५६, १४७ |
| मुरारबा गोविकर ... | १७९ |
| मुश्रफखां ... ... | १४९ |
| मूसाहेब ... ... | १९० |
| मेंडूखां ... ... | ५५ |
| मेंदी हुसेनखां ... ... | ६५ |
| मैना ... ... | १९० |
| मोगरी रामय्या ... | १७५ |
| मोजूद्दीनखां ... ... | १३० |
| मोरया गोसावी... ... | ४५ |
| मोहना पालकर ... | १९० |
| मौजखां ... ... | ५७ |
| मौलादाद ... ... | ४० |
| मौलाबक्षखां ... .. | १४७ |
| मंगू ... .. | २०३ |
| मंगेशराव तेलंग .. | १४९ |

**र**

| नांव | पृ. |
|---|---|
| रघुनाथ भूपाल .. ... | १३ |
| रजबअली ... ... | ५५ |
| रजाअली ... ... | १५९ |
| रजाखां ... ... | १२१ |
| रमजानी ... ... | १५९ |
| रमझानी ... ... | १८७ |

| नांव | पृ. |
|---|---|
| रसबीनखां | १४१ |
| रहिमतखां | ७५ |
| रहिमानबाई | १९३ |
| रहीमसेन | १५१ |
| रागरसखां | ३७ |
| राजा ठाकुर नबाब | २४ |
| राजा शौरिन्द्र मोहन टागोर | २० |
| राजाभैय्या पूछवाले | १२० |
| राणु शिंपी | ३८ |
| राधिका गोस्वामी | ५० |
| राम जोशी | १३१ |
| राम सहायी | १८७ |
| रामकृष्ण देव | १२५ |
| रामकृष्ण वझे | ११९ |
| रामचंद्र गोवेकर | १८२ |
| रामदास | ३५ |
| रामभाऊ अलीबागकर | १०५ |
| रामभाऊ सावेरकर | ९६ |
| रामा गुरव | १८३ |
| रामा गोंधळी | १३८ |
| रामामात्य | ८ |
| रावजीबुवा गोगटे | १२६ |
| रावजीबुवा बेलबागकर | ४७ |
| **ल** | |
| लतफन | १९४ |
| लतीफखां | १४८ |
| ललनपिया | १३० |
| लक्ष्मी | २०५ |
| लालखां | ३८ |
| लालजी | ४९ |
| लाला भगवानदास | १६८ |
| लाला हरिचरण | १८२ |
| लालूजी | १८६ |
| लोचन | ७ |
| लोहग | २६ |
| **व** | |
| वजीरखां | ४२, ४८, १४५ |
| वहीदखां | १४८ |
| वाजपेई | १५३ |
| वामनबुवा कवठेकर | ४८ |
| वामनबुवा देशपांडे | ४५ |
| वामनराव चांदवडकर | १७४ |
| वारसअलीखां | ७३ |
| वासुदेवबुवा जोशी | ८३ |
| विठा डाळवाली | १९९ |
| विठु गुरव | ३८ |
| विठोबा शाईवाले | १७६ |
| विठोबा पारनेरकर | ३९ |
| विद्याधरी | २०३ |
| विनायकराव लिमये | १५५ |
| विश्वनाथबुवा | ४९ |
| विश्वनाथबुवा काळे | १५६ |
| विष्णुपंत छत्रे | ९२ |
| विष्णुपंत जोशी | १८२ |
| विष्णुपंत भातखंडे | २२ |
| विष्णुबुवा पलुसकर | १०१ |

| नांव | पृ. |
|---|---|
| विष्णुबुवा मटांगे ... | १५५ |
| विष्णुबुवा रेंडे ... | १२८ |
| वेणीप्रसाद ... ... | १८७ |
| व्यंकटनरशी ... ... | १९२ |
| व्यंकटमखी ... ... | १५ |

**श**

| | |
|---|---|
| शादिखां ... | ५६, १२४ |
| शार्ङ्गदेव ... ... | ४ |
| शिखरसेन ... ... | १६३ |
| शेख कमाल ... ... | ४० |
| शेख बाहुद्दिन बर्नी ... | ४१ |
| शेख शीरमहमद ... | ४४ |
| शेख सादुल्ला ... .. | ४२ |
| शंकर पंडित ... ... | ९१ |
| शंकर भैय्या ... ... | १८४ |
| शंकरबुवा धुळेकर ... | ९९ |
| श्रीकंठ ... ... | १६ |
| श्रीचद ... ... | ३१ |
| श्रीनिवास ... ... | १९ |

**स**

| | |
|---|---|
| सखाराम गुरव ... ... | १७७ |
| सखारामबुवा अलवारकर ... | ८२ |
| सखारामबुवा काशीकर ... | ४५ |
| सखारामबुवा मिरची ... | ४५ |
| सखावतखां ... ... | १६५ |
| सगनभाऊ ... ... | १३७ |
| सगुणा ... ... | १९१ |
| सज्जादहुसेन ... ... | १५३ |

| नांव | पृ. |
|---|---|
| सदारंग ... ... | १४१ |
| सदोबा आष्टेकर ... | ४७ |
| सनदपिया ... ... | १२९ |
| सनबह्मा ... . | १५३ |
| समोखनसिंग ... ... | १४० |
| सय्यद निजामोद्दीन .. | २८ |
| सरफूबाई ... ... | १९४ |
| सरूपी ... ... | १८९ |
| सलामचंद डागूर ... | ४२ |
| सवाई प्रतापसिंह ... | २१ |
| सालद अलीखां ... | १६५ |
| सादक अलीखा ... | १६३ |
| सादतखां ... ... | १६४ |
| सादिक अलीखां | ४४, १४९ |
| साबित अलीखां ... | १६० |
| साले रबाबी .. ... | १६४ |
| सावदखां धाडी ... | ४१ |
| साहेबजादा हैदरअलीखां ... | १६६ |
| सिद्धेश्वरी ... ... | २०३ |
| सुखदेवसिंग ... ... | १८० |
| सुखबदन ... ... | १८८ |
| सुरतसेनखां ... ... | ३७ |
| सुरदास ... ... | ३६ |
| सुलतानहुसेन शर्की ... | २९ |
| सुलेमानखां ... ... | ५६ |
| सुंदराबाई ... ... | १९३ |
| सूरजखां ... ... | ३० |
| सोदासखेन ... ... | ४० |

| नांव | पृ. |
|---|---|
| सोभलसेन ... ... | ४० |
| सोमनाथ ... ... | ११ |
| **ह** | |
| हकीम महंमद करम इमाम ... | १८ |
| हयाति ... ... | १६३ |
| हररग ... ... | १२२ |
| हरिदासस्वामी ... ... | ३१ |
| हसनखां ... ... | १४३ |
| हाजी विलायतअली ... | १७० |
| हाफीजखां ... | १५४, १६४ |
| हिरा ... ... | १९१ |
| हुसेनखां ... ... | १५४ |
| हुसेनबक्ष ... | १६०, १८७ |
| हृदय नारायण ... | १४ |
| हेमती ... ... | १९० |
| हैदरखां ... | ३९, १०७, ११६ |
| हैदरबक्ष ... ... | १६१ |
| होनाजी ... ... | १३४ |
| **क्ष** | |
| क्षेत्रमोहन स्वामी ... | १९ |

REFBK-0005327

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
स. नं.
ता.